# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

**विद्याशाखीय विशेष गाभा (DSC-A1) : मराठी (अभ्यासपत्रिका - १) : सत्र-१**

**विद्याशाखीय विशेष गाभा (DSC-A13) : मराठी (अभ्यासपत्रिका - २) : सत्र-२**

# अक्षरबंध

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**बी. ए. १**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१९
बी.ए./बी.कॉम. भाग-१ (अक्षरबंध : ऐच्छिक)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

☐ **प्रती : १०००**

☐ **प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

☐ **मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

☐ ISBN- 978-93-89327-27-4

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४ (महाराष्ट्र राज्य) (भारत)

★ दूरशिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यासमंडळ : मराठी

अध्यक्ष : **डॉ. दत्तात्रय मल्लू पाटील**
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

- **डॉ. रणधीर शिंदे**
  मराठी विभागप्रमुख,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. शहाजी जगन्नाथ पाटील**
  पद्मभूषण वसंतरावदादा पाटील कॉलेज, तासगाव,
  जि. सांगली
- **डॉ. सुभाष गणपती जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रभाकर पवार**
  मुधोजी कॉलेज, फलटण, जि. सातारा
- **प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर
- **डॉ. अरुण कृष्णा शिंदे**
  नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर
- **डॉ. उदय रामचंद्र जाधव**
  शहाजीराजे महाविद्यालय, खटाव, जि. सातारा
- **प्रा. डॉ. दासू वैद्य**
  मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
  विद्यापीठ, औरंगाबाद
- **डॉ. नंदकुमार विष्णू मोरे**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. गोपाळ ओमाण्णा गावडे**
  महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
- **श्री. के. एस. अतकरे**
  कैलास पब्लिकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यामार्फत जून २००७ पासून बहिःस्थ विद्यार्थ्यांची गरज ओळखून दूरशिक्षण योजनेचा उपक्रम हाती घेतला आहे. तसेच २०१८-२०१९ पासून अभ्यासक्रम बदललेला आहे. सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. सदरच्या योजनेअंतर्गत बी.ए.भाग-१ ऐच्छिक मराठी पेपर क्र. १ व २ (सत्र १ व २) या विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी 'अक्षरबंध' या पेपरचे स्वयं अध्ययनासाठी हे पुस्तक लिहिले आहे. अभ्यासक्रमातील वेगवेगळ्या घटकांचे स्पष्टीकरण सुलभ भाषेतून केल्यामुळे, विद्यार्थी वर्गाला विषयाची माहिती होण्यास अडचण राहणार नाही असे वाटते. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयं अध्ययन, प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, सारांश व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची यादी दिलेली आहे.

या पुस्तकामध्ये 'अक्षरबंध' या पेपरची माहिती दिलेली आहे. या पेपरमध्ये चार घटकांचा समावेश केलेला आहे. यामध्ये सत्र १ साठी निवडक भास्कर चंदनशिव कथा- उमाळं, जांभळढव्ह, तडा, वासना, लाल चिखल, पाणी, चित्रपट म्हणजे काय - चित्रपट : एक दृकश्राव्य, चित्रपट-माध्यमांतर, दिग्दर्शकाचा दृष्टीकोन, छायाचित्रण आणि चित्रपटाची कथा - पटकथा - संवाद इ. तसेच सत्र २ साठी 'बाकी सर्व ठीक आहे' लोकनाथ यशवंत (निवडक कविता) वृत्तपत्रीय लेखन तसेच उपयोजित व स्पर्धा परीक्षेसाठी लेखन - पत्रलेखन व आकलन इत्यादींचा समावेश या पेपरमध्ये केलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयन केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा राहिल्यास, प्राध्यापक व विद्यार्थी यांनी त्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी होईल.

शिवाजी विद्यापीठ, दूर शिक्षण अंतर्गत स्वयं अध्ययन निर्मिती करण्यासाठी मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. बी. शिंदे, व प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे, मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. डी. एम. पाटील, शिवाजी विद्यापीठ, मराठी प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांचे सहकार्य लाभले. दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

■ **संपादक** ■

**डॉ. सुनील चंदनशिवे**
चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**डॉ. सागर लटके**
कन्या महाविद्यालय, मिरज

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**अक्षरबंध**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **सत्र–१ : पेपर–अ** | |
| **डॉ. सुनील चंदनशिवे**<br>चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | १ |
| **डॉ. उदय रामचंद्र जाधव**<br>शहाजीराजे महाविद्यालय, खटाव | २ |
| **प्रा. बालाजी वाघमोडे**<br>कला व विज्ञान महाविद्यालय, आटपाडी, जि. सांगली | ३ |
| **डॉ. विनायक पोवार**<br>पतंगराव कदम कला व वाणिज्य महाविद्यालय, पेन, जि. रायगड | ४ |
| **सत्र–२ : पेपर–ब** | |
| **प्रा. प्रभाकर पवार**<br>मुधोजी कॉलेज, फलटण | १, २ |
| **प्रा. गिरीश मोरे**<br>राजश्री शाहू आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रुकडी | ३ |
| **डॉ. सागर लटके**<br>कन्या महाविद्यालय, मिरज<br>**डॉ. अरुण शिंदे**<br>नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, बिंदू चौक, कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. सुनील चंदनशिवे**
चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**डॉ. सागर लटके**
कन्या महाविद्यालय, मिरज

# अनुक्रमणिका


| | अभ्यासपत्रिका A1 सत्र–१ | पृ.क्र. |
|---|---|---|
| घटक १ | निवडक भास्कर चंदनशिव<br>कथा – १) उमाळं, २) जांभळढव्ह, ३) तडा | १ |
| घटक २ | निवडक भास्कर चंदनशिव<br>कथा – १) वासना, २) लाल चिखल, ३) पाणी | १७ |
| घटक ३ | चित्रपट म्हणजे काय<br>चित्रपट : एक दृकश्राव्य<br>चित्रपट – १) माध्यमांतर, २) दिग्दर्शकाचा दृष्टीकोन<br>३) छायाचित्रण | ४१ |
| घटक ४ | चित्रपटाची कथा – पटकथा – संवाद | ५७ |

| | अभ्यासपत्रिका A13 सत्र–२ | पृ.क्र. |
|---|---|---|
| घटक १ | बाकी सर्व ठीक आहे – लोकनाथ यशवंत<br>(निवडक कविता) | ७५ |
| घटक २ | बाकी सर्व ठीक आहे – लोकनाथ यशवंत<br>(निवडक कविता) | ९१ |
| घटक ३ | वृत्तपत्रीय लेखन | १०५ |
| घटक ४ | उपयोजित व स्पर्धा परिक्षेसाठी लेखन<br>अ) पत्रलेखन<br>ब) आकलन | १३५ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून, त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच, स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला, नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी क्रमिकपुस्तक, संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

घटक -१

# निवडक भास्कर चंदनशिव

**कथा : १) उमाळं**
**२) जांभळढव्ह**
**३) तडा**

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ उमाळ

१.२.२ जांभळढव्ह

१.२.३ तडा

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्ट्ये

प्रस्तुत घटकाचे अध्ययन केल्यामुळे आपणास -

☞ ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या जीवनातील द:ख, दारिद्र्य समजून येईल.

☞ ग्रामीण भागातील शेतकरी आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी किती कष्ट घेतो, हे समजून येईल.

☞ अपार कष्ट घेऊन, शिक्षण देऊन, नोकरदार बनविलेल्या मुलाकडून शेतकरी असणाऱ्या बापाच्या स्वप्नांना कसा तडा जातो हे कळेल.

☞ खेडेगावातील निरागस प्रेम, जीवनावरील उदात्त श्रद्धा असून ही ग्रामीण भागातील मुलीचे जीवन कसे उध्वस्त होते हे समजून येईल.

☞ भास्कर चंदनशिव यांच्या कथेतील भाषेचे वेगळेपण, प्रतिमा, प्रतिकाचे वेगळेपण समजून येईल.

## १.१ प्रस्तावना

मराठी साहित्यामध्ये इ.स. १९६० नंतर जे दोन वाङ्मयीन प्रवाह आले ते म्हणजे 'ग्रामीण' आणि 'दलित' या दोन वाङ्मय प्रकाराविषयी आजपर्यंत बरेच लेखन झाले आहे. 'ग्रामीण' आणि 'दलित' जीवन एकाच पार्श्वभूमीवर घडत असते. ग्रामीण भागात दलित माणूस गावकुसाबाहेरील जगात रहात होता तर ग्रामीण भागातील संवर्ण माणसाला दलित माणसाच्या सहकार्याशिवाय गावगाडा चालवता येत नाही. हे वास्तव असताना ही ग्रामीण जीवनावरील साहित्य वेगळे व दलित जीवनावरील साहित्य वेगळे निर्माण झाले ते आजतागायत जोमाने वाढत आहेत. नवनवीन बदलासह हे प्रवाह येत आहेत. परंतु १९७० पर्यंतच्या कालखंडापर्यंत तत्पूर्वीच्या कोणत्याच साहित्यिकाला हे प्रवाह एकच आहेत असे वाटले नाही. किंवा ग्रामीण जीवनातून दलित जीवन बाहेर काढता येणार नाही किंवा ग्रामीण जीवनाला दलित जीवन चित्रणाशिवाय परीपूर्णत्व नाही असे वाटले नाही. मात्र इ. स. १९८० पासून मराठी कथा साहित्यामध्ये प्रा. भास्कर चंदनशिव या गुणी कथाकाराने आपल्या कथेच्या रूपाने ग्रामीण आणि दलित साहित्याच्या संज्ञा एकमेकांत पूर्णपणे मिसळून त्यांच्यातील सवता सुभा नष्ट केला. ग्रामीण आणि दलित असा एकच साहित्य प्रकार निर्माण करण्याचे अजोड कार्य प्रा. भास्कर चंदनशिव यांनी केले.

महात्मा फुले यांच्यापासून आजपर्यंतच्या कांही हाताच्या बोटावर मोजण्या इतपत साहित्यीकांनी शेतकऱ्यांची दु:खे मांडली. अगदी आनंद यादवांच्या पर्यंत पाहिले तर यादवांच्या कथेला ग्रामीण जीवनाचा बाज आहे. परंतु विशिष्ट वैचारिक अधिष्ठान नव्हते. मात्र भास्कर चंदनशिव यांची कथा ही महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शेतकरी नेते शरद जोशी, क्रांतीसिंह नाना पाटील यांचा वैचारिक पाया घेऊन येते. भास्कर चंदनशिव खेड्यातील ग्रामीण दलित जीवनाचे घट्ट मिश्रण करून, त्यांच्या व्यथा, वेदना एकाच पातळीवरून मांडतात. त्यांच्या मनात शोषणाविरुद्ध अंगार फुलविण्याचे काम करतात.

भास्कर चंदनशिव स्वयंप्रेरनेने प्रेरित होऊन शेतकऱ्यांच्या जीवनाचे विविध अंगी चित्रण करतात.

मुळात त्यांचा जन्म, एका राबणाऱ्या शेतकरी कुटुंबात झाला. त्यामुळे त्यांनी शेतकरी जीवन अनुभवले, भोगलेले होते. शेतकऱ्यांचे दु:ख काय असते हे त्यांना माहित होते. त्यांच्या दु:खात ते सहभागी झाले होते. स्वत:च्या कुटुंबाने व त्यांनी ते दु:ख भोगले होते. म्हणून शेतकऱ्यांच्या दु:खाचा प्रचंड आविष्कार त्यांच्या कथेत घडतो. अशा एका दमदार ग्रामीण व दलित कथाकाराच्या कथेचा अभ्यास (घटक क्र. १ मधील 'उमाळं', 'जांभळढव्ह' आणि 'तडा') करावयाचा आहे.

## १.२ विषय विवेचन

भास्कर चंदनशिव हे मराठी साहित्यातील आजचे आघाडीचे ग्रामीण कथाकार साहित्यिक आहेत. त्यांनी आपल्या साहित्यात शेतकरी जीवनाची संकल्पना मांडली. शेती, शेतकरी, शेतमजूर यांच्या संदर्भात मूलगामी परिवर्तनाला दिशा देणारा शेतकरी जीवनाचा विचार यांनी आपल्या साहित्यात प्रकर्षाने मांडला. खेड्यातील शेतकरी जीवन त्यांचे दारिद्र्य दु:ख, त्यांच्या व्यथा, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची हेळसांड, तसेच खेड्यातील प्रामाणिक उदात्त, निस्मिप्रेम. नियतीच्या फेऱ्यात अडकलेल्या स्त्रियांची, मुलींच्या जीवनाची शोकांतिका, शेतकऱ्याच्या इच्छा आकांक्षा, त्यांच्या मनाला जाणारे तडे, त्यांची जीवनाची उध्वस्थ होणारी अवस्था, त्यांच्या कथेचा केंद्रबिंदू असतो. खेडेगावात नाडलेला, पिळलेला शेतकरी, दलित कष्टकरी शेतमजूर वर्ग अशा सर्व स्तरातील माणसांची कथा चंदनशिव लिहतात.

प्रस्तुत घटकात चंदनशिव यांच्या 'उमाळ', 'जांभळढव्ह' आणि 'तडा' या तीन कथांचा आशय व अभिव्यक्तीच्या अंगाने अभ्यास करावयाचा आहे. 'उमाळ' या कथेचा नायक 'बापू' १० वी ची (मॅट्रीकची) परीक्षा पास झाल्यावर साऱ्या गावाला कसा आनंद झाला त्याच प्रमाणे लेखकाच्या आईबापाला ही आनंद झाला. पण दुसरीकडून काळजी वाटली. आता याला पुढच शिक्षण कसं द्याव याविषयी चिंता वाटू लागली. परंतु 'बापूचा' बाप त्यांच्या शिक्षणासाठी हाडाचं काडं, रक्ताचं पाणी करून  तो बापूला शिकवितो. त्याला महिन्याकाठी उसनं पासनं करून प्रसंगी कामाचा परंतु दिसायला थोडा 'बेडब' खबुक्या बैलाला विकून लेखकाला बापूचा 'बाप' पैसे पाठवितो. अशी शेतकऱ्याच्या मुलांची शिक्षणाची परवड चंदनशिव चित्रित करतात. तर 'जांभळढव्ह' मधील कथानिवेदका शेजारी रहाणारी 'पबी' लहाणपणापासून निवेदकाबरोबर खेळायची अभ्यासासाठी एकत्र यायची. वयाच्या वाढीबरोबर त्यांचे एकमेकांचं प्रेम जुळते फुलते. पुढे पबीची शाळा सुटते. 'बापू' ही पुढच्या शिक्षणासाठी गाव सोडतो. इकडे पंबीच्या जीवनात अनेक संकटे येतात. येणारी संकटे पेलून बापूवर उदात्त प्रेम करणाऱ्या पबीच्या जीवनाचा शेवट शोकांत होतो. तर आजकालची मुलं आणि सुना खेडेगावातील आपल्या आई बापाला कशी वागणूक देतात याचे चित्रण 'तडा' नावाच्या कथेत केले आहे. आयुष्यभर पै पै करून होतं नव्हतं ते विकून, पोराला शिकवून, औरंगाबादला नोकरी करणाऱ्या तात्या सानपच्या

मुलाने तात्याच्या स्वप्नांना तडा कसा दिला याचे चित्रण प्रस्तुत कथेत येते. निवडक भास्कर चंदनशिव यांच्या 'सहा' कथांपैकी वरील तीन कथांचा अभ्यास करून आशय, अभिव्यक्ती (भाषा शैली, प्रतिमा, प्रतिके) व्यक्तिचित्रणे त्यांचे स्वभाव विशेष, प्रसंगचित्रणे इ. सह सविस्तर आढावा घेऊया.

## ❑ लेखक परिचय

प्रा. भास्कर तात्याबा चंदनशिव हे मराठवाड्यातील एक उत्तम ग्रामीण कथाकार म्हणून साऱ्या महाराष्ट्राला त्यांची ओळख आहे. मराठी ग्रामीण कथा आणि दलित कथा यांची सिमा रेषा पुसुन टाकणारा एक ग्रामीण कथाकार भास्करचंदनशिव यांचा जन्म उस्मानाबाद जिल्हा कळंब तालुक्यातील हासेगाव (केज) येथे १९४५ साली झाला. एका राबणाऱ्या, ग्रामीण कुटुंबातून आलेला ह्या ग्रामीण कथाकाराला आपल्या शिक्षणासाठी भरपूर कष्ट घ्यावे लागले, त्यांचे प्राथमिक शिक्षण हासेगावला झाले. नंतर माध्यमिक शिक्षण कळंबला झाले. तर महाविद्यालयीन शिक्षण अंबाजोईला झाले. शिकत असतानाचा १९७० साली चंदनशिव यांनी कथालेखनाला सुरूवात केली. दलित साहित्याचे मुखपत्र असणाऱ्या 'अस्मितादर्श' या मासिकाने दलित जाणिवेच्या कथालेखनासाठी 'आण्णाभाऊ साठे कथा लेखन' स्पर्धेत 'मसणवाटा' नावाच्या कथेला पहिलं पारितोषिक मिळालं होतं. १९७० पासून कथा लेखन करणाऱ्या, भास्कर चंदनशिव यांचा दहा वर्षांनी १९८० ला 'जांभळढव्ह' नावाचा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. पुढे ते मराठवाड्यातील नावाजलेल्या शिक्षण संस्थेत 'वैजापूर' येथील विनायकराव पाटील महाविद्यालय, 'बलभीम' महाविद्यालय बीड या ठिकाणी प्राध्यापक म्हणून काम करीत होते. गेली ३० वर्षे अध्ययन क्षेत्रात कायरत असणारे, प्राध्यापक चंदनशिव आज सेवानिवृत्त आहेत.

१९८० पासून आज पर्यंतच्या कालखंडात त्यांनी 'जांभळढव्ह' (१९८०) मरणकळा (१९८३), आंगारमाती (१९९१), नवी-वारूळं (१९९२), बिरडं (१९९९), माती आणि मंथन (२००१), माती आणि नाती (२००२) भूमि आणि भूमिका (१९९२), रानसय ग्रामीण आत्मकथन, गंध खुणा, गाथा आकलन आणि आस्वाद ज्योती म्हणे, सगणभाऊच्या लावण्या इ. विपुल साहित्य निर्मित केली आहे. अशा तऱ्हेचा त्याचा कथा वाङ्मयातील व इतर साहित्य प्रकारातील प्रवास असून, त्यांनी आपली लेखन विषयक भूमिका आपल्या 'भूमी आणि भूमिका' या पुस्तकाच्या रूपाने विषद केली आहे.

चंदनशिव यांच्या कथांचा आस्वादानाच्या पातळीवरून अभ्यास करताना, आपल्या असे लक्षात येते की, चंदनशिव 'जांभळढव्ह' या कथा सम्रगहातील कथापासून १९९९ साली प्रकाशित झालेल्या 'बिरंड' या कथासंग्रहातील कथा पर्यंत ग्रामीण जीवनातील बदलते वास्तव चित्रण करत आले आहेत. १९८० पर्यंतच्या सर्व कथा आशयाला फाटा देऊन, ग्रामीण जीवनाचे प्रचंड वास्तव, दारिद्र्य, उपासमार, शोषण, दमन, निसर्गाची अवकृपा, दुष्काळामुळे होणारे शेतकऱ्यांचे हाल, बेकारी, शेतकऱ्याच्या पर्यंत न

पोहचलेले शिक्षण, त्यांच्या मुलाची शिक्षणासाठी होणारी परवड या साऱ्या विषयावर चंदनशिवांनी परिवर्तनवादी विचार धारेतून कथा लिहिली आहे. त्यांची कथा ही आजवरच्या कथेपेक्षा, निश्चित वेगळी आहे. आशय, अभिव्यक्तीच्या अंगाने तर ती धारदार आहे. थोडीशी गुढ वाटली तरी, मानवी मनाचा ती आंतरशोध घेते. खोल डोहात बुडून, शेतकरी जीवनाच्या दु:खाचा तळ शोधते आणि शेतकऱ्यांच्या दु:खाचा वेध घेते.

## १.२.१ उमाळ

### ❑ आशय

**'उमाळं'** भास्कर चंदनशिव यांच्या १९९९ साली प्रकाशित झालेल्या ''बिरडं'' नावाच्या कथा संग्रहातील 'उमाळं' ही कथा असून कथेचा नायक 'बापू' पूर्वीची मॅट्रीक सध्याची १० वी परीक्षा पास होतो. एका शेतकरी, राबणाऱ्या कुटुंबातील एक मुलगा 'बापू' दहावीची परिक्षा पास होतो. म्हणजे साऱ्या गावालाच अभिमान आणि कौतूक वाटते. तसे बापूच्या आई वडीलांनाही आनंद होतो. दहावीपर्यंतची शाळा जवळच्या कळंबात झाल्यामुळे त्याचे काहीचं वाटलं नव्हतं. परंतु आता बापूला आंब्याला पुढच्या शिक्षणासाठी पाठवावं लागणार म्हणून 'बापू'च्या आई वडीलांना काळजी वाटू लागते. तरीही बापूची माय साऱ्या गावातल्या बायकांना आपल्या मुलांचे कौतूक पुन्हा पुन्हा सांगायची 'बाप' तर पोराला 'आफीसर' करणार हाय म्हणून साऱ्या गावाला सांगत होता.

आपली ऐपत नसताना बापूचा बाप (अण्णा) गावातील सखाराम मास्तर, यशवंत मास्तरच्या मदतीने, सल्ल्याने बापूला आंब्याला (म्हणजे आंबेजोगाईला) कॉलेजला पाठविण्याचे ठरवितात. तेव्हा पासून बापूची कापडं, तिथे जाऊन, हाताने करून खाऊन, कॉलेज करण्यासाठीच्या सर्व सूचना त्याला त्याची आई देते. नव्हे तर पीठ मीठ, कपडेलत्ते, पेटी याची सारी तयारी करता करता बापूला आपल्या गरीबाची जाण ठेवायला सांगते. इतर पोराच्या नादी न लागता शिक्षणावर ध्यान देण्यास सांगते. तर अण्णा पैशाची जुळणी करता, करता मेटाकुटीला येतो. परंतु पोरांचे पुढच्या शिक्षणाचे गोंडस् रूप अण्णाला दिसत असते. एक दिवस 'बापू' आंब्याला जायला निघतो. गावातील मास्तर आई वडील यांचा आशीर्वाद घेऊन बापू 'आंब्याला शिकायला येतो.

'बापू' आंब्यात रोज हाताने करून खाऊन कॉलेज करत होता. आईने पीठ मीठ तीखट दिलं होतं. प्रसंगी महिन्याकाठी खर्चायला पैसे देत होते. गावाकडून पत्र येत. गावाकडची लहान लहान भावंड पत्र लिहून 'बापूला' गावाकडची सर्व खुशाली कळवित होती. परंतु गावाकडच ध्यान आलं की बापूचं मन कॉलेज लागत नसे. गावाकडील बांडी गाय, तिला झालेलं पांढर फेक गोऱ्ह, नदीकाठची कलमी आंब्याची झाडं चांगलीच मोठी झालेली, धनगराच्या शेरडानी शेडं खुडलं म्हणून धनगराचं आणि अण्णांच झालेलं

भांडणं असं सर्व गावाकडचं, लहान भावडं आपल्या मोडक्या अक्षरात लिहून कळवित होती. तसं बापूचं मन आता शहरात कॉलेजात रमेना परंतु अण्णांची आईची गरीबी दूर करण्यासाठी बापू पोटाला चिमटा देऊन शिकत होता.

बापूचा अण्णा, शेतीनिष्ठ, शेती, माती, बैलं, म्हैशीवर जीवापाड प्रेम करणारा होता. परंतु बापूच्या शिक्षणासाठी दिसायला बेडब पण कामाला खमक्या 'खुबक्या' बैलाची विक्री करून, त्यातील १०० रु. बापूला पाठविले जातात, त्याचे सारे वर्णन पत्रातून बापूला कळते. तेव्हा बापू म्हणतो, ''त्या दिवशी दिवसभर करमलं नायं'' सारखा डोळ्यापुढं खबुक्या दिसायचा, दिसायला व्हंडा पण कामाला लय रूबाबदार व्हता. लेखक, लेखकाची माय, अण्णा, शेतमळा, बैल, म्हैस यावर जीवापार प्रेम करायचे, त्यांच्या जाण्याने विकण्याने मरणाने मायबाप फारच दु:खी व्हायचे. बापूही व्हायचा, तो म्हणतो, 'ही शाळा सोडावी, आणि खाटकाला विकलेला, खबुक्याला सरळ जाऊन घरी आणावा असे वाटे.

अण्णांचा तर जीव अडकित्यात सापडल्या सारखा झाला होता. एकीकडे पोराचं शिक्षण आणि जीवापाड जपलेली जनावरे, शेतीवाडी हे मोडून अण्णा बापूच्या शिक्षणाला पैसे पुरवितो. त्यामुळे शहरात शिकत असणाऱ्या बापूचा जीव आई-वडीलांच्या अपार कष्टामुळे तीळ तीळ तुटतो. एक दिवस पुन्हा पत्र येते. 'बापू' पैशाची व खबुक्याची सारखी काळजी करू नको. कालच हरण्या गाईला गोऱ्हा झाला. अगदी खबुक्या सारखाच दिसतो. त्याचे नाव खबुक्याच ठेवूया का? असे आई अण्णा विचारतात. असे हृदयद्रावक, मन हेलावून सोडणारे वर्णन वाचताना 'बापूच्या' डोळ्यातून अश्रूच्या धारा लागतात.....

## १.२.२ 'जांभळढव्ह'

'जांभळढव्ह' ही कथा चंदनशिवाच्या पहिल्या कथासंग्रहातील शिर्षक कथा आहे. अत्यंत उत्कृष्ट खेडेगावातील उदात्त निस्मि, मनमोकळं प्रेम व्यक्त करणारी आणि शेवट शोकांत, अंतर्मुख करणारा, अशी कथा आहे.

कथेचा नायक (कथा निवेदका) च्या शेजारी रहाणारी कथेची 'नायिका' पबी लहानपणापासून निवेदकाबरोबर खेळायची. अभ्यासासाठी एकत्र यायची. वयाच्या वाढी बरोबर एकमेकांचे प्रेम जुळते. वयाबरोबर ते वाढते, फुलते, पुढे मात्र पबीची शाळा सुटते. निवेदकासोबत अभ्यासाच्या निमित्ताने एकत्र येण्याचे दिवस ही संपतात. पबीला आपल्या चुलत्याच्या घरची गुरं, राखावी लागतात. कधी कधी 'बापू' ही घरची जनावरं जांभळढव्हाकडे घेऊन जातो. पबीची तिथं भेट होते. तिथेच त्यांचे प्रेम फुलू लागते. बापू उच्च शिक्षणासाठी परगावी जातो. कांही दिवसानी परत येतो. तेव्हा पबीचे जीवन उध्वस्थ झालेले असते. वडीलांचे निधन होते. चुलत्याची गुरंढोरं राखावी लागतात. एवढेच काय सख्खा चुलता असूनही तो पबीवर अत्याचार करतो. शेवटी एका वय झालेल्या म्हाताऱ्या बरोबर 'पबीचे' लग्न लावून देवून,

त्याच्या कडून ५०० रुपये घेतो. त्यातही जीवन सुखी करावं म्हणून पबी जीव रमविण्याचे प्रयत्न करते. परंतु म्हातारा तिला मुलाबाळाचे सुख देऊ शकत नाही. अशी ही आपली करूण कहाणी 'पबी' बापूला सांगताना म्हणते ''बापू माणूस चोखलेली कोय फेकून तरी देते. पण मुड्यानं सरणाकडे तोंड करून बसलेल्या, थेरड्याकडून पाचशे रुपये घेऊन मला जन्माची त्याच्या गळ्यात बांधली. पुढे ती म्हणते, ''बाप्या लहानपणी झालं ते झालं नशीबानं त्याला आपल्या गळ्यात बांधलय तर करावा संसार, भरवावं गोकूळ सुखात रहावं. पण म्हाताऱ्याचं पुरुषतत्त्व संपलेले'' आता आपली यातून सुटका नाही म्हणून 'पबी' म्हणते ''बापू मला या नरकातून काढ, मला कुठ बी घेऊन चल किंवा मला वाट दाव, कुठंबी एखाद्या मसनात ने अगर कुंटणखान्यात ने'' अस म्हणून पबी डोळ्याला पदर लावून जाताना म्हणते ''बापू जाते मी, पाणी मातर तुझ्याच हातानं पाज'' शेवटी पबी जांभळढव्हच्या साक्षीने आपला जीव देते. अशी ही कथा वाचकाचे हृदय हेलावून सोडते. त्याला अंतर्मुख बनवून विचार करायला लावते.

## १.२.३ तडा

प्रस्तुत कथा ही चंदनशिवांच्या १९८३ साली प्रकाशित झालेल्या 'मरणकळा' या कथासंग्रहातील आहे. तात्या सानप आणि पारबती कष्टकरी शेतकरी कुटुंबाने आयुष्यभर पै-पै करून होतं-नव्हतं ते विकून, पोराला शिकवून मोठा नोकरदार केला. सध्या तो औरंगाबादाला नोकरी करतोय. 'बायको दोन मुलासह शहरात नोकरी करणाऱ्या पोरांच्या मुलांना बघावं. त्याची ख्याली खुशाली घ्यावी आणि शेतीवाडीच्या डागडुगूजीसाठी काय दिलं तर घेऊन यावं म्हणून तात्या सानप गावाकडचा रानमेवा अर्थात ताजा भाजीपाला, तुपाची बाटली, जे जे म्हणून शेतातील न्याव वाटले. ते बांधून पारबतीच्या सुचना ध्यानात घेऊन एका दिवसी पोराला सुनेला आणि नातवाला पहावं आणि काय दिलं ते घेऊन यावं म्हणून निघाला.

शेती, रानमाळ आपलं गाव, घर कधी न सोडून जाणाऱ्या तात्याना पारबत्ती एस.टी.त बसण्यापूर्वी बऱ्याच सूचना करते. एखाद्याच प्रवास सुरू होतो. एस्.टी. प्रवासात त्याला सहप्रवासी भेटतो. त्यांचे अनुभव ऐकत ऐकत बाहेरचा निसर्ग पहात एखाद्याचं औरंगाबाद शहरात तात्या सानप घेऊन पोहचतो. एस.टी. स्टॅण्डवर उतरलेला तात्या सानम सुधाकर, सुधाकर अशा हाका मारू लागतो. डोक्यावर ठेवलेली दोन बारकी ठिकी, गळ्यात उतरलेला रुमाल, खुब्यावर फाटलेला मळकटलेला सदरा, लांड्या धोतराचा खोचा मारलेला, तात्याची नजर साऱ्या आगारातून सुधाकरला शोधत होती.

तेवढ्यात लांबून दोन जोडपी येताना त्याला दिसतात. त्यात आपला सुधाकर आहे हे पाहून त्याचे काळीज सुपा एवढं होतं. शेवटी तात्या मोठ्या आनंदाने सुधाकरला बोलत असतो. परंतु सुधाकर त्याला मोजकेच उत्तर देतो. कारण शेजारी त्याचा मित्र, त्याची बायको होती. त्याला त्याच्या समोर आपल्या

गावंढळ बापाची लाज वाटत होती. तात्या आपला तोंडाचा फट्टा चालूच ठषवत घरात येतो. सुधाकरची बायको प्रभा सुद्धा तात्याला मोजकेच बोलते. तीला आपल्या गावंढळ सासऱ्याची लाज वाटते. मध्येच आपली मैत्रीण व आपल्या नवऱ्याचा मित्र सोडून गेलेचे दु:ख त्यांना होते. पण गावातून आलेल्या आपल्या बापाच्या निरागस भोळसर प्रेमाची त्यांना किंमत वाटत नाही. बऱ्याच वेळानं तात्याच्या लक्षात येते. तरी ही तात्या आपल्या गावाकडील सवयीप्रमाणे फ्लॅट संस्कृतीत रहातो. सून प्रभाला ते काही पटत नाही. शेवटी तो निघण्याच्या आदल्यादिवशी गावाकडच्या अडचणी पोराला सांगायला सुरवात करतो. बैल जोडीतील एक बैल म्हातारा झालाय. एक विकत घ्यावा म्हणतोय, हिरीचा गाळ काढावा लागतोय, तुझा धाकटा भाव भावजय फार दारिद्र्यात जगतात. त्याच्या करीता काहीतरी देईल म्हणून तात्या दोन दिवस राहिला. परंतु तात्याच्या स्वप्नाचा चुरडा झाला. सुधाकर एवढच म्हणाला ''नंतर पुढच्या दिवाळीला बघू'' तात्या दोन दिवसानी गावाकड रिकाम्या हातानं परत आला. आयुष्यभर काबाड कष्ट केलं. घासातला घास इकून शिक्षण केलं. हे सर्व आठवून तात्याने जेवण सोडलं. जेवणावरची त्याची वासनाच उडाली. शेवटी संध्याकाळी सर्व झोपी गेल्यावर, भरल्या अंत:करणाने पारबतीला आपली घडलेली कर्म कहानी सांगीतली आणि तात्या ढसाढसा रडायला लागला. आजकाळची मुलं आणि सुना खेडेगावातील आपल्या आई बापाला कशी वागणूक देतात याचे अस्वस्थ करणारे चित्रण 'तडा' या कथेत केले आहे.

## ❑ अभिव्यक्ती :-

वरील कथाचा आशय पाहिल्यानंतर अभिव्यक्तीच्या अंगाने अभ्यास करावयाचा आहे. एखाद्या कथेचा आस्वाद घेताना, त्यातील घटना, प्रसंग, वातावरण निर्मिती, व्यक्तिचित्रण, भाषा, शैलीच्या अंगाने तो आस्वाद घ्यावा लागतो.

## १. घटना, प्रसंग चित्रण आणि वातावरण निर्मिती :-

प्रा. चंदनशिव यांच्या कथेत घटना, प्रसंग आणि वातावरण निर्मिती या तिन्ही गोष्टी एकमेकांना घट्ट पकडून ठेवतात. कथेत प्रसंगाचे चित्रण हुबेहुब करतात. शिवाय प्रसंग चित्रणातील सामर्थ्य एवढे आहे ती घटना तो प्रसंग ते वाचकाच्या डोळ्यासमोर उभा करतात. 'उमाळं' कथेतील गावाकडील खबुक्या बैल विकल्यावेळच्या प्रसंगाचे चित्रण वाचकाच्या डोळ्यासमोर साक्षात उभा करतात. ''कालच्या सनवारी माया लहान भावाचं पत्र आलं, सगळं काही ठीक असल्याचं त्यानां सांगितलं होतं, आम्ही सगळे नेमाने शाळेत जाताव मनून लिहिलं व्हतं. अण्णा मात्र सगळ्याची आठवण करत्यात मनून सांगीतलं व्हत. खबुक्या विकला तवा अण्णा तुमची सई करून रडत व्हतं. अन् मायनं सांगितलंय. खबुक्या इकल्याच लई मनाला लावून गेऊ नकु. आपल्या हरण्या गाईला कालच गोऱ्हा झालाय'' किंवा जांभळढव्ह मधील

प्रसंग, कथा निवेदक आणि कथेतील नायिका 'पबी'च्या भेटीचे चित्रण ''पबी नवी कोरी रंगाची चिरडी नेसून आलेली, पोपटी रंगाचं झांपर, तंग कास्टा घातलेला, पायाच्या उघड्या जांभळासारख्या टचटचीत पोटऱ्या, टकुऱ्यावरून खानदानी आदबशीर पदर केसाच्या दोन एक बटा भुर्रभुर्रत्या, टकुऱ्यावर धुण्याची पाटी कमरेवर पाण्याची घागर.....''

''पबे कवाची वाट बघतोय गं.
..... निस्तीच गोड हासतीय,
पबे ये की,
..... आली.
'बस'
..... बसली.'

'पबे, त्वे बघ त्या जांभळीच्या फांदीवर व्हला कसा कातर घालतोय, त्ये डोलीत दडलेली राघु मैना.''

**'तडा'** कथेतील तात्या सानप औरंगाबद मध्ये नोकरदार असणाऱ्या पोराला त्याच्या बायकोला मुलाबाळाना पहावं आणि काही संसाराला उणं पुरं लागणारं, मागावं म्हणून औरंगाबादला एस.टी.ने निघाला आहे. कधी नव्हे ते तो आज एवढ्या मोठ्या लांबच्या प्रवासाला निघालाय. त्या प्रसंगाचे चित्रण -

''गाडी आली तसं तात्या सानप घाई करीत उठला. खांद्यावरची पिसवी सावरीत, दाराकडं पळाला अन आतमदी घुसून म्हागच्या सीटवर जाऊन बसला. पोरानी उचलून आणलेली पोत्याची ठिकी' त्यानं आतमदी वडून घेतली. खांदद्यावरची पिसवी मांडीवर घेऊन, जरा सिस्ताईत बसला. सामान यवस्तित ठेवीत जतावू सांगू लागला.

''सांच्या रानात जा. गुरा ढोराचं पाणी कांजी बघत जा.'' बरय, वाटं लावायला आलेला किस्ना खाली उभा ऱ्हाऊन बोलत व्हता. व्हय न्हाय करीत व्हता''

## ❑ व्यक्तिचित्रण (पात्रचित्रण) :-

भास्कर चंदनशिव यांच्या कथेतील व्यक्ति (पात्रे) ही दुःख दारिद्र्यात पिचलेली, कष्ट करणारी, नाडलेली, पिडलेली, शेतकरी, शेतमजूर अशी असतात. याशिवाय त्यांच्या कथेत येणारी स्त्री पात्रे ही प्रचंड शोषिक, शांत स्वभावाची राबराब राबणारी आपल्या पतीला, आई वडीलांना मदत करणारी, येणाऱ्या प्रसंगाला धीराने तोंड देणारी, जीवनात परिवर्तन घडवू पहाणारी असतात.

उदा. ‘उमाळं’ कथेतील **बापूचा ‘अण्णा’** बापूची दहावीची परीक्षा झाल्यावर त्याला एवढा आनंद झाला होता की, लेखक (बापू) म्हणतो ‘‘बापानं तर साऱ्या गावाला येडा आणला व्हता. समद्यांना फिरू फिरू सांगितलं व्हतं, पुढचं सारं आडाखं सांगून टाकलं व्हत. लेकाला लई मोठा हापीसर करायचं स्वप्न बाधलं व्हतं.’’ असा हा अण्णा वाचका समोर उभा रहातो. आपले जीवन बदलविणारा, परीवर्तन घडविणारा, त्यासाठी पडेल ते कष्ट उपसणारा, शेतावाडीवर जनावरांवर प्रेम करणारा प्रसंगी पोराच्या शिक्षणासाठी शेतीच्या कामासाठी चांगला असणारा खबुक्या बैल विकतो आणि पोराला शिकवून ऑफीसर बनविण्याचे स्वप्न बाळगतो. बापूची ‘माय’ ही बापूला आंब्याला जाताना सारखं जतावून जात सांगत असते. स्वत:ची काळजी घे, आपल्या नाचार दुबळ्या संसारात जे असेल ते तीने बापूला दिलं आहे. ती म्हणते ‘‘तुज्या त्या दोन फाटक्या चड्ड्या बी शिवून दिल्यात. उल्सक ठिगळ हाय. पावसापाण्यात घालीत जा. धुतलेलं वाळूस्तर नेसत जा. उगाच हिंडत फिरत जाऊ नको, आपली शाळा की अभ्यास’’ अशी माय लेखकाला संस्काराबरोबर अभ्यासावर लक्ष देण्यास सांगते. कष्ट, संस्कार, शिक्षणाबद्दलची आच तिच्या ठिकाणी दिसते.

**‘जांभळढव्ह’मधील ‘पबी’ :** ग्रामीण जीवनातील प्रामाणिक नेक मनाने बापूवर प्रेम करणारी, नियतीने येणारी सर्व दु:ख पेलून, जीवन जगू पाहणारी परंतु ते तिच्या नशिबात नसते. शेवटी जीवनाचा करूण अंत करून घेणारी, उदात्त विचाराची ‘पबी’ जाताना एवढेच म्हणते, ‘‘बापू जाते मी, पाणी मातर तुझ्याच हातानं पाज.’’ अशी ‘पबी’ वाचकाचे मन हेलावून सोडते. पबीचा शेवट शोकांत होतो हे कांही केल्या ‘पबी’ वाचकाच्या लक्षातून जात नाही.

**‘बापू’ :** राबणाऱ्या शेतकरी कुटुंबातून आलेला आपल्या बाल मैत्रीणीवर जीवापाड प्रेम करणारा, परंतु शिक्षणासाठी परगावी गेल्यावर इकडे ‘पबी’च्या जीवनाची वाताहत झालेली पाहून लेखक अस्वस्थ होऊन आपण ‘पबी’ साठी काहीच करू शकलो नाही याचे दु:ख त्याच्या मनाला असते.

**‘तडा’ :** या कथेतील **तात्या सानप** आपल्या पोटाला आयुष्यभर कष्ट करून पै-पै गोळा करून मुलाला शिक्षण देतो. पण आपला मुलगा आपल्या स्वप्नाला तडा देतो. हे त्याला सहन होत नाही. तो म्हणतो, ‘‘मायला टकुऱ्यावर वझं घेऊन हिंडलो. ज्यांच्या न्हाय त्यांच्या बांधाला हिंडून, भाजीपाला आणला. घासातला घास इकून सिक्सान केलं, पर बैलाचं नाव काढलं गप्पच, हिरीचं बोललं तरी मुकाचं’’ असा हा तात्या सानप औरंगाबादहून रिकाम्या हातानं आल्यावर आपल्याच पोराची अब्रू जाऊ नये म्हणून खोटं खोटं साऱ्या गावाला सांगतो. ‘‘लय चंगळ केली पोराकडं गेल्यावर’’ उगचं खोटं कौतूक सांगत, आतून झुरत होता. अन्नावरची वासनाच उडाली होती. असा तात्या सानप वाचकाला अस्वस्थ करून जातो. आजकालची मुलं सुना आपल्याच बापाला कशी आपमानित करतात त्यांच्या स्वप्नाचा चुराडा करतात. त्याची त्यांना लाज वाटते.

तर **'पारबती'** ही तात्या सानपची बायको ही शोषित आपल्या पोरा बाळावर जीवापाड प्रेम करणारी, काबाडकष्ट करणारी ग्रामीण भागातील असंख्य शिकलेल्या पोराची 'माय' वाटते.

## ❑ भाषाशैली :-

भास्कर चंदनशिव यांच्या कथेंत खास मराठवाडी बोली भाषेचा वापर केलेला आढळतो. मराठवाडी प्रदेश तेथील माणूस त्याचे आचार विचार, बोलणं, वागणं इ. गोष्टी जशा कथेत येतात. तसेच खास मराठवाडी बोली भाषेचा प्रभाव चंदनशिव यांच्या कथेवर आहे. मराठवाडी बोली भाषेचा ते खुबीने वापर करतात. उदा. 'उमाळं' कथेतील 'बापूला' शिक्षणाला आंब्याला पाठवताना त्याची माय दोन दिवस अगोदरपासून त्याला सारखं संस्कारी गोष्टी सांगत असते. ''शिकायचं ठरल्यापासून माय सारं सारं समजावून सांगत व्हती. आठवलं तसं बोलत व्हती. कुणाचं कुठ बाहीर आयकून आली की हालक व्हायची. काय बी मनात आणून गहिवरायची'' जतावू जतावू बोलायची पार रात पस्तोर बोलत ऱ्हायची. घरातला जुना तवा, दोन तांबे, एक ताट वाटी, ताटली, बांधता बांधता डोळ्याचं पाणी पुशीत हुंदका गिळीत बोलायची-

''बापू....

काय? माजी बी घाटी रुतत जायची गळा आवळल्यागत व्हायचं.

''इस्टूला सांभाळून पेटवित जा न्हायतर त्या घर मालकीनीला चूलच घालून दी मनाव''

## ❑ 'जांभळढव्ह' :-

'जाभळढव्ह' कथेचा नायक 'बापू' गावची शाळा संपली म्हणून आपली बाल मैत्रीण पबीला सोडून तालुक्याच्या गावी पुढील शिक्षणासाठी जातो. प्रत्येक रविवारच्या सुट्टीला गावी येतो. तेव्हा 'पबी' आणि 'बापू'चा बोलीभाषेतील संवाद पहा -

''आईतवारच्या सुट्टीला मी घरी यायचो. पहिल्यांदा तिची भेट व्हायची...''

''बाप्या कवा आलाच रं.....?''

''त्वा कवा बघितलचं.....''

''ते नव्हं का, आताच बघतेय.....''

तसं ती खळाखळा हासायची..... अन सजच बोलून जायची.

कळंबाला गेल्यापासून लईच बोलायचं शिकलाचं..... मी निस्तं, तिच्या हासण्यावर हासयचो. खिनभर तस्संच उभं, पबे त्वा शाळा सोडली जणू माहित असून बी काईतरी बोलावं म्हणून मी बोललो.

''व्हा वरीस झालं की?''

''का गं,''

''माय, मोप झालं मनली, कवर शिकतीच?......''

- ''**तडा**'' :-

'तडा' या कथेतील तात्या सानप औरंगाबाद येथे नोकरीला असणाऱ्या, आपल्या मुलाला भेटण्यासाठी आणि आपल्या संसाराला काही हातभार लावण्यासाठी काही थोडेफार पैसे मिळतील का? म्हणून तो पोराकडे औरंगाबद येऊन पोहचतो. एस.टी. स्टॅण्डवरच मुलगा, सून भेटतात. त्यांच्याबरोबर तात्या त्यांच्या घराकडे जातो. गावाकडं अत्यंत गरीबीत दिवस काढणाऱ्या तात्याला आपल्या पोराच्या अलिशान घरात प्रवेश केल्यानंतर-

''तात्या जरा थबकला कुलूप निघालं. भक्कम लाईटची कांडी झळाकली. त्यानं टकुऱ्यावरलं वझं उतरल न बोलवताच आत शिरला. सगळं परकं परकच वाटत व्हतं. चुकल्यागत भुलल्यागत झालं व्हतं. पलंगावर कसली तरी जाळी तंबूगत ताणून टाकली व्हती. मदी दोन लेकर खुशाल सशाच्या पिलागत घराघुर घोरत पडली व्हती. तात्या भान हरपून सारं बघत व्हता. गुहेतला लखलखाट बघाव तसं त्याला झालं व्हतं.''

वरील प्रकारची बोली भाषा वापरून चंदनशिव कथेच्या आशयाला अधिक जीवंत करतात. त्यातील पात्राला अधिक बळ देतात. कथा अधिक प्रवाही होते. माणसाची भाषा संस्कृती जीवन संस्कृती त्यातून प्रकट होते. माणसाचे विविध स्वभाव कळतात. अशा प्रकारे भास्कर चंदनशिव मराठवाडी, बोलीभाषेचा वापर मोठ्या खुबीने करतात. याशिवाय त्याच्या कथेला एक प्रकारची काव्यात्मकता असते. कथेची सुरूवात शेवट काव्यात्य शैलीत केलेला असतो. किंवा त्याच्या कथेत वाचकाची लींक कुठे तुटत नाही. वाक्य कुठे रेंगाळत नाही. उदा. 'जांभळढव्ह'मधील 'बापू'चा स्वत:शीच चाललेला संवाद, त्यांच्या कथेला एक प्रकारची लय असते. कवितेच्या वळणाची भाषा असते. तिच्यात एक प्रकारचा गोडवा असतो. त्यात पात्राचे मनोविश्लेषण ही घडते.

त्याच बरोबर प्रा. चंदनशिव यांची भाषा ही साहित्याची भाषा आहे. ती त्यांनी आपल्या खास मराठवाडी भाषेतून व्यक्त केली आहे. त्यांच्या कथेतील अनुभव भाषेला जन्म देतो. त्यांच्या कथेतील महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांच्या निवेदनात अर्थपूर्ण प्रतिमा आणि प्रतिकाच्या वापरामुळे त्यांची निवेदन शैली प्रभावी बनते. अशाप्रकारे प्रा. चंदनशिव यांनी आपल्या कथेत वेगळी व मराठवाडी बोलीभाषा, प्रतिमा, प्रतिके, काव्यात्मकता, मनाविश्लेषण इत्यादीचा वापर करून कथा प्रभावी सुंदर बनविली आहे.

## १.३ सारांश

भास्कर चंदनशिव यांच्या निवडक 'सहा' कथांपैकी तीन कथांचा अभ्यास आपण केला. यातील प्रत्येक कथा ही वेगळ्या विषयावरची कथा आहे. ग्रामीण भागातील शेतकरी आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी अपार कष्ट करतात. राबराब राबतात. आपल्याजवळ असेल नसेल ते सर्व विकून, पोटाला चिमटा काढून, आपल्या मुलांना शिकवतात. मुलगाही आपल्या गरीबीची जाण ठेवून शिकतो. त्यांच्या शिक्षणाची परवड कशी होते याचे अत्यंत समर्पक चित्रण **'उमाळं'** नावाच्या कथेत घडते.

तर **'जांभळढव्ह'** या कथेत खेडेगावातील एका तरूणीच्या निखळ, निरागस, प्रामाणिक, उदात्त प्रेमाचे कथाचित्रण करताना 'नियती'ने तिच्या जीवनात किती भयंकर दु:ख पेरले, 'पबा' नावाची ही तरूणी शेवटी आहे ते दु:ख भोगायला तयार असते. परंतु ते नियतीला मान्य नसते. शेवटी आपला लहानपणीचा मित्र 'बापू' ची भेट होते. आणि त्यांच्या जवळ आपल्या जीवनाची कर्मकहाणी सांगते. आणि आपल्या जीवनाचा शेवट करून घेते. अत्यंत ऱ्हदयद्रावक, जीवाला चटका लावणाऱ्या 'पबी'च्या जीवनाची कहानी 'जांभळढव्ह' मध्ये चित्रित केली आहे. वाचकाला ही कथा अंतर्मुख होऊन, विचार करायला लावणारी आहे.

आयुष्यभर पै-पै करून होतं-नव्हतं ते विकून पोराला शिकवून औरंगाबदला नोकरी करणाऱ्या तात्या सानपच्या मुलांने तात्याच्या स्वप्नांना कसा **'तडा'** दिला आणि आजकालची मुलं आणि सुना खेडेगावातील आपल्या आई बापाला कशी वागणूक देतात. याचे चित्रण 'तडा' या कथेत येते. तीन कथांचा आशयच्या अंगाने अभ्यास केल्यानंतर अभिव्यक्तीच्या अंगाने अर्थात त्या कथेतील प्रसंगचित्राणे व्यक्तिचित्रणे (पात्र चित्रणे), भाषा शैली, निवेदन शैली, प्रतिमा, प्रतिकांचा वापर, मराठवाडी बोलभाषेचा वापर, व्यक्तिचित्रणाचा मनोविश्लेतील बारकावा, काव्यात्मकता इ. अंगाने अभ्यास केला आहे. एकूणच भास्कर चंदनशिव यांची कथा खेडेगावातील ग्रामीण माणसाला केंद्रभूत मानून त्यांचे दु:ख दारिद्र्य, कौटुंबिक भावजीवन, पोराबाळाचे शिक्षण त्यासाठी वाटेल ते कष्ट घेणारे शेतकरी, निसर्ग शेती वाडी, काळी आई, जनावरे यांच्याशी त्यांचे असणारे आतूट नाते. आणि याच शेतकऱ्याच्या पोटी शिकून मोठी झालेली, मोठमोठ्या अधिकारपदावर काम करणारी पोरं आपल्या आई बापाला कशी वागणूक देतात. याचे चित्रण करणारी कथा अत्यंत समर्पक ग्रामीण जीवनाचे सखोल चित्रण करणारी आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

| | | | |
|---|---|---|---|
| ☞ चिरडी | : हिरवीसाडी, | ☞ सई | : आठवण. |
| ☞ व्हता/व्हती | : होता/होती, | ☞ हार्सेवायू | : आनंद. |

☞ पाणी कांजी : वैरणपाणी,
☞ ढाळज : सोपा,
☞ इस्टू : स्टोव्ह,
☞ कागद : पत्र,
☞ कवर : कुठवर,
☞ वटी येणे : पदरी येणे,
☞ ठिकी : लहान पोती,
☞ तालेवार : श्रीमंत,
☞ खुरप्या : शेतकरी,
☞ कह्याची : कशाची,
☞ सादळणे : वल्लीगार होणे,
☞ ढव्ह : डोह,
☞ उमाळं : पाझर फुटणे,
☞ गोऱ्हा : खोंड,
☞ नेन्ती : लहान,

☞ तोटारली : आडखळली.
☞ मेन चटलेले : तेलकटलेले.
☞ उलसक : थोडसं.
☞ ईख : विष.
☞ चिर्रकणे : दचकणे,
☞ तकीक : व्यवस्थीत.
☞ मोप : पुस्कळ.
☞ भाजून काढणे : लग्न लावून देणे.
☞ शेंडाबुडी : खाल पासून वरपर्यंत.
☞ थीटी : आखूड.
☞ हाबाडा : हिसका.
☞ 'तडा' : छेद जाणे.
☞ सवतेल : वेगळे.
☞ चितागती : काळजीत.
☞ खिनाभरानं : थोड्यावेळानं.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

### अ) योग्य पर्याय निवडा.

१. खेड्यातील निरागस प्रेमाचे भावव्याकूळ चित्रण कोणत्या कथेत येते.
*(अ) जांभळढव्ह (ब) पाणी (क) तडा (ड) वासना*

२. जांभळढव्ह मधील 'बापू' माध्यमिक शिक्षणासाठी कोणत्या गावी जातो?
*(अ) बीड (ब) कळंब (क) आंबा (ड) बार्शी*

३. 'उमाळ' कथेचा नायक 'बापू' मॅट्रीक नंतरच्या शिक्षणासाठी कोणत्या गावी जाणार आहे.
*(अ) कळंब (ब) औरंगाबाद (क) आंबला (ड) बीडाला.*

४. भास्कर चंदनशिव यांचा पहिला कथासंग्रह कोणता ?

*(अ)मरणकळा (ब) बिरडं (क) अंगारमाती (ड) जांभळढव्ह.*

५. बापूच्या वडीलांनी त्यांच्या शिक्षणासाठी कोणत्या बैलाची विक्री केली ?

*(अ) खबुक्या (ब) पाखऱ्या (क) चिमण्या (ड) हिऱ्या.*

६. तात्या सानपाचा मुलगा कोणत्या गावी नोकरीस आहे.

*(अ) कोल्हापूर (ब) औरंगाबाद (क) अंबाजोगाई (ड) कळंब.*

७. 'जांभळढव्ह' या कथेतील नायिकेचे नाव काय ?

*(अ) पुतळी (ब) तानी (क) पबी (क) चंपी.*

८. भास्कर चंदनशीव यांचा जांभळढव्ह कोणत्या साली प्रकाशित झाला.

*(अ) १९८२ (ब) १९९२ (क) १९९८ (ड) १९८०.*

९. 'उमाळं' कथेतील अण्णा 'बापू'ला कोणत्या मास्तरच्या सल्ल्याने आंब्याला पाठवितो.

*(अ) यशवंतमास्तर (ब) सिवराम मास्तर (क) बापू मास्तर (ड) राजे मास्तर.*

१०. बापूला अण्णांने किती रुपयाची मनिऑर्डर केली होती.

*(अ) १५० रुपये (ब) १०० रुपये (क) २०० रुपये (ड) २५० रुपये.*

११. 'अस्मितादर्श' त्रैमासिकाच्या वतीने आयोजित 'अण्णा भाऊ साठे' कथा स्पर्धेत प्रा. चंदनशिव यांच्या कोणत्या कथेला पहिला पुरस्कार मिळाला.

*(अ) जांभळढव्ह (ब) उमाळं (क) मसणवाटा (ड) तडा.*

१२. औरंगाबाद येथे नोकरी करणाऱ्या तात्या सानपच्या मुलाचे नांव काय?

*(अ) बापू (ब) यशवंत (क) सुधाकर (ड) भास्कर.*

१३. 'उमाळं' ही कथा कोणत्या कथासंग्रहातून घेतली आहे.

*(अ) जांभळढव्ह (ब) अंगारमाती (क) मरणकळा (ड) बिरडं.*

१४. तात्या सानपला एस.टी. स्टँडवर पोहचवायला कोण आले होते.

*(अ) किस्ना (ब) प्रभा (क) पुतळा (ड) रामचंद्र.*

१५. भास्कर चंदनशिव यांच्या कथा लेखनावर कोणाचा प्रभाव आहे.

*(अ) आनंद यादव (ब) महात्मा फुले (क) रा.र.बोराडे (ड) श्रीराम गुंदेकर.*

## १.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| *१. (अ)* | *२. (ब)* | *३. (क)* | *४. (ड)* | *५. (अ)* |
| *६. (ब)* | *७. (क)* | *८. (ड)* | *९. (अ)* | *१०. (ब)* |
| *११. (क)* | *१२. (क)* | *१३. (ड)* | *१४. (अ)* | *१५. (ब)* |

## १.७ सरावासाठी स्वाध्याय

❑ **दिर्घोत्तरी प्रश्न.**

१. खेड्यातील निरागस भाव, व्याकूळ प्रेमाचे चित्रण 'जांभळढव्ह' कथेमध्ये कसे केले आहे ते सविस्तर लिहा.

२. शेतकरी कुटुंबातील बापूच्या शिक्षणाची परवड 'उमाळं' या कथेत कशी चित्रित केली आहे हे साधार स्पष्ट करा.

३. तात्या सानपच्या स्वप्नांना कशाप्रकारे 'तडा' जातो ते 'तडा' या कथेच्या आधारे स्पष्ट करा.

४. 'जांभळ ढव्ह' या कथेतील 'पबी' च्या उद्धवस्थ जीवनाचे चित्रण करा.

५. 'तडा' या कथेतील तात्या सानपाचे स्वभावचित्र रेखाटा.

## १.८ संदर्भ पुस्तके

१. 'कथाकार भास्कर चंदनशिव', डॉ. मथु सावंत सुविद्या प्रकाशन, सोलापूर.

२. 'भास्कर चंदनशिव यांची कथा स्वरूप आणि विशेष', डॉ. सुनील चंदनशिवे शब्दाली प्रकाशन, पुणे.

३. 'निवडक भास्कर चंदनशिव', संपादक - इंद्रजित भालेराव, लोकवाङ्मय ग्रह प्रकाशन, मुंबई.

❀ ❀ ❀

घटक – २

# निवडक भास्कर चंदनशिव

**कथा : १) वासना**
**२) लाल चिखल**
**३) पाणी**

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ वासना

२.२.२ लाल चिखल

२.२.३ पाणी

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्ट्ये

भास्कर चंदनशिव यांच्या 'वासना', 'लाल चिखल' व 'पाणी' या कथा अभ्यासल्यानंतर आपणास,

☞ ग्रामीण भागातील दलितांच्या भयानक दारिद्र्याचे व त्यांच्या व्यथा-वेदनांचे वास्तव चित्र समोर येईल.

- ☞ दलित स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे वास्तव स्पष्ट होईल.
- ☞ शेतकरी समाजाच्या वाट्याला आलेल्या वर्तमान, जीव घेण्या परिस्थितीचे विदारक सत्य समोर येईल.
- ☞ शोषक व्यवस्थेविरुद्ध पेटून उठलेल्या, शेतकऱ्यांच्या तीव्र संतापाचे व आक्रमकतेचे स्वरूप स्पष्ट होईल.
- ☞ खेड्यातील दलित व सवर्ण यांच्यातील जातीय संघर्षाचे स्वरुप समजून येईल.

## २.१ प्रस्तावना

भास्कर चंदनशिव हे मराठवाड्यातील अस्सल, प्रतिभासंपन्न व संवेदनशील ग्रामीण-दलित कथालेखक आहेत. त्यांनी आपल्या कथांमधून शोषणग्रस्त शेतकरी, शेतमजूर, दलित, वंचित, पिडित यांच्या जीवनातील विदारक वास्तवाचे आणि त्यांच्या दु:ख दैन्याचे अतिशय प्रभावीपणे दर्शन घडविले आहे. मराठवाड्यातील खास बोलीभाषेतून या कथांचा आविष्कार झालेला असल्यामुळे, भास्कर चंदनशिव हे विशेष लक्ष्यवेधी लेखक म्हणून परिचित झालेले आहेत. त्यांचे कथाविश्व वैविध्यपूर्ण असून ते अनेक प्रश्न-समस्यांना आणि ग्रामीण-दलित समाजाच्या आंतरबाह्य जीवन वास्तवात नेमकेपणाने व कलात्मकतेने भिडणारे आहे.

भास्कर चंदनशिव यांना ग्रामीण-दलित समाजातील शोषितांबद्दल अपार कळवळा असल्यामुळेच सारख्याच ताकदीने त्यांच्या ग्रामीण-दलित कथा साकार झाल्या आहेत. १९६० नंतर सुरू झालेल्या या दोन स्वतंत्र साहित्य प्रवाहांच्या सीमारेषा त्यांच्या कथेने धूसर बनविल्या. एवढेच नव्हे तर हा सवता सुभा नष्ट करून ग्रामीण-दलित असा एकच साहित्य प्रकार प्रवाह निर्माण करण्याचे अजोड कार्य प्रा. भास्कर चंदनशिव यांनी केले. असे मत डॉ. सुनील चंदनशिवे यांनी 'भास्कर चंदनशिव यांची कथा' (स्वरूप व विशेष) या ग्रंथात मांडले आहे. थोडक्यता, भास्कर चंदनशिव यांची कथा साधारणपणे १९७० नंतरच्या ग्रामीण-दलित समाज जीवनाततील उलथा पालथीचा, घडामोडीचा अचूक वेध घेते. याचा प्रत्यक्ष त्यांच्या 'वासना', 'लाल चिखल' व 'पाणी' या कथांमधून येत राहतो.

## २.२ विषय विवेचन

ग्रामीण जीवनाशी सर्वार्थाने समरस होऊन भरस्कर चंदनशिव यांनी शेतकरी, शेतमजूर, दलित, उपेक्षित वंचित वर्गाचे वास्तव आपल्या कथांमधून अत्यंत प्रभावीपणे मांडले. तसेच ग्रामीण भागातील अडाणी-अशिक्षित, दलित स्त्रियांच्या वाट्याला येणारे अनेक प्रकारचे भोग आणि अनेकांच्या वासनेला

बळी पडणाऱ्या दलित तरूणींच्या उद्ध्वस्त झालेल्या, जीवनाचे भेदक चित्रणही त्यांनी समर्थपणे केले आहे. दलित स्त्रीकडे ते माणूस म्हणून पाहतात. अनेक बाजूंनी होणारे तिचे शोषण त्यांना अस्वस्थ करते. त्यातूनच ते शोषकांचे चेहरे निर्भिडपणे उघड करतात.

दारिद्र्य, भूक, उपासमार, लाचारी, आजारपण यामुळे आधीच जर्जर झालेल्या दलित स्त्रियांचे दु:ख एवढ्यावरच थांबत नाही, तर तिच्या अब्रूचा म्हणजे अस्तित्वाचाच घास घेण्याचे निर्दयी कृत्य करणाऱ्या प्रवृत्तींचीही त्यात नेहमी भर पडत असते. अशा अनिष्ट, अमानुष प्रवृत्तींना रोखण्याचे सामर्थ्य आजही आपल्या व्यवस्थेत नसल्याचे सूचनही भास्कर चंदनशिव आपल्या कथांमधून करतात. म्हणून त्यांची कथा वाचकांना विचार करायला लावते. अंतर्मुख बनविते आणि दलितच नव्हे तर समग्र दीनदुबळ्या स्त्रीवर्गाकडे सहानुभूतीने व मानवतेच्या दृष्टिकोणातून पाहायला लावते. त्यांच्या 'वासना' या कथेतून आपणास याचाच प्रत्यय येतो.

## २.२.१ वासना

दलित स्त्री जीवनावर वास्तव भाष्य करणारी भास्कर चंदनशिव यांची **'वासना'** ही कथा त्यांच्या 'बिरडं' (१९९९) या कथासंग्रहातील आहे. पुतळा ही महार जातीतील तरुणी आपल्या आजारी आईसाठी अन्न मिळविताना पुरुषी वासनेची शिकार होते. याचे भेदक व तितकेच हृदय हेलावून सोडणारे चित्रण 'वासना' कथेत केलेले आहे. गावोगावचे जमीनदार, धनदांडगे, सवर्णीय पैशाच्या आणि सत्तेच्या जोरावर गावातील गरीब, गरजू, पोटार्थी दलित समाजाच्या लाचारीचा निर्दयपणे फायदा घेऊन त्यांच्यावर पिढ्यान्‌पिढ्या कसा अन्याय-अत्याचार करीत आले आहेत या दाहक सत्याचे दर्शनही 'वासना' कथेतून घडते.

ही कथा पुतळा या दलित तरुणीची दुर्दशा स्पष्ट करते. महारवाड्यातील एका जीर्ण खोपटात पुतळा आपल्या आई सोबत राहते. दोन महिन्यांपासून तिची आई भागा म्हारीण औषधपाण्याला पैसे नसल्यामुळे अंथरूणावर खिळून मरणाची वाट पहात आहे. पुतळा आपल्या परीने तिची काळजी घेत असते. शेजारच्या केरू आत्याने दिलेले झाडपाल्याचे औषध देणे आणि दोघींच्या दोन वेळच्या भुकेची पूर्तता करणे एवढेच पुतळा कसेबसे करत राहते. परंतु परिस्थितीमुळे पोटाचा प्रश्न सोडविणेही पुतळाला अशक्य होते. अशातच मरणासन्न अवस्थेत असलेल्या भागाला सागुती खाण्याची वासना होते. दुकानकरुची वासना वाईट असल्याचे गंगू मावशी पुतळाला सांगते. म्हणून आईची ही वासना पूर्ण करण्यासाठी पुतळा धडपडते.

सागुती आणण्यासाठी पैसे नसल्याने 'तांब्या' गहाण ठेवण्याचा पुतळाचा विचार गंगू मावशी नाकारते व दुसऱ्या मार्गही सुचविते. दुसऱ्याच दिवशी गावातील जमीनदार आबा देसाई याच्या शेतात

म्हसोबाचा नवस फेडण्यासाठी डावरा असतो. चार खंड्या ज्वारी झाल्याच्या आनंदात आबा देसाईने चार बोकड कापून सगळ्या गावाला डावऱ्यासाठी बोलविलेले असते. महारवाड्यातील लहान-थोरांबरोबर पुतळाही सागुती आणण्यासाठी देसायाच्या शेतात जाते. तेथे दामा जाधव, सखाराम, यशवंत नाना, धनाजी, रामभाऊ, कारभारी पाटील, किसनी पवार तसेच रकमा धनगर अशी गावातील मंडळी आलेली होती. डावरा सुरू होताच आधी गाववाल्यांच्या पंगती बसतात. महारांना ताटकळत ठेवले जाते. त्यांच्या काकुळतीला येऊन वाढण्याबाबत याचना सुरू होतात व वाढण्याचे काम करणाऱ्या सखारामला पुतळा आपल्या आईची कैफियत सांगून 'सागुती'ची मागणी करते. त्याचक्षणी सखारामची विखारी नजर तिच्यावर पडते. आईच्या काळजीने ऊसाच्या सोत्रीगत झालेल्या पुतळाचे तारुण्य सखारामला बेभान बनविते. मनोमन त्याचे डावपेच सुरू होतात. त्याचा कावा लक्षात येऊन सुद्धा पुतळा निरुपाय बनते.

सखाराम तिच्या तामणात सागुतीचे पातेले ओततो. पुतळालाही सागुतीचा मोह अनावर होऊन ती मटनाची फोडे खाऊ लागते. पण आईची आठवण येताच ती मटनाच्या बोट्यांसह तांब्या भरून ठेवते. सखाराम तिच्याकडून झाडलोटीचे काम करवून घेतो. त्यातच अंधार पडतो. सर्वजण त्यापूर्वीच गावाकडे गेलले असतात. शेवटी पुतळा आनंदाने सागुतीने भरलेला तांब्या घेऊन एकटीच आईच्या ओढीने घाईने घरी जावू लागते. मनात भीती घेऊनच ती नदीपात्रात उतरते. तिच्या आधी धावत जाऊन दबा धरून बसलेला सखाराम अचानक तिच्यावर झडप घालतो. त्याच्या मनगटाचा चावा घेऊन पुतळी स्वत:ला वाचविण्याचा अयशस्वी प्रयत्न करते. अशाप्रकारे आईसाठी सागुती आणण्यासाठी गेलेली पुतळाच वासनेची शिकार बनते- आपली अब्रू गमावून बसते.

'खेड्यातील दलित स्त्रीला अब्रूच नसते' असे मानत आलेला सवर्णीय पुरुष समाज तिच्यावर सातत्याने पिढ्यान् पिढ्या अन्याय-अत्याचार करीत आला आहे. परंतु आजही दलित स्त्रीला त्याविरुद्ध तक्रार करण्याची हिंमत होत नाही. त्यातून तिने तसे धाडस केलेच तर तिला न्याय मिळण्याची शक्यता वाटत नाही. एकूणच तिची लुटली गेलेली अब्रू परत मिळू शकत नाही. हेच कटू सत्य 'वासना' या कथेतून स्पष्टपणे सूचित केलेले आहे.

स्त्री शरीराच्या वासनेने बरबटलेली पुरुषी मने कशी वागतील याचा कोणताच अंदाज लागणे शक्य नाही. वासनातृप्तीसाठी कामांध झालेला पुरुष जातीधर्म, नातीगोती, रितीरिवाज, नीतीमूल्ये, लहान थोरपण हे सर्व काही डावलून कोणत्याही थराला जाऊ शकतो, याचे दाहक व दर्ददायी चित्रण भास्कर चंदनशिव यांनी 'वासना' या कथेत केलेले आहे.

### २.२.१.१ प्रसंगचित्रण :-

'वासना' कथेत वेगवेगळ्या प्रसंगांचे चित्रण हुबेहूब, जिवंत आणि प्रत्ययकारी स्वरूपात आलेले

आहे. त्यातून भास्कर चंदनशिव यांच्या सूक्ष्म निरीक्षण शक्तीचा व घटना-प्रसंगांना नेमकेपणाने भिडण्याच्या सामर्थ्याचा प्रत्यय येतो. त्यासाठी आवश्यक असणारी वर्णनपरता, निवेदन, संवाद योजना आणि समर्पक भाषा या सर्व घटकांचा अनोखा मिलाफ साधण्याचे भास्कर चंदनशिव यांचे कसब नावीण्यपूर्ण, वेधक आणि वास्तव उभे करणारे असते. यादृष्टीने काही प्रसंगचित्रणे संस्मरणीय अशीच आहेत. आबा देसायाच्या शेतातील डावऱ्याचा प्रसंग पुढीलप्रमाणे उभा केला आहे.

''हुकूम सुटताच पळापळ झाली. दोघांदोघांनी एक एक हंडा खाली उतरला. झटक्यात पंगती बसल्या अन् मटनाची भगुनी रांगेरांगेतून फिरू लागली. बास बास म्हता पराती काठोकाठ भरू लागल्या. 'चला हूं' म्हणून सुरूवात झाली. फरा, फर्र फुरकं वाजू लागलं. रस्याचं वगूळ कोपराला भिडलं, काही जणांनी तर परातीच तोंडाला लावल्या. वाढणाऱ्याची तारांबळ उडू लागली. अन् चोखलेल्या नळ्या परातीच्या काठावर खटखटू लगल्या. सागुतीचा खमंग तिखट वास सुटताच पुढच्या कुत्र्याला काटकाने भेडवीत म्हांगा-म्हातारी पोरं मुंगीच्या पावलानं पुढं पुढं सरू लागली. सागुतीचा वास त्यांच्या नाकात वळवळत व्हता. घशातून सुटलेली लाळ पोटात आग पाडीत व्हती. अन् कळती-सवरती म्हातारी म्हारं आपल्या पोराला खुणावून 'अण्णा, दादा, आप्पा,' म्हणून हाका मारायला लावीत व्हती. पण कुणाच गाववाल्याचं लक्ष तिकडं जात नव्हता...' मटणाच्या धुंदीत कान बहिरे झाले व्हते. आपलंच गरदाड भरीत व्हते....''

पुतळाला पाहून सखारामची वासना कशी चाळवते, तो क्षणिक प्रसंगही भास्कर चंदनशिव यांनी अचूक टिपला आहे. त्यासाठी त्यांनी समर्पक, अन्वर्थक संवाद-निवेदनाचे उपयोजन केले आहे. तो प्रसंग पहा -

''अण्णा, च्यार दोन बोट्या टाकावं, माजी माय लई ज्यार हाय.'' छाती पदरानं दडवीत, वलसावलीला बसलेली पुतुळी डोळ्याचं अलगद पाणी पुशीत, जड कंठानं बोल्ली तसं ढळलेल्या छातीकडं बघून पाघळलेला सखाराम हसत बोल्ला,

''तसं नव्हं, आण्णा माझी माय निजूनच हाय. तिला सागुतीची वासना झालीया. तिचं सारं तोंड सुजून आलय... अन् सागुती.... सागुती करून तळमळत पडलीया....'' पुतुळीचं डोळं पुन्हा डबडबून आलं.

''पुतळे, वाढतो.... पण....?''

वाकून बोललेल्या सखारामचा खवचट सुस्कारा तिच्या तोंडावरच सुटला. पुतळी एकदम चमकली. त्याचा हेतू तिच्या कसबी मनानं हेरला.''

हा प्रसंग म्हणजे पुढील संभाव्य प्रसंगाची नांदी करणारा आहे. पुतळावर होणारा अतिप्रसंग भास्कर चंदनशिव यांनी तितक्याच संयमशीलतेने पण अतिशय परिणामकारकतेने चित्रित केला आहे.

''थांब पुतुळे!'' अंधारातून धाप लागलेला दबता आवाज पळत येऊन तिला भिडला. तिला कवळ्यात घेऊन करकचून आवळताच ती भेसूरपणे किंचाळली.... सारा अंधार फाटून चिंधड्या झाल्या. पुतुळी संतापलेल्या नागिनीगत कडकडून मनगटाला चावली. सारं कोरड्यास अंगावर सांडलं. ती आडवी पडून गडबडा लोळू लागली. साऱ्या झिंज्या इस्कटून गेल्या. पायाची आडी घालून ज्याला जपत व्हती, तीच जपणूक लुळी पडली. सारंच ढिलं सुटलं....

अंधारानं आंधळी झालेली पुतुळी अलगद उठून बसली अन् बसल्या जागीच रक्ताळलेल्या थरथरत्या हातानं वलसर चाचपू लागली.... नरम मऊ बोटी हाताला लागताच मुठीत आवळू लागली.... सुटलेलं लुगड न सावरता वाकून तांब्या हुडकू लागली.... अन् दाटत्या अंधारात कलसं पाखरू चित्कारून उडत गेलं....''

## २.२.१.२ व्यक्तिचित्रण :-

भास्कर चंदनशिव यांची कथा ग्रामीण समाजातील शोषितांचे वास्तव मांडते. त्यांच्या व्यथा, वेदना, परवड मांडून शोषकांची नानाविध रूपे समोर आणते. शोषणग्रस्त समाजाच्या प्रश्न समस्यांना भिडते. दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्ती, नियती या दुष्ट चक्रात सापडून पिचलेल्या, गांजलेल्या आणि अशा भणंग जीवनाला सामोरे जात हतबल, पराभूत झालेल्या समाज घटकांचेही चित्रण ही कथा प्रभावीपणे करताना दिसते. त्यामुळे त्यांच्या कथेतील व्यक्तिचित्रणे सर्वसामान्य, अतिसामान्य माणसांची असतात. ही माणसे किंवा पात्रे मानवी स्वभाव, वृत्तीप्रवृत्ती आणि कृती उक्तींचे दर्शन घडविणारी आणि त्या त्या समाजसमूहांचे प्रतिनिधित्व करणारी असतात. असे असूनही त्यांच्या कथांमधील अनेक व्यक्तिरेखा स्मरणीय व वाचकांच्या मनात घर करणाऱ्या ठरल्या आहेत.

प्रस्तुत 'वासना' कथेतील 'पुतळी' ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा असून ती जीवंत वेधक व उठावदार व्यक्तिरेखा आहे. तर भागा म्हातारी, केरू आत्या, गंगू मावशी, आबा देसाई, सखाराम, कारभारी, पाटील, धनाजी रकमा धनगर आदी गौण पात्रे आहेत. ती प्रसंगानुरूप व केवळ गरजेपुरती आली आहेत. 'सखाराम' हे व्यक्तिचित्र प्रातिनिधित असले तरी दुय्यम महत्त्वाचे आहे.

## २.२.१.३ पुतळा :-

'पुतळी' हे 'वासना' कथेतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे. ती तरूण असून कोणाही पुरुषाचे लक्ष वेधून घेणारे सौंदर्यही तिला लाभले आहे. महार जातीतील पुतळीला आजाराने अंथरूणाला खिळलेल्या

आईशिवाय अन्य कुणाचाही आधार नाही. दारिद्र्य, उपासमार व आईच्या काळजीने पुतळी ऊसाच्या सोत्रीप्रमाणे सुकून गेली आहे. ती आई भागाची सेवा सुश्रूषा करण्यासाठी सतत धडपडते. केरू आत्याने दिलेल्या झाडपाण्याचे औषध ती भागाला देत राहते. आजाराला उतार पडावा म्हणून ती जांभळढव्हाचा चारा निवदही टाकून येते. पण भागीचा आजार वाढतच जातो. तशातच तिला सागुती खाण्याची वासना होते. पुतळीला नवाच पेच पडतो. आईच्या वासनातृप्तीसाठी ती तांब्या गाण ठेवण्याचा विचार करते. गंगू मावशी तिला आबा देसायाच्या शेतात उद्या डावरा असल्याची माहिती देते.

पुतळी आपले शील, चारित्र्य धोक्यात आले आहे, हे ओळखून सुद्धा आईसाठी 'सागुती' घेऊन जाण्याच्या निर्णयापासून ढळत नाही. सखाराम नदीपात्रात तिची अब्रू लुटतो व निघून जातो. त्यानंतरही पुतळी वाळूत पडलेल्या मटनाच्या बोट्या मुठीत आवळून धरते. अंगावरील वस्त्रांची पर्वा न करता अंधारात तांब्या शोधीत राहाते. यातून पुतळीचे आई वरील नितांत प्रेम दिसून येते. आपल्या परीने शील शाबूत ठेवण्याचा निर्वाणीचा प्रयत्न करणारी पुतळी अपयशी, दुर्दैवी ठते. आईची वासना ती तृप्त करू शकत नाही. ती अडाणी अशिक्षित असली तरी तल्लख बुद्धीची  व चाणाक्ष दृष्टीची आहे. म्हणूनच सखारामचा कावा तिला तात्काळ कळून येतो. दारिद्र्य, लाचारी, जात व निराधारपण यामुळे पुतळीला आपली अब्रू, गमवावी लागते. आईच्या पश्चात तिचे भविष्यही पूर्ण अंधारमय असल्याचे जाणवत राहत. म्हणून 'पुतळी' ही व्यक्तिरेखा सहृदय वाचकांच्या मनाला चटका लावणारी आहे. तसेच ती उपेक्षित, वंचित दलित स्त्रीवर्गाचे प्रतिनिधित्व रणारीही व्यक्तिरेखा आहे.

## २.२.१.४ भाषाशैली :-

भास्कर चंदनशिव यांच्या 'वासना' या कथेत ग्रामीण-दलित जीवनातील धगधगते सत्य मांडणारी भाषा येते. कथेच्या प्रंरभापासून शेवटपर्यंत ते अस्सल बोलीभाषेचा वापर करतात. ही भाषा पात्रानुरूप असून प्रसंगपरत्वे वेगवेगळी वळणे घेणारी आहे. निवेदन, वर्णने, संवाद, वातावरण निर्मिती यासाठी त्यांनी योजिलेली भाषा साधी सहज, सोपी, चित्रदर्शी, काव्यात्मक आणि वाचकांच्या मनावर ठसा उमटविणारी असते. त्यांची भाषा दुःखितांच्या शोषितांच्या जगण्याला समूर्त करते. त्यांच्या भाषेतील प्रतिमा, वाक्प्रचार, दृष्टान्त एकूणच कथेला जिवंतपणा आणतात. उदा. 'वासना' कथेच्या प्रारंभी पावसाळी वातावरणाचे ते वर्णन करतात -

''दिवसानं पाय सोडलं, कोंडून टाकल्यागत आभाळ झाकाळून आलं. ढोणात मोट रिचावी, तसं भरून आलेलं आभाळ बुडातूनच गर्जत उठलं. फळीच्या फळी हाताला हात धरून वर वर सरकू लागली. भेदरलेला वारा पावसाचा वास पसरीत धडपडत पळू लागला. पावसाची मशीनगत त्याची पाठ तडकू लागली...

म्हारड्यातील कोपटं जीव धरून उभी व्हती. अन् पिसालेल्या वादळी पावसाचं भ्या त्यांच्या पोटात धडक्या घेत व्हतं. ती वाऱ्यानं हापकत व्हती. अन् पावसानं गळत व्हती. तीन-चार कोपटाच्या घोळक्यात भागा म्हाणीचं कोपटं दुकण्या कोंबड्यागत उभ्या उभ्या झुरणी लागलं व्हतं.''

भास्कर चंदनशिव यांच्या कथेत बोलीचे समृद्ध दालनच खुले झालेले असते. उदा. ''अन् येड्या सखारामाच्या डोळ्याची झुरळं पुतुळीच्या पायापासून वरवर सरकत गेली अन् छातीजवळच रेंगाळू लागली. तिचा शेलाटी बांधा म्हागून म्होरून न्याहाळू लागली. करकरीत गोऱ्या दंडाला डवचू लागली. गालावरून हळूवारपणे सरकत, तिच्या रेखीव डोळ्यात उतरली.' अशी काव्यात्म बनणरी भाषा वाचकांना खिळवून ठेवते.

कोंबड्यागत झुरणी लागणे, ऊसाच्या सोत्रीगत होणे, मोडकी घालणे, गरदाड भरणे, पाय भुईला न लावणे. सोनकिड्याच्या जळत्या ठिणग्या, अंधार फाटून चिंधड्या होणे, संतापलेल्या नागिनीगत कडकडून चावणे, अंधाराने आंधळी झालेली पुतळी- अशा प्रतिमा, दृष्टांत, वाक्प्रचार योजनेमुळे भास्कर चंदनशिव यांच्या भाषाशैलीला स्वतंत्र परिमाण लाभले आहे. त्यामुळे या कथेचे शिर्षक, प्रारंभ, मध्य व शेवट तसेच योजना, वातावरण निर्मिती, निवेदन वर्णने आदी अभिव्यक्ती विशेषांनाही समर्पकता लाभली आहे.

## २.२.१.५ समारोप

'वासना' ही दलित स्त्री जीवनातील भेदक वास्तवाचे दर्शन घडविणारी कथा आहे. ही कथा 'पुतळी' या दलित तरूणीची दुर्दशा मांडते. पुतळीची आई भागा म्हारीण म्हणजे दारिद्र्याची बळी ठरलेली दलित स्त्री आहे. दलित स्त्रीकडे समाजाने माणूस म्हणून पहावे; तिच्याबद्दल सहानुभूतीची भावना निर्माण व्हावी. असा किमान दृष्टिकोण वाचकांच्या मनातजागा व्हावा. अशी लेखकाची भूमिका या कथेतून सूचित होते. किंबहूना हा संस्कार उमटविण्याचे, बिंबविण्याचे सामर्थ्य 'वासना' कथेत असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

## २.२.१.६ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. वासना - इच्छा

२. सोत्री - चिपाड

३. सागुती - बोकड-बकरा यांचे मटन

४. इदूळ पस्तोर - आता पर्यंत

५. बोट्या - मटनाचे तुकडे (शिजलेले)

६. भगुनं – पातेले

७. निवद – नैवेद्य

८. गरदाड – पोट

९. डावरा – शेतात केलेले मटनाचे जेवण.

## २.२.१.७ वस्तुनिष्ठ प्रश्न.

१. ‘वासना’ कथेतील पुतळीच्या संघर्षाचे चित्रण करा.

२. ‘वासना’ कथेचा आशय स्पष्ट करा.

## २.२.१.८ योग्य पर्याय निवडा.

१. ‘वासना’ ही कथा भास्कर चंदनशिव यांच्या कोणत्या कथासंग्रहातील आहे?

*(अ) बिरडं (ब) मरणकळा (क) नवीन वारूळे (ड) जांभळढव्ह.*

२. ‘वासना’ ही कथा कोणत्या जीवनवास्तवावर प्रकाश टाकते?

*(अ) आदिवासी (ब) नागर (क) दलित (ड) ग्रामीण.*

३. ‘वासना’ कथेतील भागाला झाडपाल्याचे औषध कोणी दिले होते?

*(अ) केरू आत्या (ब) गंगू मावशी (क) रमा काकू (ड) पुतळा.*

४. ‘वासना’ कथेतील भागा म्हातारीच्या मुलीचे नाव काय होते?

*(अ) सुमी (ब) सोनी (क) तानी (ड) पुतळी.*

५. आबा देसायाला किती खंड्या ज्वारी झाली होती?

*(अ) सात (ब) दहा (क) चार (ड) सहा.*

❑ **उत्तरे :–**

१. (अ) बिरडं.

२. (क) दलित.

३. (अ) केरू आत्या.

४. (ड) पुतळी.

५. (क) चार.

## २.२.२ लाल चिखल

भास्कर चंदनशिव यांची 'लाल चिखल' ही शेतकरी वर्गाच्या जीवन वास्तवावर प्रकाश टाकणारी आशयघन व खूप गाजलेली कथा आहे. गेल्या दोन-अडीच दशकांपासून महाराष्ट्रात विशेषत: मराठवाड्यात अखंडपणे सुरू असलेल्या शेतकरी आत्महत्या सत्राचे मूळ शोधू पाहणारी ही कथा आहे. तसेच ही कथा शेतकऱ्यांच्या असंतोषातून व संतापाच्या उद्रेकातून भविष्यात होऊ पाहाणाऱ्या क्रांतीचा इरादाही देते.

'लाल चिखल' ही 'अंगारमाती' (१९९१) या कथासंग्रहातील कथा आहे. शेतकऱ्यांचा शेतीमाल बाजारात विकला गेला नाही. त्याला योग्य भाव मिळाला नाही. त्यामुळे शेतकऱ्याच्या मनात निर्माण झालेला व्यवस्थेबद्दलचा तीव्र संताप या कथेत व्यक्त होतो. हासेगावातील प्रामाणिक शेतकरी आबा हा काबाड कष्ट करून जगण्याचा प्रयत्न करतो. आपल्याच शेतात कष्टाने पिकविलेली टोमॅटो बाजारात न विकल्याने भ्रमिष्ट होतो व बाजारात आणलेली टोमॅटो तेथेच जमिनीवर ओतून त्यावर ओरडून नाचू लागतो. या कथेतील आबाच्या कृतीतून शेतकऱ्याच्या मनातील राग व्यक्त झाला आहे. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव व बाजारपेठ न मिळाल्याने भ्रमिष्ट झालेल्या शेतकऱ्याच्या जीवनातील प्रसंग वाचकांचे हृदय पिळवटून टाकतो. या निमित्ताने लेखक भास्कर चंदनशीर शेती, उत्पादित मालक, शासनाचा हमीभाव, बाजारपेठ अशा ज्वलंत प्रश्नाकडे आपले लक्ष वेधून घेतात.

'लाल चिखल' ही कथा शेतकऱ्यांचे शोषण आणि त्या शोषणाविरुद्धचा विद्रोह याविषयीचे चित्रण करते. स्वत: भूमीपुत्र असलेल्या कथाकाराने या कथेद्‌वारे शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडली आहे. ती कथा आजच्या अवस्थेत दलाल, आडते फायद्यात आणि शेतकरी कसे तोट्यात आहेत याकडेही लक्ष वेधून घेते. अशा या चित्तस्पर्शी कथेचे कथानक, त्यातील घटना प्रसंग, निवेदन, वर्णने यातून सामग्र शेतकरी जीवनाचे वास्तव चित्र साकार होते.

'लाल चिखल' या कथेचा निवेदक 'बापू' हा एका शेतकरी दांपत्याचा मॅट्रिकच्या वर्गात शिकणारा मुलगा आहे. कथालेखक भास्कर चंदनशिव हेच बापूच्या भूमिकेतून बऱ्याच कथांचे निवेदन करतात. बापूचे आई वडील कळंब येथील आठवडी बाजारात भाजीपाला विकून कुटुंबाचा निर्वाह करीत असत. सोमवार हा बाजाराचा दिवस. बापू हासेगाव हे कळंब हा प्रवास दररोज पायी करीत असे. जाता-येता तो वाचन करून आपला अभ्यास पूर्ण करीत असे. दरवर्षी वरचा नंबर मिळवत असूनही बापूला मॅट्रिकच्या वर्षाचे दडपण वाटत होते. सोमवारी बाजारामुळे अर्धी शाळा असे पण बापूला तो आपल्या मुळावरच असल्यासारखे वाटे. कारण त्या दिवशी त्याला बाजारात गावाकडून भाजीपाला घेऊन येणाऱ्या आई वडीलांसाठी जागा धरून ठेवावी लागत असे. शाळा सुटल्यावर बाकीची मुले-मुली आपापल्या घरी-गावी जात. बापूला आई-वडिलांना मदत म्हणून बाजारात भाजीपाला विकायला लागे. वर्गातील मुली बाजारात येत, याचा बापूला संकोच वाटत असे 'धंद्यात लाज बाळगू नये' असे शिक्षण त्याला

सांगत असत. एवढे वार्व कळंबात राहावे असे बापूला वाटत असूनही, परिस्थितीमुळे ते शक्य नसल्याचेही त्याला समजून चुकते. अशाच एक सोमवारच्या बाजाराचा अनुभव बापूने स्वत:च्या प्रत्यक्ष निरीक्षण व चिंतन-स्मरणाद्वारे साक्षात टिपला आहे.

बापू जागा मिळेल की नाही या धास्तीने दप्तराची पिशवी पाठीवर टाकून बाजारात जातो. मायने दिलेली भाकर गाववाला गिना काळे ती बापूला देतो. भाकरी दप्तराच्या पिशवीत कोंबून बापू मोठ्या प्रयासाने तीन ठिकाणी जागा धरतो. आई-वडीलांची वाट पहात असतानाच सटवा तेली त्याला सांतो, 'येड्या, तू हितंच तप घालीत बस. आरं म्हातारं मरणाचं वझं घिऊन बाजारात हिंडायलंय की... तुला जागा धरायचं सांगितलय की जणू...' - त्यावर दप्तर तिथेच ठेवून बापू आबा-मय कुठे दिसतात का ते न्याहाळू लागतो. मिरच्याच्या लाईतून माय दोन ओझी घेऊन येताना त्याला दिसते. ती कांदे व गवार घेऊन आलेली असते. आबाने दोन मोठ्या डाली भरून टोमॅटो आणलेली होती. पिकलेली टोमॅटो खराब होऊ नयेत म्हणून आबाने या दोन डाली कावड करून मोठ्या कष्टाने पाच-सहा किलोमीटर आंतर खांद्यावरून वाहिली होती. बापूला आबा-मायच्या कष्टाची, घरच्या ओढग्रस्त परिस्थितीची पूर्ण जाणिव आहे. संसाराचा गाडा नीट चालावा म्हणून आबा-माय, थोरला भाऊ, चार बैलं रात्रंदिवस राबतात. पण दोन वर्षांपूर्वी पडलेली न्हाणीची भींत बांधणे त्यांना शक्य झालेले नाही.

बाजारातही बापू पुस्तकातील दादाभाई नौरोजींचे बोल, जोशी सरांचे शिकविणे आठवून शेतकऱ्यांच्या वास्तव स्थितीचे चिंतन करतो. तो शेतकऱ्यांच्या शोषणाचा पुस्तकातील मजकूर वाचू लागतो. तो त्याला पटू लागतो. ''.....शेतकऱ्यांनी शेतात तयार करून आणिलेला एकंदर सर्व भाजीपाला वगैरे माल शहरात आणितेवेळी त्या सर्व मालावर म्युनिसीपालिटी जकात घेऊन सर्वतोपरी नाडिते... गाडीभर माळवे शहरात विकण्याकरीता आणिल्यास... गाडीभाडे अंगावर घेऊन त्यास घरी जाऊन मुलांबाळांपुढे शिमगा करावा लागतो... असले अधम कारभारी शेतकऱ्यांमध्ये पुढारी असल्यास.... शेतकऱ्यांची सुधारणा कशी होणार मरे!....''- स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतकऱ्यांचे हेच कायम असल्याचे बापूला अस्वस्थ करते. 'गोरा इंग्रज गेला पर काळ्या इंग्रजानं तसलंच पाऊल उचललं' - अशा मानसिकतेच्या पार्श्वभूमीवर 'लला चिखल' या कथेतील सर्व बारकाव्यांसह बापू बाजारात घडत असणाऱ्या घटना प्रसंगांचा वेध घेत राहतो.

वेगवेगळ्या ठिकाणी बापूने धरलेल्या जागांवर आबा टोमॅटो, माय कांदा तर बापू गवारी विकायला बसतात. आबा टोमॅटोची एक डाल उघडी ठेवून सगळ्या बाजारावर, माळव्याच्या रांगावर नजर टाकून पुटपुटतात, 'मायला जिकडं तिकडं लालेलाच हाय बाबा...' बाजाराचा अंदाज आल्यामुळे आबाचा चेहरा उतरुन जातो. तरीही उसन्या बळाने ते आरोळी ठोकतात, 'चला, चला... लाल टमाटी सस्ती लावली सस्ती...' - बाजारातील गर्दी वाढत जाते. गिऱ्हाईक येईल, डालीत हात घालून चेंडू दाबल्याप्रमाणे दाबून टोमॅटो अर्ध्या भावातच मागून निघून जात असे. आबाचा राग वाढत जातो. मायवर व बापूवर तो खेकसतो. पण गिऱ्हाईकाशी राग गिळून शांतपणे बोलतो.

बाजाराची वेळ संपत येताच टोमॅटोचे भावही दोन रुपये किलोवर उतरत बारा आणे केल्याची आबा आरोळी ठोकतो. ''चला बाराने किलोऽऽ... घ्या... खाऽऽ लाल लाल टमाटीऽऽ....''- पण आबाचा अवतार बघून गिऱ्हाईक हसत हसत पुढे निघून जाई. तरीही आबा चिडीला येऊन पुन्हा ओरडायचा, ''चला... बारा आण्याची आठ आणे... आण आणेऽऽ झालीऽऽ झालीऽऽ घ्या घ्या.'' एवढा दर कमी करूनही गिऱ्हायिक येत नव्हते. सायंकाळपर्यंत आबाची एक डाली टोमॅटो तशिच शिल्लक होती. पहिल्या डालीतील थोडेच टोमॅटो विकले होते. बाजार सुना सुना झाला तरी आबा हातात तागडे घेऊन बेभानपणे ओरडत होता. एवढ्यात एक गिऱ्हाईक येऊन चार-दोन टोमॅटो हातात घेऊन हुज्जत घालीत चार आणे किलोने पावशेर टोमॅटो मागते. तेव्हा मात्र आबाच्या साऱ्या संयमाचा, संतापाचा कडेलोट होतो. तो गिऱ्हायकावर कडाकन गरजतो, ''ये हायवानाऽ जिभीला हाड बसवून घे! चल ऊठ, पळ हितून....'' आबाचा हा रुद्रावतार पाहून गिऱ्हाईक मागे सरकत निघून जाते.

संतापाने बेभान झालेला आबा, '....चार आणे किलो... ईस पैस्या किलो... धा पैस्या, पाच पैस्या.... आरं फुकट घ्या की मनावं...'' असे म्हणत टोमॅटोच्या दोन्ही डाला खाली ओततो. लालेलाल टोमॅटोचा गुडघ्याएवढा रसरशीत ढीग होतो, आणि त्यावर मोठ्यान बोंब ठोकीत आबा ढिगावर कितीतरी वेळ नाचत राहतो - याप्रमाणे आशयाची घट्ट वीण 'लाल चिखल' या कथेच्या आरंभापासून ते शेवटपर्यंत कायम राहिलेली आहे.

## २.२.२.१ प्रसंगचित्रण :-

'लाल चिखल' या कथेतील प्रसंग ग्रामीण भागातील व्यक्तींच्या नित्य पाहण्यातील असेच आहेत. अनेकजण त्या त्या अनुभवातूनही जात असतात. शेतात पिकविलेला शेतमाल बाजारात आणून विक्री होईपर्यंत शेतकऱ्यांना खूप आटापिटा, संघर्ष करावा लागतो. प्रथमत: बाजारात जागा मिळविण्यासाठी आधी आलेल्या व्यक्तींशी विनयाने विचारणा करावी लागते. बापू या छोट्याच गोष्टीसाठी कसा धडपडतो, या प्रसंगाचे चित्रण भास्कर चंदनशिव जिवंत व वेधक निवेदन संवादातून करतात.

''म्या पुन्हा एकदा सम्दीकडं चक्कर टाकली.... एक मोकळी जागा हेरून तिथंच दप्तर टाकलं. आन् मेख ठोकणाऱ्या माणसाला म्या हाटकिलं, जवळ जात इच्यारलं,

'मामा, ही जागा खुलीच नं.....?'

'काय मांडायचंय?' त्याने माज्याकडं न बघताच गुरकल्यागत इच्यारलं.

'उल्सं माळवंय....' मी उभाच

'कोण गाव?' उगचच ताठत चालला.

मलाच चुकल्यागत वाटलं. न इच्यारता तसंच ‘खडं,-दगडं’ मांडून बसाया फायजी व्हतं. पर बोलणं डरकीत म्या बी जोर देऊन बोललो,

‘हास्यागाव...’

‘.......जरा पलीकडं सरून बसं.’ तवर तर म्या दगडं मांडून बसलो व्हतो.’’

हा प्रसंग बरेच काही सुचविणारा आहे. जशाच तसे वागायला समाजच भाग पाडायला शिकवितो, हे येथे ध्यानी येते. जागा मिळविण्याचा प्रश्न सुटला की शेतकऱ्याला आणलेल्या शेतमालाची घसा तोडून जाहिरात करावी लागते. हे शहाणपण सुद्धा बापूला शेजारी बसलेल्या अशिक्षित शेतकऱ्याकडूनच कळते. तो प्रसंग भास्कर चंदनशिव ठळकपणे साकार करतात.

‘‘ ‘का रं, माप हाय का किलूचं...’ शेजारच्या पावण्यानं मला हाक मारून हाटकिलं. माज्या जवळचा आर्धा किलू मागून घेतला. आन् त्याची गिऱ्हायकी म्या किनभर बघत बसलो. पावण्यानं गिऱ्हाईक वावरलं. आन् झाल्याली भवानी कपाळाला लावून आदबीनं बसला तसं म्या त्याला बोलत बोलत इच्यारलं.

‘.....आन् ह्या ह्याचं भाव कोण ठरवितंय वं....’

‘कोण कस्याला ठरवील. आपलं नशीब मानायचं आन् गप्प बसायचं....’ पावण्याननं बोलणं थांबवीत आरूळी ठोकली,

‘घ्या घ्या, हिर्वी मिर्ची, लवंगी मिर्ची.... घ्या.... सस्त लावली सस्त....’ भवानी झाल्यावर पावण्याला चेव आला व्हता. येगळाच हुरूप चढला व्हता.... आन् माज्याकडं बघून सांगत व्हता.

‘पोरा, मुका ऱ्हायलाच तर तसंच गठुडं गावाकडं न्यावं लागंल. बैलाला खाऊ गालावं लागंल... आरं बोललं त्यांच हुलगं इकत्यात, मुक्याचं गहू बी कुणी इच्यारीत नस्तंय....’ असं सांगत सांगतच त्यो उभा ऱ्हायला आन् कानाला हात लावून आरडायला-

‘‘घ्या, घ्या सस्तीची-मस्तीची. घ्या लवंगी मिर्ची.... हिरवी मिर्ची, हिर्वीऽऽ आलीऽऽ आलीऽऽऽ’ ’’

‘लाल चिखल’ या कथेतील शषवटचा प्रसंग तर, वाचकांचे अवधान सर्वार्थाने खेचून घेणारा आहे. भास्कर चंदनशिव यांच्या प्रतिभा सामर्थ्याचे, अन परमन-परकाया प्रवेश करण्याच्या अपूर्व शक्तीचेही या प्रसंगातून दर्शन घडते.

‘‘ ‘आठ आणे किलू.’ आबाचा तसलाच तार लावलेला आवाज गिऱ्हाईकानं चार-दोन टमाटी हातात घेतली.

'पर.... द्यायचं काय?' गिऱ्हायकानं खिसं चाचपून बघितलं तसं चिडलेलं आबा ढिसकारल्यागत झालं

'द्यायचं मंजी...?'

'सांगणं आठ आण्याचं, पर आखरीला किती घ्यायचं?' आबाच्या माथ्यावर भडका उडाला, कपाळाची शीर फरफरली. कानशिलं बघता बघता तापली. व्हट थरारल्यागत झालं. पर राग आवरून आबानं इच्यायलं.

'पावनं.. किती घ्यायचीत ?'

'सिस्ताईनं सांगितलं, तर पावशेर घेतली अस्ती....?

असं मनून त्याचं चार-दोन मोठी मोठी टमाटी उचलून ताजव्यात टाकली. आन् पिसवी धरीत त्ये गिऱ्हाईक बोललं.

'चार आणे किलोने धरा.'

'काय ?'

आबा पिसाळलं. डोळ्यातून ठिणग्या गाळीत उठलं सम्दं आंगच थरारलं. आन् कडाड्कन आबा गरजलं....

'ये हायवानाऽ जिभीला हाड बसवून घे! चल ऊठ, पळ हितून....' तसं त्यो माणूस तट्कन उला. आन् काईतरी बुटबुटत म्हागं सरकत निघून गेला....

आबा भुसा भरल्यागत ताठच्या ताठ उभं व्हतं. चेहरा तापला व्हता. आन् डोळ्यात टमाट्याच्या डालीच्या डाली उतरल्या व्हत्या.

'.....चार आणे किलो.... ईस पैस्या किलो.... धा पैस्या, पाच पैस्या.... आरं फुकट घ्या की मनावं...?

आण एकाकी आबानं दोन्ही बी डाला खाली रिचविल्या. लालेलाल टमाट्याचा, टचटचीत टमाट्याचा गुडघ्याएवढा रसरशीत ढीग झाला. आन् आबानं मनगट तोंडावर आपटीत एकच बोंब ठोकली. कचाकचा टमाट्याचा ढीग तुडवीत नाचायला बोंबलायला.

आबा लालेलाल चिखलात कवरच्या कवर नाचतच व्हता.....''

## २.२.२.२ व्यक्तिचित्रण :-

'लाल चिखल' या कथेत आबा या शेतकऱ्याचे व्यक्तिचित्रण केंद्रस्थानी असून कथानिवेदक बापू

आणि त्याची माय यांची व्यक्तिचित्रणेही महत्त्वाची आहेत. गिता काळे, सटवा तेली या बापूच्या गावच्या व्यक्ती, जोशी सर, जाधव सर आणि सुमन जोशी, अनघा देशमुख, विमल राऊत या बापूच्या वर्गातील मुली या व्यक्तिरेखा केवळ कथा निवेदनाच्या ओघात आलेल्या आहेत.

## ❑ आबा :-

'लाल चिखल' या कथेत भास्कर चंदनशिव यांनी 'आबा' या व्यक्तिरेखेतून शेतकरी वर्गाचे वास्तव मांडले आहे. त्यामुळे आबा ही प्रातिनिधित व्यक्तिरेखा आहे. तिचे कथेतील स्थान, महत्त्व स्पष्ट करताना डॉ. मथू सावंत लिहितात, '' 'लाल चिखल' या कथेत शेतात घाम गाळून पिकलेल्या टोमॅटोला योग्य भाव मिळत नाही. मातीमोल भावानेही ते विकत घ्यायला कुणी तयार नाही. पांढरपेशी माणसेही शेतकऱ्याचे शोषण करायला पुढेच आहेत. या क्षोभातून आबा टमाट्याच्या डाली जमिनीवर रिचवून त्यावर नाचतो, ओरडतो, बोंबलतो. कष्टाने कमावलेल्या धान्याला देखील किंमत नाही तर शेतकऱ्याने जगायचे कसे? हा प्रश्न आबाच्या मनात येतो. संतापाने स्वत:चेच रक्त जाळणाऱ्या आबाचे कारुण्यपूर्ण मनोविश्लेषण चंदनशिव यांनी यथार्थपणे केले आहे.'' *(कथाकार भास्कर चंदनशिव, संगत प्रकाशन, नांदेड, दुसरी आवृत्ती २००६ पृ. १८६-८७)*

आबा वयस्कर असूनही त्यांना अपार कष्ट उपसावे लागते. पण त्यातून त्यांना घरातील साधी न्हाणीची भींत दोन वर्षात बांधता येत नाही. खर्च झेपणार नाही. म्हणून मुलगा बापू मॅट्रिकच्या वर्गात शिकत असून त्याला या महत्त्वाच्या वर्षी इच्छा असूनही कळंब येथील शाळेच्या ठिकाणी ठेवू शकत नाहीत. अशा ताण-तणावात सतत वाढ होऊन आबा स्वत:वरच सूड उगवून घेण्याचा प्रयत्न करतात. मानसिक संतुलन हरवून बसतात. परंतु त्यांचा संताप, आदेश आणि त्यांनी केलेली अनपेक्षित कृती यातून भास्कर चंदनशिव यांनी भावी काळात घडून येणाऱ्या शेतकऱ्यांच्या क्रांतीचे सूचन केलेले आहे. म्हणून 'आबा' हे व्यक्तिचित्रण जिवंत, ठसठशीत व उठावदारपणे या कथेत मूर्त झालेले आहे.

## ❑ कथानिवेदक बापू :-

भास्कर चंदनशिव यांच्या बऱ्याच कथांचे निवेदन करणारे पात्र म्हणजे 'बापू' होय. 'लाल चिखल' या नितांतसुंदर कतेतील निवेदक 'मी' म्हणजे बापू आहे. मॅट्रिकच्या वर्गात शिकत असलेल्या किशोरवयीन बापूला भल्या-बुऱ्याची जाण आली असून त्याला आता कुठे जगाचे व्यवहार, मायबापाचे कष्ट, दैन्य याची जाणीव होते. वर्गात शिकविलेले, वाचलेले मा. फुले, पितामह दादाभाई यांचे शेतकऱ्यांविषयीचे विचार त्याला प्रत्यक्षात अनुभवण्यास मिळत आहेत. बापू आपल्या आई-वडीलांना जमेल तशी मदत करतो. तो शेतकऱ्यांचा, संस्कारी कुटुंबातील मुलगा असून कुणब्याच्या घरातील श्रमप्रधान संस्कृतीची त्याला पुरती ओळख आहे. बापू या व्यक्तिचित्रणातून भास्कर चंदनशिव शेतकऱ्यांच्या वास्तव परिस्थितीचा लेखाजोखा मांडतात.

❑ **बापूची माय :-**

कथानिवेदक बापूची माय या व्यक्तिरेखेबद्दल डॉ. मथू सावंत लिहितात, '' 'लाल चिखल' मधील बापूची माय ज्या वयात लेकीसुनांच्या हातचे आयते खायचे, आराम करायचा, त्या म्हाताऱ्या वयात नवऱ्याबरोबर ओझी वाहते. बाजारात माळवे विकायला मदत करते. म्हातारपणामध्येही नवऱ्याच्या दडपणाखाली वावरते. कुटुंबासाठी ढोरमेहनत करणारा या स्त्रियांमध्ये समर्पणाची वृत्ती किती भिनलेली आहे हे लक्षात येते.'' *(कथाकार भास्कर चंदनशिव, प्र.क्र. ११९)* याप्रमाणे 'लाल चिखल' या कथेत चंदनशिव यांनी प्रातिनिधित पण अत्यंत प्रभावि व वास्तव व्यक्तिचित्रे रेखाटलेली आहेत.

## २.२.२.३ भाषाशैली :-

आशय आणि अभिव्यक्ती यांच्या मुशीतून भास्कर चंदनशिव यांच्या 'लाल चिखल' कथेचा आविष्कार झालेला आहे. कथेचे शीर्षक, निवेदक, संवाद योजना, प्रारंभ-शेवट, वातावरण निर्मिती आणि सर्वांगसुंदर अस्सल मराठवाडी बोलीचे उपयोजन अशा कथा घटकांचे औचित्यपूर्ण व अत्यंत समर्पक दर्शन 'लाल चिखल' या कथेतून घडते.

शाळा सुटल्याचे व सोमवारच्या बाजाराचे वर्णन येथे इतके हुबेहुब वाटते की, आपण स्वत: बाजारातून हिंडतो आहोत. उदा. ''घंटी वाजली, शाळा सुटली आन् तुयबून धरल्यालं पाणी फुटावं, तसं दारातोंडून पोरं वाहात सुटली. शाळेच्या समद्या पटांगणात चुरमुरं उधळल्यागत झालं.'' किंवा ''सोम्मारचा बाजार आसल्यामुळं आज आर्धीच शाळा व्हती. बाजारगावची माणसं टकुऱ्यावर काईतरी वझी घेऊन धावत होती. शेळ्या, कोंबड्या, बैलं, माळवं, दाळी-दुळी इक्रीटिक्रीला जमंल तसं आणलं जात व्हतं. गाढवं, घोडी, गाड्या, सायकली... आसल्या वर्दळीनं सम्दा सम्दा रस्ता गजबजून गेला होता.'' बोलीतील नावीण्यपूर्ण शब्दरूपे, उपमा, दृष्टान्त, प्रतिमा, वाक्प्रचार इत्यादी घटकांच्या सहज आविष्कारामुळे 'लाल चिखल' या कथेचे सौंदर्य व सामर्थ्य वाढलेले आहे.

## २.२.२.४ समारोप :-

शेतकऱ्यांवर बेमालूमपणे होत असलेल्या अन्याय अत्याचाराचे, त्यांच्या शोषाचे आणि त्यातून निर्माण झालेल्या तीव्र संतापाचे दर्शन 'लाल चिखल' या कथेतून घडते. शेतकऱ्यांबद्दलचा अपार कळवळा, त्यांच्या जीवनाचा आंतरबाह्य स्वरूपात घेतलेला वेध, त्यांच्या प्रश्न-समस्यांचे घडविलेले वास्तव दर्शन, त्यांच्या आत्मक्लेशाचे व विद्रोहाचे संसूचन आणि अत्यंत समर्पक, परिणामकारक अभिव्यक्ती अशा विविध कथावैशिष्ट्यामुळे 'लाल चिखल' ही कथा मराठी साहित्यातील एक अक्षर ठेव आहे असे मनोमन वाटते.

## २.२.२.५ स्वयं-अध्ययन प्रश्न

## अ) योग्य पर्याय निवडा.

१. भास्कर चंदनशिव यांची 'लाल चिखल' ही कथा त्यांच्या कोणत्या कथा संग्रहातील आहे?
*(अ) जांभळढव्ह (ब) बिरडं (क) अंगारमाती (ड) नवी वारूळं.*

२. 'लाल चिखल' या कथेतील बाजाराचा दिवस कोणता ?
*(अ) सोमवार (ब) शनिवार (क) मंगळवार (ड) शुक्रवार.*

३. 'लाल चिखल' कथेचा निवेदक बापू कोणत्या वर्गात शिकत होता?
*(अ) आठवी (ब) सातवी (क) नववी (ड) मॅट्रिक.*

४. 'लाल चिखल' कथेत आबाला गिऱ्हाईकाने कोणत्या भावाने टोमॅटो मागितली?
*(अ) एक रुपया किलो (क) दोन रुपये किलो*
*(ब) पंचवीस पैसे किलो (ड) आठ आणे किलो*

५. 'लाल चिखल' या कथेतून लेखकाने कोणाच्या प्रश्नांना वाचा फोडली आहे?
*(अ) नोकरदार (ब) आदिवासी (क) मजूर (ड) शेतकरी.*

❑ **उत्तरे :-**

१. *(क) अंगारमाती.* २. *(अ) सोमवार.*

३. *(ड) मॅट्रिक.* ४. *(ब) पंचवीस पैसे किलो.*

५. *(ड) शेतकरी.*

## ब) दिर्घोत्तरी प्रश्न.

१. 'लाल चिखल' या कथेचा आशय स्पष्ट करा.

२. 'लाल चिखल' या कथेतील शेतकऱ्यांच्या शोषणाचे चित्रण करा.

## २.२.२.६ शब्दार्थ

१. उल्सं - थोडेसे.

२. चाती - चाके.

३. म्हागूम्हाग - मागोमाग.

४. खीनभर - क्षणभर.

५. वकूत - वेळ.

६. मपल्या - आपल्या स्वत:च्या.

७. कवरच्या कवर - कितीतरी वेळ.

## २.२.३ पाणी

भास्कर चंदनशिव यांची 'पाणी' ही कथा 'जांभळढव्ह' या कथासंग्रहातील आहे. खेडे गावात राहाणाऱ्या महार जातीच्या समाजाला भीषण दुष्काळात पाण्यासाठी सवर्णीयांशी संघर्ष करावा लागतो. परंतु त्यातून त्यांच्या वाट्याला घोर निराशा येते. सगळा महार समाज पाण्याविना तळमळत राहतो. त्यांचे जीवनच धोक्यात येते. केवळ दलित असल्यामुळेच गाववाले त्यांच्याशी निर्दयपणे वागतात. या वास्तव चित्रणाद्वारे 'जातीयता' हा मानवतेला लागलेला काळीमा असल्याचे प्रकर्षाने जाणवत राहाते.

### २.२.३.१ आशय

'पाणी' ही दलित कथा आहे. स्वातंत्र्यानंतर आपल्या देशात शिक्षणाने जागृती झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित होऊन ग्रामीण भागातील दलित समाजही जागृत होऊ लागला. तो आपल्या न्याय हक्कांसाठी सवर्णीयांशी संघर्ष करू लागला. अशा संघर्षाची कहाणी 'पाणी' कथेतून मांडलेली आहे.

भर दुपारी गावातील सात-आठ महार जातीचे लोक खांद्यावर कुदळी-खोरी घेऊन पाण्याचा शोध घेत गावाशेजारील नदी पात्रात हिंडत असताना, त्यांना ओलसर जागा सापडते. नदी पात्रात गाववाल्यांचा झरा मात्र या ओलसर जागेच्या खालच्या बाजूला असतो. आपण इथे झरा खोदलेला गावकऱ्यांना रूचणार नाही याची पुरती जाण असतलेला सदान्ना आपल्या तरूण जातभाईना मोडता घालण्याचा प्रयत्न करतो. तो कुदळीने उकरीत असलेल्या, ज्योतीला म्हणतो, 'पर ह्या हिरा गाववाल्याला देखवल का...?' यावर एक महार तरूण उत्तरतो, 'छ्या छ्या, सदान्ना कवा बी फाटक्यता पाय घालूनच बसतोय. चला रं पोरावं, चला.' - सदान्नाच्या बोलण्याकडे दुर्लक्षच नव्हे तर, ते साफ धुडकावून महार तरूण उघड्या अंगाने झरा खांदू लागतात. मग सदान्ना त्यांचे काम बघत बसून राहतो.

थोड्याच वेळात झऱ्याला खूप पाणी लागले. झरा खोदणारा दाम्या आरडून बोलतो, 'आरार्रा, अगं त्ये बग पाणी, आयात मोरीसारखा भडका आला? तो नाचत हसतच वर येतो. पाणी बघून सारेजण

आनंदित होतात. सदान्ना मात्र मख्खपणे आपल्याच विचारांच्या तंद्रीत पाण्याकडे बघत राहातो. त्याला जराही आनंद होत नाही. सदान्नाला नदीतली हाडळ लागली काय? असे म्हणून तरूण मुले त्याला आपल्या आनंदात सहभागी करून घेऊ पाहातात. त्यावर सदान्ना म्हणतो. 'पोरहो,देव देतोय पर करम आड येतय, त्याला काय करणार हुं' - पण त्याचे बोलणे ऐकूण घ्यायला जातभाई तिथून कधीच गावात गेले होते. भानावर आलेला सदान्न झऱ्यात उतरून पोट भरभरून पाणी पितो. समाधानाने ढेकर देत वर येतो आणि गाव वाटेला लागतो. चालताना त्याच्या मनात नको नको ते विचार येत राहातात. सवर्ण गाववाले संतापून आपणाला जाब विचारतील. त्यांना कसे सामोरे जायचे या विचाराने सदान्ना अस्वस्थ होतो.

''....तरी मी सतरांदा पोराली सांगत व्हतो की, बाबानु हितं हिरा खांदू नका रं. आता खालच्या अंगालाच गाववाल्याचा हिरा हये काय पोराला माहित नव्हतं ह्या. उद्या गाववाले खवळून उठले, आन् धेड्यानू तुमी मुद्दाम वरल्या बाजूला पाणी केलंत.... आमचं पाणी बाटवाया पायीच तुम्ही ह्यो उद्योग केलाय, तर कोणाच्या थोंडान त्यान्ला बोलावं....'' अशा विचारचक्रात सापडलेल्या सदान्नाच्या कुशंकेला यानंतर गावातून नारळ, गुलाल घेऊन आलेल्या संतांच्या बोलण्याने अधिकच पुष्टी मिळते. नारळ-गुलाल घेताना भगा वाणी संताला म्हणाला होता, ''भडव्याहो, हिरा खांदून आलाव, प भरा कसं पाणी भरतात त्ये, मायला आमचं पाणी बाटविण्यापाईच वरच्या बाजूला घातली आसंल.... आन् आसं बोलत बोलतच दात खायला.....' हे ऐकूण घेत असतानाच सदान्नाची नजर 'काँवऽ काँवऽऽ' ओरडणाऱ्या कावळ्याकडे जाते पुढच्या अशुभाची यामुळे सदान्नाला पक्की पूर्वसूचनाच मिळल्याचे वाटते. तो हताशपणे लिंबाच्या वाळल्या फांदीवर बसलेल्या कावळ्याला उद्देशून म्हणतो,

''का रं बाबा, तुझा सराफ खरा ठलाय मर्दा. आजूक कसला, सराप द्यायलाच.... आरं होती नव्हती ढोरं मेल्यात. आरं काय राखलंय. ह्या उरल्यासुरल्या पाण्याला बी सराप.....'' यावर संता रडवे हसतो. सदान्ना त्याला झऱ्याला नारळ वाढवून येण्यास सांगतो.

दिवस मावळल्यानंतर गावात, रस्त्यावर 'म्हारग माजल्यात, त्यांनी मुद्दाम वरच्या बाजूला हिरा धरला' अशी उघड पणे लोक चर्चा करू लागतात. पाटील, सरपंचाकडून 'धेडग्यांना चावडीत येण्याचा' रामा येसकराकडून निरोप दिला जातो. त्यामध्ये सदान्ना, संताजी चुलतं, संभा भाऊ, चोखा-चुलत भाऊ यांना निरोप देणे जातभाई असणाऱ्या रामाच्या जीवावर येते. पण त्यापुढे त्याचा नाईलाज असतो.

चढत्या रात्रीला गॅसबत्तीच्या उजेडात एका बाजूला गाववाले तर दुसऱ्या बाजुला महार लोक बसून चावडीत बैठक सुरू होते. सरपंच खड्या आवाजात सदान्नाला म्हणतो, 'आं ह्येऽसदा, काय केलंच रं ह्योऽऽ! पोराला चांगली वाट दावून आपण बगत बसायचं वय ह्या, का त्याच्या माथ्यावर शेण कालवून टाकायचं?' यावर 'हिऱ्याचंच बोलताव नव्हं?' असे सदान्नाने विचारताच 'हिऱ्याचं न्हाय, आमच्या

लग्नाबद्दल चाललंय ह्ये बघ? असे पाटील तिढ्यात बोलताच सारेच खळखळून हसतात. तेव्हा संतापलेला तरूण संभा सगळ्या मराठवाड्याच्या पिण्याच्या पाण्याची गरज किती अनिवार्य आहे, हे पटवून सांगण्याचा मन आवरूण प्रयत्न करतो. पण त्याच्या बोलण्याचीही पाटील पुन्हा खिल्ली उडवितात. त्यात भगा वाणीही गाववाल्यांचे पाणी बाटविण्यासाठीच महारानी वरच्या बाजूला झरा काढल्याचे बोलून दाखवितो. तरूण रक्ताच्या पोरांना आवरणे कठीण होईल या भितीने सदान्ना 'पोरट्यांचे मनावर घेऊ नका' असे पाटलांना सबुरीने सांगतो. पण संभा शेजारी बसलेला रामचंदर उसळून पाटलांना बोलतो, ''आवं, आता सुदीक पाण्यागत आपला बाट ह्या फरशीवाटं झिरपून जात आसंल!'' यावर महाराची चार मुले तोंड दाबून हसतात व बत्तीआड माना लपवू लागतात. महाराची मुले आपली थट्टा करीत आहेत असे वाटून पाटील संतापाने शिवी देऊन दात ओठ खात निघून जातो. आणि चावडीवरची बैठक संपते.

पहाटे पहाटे अंधारात महारवाड्यातील बायका-पोरे गाडगी-मडकी घेऊन आपल्या हक्काचे ताजे पाणी आणण्यासाठी नदीपात्रात पोहोचतात. आपण खोदलेला झरा शोधू लागतात. पण झरा कुठेच सापडत नव्हता. कारण गावातल्यांनी रातोरात झरा बुजवूनही टाकला होता. 'पाणी' कथेचा आशय स्पष्ट करताना डॉ. मधू सावंत लिहितात, ''दारिद्र्य, सर्वव्यापी तहान-भूक, अस्पृश्यता, विविध ताण, दोन पिढीतील संघर्ष असे गडद कारूण्याचे चित्रण भास्कर चंदनशिव यांनी अत्यंत संयतपणे केले आहे. हेच या दलित कथेचे यश म्हणता येईल.'' *(कथाकार भास्कर चंदनशिव, पृ. क्र. ७०)*

## २.२.३.२ प्रसंगचित्रण

कमीत कमी घटना प्रसंगांची योजना करून भास्कर चंदनशिव यांनी खेडेगावात राहाणाऱ्या महार जातीचा पाण्यासाठी जीवाच्या आकांताने, मोठ्या मेहनतीने केलेला संघर्ष कसा असफल ठरला याचे अत्यंत जीवंत व प्रयत्नकारी चित्रण केले आहे. कथेच्या सुरूवातीलाच पाण्यासाठी कासावीस, लाचार, अगतिक झालेला (महार) दलित समाज चंदनशिव पुढील प्रसंगातून समोर उभा करतात.

''भर दुपार जळतं उन्हं. होरपळत उभी असल्याली कवळी म्हातारी झाडं. कमरंतून मोडून पडल्याही वाळली मोळवणी बेटं, आन् कुठं तरी वाळूच्या पोटात वास मारणारं सडकं-नासकं हिरवट पाणी.... मरुन सडत-वाळत चालल्याली बेडकं, मासं, खेकडं....

साताठ म्हारं खांद्यावर कुदळी-खोरी घेऊन पाण्याचा माग काढीत हिंडत्यात, पर पान्हाळ जागा कायी धावत नव्हती... हितं खांदावं का तिथं खांदावं? कुठं खांदावं?.... पाणी फायजी!!! गाववालं आडाला बाटवू देत न्हायीत, कवर मागत कसावं.

'अण्णा, दोन पव्हरं ह्या गाडग्यात टाकावं....'

'बायसाब, एकदा एव्हरा वाढताव का?'

'आपून आपला सवतेल हिरा खांदावा नदीत....'

ह्या विचारानं म्हारं जागा हुडक व्हती. कुठलीतरी खोलगट जागा बघावी आन् तिथं परस दीड परस हिरा खांदावा.... पर जागा काय आजून घावली नव्हती. सारखी हुडकाहुडक चालल्याली.''

चावडीतील बैठकीचा प्रसंगही दलित-सवर्ण यांच्यातील जातीय ताणतणावांचे आणि दलितांमध्ये पेटू पाहाणाऱ्या विद्रोहाचे दिग्दर्शन घडविणारा आहे. तर कथेतील शेवटचा प्रसंग मन सुन्न करणारा आणि कारण्याचे अतिशय परिणामकारक दर्शन घडविणारा आहे. तो असा -

''.... रात उताराला लागली. गार वारं म्हारड्यात शिरलं... आभाळ पुसत चाललं. कोपटानं कोपटं हालू लागली, बोलू लागली, खुराडं उघडलं... आन् बायका गाडगी घिऊन पांदीला लागल्या. ... ताजं पाणी! हक्काचं पाणी!!! मनं नाचू लागली. पोटाच्या खळग्या... 'चला, तेवढंच, पाणी तर पाणी !' जणू बोलू लागल्या.

'बाईन् बाई.... पांदीला रांग लागली.'

साऱ्या जाणाऱ्याच परतीची घागरच नदरं पडना. बाया, पोरं आन् गडी.... घरात हायीत न्हायीत तेवढी गाडगी-मडकी घिऊन पळापळीत सामील.... पर सारी सारी माणसं नदीतच.... पुसटशा उज्याडात.... झरा हुडकीत्यात.... कुणी खालतं, कुणी वरतं.... गंगमुख राखीसमुखं.... पर झरा काय घावत नव्हता. सारा सारा म्हारवाडा हुडकितोय झरा?.... पर झरा कुठं दडला? कुठं गेला?.... गेला कुठं पाण्याचा झरा?

एकाच जाग्यावर घोळक्यानं ठेवल्याली गाडगी.... आभाळात भुकेली तोंड वासून पडल्याली. मानात माना घालून... पाणी... पाणी... करीत.''

## २.२.३.३ व्यक्तिचित्रण

'पाणी' ही दलित-सवर्ण यांच्यातील संघर्षाची प्रातिनिधित कथा आहे. तथापि, भास्कर चंदनशिव यांनी दलित समाजातील 'सदान्ना'चे हे व्यक्तिचित्रण ठळकपणे साकारलेले आहे. महार जातीतील सदान्ना ही सर्वात वयस्कर, जाणती व बुर्ग व्यक्तिरेखा आहे. जातीयतेचे अनेक चटके त्याने सोसलेले आहेत. गावात जगताना त्याला सवर्णीयांशी वैर पत्करून चालणार नाही याची पुरेपूर जाणीव आहे. तसेच गाववाल्यांच्या जातीयवादी वृत्तीचे, त्यांच्या मानसिकतेचे नेमके भान आहे. तसेच आपल्या हक्कांची जाणीव झालेल्या, तरूण दलित पिढीच्या लढाऊपणालाही आपण थोपवू शकत नाही. याचीही त्याला जाणीव आहे. गावापुढे आपल्या समाजाचा टिकाव लागणार नाही हे सदान्नाला स्वतंत्र हिरा (झरा)

खोदायला लागल्यापासून मनोमन वाटत होते. त्याच्या मनोविश्लेणातून ते सातत्याने व्यक्त होत राहाते. सदान्ना ही व्यक्तिरेखा दलितांच्या मागच्या म्हणजे जुन्या पिढीचे प्रतिनिधित्व करते. रामा येसकर ही व्यक्ती सुद्धा परंपरागतिक दलितांचा वारसा स्पष्ट करणारी आहे.

संभा, रामचंदर, संताजी, चोखा ही दलित तरूण मंडळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार, प्रेरणेने भारून आपल्या हक्कांसाठी, अन्यायासाठी आणि अस्तित्वासाठी संघर्षाला सिद्ध झालेली आहेत. भगा वाणी, पाटील, सरपंच यांची व्यक्तिचित्रणे म्हणजे, जातीयता, स्पृश्यास्पृश्यता यातच रूतून बसलेली आणि राज्यघटना, कायदा याचे भान न पाळता स्वत:लाच श्रेष्ठ मानणारी आहेत. दलितांना त्यांच्या कष्टातून निर्माण केलेले पाणी मिळू न देण्याचे अमानुष, निर्दयी कृत्य लागणारे खेडेगावातील सवर्ण जुन्या पिढीचेच प्रतिनिधित्व करतात.

## २.२.३.४ भाषाशैली

भास्कर चंदनशिव हे गावगाड्याशी आणि त्यातील समाज घटकांशी सर्वार्थाने एकरूप झालेले कथाकार आहेत. त्यामुळेच 'पाणी' कथेतील दलित जीवनाच्या अंगोपांगांचे, त्यांच्या जगण्यासाठीच्या धडपडीचे यथार्थ व वास्तववादी चित्रण त्यांच्या भाषेने केलेले आहे. पात्रांचे संवाद, मनोविश्लेण निवेदन आणि वर्णने यासाठी ते अस्सल बोलीचा अवलंब करतात. तरीही या घटकांचे स्वतंत्रपण कायम राहाते. रामा येसकराच्या मनातील विचारांचे आवर्त भास्कर चंदनशिव अतिशय समर्पक बोलीतून व्यक्त कसे करतात ते पहा.

'सदान्ना, संताजी चुलतं, संभा भाऊ, चेखा-चुलत भाऊ, सारी नात्याची, जातीची काय करावं? कसं बोलावं? काय सांगावं? आपून येसकर, गावकीचा... गावानं सांगावं, आपून आयकावं... पर आता कसं करावं? टकुऱ्यात आग्यामोहळ उठलं मनाच्या पाठीमागं लागलं धडधडत मन रामाच्या अंगाला चालता चालता घाम फुटला.''  -- तसेच 'पाणी' या कथेत बोलीतील 'फाटक्यात पाय, कवळी-म्हातारी झाडं, हावऱ्यागत, खेवसाळला, सराप, म्हारड्यात, बापाची मिरासय, तुमच्याल, कोपटं, राखीसमुख- अशी शब्दरूपे चंदनशिवांच्या भाषाशैलीचे नैसर्गिक, अकृत्रिम सौंदर्य खुलवितात.

## २.२.३.५ समारोप

'पाणी' या दलित कथेतून भाकर चंदनशिव यांनी साधारणपणे १९८० पूर्वीच्या काळात खेडोपाडी असणाऱ्या दलितांना सवर्णीय समाज कशी अमानुषपणे वागणूक देत होता याचे मन विषण्ण करणारे आणि हृदद्रावक चित्रण केले आहे. 'पाणी' म्हणजे जीवन, एखादेवेळेस काही काळ अन्नाशिवाय माणूस जगू शकेल, पण पाण्याशिवाय नाही. असे असताना दलितांना ते मिळू न देण्यासाठी विटाळ, स्पृश्यास्पृश्यता यासारख्या जुनाट, बुरसटलेल्या प्रवृत्ती, लोकशाहीमध्ये अजूनही कायम आहते. हे वास्तव

अस्वस्थ करणारे आहे. 'पाणी' या कथेद्वारे भास्कर चंदनशिव यांनी माणसांमधील माणुकीला अत्यंत कळवळ्याने भावोत्कटतेने ललकारले आहे.

## २.२.३.६ स्वयं-अध्ययन प्रश्न

### अ) वस्तुनिष्ठ प्रश्न (योग्य पर्याय निवडा)

१. भास्कर चंदनशिव यांची 'पाणी' ही कथा त्यांच्या कोणत्या कथासंग्रहातील आहे.
*(अ) जांभळढव्ह (ब) बिरडं (क) लाल चिखल (ड) नवीन वारुळं.*

२. 'पाणी' या कथेत कोणत्या जातीच्या लोकांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो.
*(अ) धनगर (ब) सुतार (क) महार (ड) पेंढारी.*

३. 'पाणी' या कथेत दलित लोक झरा कोठे काढतात?
*(अ) माळावर (ब) नदीत (क) ओढ्यात (ड) तलावात.*

४. 'पाणी' कथेत महारांनी झरा काढल्याची बातमी सर्वात आधी कोणाला कळते?
*(अ) सरपंच (ब) पाटील (क) इनामदार (ड) भगा वाणी.*

५. 'पणी' कथेत कोणा-कोणातील संघर्षाचे चित्रण केलेले आहे?
*(अ) शेतकरी-सरकार (क) कारखानदार-कामगार*
*(ब) दलित-सवर्णीय (ड) जमनदार-शेतमजूर.*

❑ **उत्तरे :-**

१. *(अ) जांभळढव्ह.*
२. *(क) महार.*
३. *(ब) नदीत.*
४. *(ड) भगा वाणी.*
५. *(ब) दलित-सवर्णीय.*

### ब) दीर्घोत्तरी प्रश्न.

१. दलितांना पाण्यासाठी कराव्या लागलेल्या संघर्षाचे स्वरूप 'पाणी' या कथेच्या आधारे स्पष्ट करा.

२. 'पाणी' कथेचा आशय स्पष्ट करा.

### २.२.३.७ शब्दार्थ

१. पव्हरा – पोहरा, घागर

२. हिरा – झरा

३. खिनभर – क्षणभर

४. सराप – शाप

५. गंगमुख – उत्तर दिशा

६. राखीसमुख – राक्षसमुख, दक्षिण, दिशा

७. पांद – पानंद, रानातील वाट.

❀ ❀ ❀

**घटक - ३**

# चित्रपट म्हणजे काय?

## चित्रपट : एक दृकश्राव्य माध्यम

**चित्रपट : १) माध्यमांतर**
**२) दिग्दर्शकाचा दृष्टिकोन**
**३) छायाचित्रण**

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ चित्रपट म्हणजे काय?

३.२.२ चित्रपट एक सामाजिक दृकश्राव्य माध्यम

३.२.३ दिग्दर्शकाचा दृष्टिकोण

३.२.४ छायाचित्रण

३.२.५ चित्रपटाचा आस्वाद

३.३ समारोप

३.४ कठिण शब्दांचे अर्थ

३.५ सरावासाठी अंतर्गत विकल्पासह लघुत्तरी प्रश्न

३.६ पूरक वाचन

३.७ संदर्भ सूची

## ३.० उद्दिष्ट्ये

हा पाठ वाचून आपणास खालीलप्रमाणे उद्दिष्ट्ये साध्य करता येतील.

१. चित्रपट माध्यमाची ओळख होईल.

२. चित्रपट निर्मिती कशी होते? ती जाणून घेता येईल.

३. चित्रपट निर्मितीमध्ये दिग्दर्शकाची भूमिका काय आहे ते लक्षात येईल.

४. छायाचित्रणाचे वेगवेगळे प्रकार व त्याची कौशल्ये लक्षात येतील.

५. विद्यार्थ्यांना चित्रपट निर्मितीमध्ये करिअर करण्यासाठी मार्गदर्शक ठरेल.

६. माध्यमाचं माध्यमांतर कसं होते ते कळेल.

## ३.१ प्रस्तावना

माणसाने त्याच्या अभिव्यक्तीसाठी अनेक साधनांचा व माध्यमांचा शोध लावला. त्यातील 'चित्रपट' हे महत्त्वाचं माध्यम आहे. पूर्वीपासूनच मनुष्य समूहाने राहात आला आहे. माणसाला आपल्या मनातील भावना, विचार, कल्पना सतत कोणाला तरी सांगाव्याशा वाटतात. यातूनच चित्रलिपींचा आणि पुढे भाषेचा जन्म झाला. आज संपूर्ण जग विविध भाषेनी एकमेकांशी जोडलं आहे आणि भाषा वेगवेगळ्या माध्यमामधून वापरल्या जातात. प्रत्येक व्यक्तीच्या अवती-भोवती आज वेगवेगळी माध्यमं आहेत. माणसाला या माध्यमांची पूर्णपणे ओळख नसली तरी तो विविध माध्यमांचा वापर करतोच. यातून माहितीची देवाण-घेवाण होते. तर कधी कल्पकतेने, सृजनशिलतेने भाषेचा वापर होतो. त्यामुळे माणसांना माध्यमाची ओळख असणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे. आज मनुष्य खेडेगावातील असो किंवा शहरातील तो संपूर्ण विश्वाशी जोडला गेला आहे. यासाठी चित्रपट माध्यमाचा खूप मोठा हातभार लागला आहे. निरक्षर, लिहिता-वाचता न येणाऱ्या माणसांनापण चित्रपट पाहता येतो. त्याला तो समजतो. म्हणून चित्रपट व मालिका पाहणाऱ्यांची संख्या ही जास्त आहे. चित्रपटाने समाजातील खूप मोठा प्रेक्षक वर्ग व्यापला आहे. म्हणून चित्रपट माध्यमाची ओळख असणं आणि त्याची निर्मिती समजून घेणं महत्त्वाचं आहे.

चित्रपट व्यक्तींच्या भोवती घडणाऱ्या घटना प्रसंगाना अर्थ देतो. तसेच संगीतही देतो. घटना, प्रसंगाची परिणामकारकता वाढवतो. चित्रपट दृक-श्राव्य माध्यम असल्यामुळे, लोकांच्या मनाची पकडही हे माध्यम लगेच घेते. त्यामुळे चित्रपटाचा खूप मोठा प्रभाव लोकांच्या आहार-विहारावर, पेहरावावर,

त्यांच्या जगण्यावरती पडलेला असतो. म्हणून सामाजिक अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून चित्रपटाचा अभ्यास करणं गरजेचं आहे.

## ३.२ विषय विवेचन

संपूर्ण जगामध्ये चित्रपट निर्मितीसाठी रोज लाखो, कोट्यावधी रुपये खर्च होतात. नाव, प्रसिद्धी आणि पैसा मिळवून देणारे हे माध्यम असल्यामुळे हजारो तरूण यामध्ये कामे करतात. चित्रपटाने माणसाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विश्वावरती खूप मोठा प्रभाव टाकला आहे. त्यामुळे चित्रपट म्हणजे काय? ते माध्यमाचे माध्यम कसं आहे? चित्रपट निर्मितीमधील दिग्दर्शकाची भूमिका, छायाचित्रण एक कला या मुद्यांचा क्रमवार अभ्यास आपण करणार आहोत.

### ३.२.१ चित्रपट म्हणजे काय?

चित्रपट माध्यमाची ओळख करून घेण्यापूर्वी चित्रपट म्हणजे काय? हे आपण पाहूया.

'चित्रपट' म्हणजे चित्रांची संख्या किंवा मालिका. यातील 'पट' शब्दाचा अर्थ संख्या किंवा मालिका असा होतो. अर्थात 'चित्र' या शब्दाचा अर्थ कॅमेऱ्याने दृशियत केलेली दृश्ये असा घ्यावा लागेल. कारण एखादा चित्रकार रंगाच्या साहाय्याने चित्रे काढतो. ती 'स्थीर' चित्रे असतात. कॅमेऱ्याने घेतलेली दृश्ये वेगवेगळ्या फ्रेमरेटची असतात. फ्रेमरेट म्हणजे दर सेकंदाला दृश्ये घेण्याचा वेग. यावरून 'चित्रपट' या शब्दाची संकल्पना किंवा संज्ञा स्पष्ट करताना, 'कॅमेऱ्याचे दृशियत केलेल्या दृश्यांची मालिका' असा अर्थ घ्यावा लागेल. कॅमेऱ्याने घेतलेल्या दृश्यावर अनेक संस्कार होतात. उदा. संकलन, कलर करेक्शन, डी.आय. क्रोमा, स्पेशल इफेक्ट, बॅकग्राऊन्ड म्युझिक याचाही विचार चित्रपट संज्ञेबरोबर करायला पाहिजे.

चित्रपटाची समानार्थी व रूढ असणाऱ्या शब्दांचा अर्थ आपण पाहूया. 'रूढ असणे' म्हणजे वापरात असणारे शब्द.

- **फिल्म**

'फिल्म' ही पारदर्शक, गुंडाळी करता येणारी प्लॅस्टिक कोटिंगची रील असते. फिल्मवरती दृश्यांचे व ध्वनींचे संकलन करता येऊ लागले. यंत्राच्या साहाय्याने संपादित केलेली दृश्ये चित्रपट गृहात दाखविता येऊ लागली. ही फिल्म ओ.सी. एम्.एम्., सुपर ओ.सी. एम्. एम्., १६ एम्. एम्., सुपर १६ एम्. एम्., ३५ एम्. एम्., ६० एम्. एम्., ७० एम्.एम्., ची असते. ध्वनीचे व दृश्यांचे ट्रॅक साठवलेली फिल्म यंत्राच्या साहाय्याने चित्रपट गृहात दाखवली की चित्रपट पाहिल्याचा अनुभव येतो.

## ❑ **मोशन मुवी** (Motion Movie)

'मोशन' म्हणजे गती आणि मुवी म्हणजे हालचाल. गतीने होणारी हालचाल या संदर्भातले दोन शोध महत्त्वपूर्ण होते. इ.स. १८२४ मध्ये पिटर मार्क रोझे यांनी प्रतिमा सातत्यावरचा शोधनिबंध इंग्लंडमधील रॉयल सोसायटीमध्ये वाचला. यामुळे चित्रपट निर्मितीस चालना मिळाली. डोळ्यासमोरून ठराविक गतीने हलणाऱ्या प्रतिमा गेल्या तरी त्याचा प्रभाव डोळ्यामध्ये टिकून राहतो. तो सेकंदाचा १/१० इतका असतो. त्यामुळे वेगाने हलणाऱ्या प्रतिमामुळे चित्रपट पाहिल्याचा अनुभव येतो. तसेच 'एडवर्ड माईब्रीज' या संशोधकाने इ.स. १८७२ मध्ये २४ कॅमेरे एका सरळ रेषेमध्ये ठेवून धावणाऱ्या घोड्याची दृश्ये घेतली. ती संकलन करून जोडली असता धावणारा घोडा पाहत आहोत असा भास निर्माण झाला. कॅमेऱ्याचा फ्रेमरेट खूप महत्त्वाचा असतो. तो दर सेकंदास २४, २५, ३०, ४८, ५०, ६० इतका असतो. 'फ्रेमरेट' म्हणजे दर सेकंदाला घेतल्या जाणाऱ्या प्रतिमा.

यावरून 'मोशन मुवी' या शब्दाची संकल्पना स्पष्ट होते. 'गतीने हालणाऱ्या दृश्यांची मालिका' त्याला आपण 'मोशन मुवी' म्हणू.

## ❑ **सिनेमा**

सिनेमा हा शब्द इंग्रजीत आहे. 'सीन' म्हणजे दृश्य चित्रपटामध्ये अनेक दृश्ये असतात. ती संकलन करून एकत्र जोडलेली असतात. म्हणून अनेक दृश्यांची मालिका तो सिनेमा होतो.

Picture (पीक्चर) चा मराठीत अर्थ 'दृश्य' असा होत असला तरी कॅमेऱ्याने दृशित केलेली दृश्ये असाच त्याचा अर्थ घ्यावा लागेल. चित्रपटाचे स्वरूप आणखीन चांगल्या पद्धतीने स्पष्ट व्हावं या दृष्टीकोणातून चित्रपटाची संबंधित काही लोकांच्या प्रतिक्रिया आपण पाहूया –

प्रा. डॉ. बापूसाहेब चंदनशिवे हे अहमदनगर येथे न्यू आर्टस् अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजमध्ये संज्ञापन विभागाचे विभाग प्रमूख आहेत. त्यांच्या मते,

''चित्रपट हे सामाजिक दृकभाष्य माध्यम आहे. समाजातील लोकांनी ते निर्माण केले म्हणून ते सामाजिक आहे. चित्रपटांनी केवळ मनोरंजन करू नये तर त्याने सामाजिक प्रबोधनपण करावे. चित्रपट व्यक्तींच्या भोवती घडणाऱ्यांना घटनांना अर्थ, संगीत देतो. समाजामध्ये घडणाऱ्या बऱ्या वाईट गोष्टीसाठी केवळ चित्रपटाला दोषी ठरवू नये. कारण समाजात घडणाऱ्या घटनांचं प्रतिबिंबच चित्रपटामध्ये पडलेलं असतं.''

यावरून चित्रपटाच्या संदर्भात काही गोष्टी स्पष्ट होतात. चित्रपट एक माध्यम आहे. आणि ते दृकश्राव्य माध्यम आहे. पण ते माध्यम कोणा एका दिग्दर्शकाचे, अभिनेत्याचे नाही. त्यातील सामाजिकता

प्रा. डॉ. बापूसाहेब चंदनशिवे यांनी अधोरेखित केली आहे. 'सैराट' चित्रपटाच्या संदर्भात अनेक क्रिया प्रतिक्रिया समाजामधून उमटल्या होत्या. बऱ्याचजणांनी चित्रपटास दोषी ठरवलं होतं. पण चित्रपट हे समाजात घडणाऱ्या घटनाचं 'प्रतिबिंब' आहे असे प्रा. बापूसाहेब चंदनशिवे सर म्हणतात.

'ख्वॉडा', 'बबन' आणि 'हैद्राबाद कस्टडी'चे दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे यांनी थोडसं वेगळं मत मांडल आहे. ते आसं,

''प्रत्येक व्यक्तींच्या भोवती सिनेमा असतो म्हणजे काहीना काही घटना घडत असतात. यातील चित्रिकरण करता येण्यासारख्या घटना चित्रीकरण करून, चित्रपटातून मांडल्या की त्याच्या सिनेमा होतो. या घटना अभासात्मक असतात.''

आता चित्रपटामध्ये सामाजिक घटना अभासात्मक असतात की त्याचं प्रतिबिंब उमटलेलं असतं? या संदर्भात आपण विचार करू. 'प्रतिबिंब' म्हटलं तरी आरशातील प्रतिमेसारखं जसंच्या तसं उमटलेलं नसतं. एका व्यक्तीच्या संदर्भातील घटना असल्या तरी, चित्रपटाच्या दृष्टिकोनातून इतर व्यक्तीच्या संदर्भातील घटनाही त्यामध्ये मिसळतात. ज्यामुळे चित्रपट व्यक्तीनिष्ठ वाटत असला तरी तसा तो नसतो. व्यक्ती सामाजिक अभिव्यक्तीच्या प्रतिनिधी ठरतात. या अर्थानेही चित्रपट सामाजिक अभिव्यक्तीचं माध्यम आहे.

'कलात्मक चित्रपट' आणि 'व्यावसायिक चित्रपट' असे स्थूलमानाने भारतीय चित्रपाचं वर्गीकरण केलं जातं. जगामध्ये ज्या प्रदेशातून चित्रपट निर्मिती होते. त्यावरूनही चित्रपटाचं वर्गीकरण केलं जातं. उदा. हॉलिवूड, टॉलीवूड, बॉलीवूड, इराणी, मद्रासी, बंगाली, मल्याळम्, मराठी.

पण या संदर्भातील मराठीमधील तरूण दिग्दर्शकांच्या भूमिकापण विचारता घ्यायला पाहिजेत. दि. ६ जानेवारी २०१३ च्या 'दै. लोकसत्ता' अंकात रवी जाधव यांची मुलाखत आली होती. त्यामध्ये त्यांनी 'कलात्मक व व्यावसायिकतेशी मेळ घालणारे चित्रपट हे एक माध्यम आहे.' असं सांगितलं होतं. तर भाऊराव कऱ्हाडे कलात्मक व व्यावसायिक असा भेदच मानत नाहीत. 'चित्रपट हा चित्रपट असतो. चांगला चित्रपट कलात्मक व व्यावसायिक अशी दोन्ही मूल्ये जोपासतो' असे त्यांचे मत आहे.

## ३.२.२ चित्रपट एक सामाजिक दृकभाष्य माध्यम :

मानवाने आपल्या गरजेपोटी अनेक साधनांचा तसेच माध्यमांचा पण शोध लावला. पूर्वीपासूनच माणसाला माणसांशी काहीतरी बोलायचं आहे, सांगायचं आहे. यासाठी आदीमानवाने गुहेमध्ये चित्रे काढली, शिल्प कोरले. चित्र लिपीतून पुढे भाषेचा जन्म झाला. चित्रपट हे सुद्धा मानवाने शोधलेले माध्यम आहे. चित्रामधून, शिल्पामधून, नृत्यामधून मनुष्य माणसाशी जसं काही सांगत राहतो तसंच

चित्रपटामधूनही सांगत राहतो. काय सांगायचं आहे माणसांना? विचार, भावना, कल्पना, माहिती, भाषेतील संकेत. हा खूप मोठा देवघेवीचा संवाद आहे. यामध्ये विविधता आहे. या विविधतेने माध्यमांची निर्मिती झाली आहे.

## ❑ माध्यम म्हणजे काय ?

भाषा अभिव्यक्तीचे साधन आहे आणि ती माध्यमसुद्धा आहे. मनुष्य एकमेकांशी संवाद साधत असताना वेगवेगळ्या प्रकारे संवाद साधतो. कधी सरळ, व्यावहारिक पातळीवरती संवाद साधतो. तर कधी माध्यमांची गुणवैशिष्ट्ये घेऊन संवाद साधतो. उदा. 'सैराट' चित्रपटातील आर्चीचा डायलॉग, ''मराठीत सांगितलेलं समजतं नाही? इंग्रजीत सांगू?''

वर वर पाहता हा संवाद रोजच्या व्यवहारिक बोलीभाषेतील वाटत असला तरी एका माध्यमामधून व्यक्त झाल्यामुळे त्याला ग्लॅमर प्राप्त झालं आहे. असाच शोलेमधील गब्बरसिंगचा डॉयलॉग, ''कितने आदमी थे?'' किंवा 'डॉन' मधील अमिताभचा डॉयलॉग ''डॉन को पकडना मुश्कीलही नही ना मुनकीन है।'' का वेगळे वाटतात ? तर चित्रपटातील दृश्यात्मकता, कलाकारांचा अभिनय व माध्यमांची परिणामकाकरता या गोष्टी साधन असणं वेगळं आणि माध्यम असणं वेगळं, कारण प्रत्येक माध्यमाचा आकृतीबंध आणि गुण वैशिष्ट्ये वेगवेगळी आहेत.

चित्रपट ऐकता येतो म्हणजे त्यातील गाणी, संवाद, संगीत ऐकता येतं म्हणून ते श्राव्य व चित्रपट पाहता येतो. म्हणून ते दृक, अशिक्षित, आडाणी माणसांना पण चित्रपट कळतो. म्हणून चित्रपटाची व्यापकता पण अधिक आहे.

## ❑ चित्रपट माध्यमाचं माध्यम

चित्रपटामध्ये अनेक बाबींचा समावेश होतो. कोणकोणत्या बाबी आहेत त्या?

१) विचार, २) कल्पना, ३) कथा, ४) पटकथा, ५) संवाद, ६) गिते, ७) गायन, ८) संगीत, ९) पार्श्वसंगीत, १०) संकलन, ११) प्रकाश योजना, १२) नृत्य, १३) शिल्पकला, १४) चित्रकला, १५) डी.आय. (D.I.) , १६) ग्रामीक्स, १७) क्रोमा, १८) व्हीडीओ इफेक्ट, १९) चित्रपटाची प्रसिद्धी, २०) चित्रपटाचे वितरण, २१) दिग्दर्शक व इतर तंत्रज्ञ लोकांच्या संहिता, २२) चित्रपट निर्मिती व्यवस्थापन.

यावरून एक गोष्ट लक्षात येते. एक चित्रपट निर्माण होत असताना अनेक माध्यमांचा समावेश चित्रपटामध्ये झाला आहे. उदा. चित्रकला, शिल्पकला, साहित्य, संगीत, नृत्य, मुद्रित प्रसारमाध्यमे इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे इत्यादी.

साहित्यामध्ये कथा, कविता, नाटक, कादंबरी, गिते इत्यादींचा चित्रपटामध्ये समावेश होतो. कथा नैपथ्यासाठी आकर्षक रंगविलेले सेट उभे करावे लागतात. वेगवेगळ्या चित्रांच्या प्रतिकृती त्यामध्ये असतात. उदा. 'बाहुबली' चित्रपटाचा सेट यामुळे चित्रकला सारख्या माध्यमाचा समावेश पण चित्रपटामध्ये होतो. चित्रपटामध्ये वेगवेगळे पुतळे उभे केल्याचे दाखविले जातात. उदा. बाहुबली चित्रपटातील बल्लाळदेवचा भव्य पुतळा.

चित्रपटामध्ये संगीत आणि नृत्ये असतात म्हणून नृत्य आणि संगीत या कला माध्यमांचा समावेश पण चित्रपटात होतो.

मुद्रित प्रसारमाध्यमामध्ये वर्तमानपत्रे, पाक्षिके, मासिके, साप्ताहिके, वार्षिक अंक, दिवाळी अंकाचा समावेश करावा लागेल. चित्रपटाची समीक्षा, बातमी, जाहीरात यातून प्रसिद्ध होते. चित्रपटाच्या प्रसिद्धीसाठी पी.आर.वो. नेमावा लागतो. त्यामुळे या मुद्रित  प्रसारमाध्यमाचा समावेश पण चित्रपटामध्ये होतो.

इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमामध्ये आकाशवाणी, दूरचित्रवाणी, इंटरनेट, मोबाईल याचा समावेश होतो. अलीकडे इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमामध्ये व्हॉटस्अप, फेसबूक, यू टूब, ट्वीटर, इन्स्टॉग्राम यांच्या वापरामुळे झपाट्याने दळण वळणामध्ये बदल झाले आहेत. या सर्वांचा वापर चित्रपट निर्मितीसाठी होतो. म्हणून चित्रपट माध्यमाचं माध्यम आहे.

वरील पैकी बरीच माध्यमं एकांगी आहेत. काही माध्यमामध्ये एखाद-दुसऱ्या इतर माध्यमाचा समावेश होतो. पण चित्रपटासारखी व्यापकता इतर माध्यमांमध्ये नाही. त्यामुळे चित्रपट निर्मिती एका व्यक्तीने होत नाही. खूप लोकांचे परिश्रम त्याला कारणीभूत होतात. शिवाय भरपूर पैसाही खर्च करावा लागतो. त्यामुळे चित्रपट निर्मिती म्हणजे एक उद्योगधंदाच आहे.

## ❑ माध्यमाचे माध्यमांतर

माध्यमांतर म्हणजे एक माध्यमाच्या कलाकृतीची इतर माध्यमामध्ये झालेली निर्मिती होय. उदा. आनंद यादवाच्या 'नटरंग' कादंबरीवरून 'नटरंग' चित्रपट निर्माण झाला. वि. वा. शिरवाडकरानी लिहिलेल्या 'नटसम्राट' नाटकावरून 'नटसम्राट' चित्रपट निर्माण झाला.

एखाद्या कादंबरीचं किंवा नाटकाचं चित्रपटामध्ये माध्यमांतर होत असताना ते 'रुपांतर' असत नाही. तर निर्मिती असते. उदा. कादंबरीतील घटना-प्रसंग जसेच्या तसे आणि सगळेच घटना प्रसंग चित्रपटामध्ये येतीलच असे नाही. कारण कादंबरीचा आकृतीबंध व सिनेमाचा आकृतीबंध वेगवेगळा आहे. सिनेमामध्ये कॅमेऱ्याच्या सहाय्याने त्या घटना चित्रित कराव्या लागतात. त्यासाठी तंत्राचा वापर

करावा लागतो. घटना-प्रसंग छायाचित्रण करता येण्यासारख्या असावे लागतात. म्हणून माध्यमांतर म्हणजे 'एक माध्यमाचं दुसऱ्या माध्यमामध्ये झालेलं जसंच्या तसं रुपांतर' असं म्हणता येत नाही. ती नवनिर्मितीच असते. मग चित्रपटाचं इतर माध्यमामध्ये माध्यमांतर होतं का? होय. निश्चित!

''कोणत्याही लिखित अथवा अलिखित माध्यमाचं चित्रपटासारख्या दृकश्राव्य माध्यमामध्ये झालेली निर्मिती त्याला आपण इतर माध्यमाचं चित्रपण माध्यमामध्ये झालेलं माध्यमांतर म्हणू'' तर-

''चित्रपटाचं इतर माध्यमामध्ये झालेलं माध्यमांतर त्याला चित्रपटाचं इतर माध्यमामध्ये झालेलं माध्यमांतर म्हणू'' उदा. 'अर्धसत्य' चित्रपटाच्या शुटींगच्या वेळी श्री. दा. पालवणकरांनी लिहिलेली रोजनिशी माध्यमांतर आहे तर 'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमामध्ये ''सैराट'' मधली कथा नाट्यरुपात सादर होत असेल तर ते चित्रपटाचं माध्यमांतर आहे. किंवा एखाद्या पथनाट्यामध्ये पथनाट्य सादर करत असताना एखाद्या चित्रपटाची कथा मांडली जात असेल तर ते माध्यमांतर आहे.

माध्यमांतर कोणकोणत्या गोष्टीचं होतं? कादंबरीचं माध्यमांतर जसं होतं तसं नाटकाचंही होतं. उदा. 'कट्यार काळजात घुसली' या संज्ञेत नाटकावरून 'कट्यार काळात घुसली' हा मराठी चित्रपट आला. म्हणजे नाटकाचं चित्रपटामध्ये माध्यमांतर होतं. तसं कवितेचं पण होतं. उदा. नागराज मंजुळे यांनी बनविलेला लघु चित्रपट पिस्तुल्या' याची संकल्पना महात्मा फुले यांनी लिहिलेल्या 'विद्येविना मती गेली।' या अखंडावरची आहे. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेल्या अनेक कादंबऱ्यावरून चित्रपट निर्माण झाले आहेत. उदा. 'फकिरा', 'माकडीचा माळ', 'वारणेचा वाघ', 'वैजयंता' इत्यादी. तर केतन देसाई यांनी बनविलेला चित्रपट 'अजिंठा' हा ना. धो. महानोर यांनी लिहिलेल्या खंडकाव्यावरून घेतला आहे.

चित्रपटाचं चित्रपटामध्ये रुपांतर होतं. त्याला आपण माध्यमांतर म्हणू शकत नाही. उदा. 'सैराट' चित्रपटाचा रिमेक आता हिंदीमध्ये आला 'धडक!' किंवा मद्रासी, बंगाली चित्रपटाचे अनुकरण करून हिंदीमध्ये, मराठीमध्ये ते चित्रपट डब करून दाखविले जातात. त्याला आपण माध्यमांतर म्हणत नाही. कारण माध्यमांतर होत असताना दोन वेगवेगळी माध्यमं असणं गरजेचं आहे. एकाच माध्यमाचं त्याच माध्यमांमध्ये झालेलं रुपांतर त्याला माध्यमांतर म्हणता येत नाही. ते **रुपांतर** असतं किंवा **भाषांतर** असतं.

आता प्रश्न उरतो, माध्यमांतर का होतं ? माध्यमांतर होण्याची अनेक कारणे आहेत. हौसेपोटीही माध्यमांतरे होतात. पण एखादी कथा, कादंबरी किंवा नाटक वाचून, त्यावरती चित्रपट काढावा असं वाटलं. आणि असं वाटण्याची अपरिहार्यता अधिक चांगल्या प्रकारे माध्यमांतर करू शकते. उदा. बंगाली भाषेतील अनेक गाजलेल्या कादंबऱ्यावरून सत्यजित रॉय यांनी चित्रपट बनविले. 'पाथेर पांचाली'

त्यापैकीच एक 'देवदास' चित्रपटाची निर्मितीही अशीच आहे. पण माध्यमांतर होत असताना, दिग्दर्शकांला दोन्ही माध्यमाची समज, जाण असणं अपेक्षित आहे. नाहीतर चुकीच्या पद्धतीने माध्यमांतर होऊ शकतं. माध्यमांतर होताना आणखी एक कारण महत्त्वाचं ठरतं. व्यावसायिकता एखाद्या गाजलेल्या लोकप्रिय कादंबरीचं, नाटकाचं चित्रपटामध्ये माध्यमांतर करावं असं वाटणं स्वाभाविक आहे. कारण चित्रपटाच्या कथेवर भरपूर पैसे खर्च करावे लागतात. ते वसूल होणे पण महत्त्वाचे असते. तसंच गाजलेल्या सिनेमावरती कादंबरी लिहाविशी वाटते. त्याचं नाट्य रूपांतर करावंसं वाटतं. पण सगळेच कलावंत असे करतात असे नाही. माध्यमांतर करू वाटण्याची अपरिहार्यता येथे खूप महत्त्वाची आहे. आता दुसरा प्रश्न माध्यमांतराकडे कसं पहावं? माध्यमांतराची समीक्षा करीत असताना, ढोबळपणे त्या चुकीचं किंवा बरोबर ठरवू नये. दोन्ही माध्यमाचे आकृतीबंध आणि गुणवैशिष्ट्ये लक्षात घ्यावीत. एखाद्यावेळेस कथा, कादंबरीमध्ये न दिसणारी बाब चित्रपटामध्ये येऊ शकते. तर चित्रपटात न दिसणारी बाब कथा, कादंबऱ्यामध्ये येऊ शकते. उदा. ''नागासारख्या जिभल्या चाटीत वाहुटुळाचे झोत डोंगराला भिडले होते.'' कथेतलं हे दृश्य चित्रित करत असताना अनेक मर्यादा येणार आहेत. एकतर असे प्रसंग जसेच्या तसे अनुभवून चित्रित करावे लागतील. त्यासाठी वेळ द्यावा लागेल किंवा स्पेशल इफेक्ट व ॲनिमेशन करावे लागेल. दोन्ही बाबी वेळ खाऊ आणि खर्चीक आहेत. पण कथेतील वस्तुनिष्ठता राखण्यासाठी हे करावंच लागेल. म्हणून दोन्ही माध्यमाची व्याप्ती व मर्यादा लक्षात घेऊन माध्यमांतराकडे पाहिलं जावं.

## ३.२.३ दिग्दर्शकाचा दृष्टिकोण

चित्रपट निर्मितीमध्ये दिग्दर्शक हा खूप महत्त्वाचा घटक आहे. अगोदर 'दिग्दर्शक' म्हणेज काय? या शब्दाचा आपण उलघडा करू. 'दिग्दर्शक' म्हणजे दिशा-दर्शक करणारा. इंग्रजीमध्ये त्याला 'डायरेक्टर' म्हणतात. दिग्दर्शक कशा संदर्भात दिशा-दर्शन करतो? लेखकाने लिहिलेल्या चित्रपट संहितेपासून संपूर्ण चित्रपट निर्मितीत जे जबाबदार घटक वा व्यक्ती आहेत त्या सगळ्यांना दिग्दर्शक दिशा-दर्शक करतो. म्हणून दिग्दर्शकाचा प्रवास इतराच्या मानाने खूप लांब आणि जाणिवांच्या दृष्टीने खोलवर असतो. त्याला चित्रपट माध्यमाची पुरेपूर जाण तर असतेच पण समाजामध्ये घडणाऱ्या इतर घडामोडीची पण जाणीव असते. म्हणून दिग्दर्शकाला 'जहाजांचा कप्तान' म्हणतात. पण माझ्या मते तो वाहनचालक आहे. त्याला रस्त्यावरील खाच-खळग्याची जाणीव आहे. तसेच एस.टी. मध्ये बसलेले सहप्रवाशी नेमके कुठे न्यायचे आहेत ते माहित आहे. चित्रपटाच्या प्रवासा दरम्यान दिग्दर्शकाला अनेक सहप्रवाशी भेटतात. उदा. लेखक, निर्माता, निर्मिती व्यवस्थापक, कॅमेरामन, सहाय्यक दिग्दर्शक, रंगभूषाकार, वेशभूषाकार, केशभूषाकार, प्रकाश योजनाकार, कलाकार संकलक, स्पेशल इफेक्ट देणारे लोक, चित्रपटाचे सेन्सॉर करणारे लोक, संगितकार, चित्रपटाचे प्रसिद्धी व वितरण करणारे लोक. बाप रे

बाप' किती लोकांचा हा गोतावळा. दिग्दर्शकाला या सगळ्यांना चित्रपटाच्या संदर्भातील विचार, भावना, कल्पना या लोकांना समजावून सांगावी लागते. 'बाहुबली' चित्रपटाच्या दिग्दर्शकाने हजारो तंत्रज्ञ लोकांशी संवाद साधला होता. एक चित्रपट करावयाचा झाला तर कमीत कमी शंभर ते दिडशे तंत्रज्ञ लोकांशी दिग्दर्शकाला संवाद साधावा लागेल. अगदी स्पॉटबॉय पासून चित्रपट वितरणापर्यंत चित्रपटासंदर्भातील दृष्टिकोण दिग्दर्शकाने समजावून सांगितलेला असतो.

दिग्दर्शकाचा हा दृष्टीकोण अगदी सुरूवातीपासून चित्रपटाच्या शीर्षकावरून दिसतो. 'सैराट' काय आहे? विशिष्ट वयातील मुला-मुलींची वृत्ती. 'ख्वॉडा' काय आहे? कुस्तीतील डाव, असाच ख्वाँडा विशिष्ट समाजाला बसला. 'देऊळ'! देवाचा भरले बाझार. तो माणसाने भरवला. 'कळाव' समाजाला घातला पायबंद आहे. अशी बरीच उदाहरणे देता येतील. उदा. 'श्वास', 'कोर्ट', 'धग', 'जोगवा', 'रिंगण', 'कासव' या चित्रपटाच्या नावातून दिग्दर्शकांचा दृष्टिकोण जाणवतो. शिर्षकाबरोबर चित्रपटामध्ये असतो. एखादी कल्पना किंवा विचार, त्यातूनही दिग्दर्शकाचा दृष्टीकोण जाणवतो. 'थ्री एडियट' मध्ये अमिरखान जेव्हा म्हणतो 'आल इज वेल' या एका ओळीतून विचार कळतो. किंवा 'पिके' चित्रपटाची संकल्पना आणि सुरूवातीचं दृश्य यातून मनुष्याने नंतर धर्माची व जातीची लेबले घेतली आहेत हे कळतं. 'लगे रहो मुन्नाभाई' मधील गांधीजींची मध्यवर्ती कल्पना चित्रपट उंचीवर नेते. 'सैराट' मधील जातवास्तव अस्वस्थ करून सोडतं. इतकंच काय शाम बेनेगले यांनी दिग्दर्शित केलेले चित्रपट 'मंथन', 'निशांत', 'अंकूर', 'पर', 'आरोही' यातून दिग्दर्शकाचं सामाजिक आकलन किती जबरदस्त आहे याची प्रचिती येते. सत्यजित रॉय यांचे 'पॉथरे पांचाली', 'महानगर', 'नायक', 'देवी' यातूनही त्यांचे विचार व दृष्टिकोण कळतात. मराठीमधील 'सामना' 'सिंहासन' या चित्रपटामधूनही सहकार व राजकीय क्षेत्र समजतं. थोडक्यात चित्रपटामधून दिग्दर्शकाचा दृष्टीकोण कळतो. या 'आशय-विषयांच्या निवडीवरून तसेच चित्रपटाच्या मांडणीवरूनही कळतो. म्हणून चित्रपट निर्मितीमध्ये दिग्दर्शकाची कल्पकता आणि विचार खूप महत्त्वाची गोष्ट आहे. संपूर्ण चित्रपटामध्ये विचार व कल्पकता असतेच पण चित्रपटातील प्रत्येक दृश्यामध्ये ते दृश्य तेच का चित्रीत करावयाचे? यामध्येही दिग्दर्शकाचा दृष्टीकोण दिसतो. फॅण्ड्रीमध्ये व सैराटमध्ये केलेल्या झाडांचा व निसर्गाचा वापर आणि कलाकाराची निवड चित्रपटाला वेगळ्या उंचीवर नेतो. फॅण्ड्रीमधील सोमनाथ अवघडे (झब्या) यानेपण हलगी वाजवली, डोक्यावर पेटती समई घेतली आणि हिरॉईनभोवती नाचत हिंदीतील अनेक हिरोनी हलग्या वाजवल्या पण जाणीव आणि अनुभवाच्या पातळ्या वेगवेगळ्या आहेत. त्याला उच्च व निच्चतेचे पदर आहेत. नागराज मंजुळेचा 'फॅण्ड्री' त्यामुळे वेगळा चित्रपट ठरतो व त्यांचा दृष्टीकोण दिसतो. तो कलाकार निवडीपासून दिसत राहतो. चित्रपटामध्ये अमूकच हिरो व अमूकच हिरॉईन असावी ही संकल्पना नागराज मंजुळे व काही तरूण दिग्दर्शकांनी मोडीत काढली आहे. अनुभवाची वस्तुनिष्ठता राखण्यासाठी त्यांनी वेगळे प्रयोग केले आहेत. हे प्रयोग आशय, विषय, भाषा व अभिव्यक्तीच्या बाबतीतही झाले आहेत. एखादं पोष्टर डिझाईन करतानाही

किंवा एक, दीड मिनीटाचा टीझर बनवतानाही दिग्दर्शकाचा दृष्टिकोण जाणवतो. याही दिग्दर्शकाला खालील बाबींचं ज्ञान असणं गरजेचं आहे -

१. चित्रपट माध्यमाचं ज्ञान.

२. चित्रपट निर्मितीचे तंत्र.

३. चित्रपटातील पात्रांचे स्वभाव व त्याचे निसर्ग व प्राण्यांशी असणारे सहसंबंध.

४. व्यापक सामाजिक विचारधारा व तत्त्वज्ञान.

५. चित्रपटाचे भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय व सामाजिक वातावरण.

६. माणसांच्या वागण्या-बोलण्याच्या तऱ्हा, लकबी व त्यांची भाषा.

यावरून दिग्दर्शक व्यापक दृष्टिकोण असणारा असावा हे कळतं. चित्रपट संहितेपासून दिग्दर्शकाचा प्रवास सुरू होतो. निवडलेल्या स्थळाचं तो 'रेकी' (निरीक्षण) करतो. व्यंकटेश तात्या माडगूळकरांनी 'बनगरवाडी' चिपटाचं शुटिंग करावयाच्या अगोदर तंत्रज्ञ लोकांची टीम 'लेंगरेवाडी' गावात आणली होती. तिथे मेंढरांचं येणं जाणं, त्यांच्या पायवाटा, कोकराचं, मेंढराचं ओरडणं, मेंढक्याचे मेंढर बोलवणं, त्यांच्या हालचाली, लकबी, कुणी माऊलीनं मारलेली हाक या सगळ्यांच्या नोंदी घ्यायला लावल्या होत्या. दिग्दर्शक लोकेशन पाहून झालं की स्वत:चा स्टोरीबोर्ड तयार करतो. कॅमेरामन, वेशभूषाकार, रंगभूषाकार आणि सहाय्यक दिग्दर्शकाकडून चित्रिकरण करण्यासाठी लागणाऱ्या संहिता तयार करून घेतो. या संहिता वेगवेगळ्या प्रकारच्या असतात कधी चित्रांचं स्केच काढले जातात. कधी स्टील (स्थीर) फोटोंचा वापर केला जातो. या सगळ्यामधून दिग्दर्शकाचा दृष्टिकोण समजला जातो. चित्रपट निर्मिती दिग्दर्शकाच्या सल्ल्यानुसार होते म्हणून यश व अपयशाला त्यालाच जबाबदार धरले जाते.

## ३.२.४ छायाचित्रण

छायाचित्रणाला चित्रपटामध्ये खूप महत्त्व आहे. ती कला आहे. तसेच तांत्रिक कौशल्याचा पण भाग आहे. चित्रपटामध्ये कॅमेऱ्याच्या भाषेला खूप महत्त्व आहे. साहित्यामध्ये म्हणजे कथा, कादंबरी, कविता, नाटकामध्ये पण भाषा असते. ती अर्थवाही शब्दांने उलगडत जाते. चित्रामध्ये चित्राची भाषा, रंगाची ठेवण आहे. नृत्याची, संगिताची पण भाषा आहे. तशीच कॅमेऱ्याची भाषा कॅमेऱ्याने दृश्यित केलेली दृश्ये आहेत. ती दृश्ये एकमेकांसमोर ठेऊन संकलन केलं की चित्रपट तयार होतो. एका चित्रपटामध्ये अनेक दृश्यांची मालिका असते. कॅमेरा वेगवेगळ्या प्रकारे ही दृश्ये दृश्यित करतो. यावरूनही छायाचित्रणाचे प्रकार पडतात. काही वेळा शब्दातून प्रसंगाची परिणामकारकता जाणवत नाही. पण नुसती

दृश्ये पाहून जाणवते. पूर्वी चित्रपट मुकपटच होते. पण लोकांना कळत होते. त्याचे कारण दृश्याची परिणामकारकता, चित्रपट पाहाताना कान, डोळा, मन, मेंदू एकत्रीत होतात. त्यामुळे परिणामकारकता वाढते. म्हणून सिनेमा ऐकण्यापेक्षा बघितल्यावर जास्त कळतो. त्यातून छायाचित्रकाराची कलासक्त जाणीव व कौशल्य कळतं. म्हणून छायाचित्रण हा चित्रपटाचा तिसरा डोळा आहे आसं म्हणतात. पहिला डोळा लेखक व दुसरा दिग्दर्शक असतो. छायाचित्रणकार हा तिसरा डोळा असतो. कारण चित्रपट प्रदर्शनापूर्वी त्यानेच पाहिलेला असतो. यासाठी कॅमेरामनला कॅमेऱ्याची तंत्रे माहित असणं गरजेचं आहे. कॅमेरा, फोकस, कलर टोन, व्हाईट बॅलन्स, लेन्सचा वापर, लाईटचा वापर, कॅमेरा अॅक्सेसरीजचा वापर त्याला करता आला पाहिजे. एखादं पुस्तक वाचून किंवा चित्रपट पाहून छायाचित्रण करता येणार नाही. त्यासाठी सराव-सराव आणि अनुभव महत्त्वाची गोष्ट आहे. कॅमेरा वापरावरून काही बेसिक कॅमेरा शॉट पडतात ते खालीलप्रमाणे :-

१. **अती दूर दृश्य** (Extreem long shot) : कॅमेऱ्याने खूप लांबून घेतलेले दृश्य चित्रपटामध्ये अशा दृश्याची गरज असते. तेथील भौगोलिक परिस्थिती कळण्यासाठी अशी दृश्ये गरजेची असतात.

२. **दूर दृश्य** (Long Shot) : अती दूर दृश्याच्या मानाने कमी लांबवरून ही दृश्ये घेती जातात.

३. मध्यम समीप दृश्य (Mid shot)

४. समीप दृश्य (Close shot)

५. अती समीप दृश्य (Extreem close shot)

६. Low Angle खालून वरती घेतलेले दृश्य.

७. Top Angle किंवा Bird eye's Angle उंचावरून घेतलेले दृश्य.

८. Over the slogder shot (ols) एका व्यक्तीच्या खांद्यावरून समोरच्या व्यक्तीचे घेतलेले समीप (close) दृश्य.

९. Two shot : दोन व्यक्तीचे दृश्य

१०. Tree shot : तीन व्यक्तीचे दृश्य

११. Group shot : व्यक्तींच्या समूहाचे दृश्य.

१२. Point of view : एका व्यक्तीच्या दृष्टीकोणातून इतर व्यक्तीचे, प्राण्याचे किंवा वस्तूचे घेतलेले दृश्य.

१३. एका दृश्यामध्ये काय काय आहे ते दाखविण्यासाठी सुद्धा काही दृश्ये घेतली जातात. त्याला Estaciles shot म्हणतात. नंतर त्या एका मोठ्या दृश्याचे वर्गीकरण (Shot Division) छोट्या दृश्यामध्ये करावे लागते. त्यासाठी कन्ट्युनिटी महत्त्वाची असते.

कॅमेऱ्याबरोबर कोणत्या ॲक्सेसरीज? आणि त्या कशा वापरल्या आहेत यावरूनही दृश्याचे प्रकार पडतात. ते खालीलप्रमाणे :-

१. Title Up : क्रेनवरच्या कॅमेऱ्याने उंचावरती येणे.

२. Title Down : क्रेनवरच्या कॅमेऱ्याने उंचावरून खाली येणे.

३. Pan Right : ट्रॉलीवरचा कॅमेरा उजवीकडे नेणे.

४. Pan Left : ट्रॉलीवरचा कॅमेरा डावीकडे नेणे.

५. डॉली इन : कॅमेरा उद्दिष्टाजवळ नेणे.

६. डॉली आऊट : कॅमेरा उद्दिष्टापासून लांब नेणे.

हल्ली चित्रीकरणासाठी ड्रोन, ग्लिम्बलसारखी उपकरणे वापरली जातात. हे सगळे उपकरणाद्वारे घेतली गेलेली दृश्ये आहेत. शिवाय कॅमेऱ्यामध्ये वेगवेगळी दृश्ये घेण्यासाठी, वेगवेगळ्या लेन्स वापरल्या जातात. छायाचित्रकाराला कोणती लेन्स कोठे वापरावयाची आहे. त्याचे ज्ञान असायला पाहिजे. त्याचबरोबर चित्रपटामध्ये कोणते v.fx (Video effect) येणार आहेत. त्यासाठी चित्रीकरण कसे करावे लागणार आहे. प्रकाशाची मेगीबद्धता कशी आणली जाणार आहे? त्यासाठी कोणते रंग व प्रकाश योजना कशी ठेवायला पाहिजे? याचे ज्ञान असणे रजेचे आहे.

## ३.२.५ चित्रपटाचा आस्वाद

माध्यमं अनेक आहेत. आणि माध्यमांच्या कलाकृतीला पण त्यांची अशी वेगवेगळी सौदर्यमूल्ये आहेत. तशीच चित्रपटाला पण सौंदर्यमूल्ये आहेत. ही सौंदर्यमूल्ये कोणत्या घटकाच्या द्वारा निश्चित होतात?

चित्रपटाचा आशय, चित्रपटाची अभिव्यक्ती, कॅमेऱ्याची भाषा, चित्रपटामध्ये वापरलेली प्रतिके, रंगभूषा, वेशभूषा, पार्श्वसंगीत, संकलन, कलाकारांचा अभिनय, चित्रपटाने जोपासलेला विचार व लोकांना दिलेला संदेश यातून चित्रपटाची मूल्ये विकसित होतात. उदा. 'फॅण्ड्री' चित्रपटातील झब्याचे आई-वडील अडाणी तरीही राष्ट्रगीत सुरू झाल्यावर डुकर पकडायचं सोडून अभिवादनासाठी उभे राहातात. इथे दिग्दर्शकाने जोपासलेले मूल्य खूप सुंदर आहे. हा देश सगळ्यांचा आहे. शहरातील, खेड्यातील,

पाड्यातील लोकांचाही आहे. मग २६ जानेवारीला व १५ ऑगस्टला राष्ट्रीय सण म्हणून किती लोक ध्वजवंदन करण्यासाठी उभे असतात. शाळा, कॉलेजची मूलं, शिक्षक, ग्रामपंचायत सरपंच व सदस्य आणि ग्रामसेवक, बाकीच्या लोकांचा देश नाही का? म्हणून 'फॅण्ड्री'कडे बघताना वेगळ्या जाणिवेने पहावे लागते व त्याचा आस्वाद घ्यावा लागतो. कारण आताचे दिग्दर्शक चित्रपटामध्ये वस्तुनिष्ठता आणण्याचा प्रयत्न करतात. माणसांचा घाम, त्याची अनघड भाषा, भाषेतील उच्चार, त्याचं दिसणं, वावरणं, आज दिग्दर्शकाना हवं आहे. म्हणूनच चित्रपटातील हा नवा प्रयोग लक्षात घेऊन आपली आस्वाद प्रक्रियापण समीक्षक, प्रेक्षकांनी वाढवली पाहिजे. त्यासाठी आज वेगवेगळ्या शहरामधून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टीव्हलचं आयोजन केलं जातंय. यातून जगभरातले दर्जेदार चित्रपट लोकांना पाहाता येऊ लागले आहेत. कालांतराने साहित्यासारखे चित्रपटामध्ये ग्रामीण, दलित, शहरी, स्त्रीवादी चित्रपट म्हणून प्रवाह निर्माण होतील का हा प्रश्न आहे. सध्यातरी चित्रपटाकडे चित्रपट म्हणून पाहाण्याचा दृष्टीकोण दिसत आहे.

## ३.३ समारोप

चित्रपट कसा असावा? करमणूकीप्रधान की समस्याप्रधान? चित्रपट कोणाचा? निर्मात्याचा? दिग्दर्शकाचा? का ते एक सामाजिक माध्यम? याची उत्तरे जवळ-जवळ आपण शोधली आहेत. इथे एक गोष्ट आवर्जून नमूद कावीशी वाटते. चित्रपट माध्यम हे साामजिक दृक-भाष्य माध्यम आहे. माणसाने माणसांच्या गरजेपोटी ते शोधले आहे. यातून मनुष्य आपले विचार, भावना, कल्पना, संदेश, माहिती एकमेकांला देत आहे. यामध्ये अनेक माध्यमांचा समावेश होतो. म्हणून ते माध्यमाचे माध्यम आहे. यामध्ये तांत्रिक बाजू खूप मोठी आहे म्हणून तंत्राशी त्याचा संबंध आहे. आणि चित्रपट निर्मितीसाठी भरपूर पैसे खर्च करावे लागतात. म्हणून त्यामध्ये व्यावसायिक मूल्ये पण आहेत. हजारो लोकांच्या रोजी-रोटीचे प्रश्न सोडविण्याची ताकत चित्रपटामध्ये आहे. चित्रपटाचे संस्कार मनुष्यावरती होतात. नट नट्यांच्या पेहरावाचं, केशभूषेचं, अभिनयाचं अनुभरण मनुष्य करतो. त्यातून एखाद्या पिढीची वागण्या-बोलण्याची 'स्टाईल' विकसित होते. या ही अर्थाने ते सामाजिक दृकभाष्य, माध्यम आहे.

## ३.४ कठीण शब्दांचे अर्थ

☞ **D. I.** (Digital Intermeoieat) : चित्रपटाच्या संकलनानंतर रंग संगती व प्रकाश योजनेची केलेली श्रेणीबद्धता

☞ **स्टोरी बोर्ड** : कॅमेऱ्याने दृश्यित करावयाच्या दृश्याची दिग्दर्शकाने तयारी केलेली साहिता.

- ☞ **स्टोरी ब्रेकडाऊन** : कॅमेऱ्याने चित्रीत करावयाच्या चित्रपट कथेची दिग्दर्शकाने तयार केलेली संरचनात्मक संहिता.
- ☞ **स्टाईल** : शैली.
- ☞ White Balance : पांढऱ्या रंगाचं कॅमेऱ्याने केलेले संतुलन
- ☞ Focus : प्रकाश व दृश्याचा केंद्र बिंदू
- ☞ Frame Refe : दर सेकंदाला दृश्ये चित्रीत करण्याचे प्रमाण.
- ☞ Folly : चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान निर्माण होणारा वातावरणातील घटकांचा आवाज.

## ३.५ सरावासाठी अंतर्गत विकल्पासह लघुत्तरी प्रश्न.

१. चित्रपट माध्यमाचे माध्यम आहे स्पष्ट करा ?

२. 'चित्रपट हा दृकभाष्य माध्यम आहे' स्पष्ट करा?

३. चित्रपट म्हणजे काय?

४. 'फिल्म', 'मोशन मुवी', 'सिनेमा' व 'चित्रपट' शब्दाच्या संकल्पना स्पष्ट करा.

५. 'चित्रपट निर्मितीमध्ये दिग्दर्शकाचे दृष्टिकोण महत्वाचे असतात' या विधानाची चर्चा करा.

६. चित्रपट निर्मितीमधील दिग्दर्शकाची भूमिका स्पष्ट करा.

७. चित्रपटाचे माध्यमांतर कसे होते?

८. माध्यमांतर म्हणजे काय ते सांगून माध्यमांतराचे स्वरूप स्पष्ट करा?

९. 'छायाचित्रण एक कला व कौशल्य आहे' स्पष्ट करा.

## ३.६ पूरक वाचन

१. 'अक्षरबंध' प्रकाशन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. पुरस्कार प्राप्त चित्रपट उदा. फॅन्ड्री, ख्वॉडा, देऊळ, कासव, रिंगण, नटरंग, श्वास, टिंग्या, जोगवा, कोर्ट पहावेत.

३. चित्रपटाचे सौंदर्यशास्त्र - मा. सतिश ठाकूर, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००८.

४. फिल्म निर्देशन : कुलदीप सिन्हा, राधामोहन प्रकाशन, नई दिल्ली.

५. सूर का सातवाँ घोडा : (हिंदी फिल्म) शाम बेनेगल.

## ३.७ संदर्भ सूची


१. मराठी विश्वकोष : खंड-५, पृ.

२. Save the cat : Author Blake sayder.

३. The Filmmaker's eye : Gusted Mercado focal Press : Page - 72 to 74.

४. Screen Play : The foundation of Screen writing : SYD Field.

**घटक – ४**

# चित्रपटाची कथा–पटकथा–संवाद

अनुक्रमणिका


४.१ उद्दिष्ट्ये

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

४.४ ४.४.१ चित्रपटाची व्याख्या

४.४.२ चित्रपटाची कथा

४.४.३ पटकथा

४.४.३.१ प्रतीकात्मकता

४.४.३.२ दृश्यात्मकता

४.४.३.३ कास्टिंग

४.४.४ चित्रपट संवाद

४.५ ४.५.१ संगीत

४.५.२ गीत

४.६ अभिनय

४.६.१ आंगिक अभिनय

४.६.२ सात्विक अभिनय

४.६.३ वाचिक अभिनय

४.६.४ आहार्य अभिनय

४.७ ४.७.१ ध्वनी

४.७.२ प्रकाश योजना

४.७.३ वेशभूषा

४.८ संकलन–संपादक

४.९ चित्रपटाचा आस्वाद

४.१० समारोप

४.११ शब्द व शब्दार्थ

४.१२ स्वयं-अध्ययन प्रश्नोत्तरे

४.१३ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.१४ सरावासाठी प्रश्न

४.१५ उपक्रम

४.१६ अधिक वाचनासाठी संदर्भ

## ४.१ उद्दिष्ट्ये

१. चित्रपटाची कथा-पटकथा व संवाद यांचे आकलन करून घेणे.

२. चित्रपटांचे गीत व संगीत यांची पार्श्वभूमी समजून घेणे.

३. ध्वनी-प्रकाशयोजना आणि वेशभूषा यांची ओळख करून देणे.

४. चित्रपटामधील अभिनयाचे प्रकार समजून घेणे.

५. चित्रपटाचा आस्वाद कसा घ्यावा याचा अभ्यास करणे.

६. चित्रपट आणि प्रसारमाध्यमे यांच्या लेखन आणि उपयोजनाच्या आकलनाचा अवकाश वाढविणे.

## ४.२ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रहो, मागील घटकात आपण चित्रपट म्हणजे काय? दिग्दर्शकाचा दृष्टीकोण आणि छायाचित्रणाचा अभ्यास केला तर मित्रहो या घटकात आपल्याला चित्रपटाची कथा कशी असते, पटकथा कशी असते. तसेच संवाद कसे असतात, याचा अभ्यास करावयाचा आहे. हा अभ्यास करत असताना चित्रपटात गायली जाणारी गीते, या गीताला दिले जाणारे संगीत आणि संगीताच्या तालावर करावा लागणारा अभिनय याचादेखील अभ्यास करणे अपेक्षित आहे. शिवाय चित्रपट निर्मिती करत असताना, ध्वनी-प्रकाश योजना आणि प्रत्यक्ष चित्रपटात काम करणाऱ्या, कलावंताना परिधाण करावयाची वेशभूषा

कशी आवी याचाही अभ्यास करावयाचा आहे. हा अभ्यास करत असताना शेवटी चित्रपट कसा पाहावा, त्याचा आस्वाद कसा घ्यावा, हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे.तर विद्यार्थी मित्रहो, आपण या घटकात पुढीलप्रमाणे चित्रपटासंबंधीचा आढावा घेऊयात.

## ४.३ विषय विवेचन

भारतीय माणूस मुख्यत्वे गोष्टी वेल्हाळ आहे. गोष्ट सांगणे किंवा ऐकणे त्याला खूप आवडते. हीच गोष्ट ऐकण्यापेक्षा ती चित्ररूपाने पडद्यावर बघायला मिळाली तर........? ही कल्पना वाटणारी घटना २८ डिसेंबर १८९५ या दिवसाच्या संध्याकाळी सत्यात उतरली. ''ल्युमिएर बंधूंनी सिनेमॅटोग्राफचं (cinematograph) प्रथम प्रात्यक्षिक पॅरिसमधल्या कॅफे ग्रँडमध्ये केले. हा सिनेमाचा जन्मदिवस होता.''

धुंडिराज गोविंद फाळके अर्थात दादासाहेब फाळके यांनी १९९३ मध्ये पहिला भारतीय चित्रपट 'राजा हरिश्चंद्र' निर्माण केला आणि भारतीयांसाठी पडद्यावर दिसणारी गोष्ट अस्तित्वात आली. आपल्याला सर्वांनाच आज चित्रपट बघायला आवडतो. ''सिनेमा हे स्वतंत्र वृत्तीच्या माणसाच्या हातातील एक भव्य आणि अमोघ अस्त्र आहे. माणसाची स्वप्ने, भावना आणि सहज प्रेरणांचे ब्रह्मांड व्यक्त करण्याचे ते एक सर्वोत्तम साधन आहे. माणसाच्या निद्रावस्थेत त्याचे मन वेगळ्या प्रकारे काम करत असते. त्या अनुभवाच्या सर्वात जवळचे असे मानवी अभिव्यक्तीचे साधन म्हणजे चित्रपट. प्रतिमांची कल्पक हाताळणी. चित्रपट म्हणजे जणू स्वप्नावस्थेत अजाणतेपणी केलेले अनुकरण'' असे अनिल झणकर म्हणतात.

भारतीयांनी सिनेमाकडे पाहण्याची आपली दृष्टी खूपच संकुचित ठेवली आहे. अनेक लोककलांना आश्रय देणारी, संगोपन करणारी भारतीय मानसिकता सिनेमाबाबतीत सिद्ध होऊ शकली नाही. सिनेमाबाबत टॉलस्टॉय म्हणतो, ''गतिमानाचे गूढ ईश्वरी वरदांन लाभलेले एक महान माध्यम.'' सिनेमाला गांधीजींनी जुगार, सट्टा यांच्या रांगेत उभे केले खरे मात्र त्यांच्याच जीवनावर अनेक सिनेमे निर्माण झाले आहेत. टॉलस्टॉय पेक्षा गांधींच्या विचारांचा प्रभाव भारतीय मानसिकतेवर जाणवतो. ''सिनेमा म्हणजे सेकंदात चोवीस वेळेला मांडलेले सत्य'' असं म्हणणारा गोदार आम्ही दादासाहेब फाळक्यांच्या सोबत समजून घ्यायला हवा.

जगभरात सिनेमा ही स्वतंत्र विद्याशाखा असताना, आपण मात्र सिनेमाला फारसे जवळ केले नाही. सिनेमा या माध्यमाचे सामर्थ्य समजून घेणे आवश्यक आहे. सिनेमाची स्वतंत्र भाषा असते, दृष्टी असते. हे जाणून घेण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न विद्यार्थ्यांकडून होतीलच असे नाही. शिवाय विविध विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलांचा विकास होणे महत्त्वाचे आहे. कोणतीही कला जेव्हा व्यवसाय होते तेव्हा त्या कलेचा

आणि कलावंताचा सन्मान होतोच. या व्यवसायाने आज जगाला मोहिनी घातलेली आहे. कारण या व्यवसायात दरवर्षी जगात अब्जावधी रुपयांची उलाढाल होत असते. भारताचाच विचार केला तर शंभर करोड कमविणारा हिंदी सिनेमा सामान्य गणला जातो. मराठी सिनेमानेही शंभर करोड पार करावेत (सैराट) ही गोष्ट खूप कौतुकाची आहे.

## ४.४.१ चित्रपटाची व्याख्या

१. "Film or Movie a series of still images that create the illusion of a Moving image." **- Wikipedia.**

२. "Cinema or Motion Picture is the art of Moving images; a Visual medium that tells stores and exposes reality." **- Gabe Moura.**

अर्थात यंत्राच्या साहाय्याने दृक्श्राव्यपध्दतीने घडत जाणारी उत्कंठावर्धक गोष्ट म्हणजे चित्रपट असे आपण म्हणू शकतो.

आज मनोरंजनाच्या क्षेत्रात चित्रपटांबरोबरच दूरदर्शनवर दिसणाऱ्या विविध मालिकांचाही वाटा महत्त्वाचा आहे. चित्रपट क्षेत्राबाबत मानवी मनामध्ये खूप आकर्षण आहे. कलावंत म्हणून उभे राहण्याची इच्छा असणाऱ्या किंवा नसणाऱ्या प्रत्येकाच्या मनात आपण पडद्यावर दिसायला हवे ही भावना असते.

आज चित्रपटांचा केंद्रबिंदू बदलताना दिसतो आहे. पुणे-मुंबईचा वाटणारा सिनेमा आज आपल्याला आपल्या जवळचा वाटू लागला आहे.

## ४.४.२ चित्रपटाची कथा

एक संपूर्ण गोष्ट म्हणजे कथा. आपण लहानपणी आजीकडून ऐकलेली कोणतीही रंजक गोष्ट ही कथाच असते. आपण अकबर-बिरबलाच्या अनेक गोष्टी ऐकलेल्या असतात. मात्र आपण ऐकलेली किंवा वाचलेली प्रत्येक कथा चित्रपटाची कथा होईलच असे नाही. प्रेक्षकांना बांधून ठेवेल, सुसंगत मांडणी असलेली, संभाव्य वाटणारी विलक्षण गोष्टच सिनेमाची कथा होऊ शकते.

कोणत्याही अभिरुचीसंपन्न व्यक्तीला भावणारी एखादी गोष्ट चित्रपट रूपाने पुढे येऊ शकते. बऱ्याचवेळा आपल्या कथा सापडते पण पूर्ण कथा सापडत नाही. म्हणजे ग्रामीण प्रेम (सैराट), धनगरांची भटकंती (ख्वाडा), कथा नक्की झाली की त्याबाबत खोलात जाऊन संशोधन करावे लागते. उदा. काळ,

भाषा, पेहराव, लकब, वेशभूषा, केशभूषा, तत्कालीन घरे, घरातील वस्तू इत्याची अभ्यास केल्यानंतर संभाव्य पात्रे, त्यांचे स्वभाव इत्यादीचे नियोजन करावे लागते.

शिवाय वनलाईन हा एक शब्द सिनेक्षेत्रात सतत वापरला जातो. एका वाक्यात किंवा परिच्छेदात कथानक प्रकट होते, त्याला **वनलाईन** असे म्हणतात. वनलाईन एक कथाकल्पना असते. ती विकसित होते. कथेचे मूळ बीज स्वरूप म्हणजे वनलाईन. कथानकाचे प्रमुख तीन टप्पे पडतात. आरंभ, मध्य आणि शेवट, प्रत्येक टप्प्यांमध्ये गरजेनुसार प्रसंग विकसित केले जातात. त्यामुळे प्रसंगांची स्पष्टता व लेखकाचे म्हणणे अधिक ठळक होत जाते.

## ४.४.३ पटकथा

पडद्यासाठी लिहिलेली कथा म्हणजे पटकथा, लेखकाला किंवा चित्रपटकर्त्याला जे काही संवाद रहित कधीकधी संवादासहित सांगायचे असते ते दृश्यमाध्यमातून सांगण्याच्या कथासूत्राला **पटकथा** असे म्हणतात.

### ४.४.३.१ प्रतीकात्मकता

एखादी गोष्ट जी तुम्ही एखादी प्रतीकात्मक कृती किंवा दृश्य दाखवून तुम्हाला जे काही सांगायचे आहे ते सूचित करता त्याला **प्रतिकात्मकता** असे म्हणतात. उदा. पडद्यावर एखाद्या स्त्रीचा गर्भपात झाल्याचे दृश्य दाखवायचे असेल तर तिथे कोंबडीचे अंडे फुटल्याचे दाखवले जाते किंवा नायक आणि नायिकेचे आलिंगन किंवा चुंबन दोन गुलाब किंवा दोन पक्षी एकत्र आणून दाखविले जाते.

### ४.४.३.२ दृश्यात्मकता

दृश्य विकसित करून म्हणणे अधिक स्पष्ट केले जाते. प्रत्यक्ष तरी अप्रत्यक्ष चित्रण म्हणजे **दृश्यात्मकता**. यामुळे पटकथेच्या कलामूल्यांसोबत वाङ्मय मूल्यांचीही जागा ठळक होते. याशिवाय संगीत, स्पेशल इफेक्टस्, फॉली, निवेदन, प्रकाश, रंग, गती इ. चा स्पष्ट उल्लेख चांगल्या पटकथेत केलेला असतो. शोले चित्रपटाबाबत अजूनही जाणकार लोक सलीम-जावेद या पदकथाकारांना महत्त्व देतात. थोडक्यात कागदावरचा चित्रपट म्हणजेच पटकथा. ही पटकथा जर उत्तम असली तर सिनेमा दर्जेदारच होतो.

दृक्श्राव्य माध्यमातील चित्रपट या कला प्रकारातून व्यक्त होत असताना चित्रांची प्रभावी भाषा प्रभावीपणे आस्वादकापर्यंत पोहोचविण्याकरिता कथेनंतर येतो तो अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणजे ''पटकथा !''

६५ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारात **'म्होरक्या'** या चित्रपटाला एकूण तीन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत.

१) उत्कृष्ट बाल चित्रपट (विशेष उल्लेखनीय कामगिरी).

२) बाल कलाकार - रमण देवकर (अभिनय).

३) बाल कलाकार - यशराज कऱ्हाडे (अभिनय).

'म्होरक्या' या चित्रपटाची कथा-पटकथा-संवाद आणि दिग्दर्शन अमर भरत देवकर यांनी केले आहे. 'म्होरक्या' या चित्रपटातील एक दृश्य आपण बघू या.

**दिवस : १/११ जानेवारी.**

**दृश्य-१ : बहिस्थ. मंदिराजवळील माळरान. आश्याला पकडणे. वेळ : सकाळ १०.४२ वा.**

पटलावर अंधार आहे. वारा, पानांची सळसळ, पक्ष्यांचा आवाज, मेंढ्यांचा आवाज येत आहे. पाच सेकंदानंतर भगवा ध्वज वाऱ्याने फडफडताना दिसतो आहे. त्याचा फडफडण्याचा आवाज ऐकू येतोय. त्याचबरोबर मेंढरांचा आवाज येतो. मेंढ्याच्या गळ्यातील घाट्यांचा आवाज येतोय. ध्वजाच्या बरोबरीने निर्मात्याचे नाव लाल मातीच्या रंगात दिसते आहे.

एक वारूळ दिसत आहे. वारुळात जाणारी मुंग्या किंवा वाळव्यांची ओळ दिसत आहेत. कुसळांचे शेंडे हालताना दिसत आहेत. शाळेच्या गणवेशातील वय वर्ष १३ वयाची ४ पोरे, शाळेचा गणवेश घालून इनशर्ट केलेला, ती पोरं तालीच्या मागून कुसळांतून लपत लपत एका वारुळाच्या मागे दडतात. ते समोरच्या मेंढ्या राखणाऱ्या १३/१४ वर्षे वयाच्या पोराला पाहत आहेत. खांद्यावर आडवी काठी, चिरगुटामध्ये भाकरी कमरेला बांधलेला पोरगा पाठमोरा दिसतोय. तो मुलगा वळताना दिसतो. तशी ती मुलं दबा धरून बसतात. भव्य माळ आणि पलीकडे मेंढरे चरत असल्याचे दिसतेय. दुसऱ्या बाजूला एक छोटेसे मंदिर आणि त्यावर भगवा झेंडा फडकत असल्याचे दिसते आहे. त्या जमिनीवर एक दगडी चीप येऊन पडते. एक १४ वर्ष वयाच्या मुलाची सावली त्या दगडी चिपेशी मेळ साधताना दिसते आहे. चिपेवर त्या मुलाच्या डोक्याची वरची कड स्थिरावलेली आहे. बेल-फळाची कवचे इतरत्र पडलेली दिसत आहेत. जमिनीवर उभ्या असलेल्या मुलाची पावले दिसत आहेत. तो डावे पाऊल उचलतो, पुढे टाकतो, उजवे पाऊल उचलतो आणि पुढे टाकतो. आश्याच्या पलीकडे लपलेली मुली वाकून त्यांच्या उजवीकडे वळताना दिसत आहेत. मंद वाऱ्याचा आणि मेंढ्या गवत खातानाचा आणि ओरडतानाचा आवाज ऐकू येत आहे, तसा त्या मुलाचा आवाज येतो.

(आश्या)

एक........ दोन........

जमिनीवर त्या मुलाचे अनवाणी, रापलेले पाय, पावलं टाकताना दिसत आहेत. तो मुलगा त्याची सावली पावलांनी मोजत आहे.

(आश्या)

तीन ........ चार ........ पाच ........ आन ही सहा ......

खांद्यावर आडवी काठी घेतलेला मुलगा सहाव्या पावलाला चीप पायाखाली घेऊन स्थिरावतो. तशी गवतात लपलेली पोरं कपड्यांमधील कुसळं काढताना दिसत आहेत. मेंढपाळ मुलगा तसाच स्थिर उभा राहिलेला आहे. काही क्षण तसाच स्थिर, हवेचा आणि मेंढरांचा ओरडण्याचा आवाज येतोय. तेवढ्यात मुलगा बोलतो.......

(आश्या)

आं? ............ शाळा भराया फायजी ........

लपलेली मुलं त्याला पाहत आहेत. मेंढपाळ मुलगा तसाच काही क्षण कान टवकारून दूर झाडांमधून दिसणाऱ्या एका इमारतीकडे पाहतोय. काळे केस (सरळ, वाढलेले), मोठे आणि काळेभोर डोळे, सरळ नाक, रेखीव उभट चेहरा, दात व्यवस्थित पांढरे पण एखादा दुसरा तिप्पड, मूळ वर्ण गव्हाळ, पण उन्हामुळे रापलेला (सावळा), पुरेपूर बांधा पण मध्यम प्रकृती, चिवट, काटक, ४.२ इंच (उंची), गुडघे, कोपर, नडग्या, घोटे यावर जखमा, ओरखड्यांचे काही व्रण, पाय सरळ, गुडघे गुडघ्याला न चिकटणारे, हाताला घट्टे, टाचांना भेगा, ओठ उललेले, थोडीफार नखे वाढलेली, डोक्याला टॉवेल, गळ्यामध्ये काळ्या दोऱ्यात असलेला बारका बदाम, मळलेला पांढरा शर्ट, शर्टची पहिली गुंडी मोठी (कोटाची), शर्टच्या खिशाच्या खाली एक दोरा फसकून ओढला गेलेला, हातामध्ये लोकराची गोफ, खाकी चड्डी, चड्डीचे खिशे फुगलेले, कडक झालेली चड्डी, इनशर्ट केलेली, कपाळाला पोताच्या काजळीचा टिकला आणि कुंकू लावलेला मेंढपाळ स्थिर उभा आहे. त्याची जमिनीवर पडलेली सावली दिसत आहे. तो स्थिर उभा राहिलेचे पाहून लपलेल्या पोरांपैकी बारकुळ अंगाच्या बंड्या आणि रफ्याला बाळ्या पायातल्या सॉक्सला लागलेली कुसळे काढत मेंढपाळ मुलाला धरायला जाण्याची खूण करतो. त्यावर भेदरलेल्या बंड्या नकारात्मक मान हालवतो, रफ्या गोंधळलेल्या अवस्थेत जागीच थांबतो, त्यावर बाळ्या बोलतो.

(बाळ्या)

जाताव का नाही?

भारतीय समाजवादी-लोकशाहीच्या पहिल्या 'राज्यकर्त्या' या स्तंभाबद्दल भाष्य करणाऱ्या 'म्होरक्या' या मराठी चित्रपटातील पहिल्याच दृश्यातील नायकाचा परिचय करणारा हा शॉट (चित्रात)! म्होरक्याच्या कथानकताली गर्भित विधानानुसार 'हजारो वर्षापासून भारतात उदयास आलेल्या भिन्न नेतृत्वांचे इथल्या संकुचित विचारधारणेने काय केले?' या प्रश्नाचा ऊहापोह चित्रपटीय भाषेतून व्यक्त केला आहे!

सदर प्रतिमा पटावर येते तेव्हा सोबत मेंढरांचा आवाज येतो. प्रतिमेतील छाया ही जणू काही सुळावर दिलेल्या व्यक्तीची आहे असे दिसते. नायकाचा चेहरा न दाखविता, पहिल्याच दृश्यात आस्वादकाला उत्सुक करून प्रतिमेतील त्या व्यक्तीला/छायेला चेहरा नसूनही तेवढी सर्वसमावेशक करून अंतिमत: वैश्विक करणे पटकथाकाराने निवडले!

सावलीचा आकार हा भारताच्या नकाशाप्रमाणे असण्याचेही पटकथेतून निश्चित झाले आहे. कथेच्या जनुकानुसार, छोट्या व्यवस्थेत म्होरक्या बनू पाहणाऱ्या नायकाचाप्रवास एकाच प्रतिमेतून प्रतीकात्मक असूनही प्रभावीपणे मांडण्यात पटकथाकार यशस्वी झाल्याचे दिसते. सोबतीने येणारा मेंढरांचा आवाज हा भारतीय जनतेचे प्रतीक आहे. म्होरक्या चित्रपटातील प्रत्येक दृक्श्राव्य प्रतिमा अशा प्रकारच्या आशयाच्या जनुकाने गर्भवती आहे. जी असायलाच हवी. हे पटकथाकारांचे प्रौढत्व सिद्ध करते.

## ४.४.३.३ कास्टिंग

कथेतील मूळ व्यक्तिरेखेला तंतोतंत न्याय देण्यासाठी पात्रांची जी निवड केली जाते त्यालाच चित्रपटाचे **कास्टिंग** असे म्हणतात. विविध ऑडिशन्स मधून ती निवड केली जाते. कास्टिंगवर मोठ्या प्रमाणात चित्रपटाचे यशापयश अवलंबून असते. नियोजित पात्राचा स्वभाव व व्यक्तिरेखा यासाठी कोणत्या कलावंताचा चेहरा व देहबोली योग्य ठरू शकते, त्यानुसार कलावंताची निवड होते. मुख्य दिग्दर्शक कास्टिंग दिग्दर्शकाची यासाठी खास नेमणूक करीत असतो.

वर्गीकरण केल्यास चित्रपटाचे दोन विभाग केले जातात. (१) **कलात्मक चित्रपट**, (२) **व्यावसायिक चित्रपट**.

कलात्मक चित्रपट हा व्यावसायिक मूल्यांचा विचार न करता फरक चित्रपटाच्या कथेला वास्तविकतेच्या उच्च पातळीवर नेण्यासाठी केला जातो. यात ऐतिहासिक, पौराणिक, चरित्रात्मक, सत्य घटनेवर आधारित अथवा मूळ लेखकाच्या कथा-कादंबरीवर आधारित कथानक असते. व्यावसायिक चित्रपटाचे नेमके उलटे असते. यामध्ये व्यावसायिक मूल्यांचा विचार करूनच चित्रपट निर्मिती केलेली असते. यातील वास्तव देखील व्यवसायाची गणिते मांडूनच चित्रित केली जातात. काही चित्रपट मात्र याला अपवाद असतात.

## ४.४.४ चित्रपट संवाद

चित्रपटातील संवाद चटकदार हवा. प्रेक्षकांना सभोवतीचे चित्रण विलक्षण हवे असते. जे त्यांच्या सभोवताली घडते पण त्यांच्या नजरेतून सुटलेले असते ते जर पडद्यावर घडले तर त्यांना आनंद होतो. विविध वाक्प्रचार, म्हणींचा वापर संवादात असल्यास ते उठावदार होतात. अर्थात चित्रपटासाठी संवाद हा घटकही तेवढाच महत्त्वाचा आहे. कथालेखक, पटकथा तसेच संवाद लेखकाला दिग्दर्शकाच्या आधी चित्रपट दिसत असतो. दोन व्यक्तीमधील परस्पर बोलणे म्हणजेच संवाद. पात्राची मनोभूमिका समजून घेऊन संवाद लिहावे लागतात. पात्रात स्वभावही गृहीत धरावा लागतो. एखादा ग्रामीण शेतकरी प्रमाणाबाहेर वाक्यप्रचार किंवा म्हणींचा वापर करणार नाही किंवा शांत स्वभावाचा माणूस पुढच्या पात्राला वाईट वाटेल असा संवाद बोलू शकणार नाही.

उदा. 'दिव्याखाली अंधार' ही म्हण प्रसिद्ध आहे. सैराटमध्ये आर्चीचे वडील भाषण करताना म्हणतात, ''कुणाच्या बुडाखाली किती अंधार आहे हे समद्या तालुक्याला माहीत आहे.'' तात्या हे पात्र खेड्यात वाढलेलं आहे. म्हणून त्या पात्राच्या तोंडी तो संवाद खुलून दिसतो. आजचा चित्रपट आधी मूकपट होता; मग चित्रपट झाला आणि आता तो बोलपट झालेला आहे. चित्रपट म्हणजे चित्रांच्या माध्यमातून पडद्यावर दृश्यमान होणारी गोष्ट. दुर्दैवाने आज सगळेच बोलण्यातून दाखवले जात आहे. चित्रपरिणामाचा विचार मागे पडला आहे. अर्थात संवाद मोजकेच पण प्रवाही असावेत. गोष्टीला हळूच पुढे घेऊन जाणारे असावेत. जिथे दोन पात्र डोळ्यातून बोलू शकतात तिथे संवादाला वाव नसतो.

संवाद लेखन जेवढे महत्त्वाचे तेवढेच महत्त्व संवादफेकीला आहे. दिग्दर्शकाच्या आदेशाबरहुकूम पात्राला संवादफेक करावी लागते. त्या पात्राचा स्वभाव, लकब इ.चा अभ्यास केल्याशिवाय त्यात नैसर्गिकता येऊ शकत नाही. संवाद हे चटपटीत, खटकेबाज असावेत जेणेकरून प्रसंगाला रंग चढेल व प्रेक्षकांचे मनोरंजन होईल.

## ४.५.१ संगीत

चित्रपटाचा परिणाम वाढवण्यासाठी संगीताचा वापर केला जातो. चित्रपट दृक्‌श्राव्य असल्यामुळे आवश्यक त्या ठिकाणी संगीताचा वापर केल्यास त्या दृश्याला उठाव येतो. उदा. शोले चित्रपटातील गब्बरसिंगच्या प्रवेशावेळी वाजणारे पार्श्वसंगीत किंवा नायक खूप दिवसांनी घरी आलेला आहे, घराजवळ येऊनबघतो तर गर्दी दिसते. जवळ जाऊन पाहतो तर तिरडीवर आई दिसते. त्याला काहीच बोलता येत नाही. स्वरकंप होतो. स्वरभेद होतो.... आणि काही वेळेनंतर त्याचा आवाज फुटतो तो ओरडतो, ''आईऽऽऽ'' या पूर्ण प्रसंगात फक्त एकच शब्द आहे आई. पण त्याच्या प्रवेशापासून तर रडेपर्यंत

पार्श्वसंगीताच्या वापरामुळे तो आई म्हणायच्या आधी प्रेक्षक रडायला लागतात. संगीताचा खुबीने वापर केल्यास चित्रपटात जीव ओतण्याचे कार्य संगीत करते. या क्षेत्राचा आवाका मोठा आहे आणि चित्रपट क्षेत्राला सतत नवीन हवे असते. आपले संगीत किंवा कलाकृती विलक्षण व प्रभावी नसेल तर चित्रपटाला न्याय मिळू शकत नाही. परिणामी आपण करीत असलेल्या कामाचे कौतुक होत नाही.

### ४.५.२ गीत

कविता हा वाङ्मय प्रकार आपल्याला ओळखीचा आहे. अगदी लहानपणापासून आपण अंगाई, बडबड गीते ऐकलेली असतात. शालेय वयापासून आपल्यात लय, ताल यांचा अंतर्भाव झालेला असतो. कवितेचे अनेक प्रकार आहेत. उदा. अंगाई, अभंग, ओवी, गझल, पोवाडा, लावणी, सुनीत, हायकू, गीत इ. गीताचा वापर भारतीय चित्रपटात पहिल्यांदा १९०५ मध्ये करण्यात आला. आज मराठी-हिंदी चित्रपटात गाण्यांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. चित्रपटक्षेत्र हे एक समृध्द उद्योगक्षेत्र झाले आहे. त्यामुळे लोकरंजनासाठी दिग्दर्शक-निर्माते आग्रही असतात. इतर गोष्टीबरोबर गाणी जर उत्तम झाली तर चित्रपटाला मोठा फायदा होतो. भारतीय माणूस गाणप्रिय आहे. त्याला पडद्यावर गाणे बघायलाही आवडते. दिग्दर्शक चित्रपटात त्याला हवी ती जागा गाण्यासाठी निश्चित करतो. जाणिवा-नेणिवा, सभोवताल, काळ, स्वभाव इत्यादीचा विचार करून गीतकार गाणी लिहितो. विविध प्रतिमा, प्रतीके, रूपके, मिथकांचा वापर गीतकार करीत असतो. पुढचा टप्पा संगीतकार त्याला चाल लावतो व ते गाणे ध्वनिमुद्रित केले जाते. आधी चाल ऐकूनही गीतकार त्यावर गाणे लिहू शकतो. गाणे ध्वनिमुद्रित झाले की, दिग्दर्शक त्याला हवे तसे चित्रीकरण करून घेतो.

जुनी गाणी छान होती असं नेहमी म्हटले जाते. आज प्रेक्षकांची अभिरुची बदलली आहे. परिणामी गाण्यांचे स्वरूपही बदललेले दिसते. गाण्यांमध्ये वाङ्मयमूल्यांचा अभाव दिसत असल्याने गाणी अल्पायुषी ठरत आहेत. कोणत्याही क्षेत्रात घेणाऱ्यापेक्षा देणारा जास्त जबाबदार असतो. सिनेमा दिग्दर्शकाच्या निर्देशानुसार पुढे जातो हे जरी खरे असले तरी शब्दांची भिंत म्हणजे गाणे नव्हे, हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे.

## ४.६ अभिनय

चित्रपट म्हणजे विविध कलांची गुंफण असते. नाट्य, नृत्य, गीत, संगीत, चित्र, शिल्प आदिच्या मिश्रणांचा परिपाक म्हणजे चित्रपट. यात विविध व्यक्तिरेखा कल्पिलेल्या असतात. त्या व्यक्तिरेखांचे स्वभाव भिन्न असतात. त्यांना जिवंत करणे म्हणजे अभिनय. थोडक्यात अभिनय म्हणजे अभिनेता किंवा अभिनेत्रीकडून केले जाणारे ते कार्य ज्याद्वारे ते एखादी कथा दाखवितात. एखाद्या पात्राच्या माध्यमातून

तसेच दिग्दर्शकाच्या आदेशावरून व क्रियेनुसार नट वाणी, शारीरिक हालचाल, हावभाव, वेशभूषा यांच्या माध्यमातून प्रेक्षकांना रसनिर्मितीचा अनुभव देतात. त्याला अभिनय असे म्हणतात. विश्वनाथ म्हणतात, 'भवेदभिनयोऽवस्थानुकार:' म्हणजेच अवस्थेचे अनुकरण म्हणजेच अभिनय.

भरतमुनींनी अभिनयाचे चार प्रकार सांगितले आहेत.

### ४.६.१ आंगिक अभिनय

आंगिक अभिनय म्हणजे शरीर, चेहरा व हावभावाच्या माध्यमातून अर्थाचेप्रकटीकरण करणे. डोके, हात, कंबर, स्तन, पार्श्वभाग आणि पाय याद्वारे आंगिक अभिनय केला जातो. यात डोळे, भुवया, ओठ, कपाळ यांचाही समावेश होतो. अपंग, कुबडा, अंध, म्हातारा यांचा अभिनय आंगिक अभिनयानेच दाखविला जातो. भरताच्या मतानुसार शारीरिक अभिनय थोडासा जरी केला तरी अभिनय दुप्पट होऊन जातो.

### ४.६.२ सात्विक अभिनय

स्वेद, स्तंभ, कंप, अश्रू, वैवर्ण, रोमांच, स्वरभंग आणि प्रलय यांचा आंतर्भाव सात्त्विक अभिनयात होतो. यातील स्वेद, रोमांच व अश्रू दाखविणे कठीण काम आहे. यातील अश्रू तर त्या पात्राने त्या व्यक्तिरेखेच्या भावनेच्या तळाशी गेल्याशिवाय शक्य होत नाही. सिनेक्षेत्रात त्यासाठी ग्लिसरीनचा वापर केला जातो.

### ४.६.३ वाचिक अभिनय

नट मुखावाटे मंचावर किंवा पडद्यावर जे काही बोलतो त्याला वाचिक अभिनय म्हणतात. वाणी किंवा वाचेला अभिनयात महत्त्वाचे स्थान आहे. गुरे राखतानाचा आवाज किंवा पक्ष्यांचा आवाज किंवा शीळ घालणे हे वाचिक अभिनयात येते. वाचेद्वारे आरोह व अवरोह दर्शित करून वाक्यांचा प्रभाव स्पष्ट करता येतो. वाक्यातील नेमका कोणत्या शब्दावर भर द्यायचा आहे हे वाचिक अभिनयाद्वारे निश्चित केले जाते. आवाजवरून एखाद्याचा स्वभाव कळू शकतो. एवढे महत्त्व वाचिक अभिनयाला आहे.

### ४.६.४ आहार्य अभिनय

या प्रकारात मंचावरील किंवा पडद्यावरील पात्राच्या सभोवतीच्या सजावटीचा अंतर्भाव होतो. उदा.राजवाडा, जेल, पोलीस ठाणे इ.चित्रपटात हे कार्य कला दिग्दर्शकाचे असते. नाटकाच्या भाषेत

यालाच नेपथ्य असे म्हणतात. आहार्य अभिनय म्हणजे आहार जसा संपूर्ण असतो. त्याप्रमाणे सर्व बाबींनी युक्त असा अभिनय म्हणजे आहार्य अभिनय. उदा. राजा दिसतो आहे पण मुकुट किंवा तलवार नाही तर तो राजा वाटण्यात संकोच निर्माण होईल व रसभंग होईल. एकूण अभिनय म्हणजे परकाया प्रवेश. अभिनय प्रत्येक व्यक्तीला करता येतो असे नाही. मात्र प्रयत्नाने ही कला साध्य करता येते.

## ४.७.१ ध्वनी

श्रवणेंद्रियाला ज्या उद्दिपणामुळे संवेदना होऊ शकते ते **उद्दिपन** म्हणजे ध्वनी. आपण चित्रपट पाहत असताना पात्रांच्या सूक्ष्म हालचाली किंवा वस्तूंचा होणारा आवाज आपल्याला स्पष्ट ऐकू येतो. त्यामुळेच त्या दृश्याचा परिणाम साधला जातो. आरंभी चित्रपट हा मूकपट होता पण तंत्रज्ञानामुळे त्यात खूप मोठे बदल झाले आहेत. घोंघावणाऱ्या वाऱ्याचा आवाज, वीज, ढगांचा कडकडाट, रातकिड्यांचा आवाज हे **ध्वनी** आलेखामुळे शक्य होते.

चित्रपट जेव्हा जिथे चित्रित करण्याची गरज भासली तेव्हा बाहेरच्या अनेक आवाजांचा अडथळा जाणवू लागला. मग संकलन झाल्यानंतर डबिंगच्या तंत्राचा शोध लागला. पडद्यावर नायकाने ज्याप्रमाणे ओठ हलवले आहेत त्याप्रमाणे परत संवाद बोलून ध्वनिमुद्रण होऊ लागले. त्यामुळे चित्रपट प्रभावी व्हायला मदत झाली. जॅक फोली आणि रे. डॉल्बी या दोन तंत्रज्ञांच्या संशोधनामुळे आजचा सिनेमा प्रेक्षकांना जिवंत अनुभव देत आहे.

आस सिंक साऊंड या अत्याधुनिक शोधामुळे डबिंगलाही मागे टाकले आहे. चित्रिकरण स्थळी मायक्रोमाईक पात्रांच्या जवळ दिल्यामुळे आवाज अधिक स्पष्ट झाला. तसेच सिंकमुळे परिसरातील सूक्ष्म आवाजांची नोंद झाल्यामुळे दृश्याचा परिणामही ठळक झालेला दिसतो.

## ४.७.२ प्रकाश योजना

आजचा कॅमेरा खूप विकसित आहे. तो फ्रेममधल्या अतिसूक्ष्म नोंदी घेतो. मात्र त्याची मुख्य गरज ही प्रकाश आहे. साध्य पात्र किंवा वस्तूवर आवश्यक तो प्रकाश असेल तर कॅमेरा कमजोर पडतो. याशिवाय काही वेळा दृश्यवेळा दृश्यप्रभाव वाढवण्यासाठी प्रकाशाचा वापर केला जातो. उदा. एखाद्या स्त्रीच्या मनाची द्विधावस्था अर्धा चेहरा प्रकाशमान करून दाखवता येते. ४ के, २ के इ. लाईटचे प्रकार आहेत. युनिटसोबत स्वतंत्र जनरेटरची व्यवस्था असते. त्यावर प्रकाश योजना राबविली जाते. वास्तववादी प्रकाश आणि नाट्यात्मक प्रकाश असे प्रकाशाचे दोन प्रकार पडतात. Reflectors, Light Cutters,

Black Cloth, Skimmers, Thermocols, Satin Cloth, Mirror, Baby, Multi, Softy, Kino, HMI, Hallogan इ. संकल्पना प्रकाश योजनेशी संबंधित आहेत. दृश्यांचा अर्थबोध होण्यासाघठी क्रेन, ट्रॉली, जीमीजिप, ड्रोन, रीग ही उपकरणे गरजेनुसार वापरली जातात.

### ४.७.३ वेशभूषा

वेशभूषा चित्रपटाचा महत्त्वाचा भाग आहे. पात्रांच्या स्वभाव-व्यक्तिरेखा अनुसार त्यांच्या पोषाखामुळेच त्या पात्राच्या अभिनयाला उंची प्राप्त होते. रंगसंगतीचे ज्ञान व मानवी स्वभावाच्या अनेक छटांचा अभ्यास असणारी व्यक्ती उत्तम वेशभूषाकार होऊ शकते. उदा. नटाची उंची कमी असेल आणि वाढवून दाखवायची असेल तर उभ्या रेषा असणारे वस्त्र दिले जातात. उलट उंची कमी दाखवायची असेल तर आडव्या रेषांचे वस्त्र दिले जाते. ऐतिहासिक, नाट्यात्मक, वास्तववादी इ. प्रकार वेशभूषेचे गणले जातात. आवश्यक असणारे कपडे कधी शिवून तर कधी भाड्याने आणले जातात. सोबतच ऐतिहासिक सिनेमांसाठी आवश्यक असणारे दागिने कधी बनवून घेतले जातात तर कधी भाड्याने आणले जातात. यासाठी काही प्रायोजकही काम करीत असतात. यासोबतच कला दिग्दर्शक हाही चित्रपटाचा आवश्यक घटक आहे. दृश्याच्या चौकटीत पात्रांच्या मागे-पुढे किंवा दर्शनी भागात कोणती वस्तू का दिसावी हे सहज न लक्षात येणारे पण महत्त्वाचे काम कलादिग्दर्शक करीत असतो.

## ४.८ संकलन-संपादक

संपादक हा शब्द आपण खूप वेळा ऐकलेला, वाचलेला आहे. सामान्यपणे वर्तमानपत्राचा संपादक आणि चित्रपटाचा संकलक भिन्न असले तरी दोघांचेही कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. ज्याप्रमाणे आई स्वयंपाक घरात विविध गोष्टींच्या मिश्रणातून एक चांगला पदार्थ तयार करते तसेच काहीसे संकलनाचे काम आहे. दिग्दर्शक पटकथेनुसार त्याला हवे तसे वेगवेगळे प्रसंग चित्रित करून घेतो. कधीकधी गरजेपेक्षा अधिक प्रसंग व दृश्य तो चित्रित करून घेतो. या सर्व प्रसंगांची एक सलग मालिका निर्माण करण्याचे कार्य संकलकाचे आहे. 'शोले' आधी रिलीज झाला तेव्हा फार चालला नाही, काही दिवसांनी परत एडिट करून 'शोले' रिलीज केला. १९७६ ला एम.एस.शिंदे यांना शोलेसाठी फिल्मफेअरचा सर्वश्रेष्ठ संपादन पुरस्कार मिळाला आहे. थोडक्यात कथेप्रमाणे विविध प्रसंगांची योग्य मांडणी करण्याची व सुयोग्य काटछाट करण्याची तसेच निवड, क्रम व गती या गोष्टींवर काम करून दिग्दर्शकाला हवा असलेला परिणाम साधण्याच्या प्रक्रियेला **संकलन** म्हणतात.

स्टेनबँक नावाच्या मोठ्या यंत्रावर पूर्वी संकलन व्हायचे आता मात्र ते इतर कामाप्रमाणे संगणकावर केले जाते.

## ४.९ चित्रपटाचा आस्वाद

कोणत्याही कलाकृतीचा रसिकावर अपेक्षित परिणाम म्हणजे रसनिष्पत्ती होय. आपण रसिक या नात्याने कलाकृतीच्या उभारणीतील कौशल्याची व सौंदर्यस्थळांची दखल घेत असतो. कलाकृतीला सामोरे जात असताना अनेक प्रश्नांना आपण सोबत घेतलेले असते, शिवाय आपण वेगवेगळ्या विचार संप्रदायातील असतो. या मुद्यांना बाजूला सारून आपण जेव्हा कलाकृतीवर सामर्थ्य आणि उणिवा यांची सहृदयतेने नोंद घेतो हीच **आस्वाद प्रक्रिया** होय.

चित्रकृतींचा आस्वाद घेणे ही आपली भावनिक गरज असते. तथापि चित्रपट चांगला असेल तरच आस्वाद साध्य आहे. रसिकता ही संस्काराने तयार होत असते. संवेदनक्षमता ही चांगल्या रसिकाची खूण आहे. रसिकाची संवेदनक्षमता जेवढी तीव्र तेवढा चित्रपटाचा त्याच्यावर होणारा परिणाम उत्कट व अचूक असतो. चित्रपट अनेक कलांचे मिश्रण असल्याने रसिकाला किमान अनेक कलांची तोंडओळख असावी लागते. त्याची प्रगल्भता व व्यासंग यावर त्याचे आकलन अवलंबून असते.

कोणत्याही प्रयोगजीवी कलेला दाद प्रतिसादाशिवाय जिवंतपण येत नाही. आपण लेणी बघायला जातो तेव्हा आपल्याला दगडात कोरलेल्या मूर्ती दिसतात. त्या ठिकाणी एखादा त्या विषयाचा जाणकार असेल तर त्याला त्या मूर्तीमध्ये एक मोठा अवकाश दिसेल आणि तो त्या क्षणाचा आस्वाद घेऊ शकेल. आस्वाद घेणे म्हणजे आपण जेवताना कशात काय मिसळून खाल्ले म्हणजे त्या पदार्थांची गोडी वाढते याचे भान आपल्याला असते. त्यामुळे अर्थात जेवणाची गोडी वाढते म्हणजे आपण आस्वाद घेऊ शकतो. एखादी गोष्ट आंतर्बाह्य समजून घेण्याची कला म्हणजे आस्वाद. चित्रपट ही मानवी व्यवहाराला अधोरेखित करणारी कृती आहे. मानवी व्यवहाराचे सूक्ष्म निरीक्षणच मानवी प्रश्न किंवा गुंता सोडविण्यासाठी उपयोगी ठरू शकते. चित्रपटाचा व्यवहार बाजूला ठेवून कला म्हणून त्याकडे पाहणे संयुक्तिक ठरेल. उत्तम चित्रपटाला चांगला प्रेक्षक हवा असतो. तो नसेल तर चित्रपटाचे मूल्यात्मक पातळीवर नुकसान होऊ शकते. कोणत्याही कलेप्रमाणे चित्रपट हा समाज दाखवतो तर समाज हा चित्रपटाला खाद्य पुरवतो. हा परस्पर व्यवहार सुरू ठेवण्यासाठी चित्रपट पाहण्याची दृष्टी विकसित होणे गरजेचे आहे. जाणकारांनी चित्रपट बघावा, त्यावर चर्चा करावी एवढेच नाही तर चित्रपट निर्मिती, दिग्दर्शन, अभिनय, गीत-संगीत यात योगदान देण्याचा विचार करावा. कारण चांगला टीकाकार, चांगला कलाकार असू शकतो. चित्रपट म्हणजे फक्त मानवी भावनांची अभिव्यक्ती नाही तर ती सर्वोत्तम आस्वाद्य कृती आहे. हे जाणून घेतले की, तो समजायला सोपा जातो. खरं तर तो फ्रेमवाईज बघत असतानाच शृंखलापरत्वेही बघायचा असतो. मात्र पडद्यावर दिसणाऱ्या फ्रेममध्ये कुठे कुठे आणि काय काय सामावलेलं आहे हे पात्रे, त्यांच्या हालचाली, संवाद यांच्यासोबत समजून घेता यायला हवे. त्यासाठी बहुतांश कलांची तोंडओळख असणेही महत्त्वाचे ठरते. कारण दिग्दर्शक पात्रांखेरीजही चित्रभाषेतून बरेच काही सांगू पाहत असतो.

## ४.१० समारोप

थोडक्यात, पडद्यावर दिसणारी पात्रे म्हणजे सिनेमा नाही तर पडद्याच्या पाठीमागे राबणारे असंख्य हात त्यात असतात. अनेक कलावंतांचे कलात्मक श्रम म्हणजे सिनेमा. सिनेमाच्या अनेकविध भागांची तोंडओळख आपण करून घेतली आहे. आता आपल्या अंगभूत क्षमतांचे निरीक्षण करून त्यांना आकार देणे ही आपली जबाबदारी आहे. आज चित्रपट आपल्यापासून दूर नाही. ही एक जमेची बाजू आहे. लघु चित्रपटाच्या माध्यमातून आपण आपले सामर्थ्य जाणून घेऊ शकतो.

आपल्यातील कौशल्यांना वाव देण्यासाठी आपले वाचन, चिंतन, निरीक्षण वाढविणे आवश्यक आहे. आपली कल्पकता योग्य कलावंत, तंत्रज्ञांनासोबत घेऊन पडद्यावर उतरली तर आपल्या पंखात बळ संचारल्याशिवाय राहणार नाही. कोणत्याही क्षेत्रात सहज काहीही प्राप्त होत नाही. परिश्रमाला पर्याय असूच शकत नाही. 'चांगले स्वीकारणे आणि वाईट अव्हेरणे' हे जर आपण करू शकलो तर देशाला 'ऑस्कर' मिळवून देणे फार मोठी गोष्ट नाही.

पैसा आणि प्रसिद्धी या दोन्ही गोष्टी सिनेमातून प्राप्त होतात. पाठीराखा हवा असतो असे म्हणतात. पण दादासाहेब फाळके यांना कोण पाठीराखा होता? अमिताभ बच्चन यांना कुणी आधार दिला? मराठीला राईट सन्मान मिळवून देणारे नागराज मंजुळे, भाऊराव कऱ्हाडे यांना कुणाची सावली होती? तर या सर्वांनी कठोर परिश्रमाच्या बळावर आज आपापल्या नावाचा ध्वज फडकविलेला आहे. स्वप्नांना घामाची जोड दिली की यशाचा रथ वेग घेतो हे अटळ सत्य आहे.

## ४.११ शब्द व शब्दार्थ

☞ **दृक्‌श्राव्य** : पाहणे आणि ऐकणे.

☞ **पटकथा** : चित्रपटासाठी लिहावयाची कथा.

## ४.१२ स्वयं-अध्ययन प्रश्नोत्तरे

### ❑ योग्य पर्याय निवडा.

१. दादासाहेब फाळके यांनी पहिला मराठी चित्रपट 'राजा हरिश्चंद्र' हा कोणत्या साली निर्माण केला?

*(अ) १९१२* *(क) १९१२*

*(ब) १९१३* *(ड) यापैकी नाही.*

२. पडद्यासाठी लिहिलेल्या कथेला कोणती कथा म्हणतात?

*(अ) नाट्यकथा (ब) पटकथा (क) कथा (ड) यापैकी नाही.*

३. खालीलपैकी कोणता अभिनयाचा प्रकार आहे?

*(अ) आंगिक अभिनय (क) वाचिक अभिनय*

*(ब) सात्विक अभिनय (ड) सर्व.*

४. खालीलपैकी कोणता वेषभूषेचा प्रकार नाही?

*(अ) ऐतिहासिक (ब) काल्पनिक (क) वास्तविक (ड) नाट्यात्मक.*

५. चित्रकृतींचा आस्वाद घेणे ही आपली कोणती गरज आहे?

*(अ) भावनिक (ब) आर्थिक (क) सामाजिक (ड) ऐतिहासिक.*

## ४.१३ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

*१. (ब) १९१३.*

*२. (ब) पटकथा.*

*३. (ड) सर्व.*

*४. (ब) काल्पनिक.*

*५. (अ) भावनिक.*

## ४.१४ सरावासाठी प्रश्न

### ❑ अ) दीर्घोत्तरी प्रश्न.

१. चित्रपट म्हणजे काय? ते सांगून चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवाद याचे स्वरूप स्पष्ट करा.

२. चित्रपटाची निर्मिती करत असताना ध्वनी, वेशभूषा आणि प्रकाश योजना यांचे स्वरूप कसे असावे याची माहिती द्या.

### ❑ ब) लघुत्तरी प्रश्न.

१. संकलन/संपादन.

२. अभिनयाचे प्रकार.

३. चित्रपटाचा आस्वाद.

## ४.१५ उपक्रम

☞ आस्वादक दृष्टीकोनातून मराठी चित्रपट पाहून त्यांचे आकलन करा.

## ४.१६ अधिक वाचनासाठी संदर्भ


१. चलतचित्र : अरूण खोपकर, राजहंस प्रकाशन, पुणे.

२. चौकटीबाहेरचा सिनेमा : गणेश मतकरी, पॉप्युलर प्रकाशन, पुणे.

३. सामना (चित्रपटाची कथा) : विजय तेंडूलकर, नीलकंठ प्रकाशन, पुणे.

४. अभिनयाचे प्राथमिक सहा पाठ : सदाशिव आमरापूरकर, विनायक दानेगावकर, लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई.


❀ ❀ ❀

### घटक - १

# बाकी सर्व ठीक आहे! - लोकनाथ यशवंत

## (निवडक कविता)

अनुक्रमणिका


१.१ उद्दिष्ट्ये

१.२ प्रास्ताविक

१.३ कवी परिचय

१.४ विषय विवेचन

  १.४.१ मराठी काव्यपरंपरा आणि लोकनाथ यशवंत

  १.४.२ लोकनाथ यशवंत यांच्या कवितेची धारणा

१.५ कविता : आशय

१.६ मध्यवर्ती कल्पना

१.७ भाषाविशेष

१.८ समारोप

१.९ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

१.१० सरावासाठी प्रश्न

१.११ वाचन

१.१२ उपक्रम


## १.१ उद्दिष्ट्ये

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस,

१. मराठी काव्यपरंपरा आणि लोकनाथ यशवंत यांच्या कवितांचे आकलन होईल.

२. स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्यायावर आधारित नवसमाज रचनेचा काव्यांतर्गत पुकारा लक्षात येईल.

३. आंबेडकरवादी विचारांच्या दुसऱ्या पिढीतील एक दमदार कवी म्हणून लोकनाथ यशवंत यांचे वेगळेपण लक्षात येईल.

४. ही कविता 'माणूस' केंद्रस्थानी मानणारी कविता आहे, हे लक्षात येईल.

५. सदर कवितेचे भाषाविशेष लक्षात येतील.

## १.२ प्रास्ताविक

आंबेडकरवादी विचारांच्या दुसऱ्या पिढीतील एक महत्त्वाचे कवी म्हणून लोकनाथ यशवंत यांचा उल्लेख करावा लागेल. सभोवतालच्या वास्तवाला भिडून भेदक व जीवघेणे अनुभव व्यक्त करणारी लोकनाथ यशवंतांची कविता माणसाला जवळ करणारी आहे. विसंगती ढोंग व दंभावर सडकून टीका करणारी ही कविता बुध्द, फुले, शाहू व आंबेडकरवादी समता तत्त्वांचा उद्‌घोष करताना दिसते. या कवितेला वाङ्‌मयीन मूल्यांची व जीवनमूल्यांची महती माहित असल्याने निसर्ग, माणूस व समाज यांच्या धारणातत्त्वांची मूल्यनिष्ठता कवी जोपासताना दिसतो. विशेषत: १९८० नंतरचे भारतीय समाजातील पडझडीचे वातावरण, शहरीकरणाचा वेग व जागतिकीकरणाचे परिणाम कवी अत्यंत उपरोधिक व उपाहासात्मक पातळीवर व्यक्त करताना दिसतो. लोकनाथ यशवंत यांची कविता आक्रस्ताळी न होता विद्रोही तर बनते. पण वेदना, विद्रोह व नकाराला विवेकाचा आयाम प्राप्त करून देऊन नवनिर्मितीला प्रोत्साहन देते. वंचितांच्या साहित्य प्रवाहातील काव्यलेखनात शब्द, प्रतिमा व अभिव्यक्तीच्या नव्या जाणिवा वृध्दिंगत करणारी ही कविता आहे. अशा स्वातंत्र्योत्तर नवजाणिवांनी समृद्ध असलेल्या लोकनाथ यशवंत यांच्या निवडक कवितांचा अभ्यास आपणाला या ठिकाणी करायचा आहे.

## १.३ कवी परिचय

लोकनाथ यशवंत यांचा जन्म इ.स. १९५६ साली झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेच्या क्रांतिकारी विचाराने प्रेरित झालेले कवी लोकनाथ यशवंत दलित कवितेच्या लाटेतील वस्तुनिष्ठ, नव्या जाणिवांसह वेदना, विद्रोह व नकारांना विवेकी बुध्द विचारांची जोड देऊन कविता निर्मिती करणारे कवी आहेत. त्यांचे आतापर्यंत पुढील लेखन प्रसिद्ध झालेले आहे. 'आता होऊन जाऊ द्या!' (१९८०); 'आणि शेवटी काय झाले!' (१९९५); 'पुन्हा चाल करत जाऊ या!' (२००९) इ. तीन काव्य संग्रहाबरोबरच 'ऐलान', 'जेरबंद' हे हिंदीमधून अनुवादित काव्यसंग्रह आहेत. लोकनाथ यशवंत यांच्या

निवडक कवितांचा डॉ. इसादास भडके यांनी संपादित केलेला 'आता आणि पुन्हा' या नावाचा काव्यसंग्रह प्रकाशित झालेला आहे. तसेच विविध समीक्षकांनी त्यांच्या कवितांची समीक्षा केलेला 'यशवंत कविता लोकनाथची' हा लेखसंग्रह येऊ घातलेला आहे. लोकनाथ यशवंत यांच्या कविता महाराष्ट्र राज्यातील विविध विद्यापीठांत कविता अभ्यासक्रमात आहेत. त्यामध्ये 'पद्मश्री दया पवार स्मृती पुरस्कार', 'अस्मितादर्श वाङ्मय पुरस्कार', 'भैरुरतन दमाणी पुरस्कार' इत्यादी पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहेत. त्यांची कविता ही संविधानिक मूल्यांची जोपासना करणारी कविता आहे.

## १.४ विषय विवेचन

### १.४.१ मराठी काव्यपरंपरा आणि लोकनाथ यशवंत

वैश्विक साहित्यात 'काव्य' हा वाङ्मयप्रकार लोकप्रिय, आकाराने लहान व कमालीचा प्रेरणादायी असा आहे. मानवी जीवन, निसर्ग, समाज, यांचा आलेख कवितेत येतो. मानवी जीवन अधिकाधिक उन्नत, विचारप्रवृत्त व समृद्ध करणारा हा काव्यप्रकार आहे. मराठी कवितेची पार्श्वभूमी, तिची वाटचाल, संत, पंत आणि तंत काव्य, आधुनिक मराठी काव्य, रविकिरण मंडळ, नवकाव्य, दलित कवितेची पार्श्वभूमी, दलित कविता व दुसऱ्या पिढीची दलित कविता यांचा आढावा घेताना आपणाला कवी लोकनाथ यशवंत यांच्या कवितेची बलस्थाने लक्षात घ्यावी लागतात.

मराठी काव्याचे कालदृष्ट्या वर्गीकरण करताना प्रथमत: आपणाला मुकुंदराजांच्या इ. स. ११८८ (शके १११०) मधील 'विवेकसिंधू' या ग्रंथापासून सुरुवात करावी लागेल. पुढे संत काव्याचा कालखंड हा (इ.स. १२५० ते १८००) असा येतो. त्यामध्ये संत नामदेव, ज्ञानेश्वर, एकनाथ, चोखामेळा, तुकाराम, रामदास, कान्होपात्रा व जनाबाई यांच्या नाम, भक्ती व विठ्ठल महात्म्य हा वैशिष्ट्यपूर्ण आशय-विषय असलेल्या कवितेचा वेध घ्यावा लागतो. यानंतर पुढे (१६००-१७९४) हा पंडित कविंचा कालखंड येतो. संत व पंत यांचे लेखन अध्यात्म, मोक्षप्राप्ती व परमेश्वर प्राप्ती इ. आशय-विषयांना घेऊन होत होते. शाहिरांचा म्हणजे तंताचा काळ (इ.स. १७५० ते १८५०) असा होय. राम जोशी, सगन भाऊ, प्रभाकर, होनाजी बाळा, अनंत फंदी इ. शाहिरांबरोबरच महादू सुतार, परशुराम शिंपी, मोतीलाल मारवाडी, येसू तेली, गंगू हैबती इ. विविध जाती-जमातींतून शाहीर आलेले दिसतात. या पेशवाईच्या काळात लावणी, पोवाडा, गौळणी, कलगीतुरा, छक्कड, फटके, गोंधळ या स्वरूपाच्या रचना होत्या. याचे विषय हे लोकजीवनाशी निगडीत असे असलेले दिसतात.

मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे ज्येष्ठ अभ्यासक रा. श्री. जोग मराठी कवितेचे (१८४० ते १९४०) या शतकातील एकूण तीन कालखंड मानतात. ''पहिला कालखंड १८४० ते १९८५ असा

कल्पून त्यास ते 'पूर्वतयारीचा काळ' म्हणतात, दुसरा कालखंड १८८५ ते १९२० असा धरून त्याला 'क्रांतिकाळ' म्हणतात व तिसरा कालखंड १९२० ते १९४० असा घेऊन त्यास 'विस्तार काळ' असे म्हणतात.'' ('मृगधारा', 'वि. म. कुलकर्णी यांची निवडक कविता; (संपा.) अनुराधा पोतदार, प्रस्तावना- सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, तृ. आ. १५ ऑगस्ट १९८५, पृ.१४) हा कालखंड केशवसुत परंपरेचा म्हणता येतो. याच काळात 'तुतारी मंडळा'तील कवी रेव्हरंड टिळक, गोविंदाग्रज, कवी विनायक, बालकवी हे कवी नावारूपाला आलेले दिसून येतात.

(१९२१ ते १९४५) हा कालखंड रविकिरण मंडळाचा असून यामध्ये माधव ज्युलियन, कवी गिरीश, ए. पां. रेंदाळकर, कवी यशवंत, कवी 'बी', भा. रा. तांबे या कवींनी मराठी कवितेला बहर आणला. यानंतर मर्ढेकरांचा (१९४६ ते १९६०) हा कालखंड येतो. या दरम्यान कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, वसंत बापट, मंगेश पाडगावकर, इंदिरा संत, आरती प्रभू, कृ. ब. निकुंब, वा. रा. कांत, श्रीकृष्ण पोवळे, शांता शेळके इ. कवी-कवियित्रींनी जीवनाच्या विविध जाणिवांना काव्यबद्ध केलेले होते.

साठोत्तर कालखंडात चंद्रकांत खोत, भालचंद्र नेमाडे, वसंत गुर्जर, चंद्रकांत पाटील, दिलीप चित्रे, सतीश काळसेकर, अरुण कोलहटकर, ना. धों. महानोर, वसंत आबाजी डहाके, मधुकर केचे, गुरुनाथ धुरी, कवी ग्रेस, नारायण सुर्वे, वसंत सावंत, आनंद यादव, अंजली ठकार, सुरेश भट, शंकर वैद्य, सुधांशू व सूर्यकांत खांडेकर इ.कवींनी नवे बदल व नव्या जाणिवांना कवेत घेणारी कविता लिहिली. याच काळात 'लिटिल मॅगॅझिन'च्या चळवळीत काम करणारे भालचंद्र नेमाडे, वसंत गुर्जर, सतीश काळसेकर, वि. शं. चौगुले, नारायण सुर्वे, राजा ढाले, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, दिलीप चित्रे इ. कवींनी मराठी काव्यातील साचेबंदपणा झुगारून नव्या जाणिवांना काव्यबद्ध करताना प्रस्थापित मराठी साहित्य व विचारसरणीला धारेवर धरून काव्यसृजन केले. याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नवसमाज निर्मितीच्या क्रांतिकारी व पुरोगामी विचारांनी प्रेरित पिढी साहित्याचे नवे दृष्टिकोन घेऊन लिहिती झाली. यामध्ये डॉ. आंबेडकरांच्या आगे-मागे ही वंचितांची चळवळ काव्यावाटे प्रभावी करणाऱ्या व आंबेडकरी निष्ठेने कला जोपासणाऱ्या कलावंतामध्ये किसन फागोजी बनसोडे, कवी दीनबंधू, बाबू कालिचरणदास, नंदा गवळी, गणेश आक्काजी गवई, पतीत पावनदास, ग. म. ढवरे, कव्याल नागोराव पाटणकर, गोपाळबाबा नलंगकर, शिवराम जानबा कांबळे, वामनदादा कर्डक, बंधूमाधव, अण्णा भाऊ साठे, राजानंद गडपायके, भीमराव कर्डक व शंकर फक्कड यांचा नामोल्लेख करावा लागतो. मानवतावाद, दीनदलितांच्यात जागृती इ. भूमिका घेऊन या कलावंतांनी आंबेडकरवादी समाजप्रबोधनाचे महत्त्वाचे काम केलेले दिसते. हा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच बाबूराव बागूल, दया पवार, नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, यशवंत मनोहर, ज. वि. पवार, राजा ढाले, बेबी कांबळे, प्रल्हाद चेखणकर, ताराचंद्र खांडेकर इ. दलित कवींनी

वेदना विद्रोह व नकार या वैशिष्ट्यांनी पूर्ण अशी समाजपरिवर्तनवादी कविता जन्माला घातली. याच आदर्श आणि प्रेरणेतून दुसरी पिढी लिहू लागली व त्यांचा आवाज हा कविताच होती. या कवितेमध्ये भुजंग मेश्राम, लोकनाथ यशवंत, अरुण काळे, प्रज्ञा लोखंडे, केतन पिंपळपुरे आदि कवींचा नामोल्लेख करावा लागेल.

## १.४.२ लोकनाथ यशवंत यांच्या कवितेची धारणा

लोकनाथ यशवंत यांच्या कवितेची धारणा ही समतावादी, धर्मनिरपेक्ष, विज्ञानवादी, भ्रष्टाचारमुक्त व सदाचारी समाजाच्या निर्मितीशी बांधिलकी मानणारी आहे. आपण काव्यातून वास्तव बाहेर काढले पाहिजे ही त्यांची भूमिका आहे. दलित विश्वाचा एक नवा पैलू प्रकट करणारी ही कविता वंचितांचे प्रश्न घेऊन मानवाच्या मुक्तीचे खरे तत्त्वज्ञान सांगणारी कविता आहे. त्यांची कविता ही सामाजिक बांधिलकी व निधर्मीपणा यांचा सखोल पाठपुरावा करताना दिसते. सामाजिक अभिसरणाच्या नावाखाली पेरणी होत असलेल्या मूलतत्त्ववादी विचारांना जोरकस विरोध करून माणसाचे माणूसपण जागविणारी ही कविता बुद्धाच्या प्रज्ञा, शील, करुणा, अहिंसा व सदाचार या तत्त्वांचा स्वीकार करताना दिसते. त्याचबरोबर अभिव्यक्तीचे नवे पैलू मांडणारी ही कविता जीवनवादी तर आहेच पण ती मानवतावादी आहे. डॉ. संजय मून म्हणतात, ''मराठी कवितेच्या प्रांतात स्वत:च्या स्वतंत्र शैलीने स्वत:ची नाममुद्रा उमटविणारा कवी म्हणून लोकनाथ यशवंत यांचा उल्लेख करता येईल.'' माणूस केंद्र मानणारी कविता विषमता जोपासणाऱ्या विषम व्यवस्थेच्या विरोधातला आवाज व्यक्त करते. प्रदूषित झालेल्या सामाजिक पर्यावरणावर भाष्य करते. सर्वसामान्य माणसाची बाजू घेणारी त्यांची कविता शोषणरहित नवीन समाजाचे स्वप्न पाहणारी आहे. गतीशील परिवर्तनाचा ध्यास, श्रेणीबध्द समाज रचनेविरुध्दचा त्रागा, सर्वसामान्यांच्या मनातील बौध्दिक जिज्ञासा जागी करून त्यास.अस्मिता प्राप्त करून देणारी ही कविता आहे. मुक्तछंद, उपरोध, उपहास, आत्मशोध व डोळस समूह शोधाला प्राधान्य देणारी ही कविता मानवाच्या मुक्तीचे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या विचारांची धारणा करणारी आहे.

## १.५ कविता : आशय

### १ ।। जीवाचा आटापिटा ।।

कवी लोकनाथ यशवंत हे पुरोगामी विचारांचे कवी असून ते लोकशाही जीवनप्रणालीचा उद्घोष करत आहेत. त्यांनी आपल्या कवितांमधून समतावादी नवसमाज निर्मितीचे विचार सांगितले आहेत. बदलत जाणारे जग आणि त्याबरोबर भारतीय समाजव्यवस्था यामध्ये होणारे प्रदूषण तसेच मानवी

जीवनमूल्यांचा होत जाणारा ऱ्हास यांना कुठेतरी रोखले पाहिजे, अशी भूमिका घेऊन जातिअंताचा लढा लढणारी ही कविता मनुष्याच्या गुणांना महत्त्वाचे स्थान देऊन जातिविरहित समाजाचे स्वप्न पाहणारी ही कविता आहे, असे म्हणावे लागते. 'जीवाचा आटापिटा' या कवितेत सर्व बाजूंनी जातीचा शोध घेणाऱ्या व जुनाट जातीभेद पाळणाऱ्यांची जातियवादी प्रवृत्ती उघडी पाडण्याचा प्रयत्न कवीने अत्यंत उपरोधिक शब्दात केला आहे. लोकनाथ यशवंत म्हणतात,

> ''*माझे आडनाव माहीत नसल्याने तो खूप अस्वस्थ झाला.*
> *एनकेन प्रकारे त्याने मामाचे नाव विचारले*
> *त्यावरुनही तो समजू शकला नाही*
> *नंतर त्याने वस्ती विचारली*
> *तिथेही त्याला बोध झाला नाही.*''

चातुवर्ण्यव्यवस्था, आरक्षण, धर्म, नातेवाईक, नोकरीचा कोटा इ. सगळ्या बाजूंनी जात शोधू पाहणाऱ्या ह्या वर्णव्यवस्थेच्या पहारेकऱ्याला, कवीला कलावंताच्या कोट्यातून नोकरी लागली आहे असे सांगावे लागते. म्हणून अशा जातीच्या हरळीला लगडून, मानसिकता जातीशी घडू बांधून जगणाऱ्याला कवी शेवटी म्हणतो,

''काही किडे घाणीत जगतात, तिथेच सरपटतात आणि तिथेच मरतात.'' असा उपहासात्मक व उपरोधात्मक टोला लगावला आहे.

## ।। मुख्य प्रवाह ।।

ही कविता शहरात राहणाऱ्या मुखवटाधारी माणसाच्या मनोवृत्तीचे दर्शन घडविणारी कविता आहे. शहरी जीवनशैली ही बहुतांशी 'ओठात एक व पोटात एक' अशी मुखवटाधारी आहे. सरळ साधेपणाने तोंडावर बेधडक बोलणे ही खेडेगावची वैशिष्ट्ये इथे शहरात निरुपयोगी आहेत. इथे सगळेच अगदी दुटप्पीपणाने चालते. इथं खोटं-खोटं असलं तरी इथल्या शहराचा मुख्य प्रवाह मुखवटाधारी, लबाड, असत्य, वरवरच्या व कार्पोरेट मतलबी जगण्या-वागण्याच्या स्वार्थी दुनियेचा आहे हे सांगताना लोकनाथ यशवंत म्हणतात,

> ''*शहरात राहूनही तुम्ही समजत नाही यार*
> *माणूस असा एकाएकी तोडायचा नसतो*
> *हळूहळू दूर सारायचा असतो.*''-

या प्रवाहात सामील होणाऱ्यांनी त्यांच्यासारखं खोटं-खोटं वागावं म्हणजे सगळी कामे बिनबोभाट

होतात. इथे कुणालाच दुखवायचं नसते तर श्रध्दा-सबुरीने डाव साधायचा असतो, गावखेड्याची संवेदना शहरात इथे कुठे? इथे तर पेट्रोलच्या नावावर आहे काळा धूर तुडुंब भरून आहे. शहरी माणसांच्या शहरातून कॅल्शियमचे प्रमाण जवळ-जवळ हद्दपार होत असून पालेभाज्यांची रसायने हाडे पोखरत आहेत. हे सांगतानाच कवी म्हणतो,

*''तुम्ही गोष्ट करता चॅपलीनच्या करुणेची, मदर टेरेसाची*
*यार, शहरमें रहते हो,*
*सामनेवाले को तौलना सिखों।' मतलबासाठी.''*

तुम्ही खेडूत लोक छातीच्या पिंजऱ्यात न मावणारे काळीज घेऊन बिग बाजार, सुपर बाजार, मॉलमध्ये फिरता, हे सगळे शहऱ्यांना माहित झाले तर तोडून खातील, बघा कार्पोरेट कसे नजर चुकवून नजर मिळवतात एकमेकांशी आणि तुम्ही भाबडे लोक कुठंही भडभड बोलून देता अशानं कसं जमायचं? इथून हद्दपार होऊन जाल. ....... टिनटप्पर, म्हणून या मुख्य प्रवाहात खोट-खोटं जगावं लागतं. यासाठी कवी म्हणतो,

*''प्रेम दाखवा प्रेम*
*मनात काहीही असलं तरी चालते.....!''*

मनात कितीही सत्यशोधन असले तरी इथले शहरी वास्तव जे आहे तसेच मन मारुन स्वीकारावे लागते. यालाच याठिकाणी इथे 'मुख्यप्रवाह' म्हणतात, असे कवी उपरोधिक भाषेत सांगताना दिसतो.

## ।। एका वृक्षाची गोष्ट ।।

या कवितेत निसर्गालाच कुंडीत बंदिस्त करणाऱ्या मानवाच्या बोन्साय प्रवृत्तीला कवीने रेखाटले आहे. कवीवर प्रेम ऊतू जाऊन एकाने त्यांना पंधरा वर्षाचा कुंडीतील बोन्साय पिंपळ भेट दिला. वर्षातून एकदा त्याची मुळं कापायची म्हणजे तो कुंडीतच राहील बुटका होऊन.... अशी महत्त्वपूर्ण सूचनाही केली. परंतु कवीने त्याला उजेडातल्या स्वच्छ खुल्या जागेत लावले. त्या पिंपळवृक्षाच्या विकासाचे गणित सांगताना कवी म्हणतात.

*''भविष्यात वृक्ष होणाऱ्या झाडाची*
*मुळ कापायला मन धजलेच नाही.*
*निसर्ग थोपवायचा कशाला.....?*

मी त्याला उजेडातल्या स्वच्छ खुल्या हवेत जमिनीत लावले.

❐ ❐

*आता, तो बेटा, माझ्या उंचीएवढा झाला आहे.*
*हवेच्या झुळकीसोबतची त्याची सळसळ*
*मला कृतकृत्य करून जाते.''*

पिंपळाच्या झाडाचे प्रतीक कवीने इथे माणूस व माणुसकीला बोन्साय, खुरटे करू पाहणाऱ्या प्रवृत्तीला, बाजूला सारून माणुसकीचा पिंपळवृक्ष समतावादी पर्यावरणाच्या धारणेने खुल्या हवेत जमिनीत लावून त्याच्या मुक्त सळसळतेपणाचा स्वातंत्र्यवादी अनुभव या कवितेत व्यक्त केला आहे.

**|| राग ||**

या कवितेत लोकनाथ यशवंत यांनी कुपोषित बालकांच्या बकाल जीवनाचे वास्तव समोर जाणून तथाकथित तकलादू समाजसेवा करणाऱ्या बेगडी समाजसेवकांचा बुरखा फाडला आहे. कवी म्हणतो,

*''कुपोषणाने गोजिरी मुलं मरत आहेत अकाली*
*सरकारला 'असल्या' बाबींकडे लक्ष द्यायला नेहमीप्रमाणे वेळ नाही*
*एनजीओवाले आनंदात आहेत''*

कवी विषय निघाला होता म्हणून एमबीबीएस डॉक्टरांना सांगत होते. तेव्हा ताडकन डॉक्टर म्हणतात,

'' शहरात यावे मुख्य धारेत त्यांनी''

तेव्हा कवी म्हणतो,

*''तुमच्या वातानुकूलित घरी आणून ठेवतो कुपोषितांना.''*

❐ ❐

*डॉक्टरसाहेब समोरून गेले तरी,*
*बघत नाहीत माझ्याकडे आजकाल''*

हे वास्तव मांडत असताना कवीने तकलादू विचारसरणीच्या दांभिकतेचा स्फोट करून इथे अतिशय उपरोधिक भाषेत हे भाष्य केलेले दिसून येते. उपरोधिकता व उपाहासात्मकता हे या कवितेचे वैशिष्ट्य आहे.

## ।। हे जीवन सुंदर आहे ।।

कवी लोकनाथ यशवंत हे समाजातल्या तकलादू, अमानवी व पाखंडी प्रवृत्तीवर निकराचा हल्ला करतात. जीवन सुंदर आहे, असं म्हणताना माया, ममता, कृतज्ञता यांचे पाश लांबवर पाहिले तरी दिसत नाहीत. मृत्यू अटळ आहे आणि ते नैसर्गिक सत्यच आहे, पण त्याबद्दल दु:ख व्यक्त करायला आता वेळ नाही. जगण्याची सुंदरता नेमकी कुठे व कशामध्ये आहे? असा प्रश्न कवीला पडतो. इथे वासंती नामक आजीचा अचानक मृत्यू होतो. कवी म्हणतात,

*''वासंती आजीने लग्नाच्या धामधुमीत*
*प्राण सोडला.*
*कर्तेधर्ते एकत्र येऊन*
*छुप्या आवाजात म्हणाले,*
*सध्या अडगळीच्या खोलीत*
*चुपचाप झाकून ठेवा.*
*वरात गेल्यावर पुढचं बघू.....''*

या ठिकाणी वरातीचा आनंद मोठा वाटतो व दु:ख नगण्य वाटते. ही संमिश्रित जाणीव जगण्याची दिशा चुकविणारी आहे. मृत्यूच्या भयानक दु:खापेक्षा वरातीचा आनंद या चंगळवादी लोकांना महत्त्वाचा वाटतो. दु:ख व कर्तव्य दडपून ठेवून नवीन नातं निर्माण करताना, यापूर्वी अपार माया, प्रेम देणार, त्यासाठी कष्ट सोसणार. वासंती आज्जीचं नातं, अडगळीत ठेवण्याच्या कृतीलाच आज व्यवहार मानलं जातयं. हे वास्तव अतिशय समर्पक शब्दात उदाहरणासहीत स्पष्ट होताना दिसते.

## ।। भविष्य ।।

भविष्य सांगणारी व ते बघणारी वृत्ती समाजात आढळते. पैसा मिळविण्यासाठी लोकांच्या भावनांशी खेळणारा भविष्यकर्ता नेमकेपणाने भविष्य पाहणाऱ्याच्या स्वभावावर हुकूमत करून पैसे काढतो. दैववादावर व चमत्कारावर पोसलेली समाज मानसिकता, लाभ मिळण्यासाठीचे भविष्य ऐकून स्वत: फसत असते. तसेच दुराचारी, भ्रष्टाचार व लोभीपणाने बरबटलेल्या मनांनाच असे भविष्याचे व लोभीपणाचे उपचार लागतात. पण कवी म्हणतो, अशा माणसांच्या भावनांना हात घालून पैसे मिळवणारा कुठलाही विधिनिषेध पाळत नाही. कवी म्हणतात की,

*''जगासोबत धावण्याच्या आंधळया आसक्तीत*
*जगणे नकासे झाले असताना*
*मी त्यांच्या हस्तरेषा बघत*
*ग्रहताऱ्यांना इकडे तिकडे फेकून म्हणालो,*
*तुमच्या सुंदर दिवसांची सुरुवात होताहे''*

हे सांगतानाच हा भविष्यकर्ता म्हणतो, एन्टीकरप्शनने रंगेहाथ पकडल्याची तुमची केस खारीज होणार आहे. भ्रष्टाचाराचे सगळे आरोप निराधार ठरून नोकरीतील बढती वाट पहात आहे. हरामातून घेतलेल्या जमिनीचे भाव भरमसाठ वधारणार आहेत व रखडलेले मुलीचे लग्न होणार आहे. अशाप्रकारे भविष्यकर्त्यांने अंदाज घेत-घेत मोठ्या साहेबांच्या जीवनातील भविष्य सांगितल्याने, त्यांच्या मलूल डोळयात सूर्यचमक नि कृश शरीरात 'एकस्ट्रा एनर्जी' भरली. त्यांनी भविष्यकर्त्याला भरपूर बिदागी दिली. अशा भविष्य पाहून घेणाऱ्यांविषयीची कीव व्यक्त करताना कवी म्हणतो,

*''किती सोपं असतं पैसे कमविणं*
*शिकले पण सवरले नाही*
*अशा इन्टलेक्च्युअल भामट्यांना मूर्ख बनविणं''*

हे पैशाची व श्रीमंतीचा डौल व साधूपणाचा आव आणणाऱ्या भविष्यकर्त्यांचा चालूपणा इथे सहज लक्षात येतो, हे समाजवास्तव नेमक्या व अचूक शब्दात लोकनाथ यशवंत यांनी मांडण्याचा प्रय्तन केलेला दिसून येतो. इथे उपहास व उपरोध अतिशय सूक्ष्म स्वरूपात येताना दिसतो.

## ।। तडजोड ।।

या कवितेमध्ये कवीला शहराच्या प्रवाहात एकरूप होताना सतत तडजोड करावी लागते. ती केली की. शहरी म्हणून आपण बिनधास्त जगू शकतो हे कवीने शहरातील वास्तव सांगितले आहे. हो ला हो म्हणून. शक्तीशाली लोकांची तळी उचलून कमजोरीचा विचार मनाला शिवूनही न घेता स्वार्थाचाच सतत विचार करायला लावणारे हे शहरी वातावरण, खेड्यातला सरळ साधेपणा, दोस्ती, मैत्री, यारी, सद्भावना, कळवळा, आपलेपणा, आस्था इ. मानवतावादी भावनांना बासनात गुंडाळून ठेवत असते. शहरातले वास्तव सांगताना कवी म्हणतो,

*''शहरात नाही कुणाचाच कुणावर विश्वास''*
*प्रत्येक हालचालीवर असतात सीसीटीव्ही कॅमेरे लक्ष ठेवून''*

शहरातल्या आधुनिक जगण्यात माणुसकी ठरवली आहे व प्रदूषण वाढले आहे. त्याचे सगळेच परिणाम सहन करून इथे जगावे लागते. पण इतके सगळे सहन करण्याची कारणे काहीही असोत, पण आपण मुख्य धारेत आहोत असे प्रत्येकाला वाटते. अशा प्रदूषित वातावरणात तडजोड व मन मारूनच जगावे लागते. यालाच मुख्य धारेत असल्याचे मानणे ही खेड्यातून शहरात आलेल्या माणसाची मजबूरी कवीला इथे सांगायची आहे. अशी ही मनाविरुध्दची तडजोड अत्यंत मार्मिक, उपरोधिक व उपहासात्मक भाषेत लोकनाथ यशवंत यांनी मांडली आहे.

### || मुलाखत ||

या कवितेत लोकनाथ यशवंत यांनी जातीची धारणा जोपासणाऱ्या मानवी मनातील वास्तव सांगितले आहे. सगळे कॅलिबर पणाला लावून लेखी परीक्षा प्रक्रियेत उत्तीर्ण झाल्यावर पर्सनल मुलाखतीच्यावेळी 'जातधर्म' कळीचा मुद्दा ठरतो व बौध्दिकता, हुशारी व्यक्तिमत्व सगळं-सगळं रसातळाला जातं आणि वरती डोकं काढून महत्त्वाची ठरते ती 'जात'. हे सगळं जातीच्या श्रेष्ठ-कनिष्ठत्त्वाचं वास्तव या पर्सनल मुलाखतीत सांगताना कवी म्हणतो.

*''जात असते विद्युत प्रवाहासारी*
*तार दिसतात पण, करंट नाही''*

हे जाती श्रेष्ठत्त्व मानणाऱ्या लोकांच्या मनातील अदृश्य जातीचे रूप विजेच्या तारेपेक्षाही महाभयंकर आहे. हुशारीची व बुद्धिमत्तेची पराकाष्ठा करून पात्रता दाखवली तरीही जातीचाच मुद्दा वर येतो. तेव्हा हे जनमानस जातीपेक्षा माणसाचं व्हावं ही अपेक्षा कवीची आहे.

## १.६ मध्यवर्ती कल्पना

लोकनाथ यशवंत यांच्या 'बाकी सर्व ठीक आहे' या काव्य संग्रहातील वरील निवडक कविता वेदना, विद्रोह, नकार, वस्तुनिष्ठता व विज्ञानवादाचा स्वीकार करून समतावादी आंबेडकरवादाचा प्रसार करणाऱ्या आहेत. कविता लेखनातील व्यक्त हाणारे मन हे समूह जीवन व्यक्त करणारे आहे. पण तरीही त्याचे भान समूहमनाला आणून द्यावे लागते. श्रेणीबध्द समाज रचनेविरुध्द हल्लाबोल करणारी ही कविता, मानवी जीवन केंद्रिभूत मानून व्यक्त होताना दिसून येते. गतिशील परिवर्तन व समाजवादी समाजाची निर्मिती ही तिची आस आहे. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणामुळे जग एकत्र झाल्यासारखे वाटत असले तरी शहरामध्ये व मोठमोठ्या महानगरांमध्ये माणसां-माणसांतील विमुक्तीकरणाचे प्रमाण वाढले आहे, ते कुठेतरी कमी झाले पाहिजे अशी कवीची भावना आहे.

लोकशाहीची बूज राखणारी ही कविता लोकशाहीचा भ्रमनिरासही सांगते. महानगरातल्या अध:स्तरीय जीवनाचे दाहक वास्तव ही कविता मांडते. लोकनाथांची कविता एका बाजूला कठोर असा आत्मशोध घेते तर दुसऱ्या बाजूला ती डोळस समूहशोधनाची प्रक्रिया पार पाडताना दिसते. समाजात खुलेआम वावरणाऱ्या विकृती कवीला बैचेन करतात, त्यांचा योग्य शब्दात कवी समाचार घेताना दिसतो. म्हणूनच डॉ. संजय मून म्हणतात, ''मानवाच्या उत्क्रांतीमध्ये कोणत्याही क्रांतीचे सहजच पोथीत रूपांतर होणाऱ्या प्रक्रियेचा अगदी सहजपणे केलेला हा उल्लेख विलक्षण होता.'' जीवनाचे सत्य संदर्भ मानून उभ्या राहणाऱ्या विकासाला माणूस पारखा होतो व सत्यशोधनाच्या कसोटीवर मानवी जीवनाचे मूल्य शोधू पाहणारी विचारसरणी कवीला प्रिय आहे. बुध्दाच्या व्यापकतेने पाहणारी ही करुणादृष्टी कविच्या शब्दांशब्दांतून व्यक्त होते. खऱ्या अर्थाने सामाजिक बांधिलकीचे तत्त्व जोपासणारी ही कविता व्यावहारिक अनुभवांची मांडणी करताना सामान्य माणसाच्या मनातली बौद्धिक जिज्ञासा सातत्याने जागृत ठेवणारी आहे. जगण्याच्या निर्विवाद स्पर्धेत सामान्य माणसाला समृध्द करण्यासाठी झटणारी ही कविता आदर्शवाद व इतिहासाच्या दिशेने निसर्ग, माणूस आणि समाज यांचे एक वास्तव चित्र रेखाटताना दिसून येते. कवीला मानवकेंद्रित विकास अतिशय महत्त्वाचा वाटतो. त्यामुळे बदलत्या जगण्याच्या लढाईतील लहान-सहान प्रश्नावरही तो कवी सहज भाष्य करतो. विचारांची एक बैठक लाभलेला कवी क्रांती, उत्क्रांती व प्रतिक्रांतीवर सहजपणे भाष्य करताना आपणाला सतत दिसून येतो. म्हणून तर डॉ. संजय मून म्हणतात, ''जितके सहज जगणे तितकीच सहज कविता, हा त्यांच्या कवितेचा विरोध जगण्याचे अनेक आसूड अंगांवर मारून घेण्यासाठी हा कवी अजूनही 'मातीचे पाय' घेऊन जमिनीवरच वावरतो. मूल्यांची सर्वदूर होत असणारी पडझड पहात असतानाच 'मी सत्त्व राखून आहे! माझ्यापरीने माझ्यापुरतं' अशी ग्वाही तो देतो'' (प्रस्तावना पृ.५)

ही कविता संवादी कविता आहे. गौतम बुध्द, प्लेटो यांच्या कामगिरीचा ती उल्लेख करते आंबेडकरी क्रांती विचारावर कवीचा विश्वास आहे. समाजमनाचे प्रबोधन व परिवर्तन व्हावे ही तिची रास्त अपेक्षा आहे. होणाऱ्या बदलांमध्ये माणसाचे मनुष्यत्व जपणारी ही कविता सूक्ष्म प्रश्नांना उजागर करताना दिसते. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या वाईट परिणामांची भिती बाळगून झोपलेल्या माणसाला जागे करणारी, बसलेल्याला उठून उभे करणारी व उभा आहे त्याला समतेसाठी पहायला लावणारी यशवंतांची कविता सरळ सरळ तथागत बुध्दाच्या, म. फुल्यांच्या व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मानवतावादी मूल्यांना ती खऱ्या जाणिवेने संविधान मूल्यांचा जयघोष करताना दिसते. मुळात मनुष्यजीवन हे समष्टीला व समतेला धरून असले पाहिजे ते समष्टीला धरून आहेच, पण मानवी जीवनाला आवश्यक असणारी नैसर्गिक अधिकाराची बूज समतेत असते. म्हणून प्रतिकूल विषमतावादी मूल्यांना बाजूला सारून समतावादी मूल्यांचा कवी जयघोष करताना जगणे व जगविणे ही मानवी संस्कृती कवितेत रुजवताना आपणाला दिसतो.

माणसाचे माणसातून उठणे व उठविणे या त्यांच्या जगण्याला व विकासाला बाधक ठरणाऱ्या गोष्टी समाजीकरणात विचारात घ्यायला हव्यात. भारतीय समाजात माणूस अनेक जाती व धर्मांध बंधनाने विमुक्त झाला आहे व आता तो येणाऱ्या बदलांमुळे समाजापासून तुटण्याची प्रक्रिया सुरू आहे. या विभागात आलेल्या आठही कविता एका मानवाच्या सामिलीकरणाची भाषा बोलताना दिसतात. समता प्रस्थापित होण्यासाठी कृत्रिम बंधने व तकलादू रितीरिवाज हे फेकून दिले पाहिजेत अशी कविता सांगते. थोडक्यात, या सर्व कवितांमधून जीवन जगण्याचे तत्त्वज्ञान दिसते. त्याबरोबर समकालीन वास्तवाचा उभा आडवा छेद घेऊन कवी जगण्याचे जगण्याशी असलेले युध्द याची जाणीव करून देतो. ही कविता मानवतावादाच्या प्रस्थापनेची शब्दशलाका आहे. ती डोळस अशा समूहशोधाची कविता आहे. त्यातून समष्टीची वास्तवता दिसून येते. थोडक्यात, वरील सर्व एकसंध आशयानुसार या कवितांत एक मध्यवर्ती कल्पना जी आहे ती म्हणजे मानवी जीवन लोककल्याणकारी व समृध्द विकासाने मूल्यांकन होऊन मानवाने मानवाच्या कल्याणासाठी झटावे. नीतीमूल्ये, जीवनमूल्ये यांच्यात फारकत न होता ती समतेच्या एका धाग्यात मूल्यांकित व्हावीत असेच या कवितांचे स्वरूप असलेले दिसून येते.

## १.७ भाषाविशेष

जीवनमूल्ये आणि वाङ्मयीन मूल्ये यांची खोलवर जाण असणारे लोकनाथ यशवंत निखळ स्वतंत्रनिर्मितीचा ठाम आत्मविश्वास घेऊन काव्यसृजन करताना दिसून येतात. आपले अंतस्थ भावविश्व व सभोवतालचे अनुभव यांना नेमकेपणाने शब्दात पकडताना कवी लोकनाथ यशवंत यांची भाषा दिसते. सभोवतालच्या अनेक घटकांना केंद्रस्थानी ठेवून उपहासात्मक व उपरोधिक भाषेत कवी मार्मिक भाष्य करताना दिसून येतो. विविध भाषिक रूपांचा वापर करताना कवी समूहमनाच्या भाषेचा स्वीकार करतो. वास्तवाचे भान आणून देणारे वैचारिक वक्तृत्व या कवितेत आहे, जीवनाशी घट्ट नाळ असलेली विविध भाषिक रूपे त्यांच्या कवितेत येतात, त्यामुळे कवितेला अर्थवाहकता प्राप्त होताना दिसते. लोकनाथ यांच्या कवितेत आशयविषय काव्यांकित होताना नव्या भाषेसह, नव्या संकेतासह व तंत्रासह ही कविता ग्रांथिक व बोली या भाषांतून ती सरळ-सरळ जीवनाला भिडते. काव्यात कलाटणी तंत्राचा ते सहज वापर करताना दिसतात. नाट्यात्मकता व कृतिशीलता यांचा सुंदर प्रयोग त्यांच्या भाषेत आहे. अनुभवविश्वाचा अनोखा बाज घेऊन आलेली लोकनाथ यशवंत यांची भाषा नाद, आकार, स्पर्श, छटा, कथनात्मकता, नाट्यात्मकता, कार्यकारणभाव यांच्या बरोबरीने सुंदर रितीने प्रकटताना दिसते. नव्या पिढीला या कवितेतून खूप शिकण्यासारखे आहे. ही कविता भाषेच्या स्वतंत्र बाजाने मानवी जीवनाचे मूल्य वाढवते. ते अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करते. उपहास व उपरोधाचे अनोखे संतुलन साधून येणारी लोकनाथ यशवंत यांची कविता जीवनूमल्य व वाङ्मयीन मूल्य यांची उंची वाढवणारी कविता आहे. यातच

लोकनाथ यशवंत यांच्या कवितेचे महत्त्व दडलेले दिसून येते. साधी, सोपी, सरळ भिडणारी ही भाषा असून आशय, विचार व अभिव्यक्ती यांचा सुंदर मिलाफ घेऊन येते. आणखी एक लोकनाथ यशवंत यांच्या काव्यभाषेचा विशेष म्हणजे ती समाजाला जाग आणून वाचक, अभ्यासक व समीक्षकांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले. जात, पात, पंथ, वंश, धर्म यांना बाजूला सारून येणारी ही कविता निखळ विश्वात्मक मानवतावादी कविता आहे.

## १.८ समारोप

समकालीन वास्तवाचा वेध घेणारी लोकनाथ यशवंत यांची कविता सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठवते. माणसाचे माणूसपण नाकारणाऱ्या समाजव्यवस्थेला नकार देऊन आंबेडकरवादी विचारांची विचारशिलता जोपासताना दिसते. फारशी प्रक्षोभकता न बाळगता संयमित, विवेकी बाणा धारण करून जात्यांध, धर्मांध, मूल्यहीनता, अमानवीपणा, विचारांचे अवमूल्यन, विमुक्तिकरण, वास्तव जगणे इ. विविध गोष्टींवर ही कविता प्रकाश टाकताना दिसते. अनुभवाला समृद्ध बनवून वाचकमनाशी संवाद साधणारी ही कविता जगण्याचे विदारक वास्तव शब्दात पकडून त्याचे अनेक पडदे उलगडताना दिसते. थोडक्यात, ही कविता धर्म, समाज, राजकारण, धर्मकारण व विविध क्षेत्रातील मक्तेदारी यावर भाष्य करताना स्वच्छ व निर्मळ जातविरहित, वर्गविरहित माणसांच्या वर्तनाची व नवसमाजनिर्मितीची अपेक्षा बाळगते. थोडक्यात ही कविता समाजाचे मूलगामी परिवर्तन व्हावे, अशी प्रामाणिक व तळमळीतून इच्छा प्रकट करणारी कविता आहे. ती जीवनाला अधिक गतिमान करणारी कविता आहे.

## १.९ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

### १.९.१ वस्तुनिष्ठ प्रश्न

### अ) योग्य पर्याय निवडा.

१. ............ त कुठे बसतो मी, म्हणून त्याच्या जीवाचा आटापिटा सुरूच.

*(अ) जातीत* *(ब) धर्मात* *(क) देशात* *(ड) चातुर्वर्णात*

२. तुम्ही गोष्ट करता चॅपलीनच्या ............, मदर टेरेसाची.

*(अ) स्नेहाची* *(ब) भांडणाची* *(क) प्रेमाची* *(ड) करूणेची*

३. वर्षातून एकदा त्याची कापायची म्हंजे तो कुंडीतच राहील बुटका होऊन ......... .

*(अ) पानं* *(ब) फुले* *(क) फांदी* *(ड) मुळं*

४. विषय निघाला म्हणून ............ डॉक्टरसाहेबांना सांगत होतो.

*(अ) एमबीबीएस (ब) एम्.डी. (क) पीएच.डी. (ड) बीएएमएस*

५. ............. आजीने लग्नाच्या धामधुमीत प्राण सोडला.

*(अ) लक्ष्मी (ब) सरोजनी (क) एलिझाबेथ (ड) वासंती*

६. हरामातून घेतलेल्या .............. भाव भरमसाठ वधारणाराहेत.

*(अ) सोन्याचे (ब) ईस्टेटीचे (क) बंगल्यांचे (ड) जमिनीचे*

७. प्रत्येक हालचालीवर असतात ........... लक्ष ठेवून.

*(अ) पहारेकरी (ब) रखवालदार (क) सुरक्षारक्षक (ड) सीसीटीव्ही कॅमेरे*

८. पर्सनल मुलाखतीच्या वेळी ............ कळीचा मुद्दा ठरला.

*(अ) मेरिट (ब) सामान्यज्ञान (क) व्यक्तिमत्त्व (ड) जातधर्म*

## १.१० सरावासाठी प्रश्न

### १.१०.१ लघुत्तरी प्रश्न

१. भविष्य सांगणारी व ते बघणारी वृत्ती समाजात आढळते याचे चित्रण लोकनाथ यशवंत यांनी 'भविष्य' या कवितेत कसे रेखाटले आहे? ते स्पष्ट करा.

२. शहरी संस्कृतीत सतत तडजोड करावी लागते याचे कवी लोकनाथ यशवंत यांनी 'तडजोड' कवितेतून दर्शन कसे घडविले आहे?

### १.१०.२ दीर्घोत्तरी प्रश्न

१. लोकनाथ यशवंत यांच्या कवितेत येणारी उपरोधिक व उपाहासात्मक जाणीव त्यांच्या कवितांच्या आधारे स्पष्ट करा. *किंवा*

२. लोकनाथ यशवंत यांच्या सामाजिक जाणिवांच्या कवितांचा आढावा घ्या? *किंवा*

३. लोकनाथ यशवंत यांच्या कवितेतील आलेली समाज वैज्ञानिक जाणीव स्पष्ट करून सांगा?

## १.११ वाचन

१. बाकी सर्व ठीक आहे (काव्यसंग्रह) - लोकनाथ यशवंत.

२. दलित कवितेतील नवे प्रवाह - महेंद्र भवरे.

३. दलित कविता व दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र- म. सु. पाटील.

## १.१२ उपक्रम

१. क्रांतिबा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्रांचे वाचन करा.

२. बुध्द, कबीर, फुले, शाहू व आंबेडकर यांच्या समाज वैज्ञानिक विचारांची सामुदायिक चर्चा करा.

३. आपल्या महाविद्यालयात, घरी व परिसरात धर्मनिरपेक्ष, विज्ञानवादी व सामाजिक समतेचे उपक्रम आयोजित करा.

❐ ❐ ❐

## घटक – २

# बाकी सर्व ठीक आहे! लोकनाथ यशवंत

## (निवडक कविता)

अनुक्रमणिका


२.१ उद्दिष्ट्ये

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

२.४ कविता : आशय

२.५ मध्यवर्ती कल्पना

२.६ भाषा विशेष

२.७ समारोप

२.८ स्वयं अध्ययन प्रश्नोत्तरे

२.९ सरावासाठी प्रश्न

२.१० अधिक वाचन

२.११ उपक्रम


## २.१ उद्दिष्ट्ये

विद्यार्थी मित्रांनो या घटकात आपणांस,

१. लोकनाथ यशवंत यांच्या कवितांमधील समकालीन सामाजिक वास्तवाची ओळख होईल.

२. महानगरीय जीवनातील अध:स्तरीय जीवनांची वेदना, वास्तव व वस्तुस्थिती समजून येईल.

३. मानवी जीवनांतील हतबलता, मजबूरी तसेच मानसिक, बौद्धिक व सामाजिक गुलामगिरीचे दर्शन घडेल.

## २.२ प्रास्ताविक

मराठी कवितेमध्ये लोकनाथ यशवंत यांची कविता समकालीन सामाजिक आशय व परिवर्तनवादी मूल्यविचार घेऊन येणारी महत्त्वाची कविता असलेली दिसून येते. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक समतेची मागणी करणारी त्यांची कविता महानगरीय जीवनांतील अध:स्तरीय जीवनांची वेदना, अनुभवविश्व व शोषण यांचे वास्तव आणि वस्तुनिष्ठ चित्रण करणारी आहे. लोकनाथ यशवंत कवितेला परिवर्तनाचे हत्यार बनवताना भावना आणि विचारांच्या अभिव्यक्तीचे एक सशक्त साधन म्हणून पाहताना आढळतात. वेदना, विद्रोह, नकार, परिवर्तनवादी विचारांचा आग्रह, बंडखोरपणा, अन्यायाचा प्रतिकार व निषेध इ. वैशिष्ट्यांनी युक्त असलेली त्यांची कविता नवसंवेदनांबरोबर, लोकशाही जीवनूमल्यांचा जयघोष करताना आढळते. मानवी जीवनातील सर्वहारांच्या समस्या व प्रश्न घेऊन उठवणारी व उठावाची भाषा बोलणारी त्यांची कविता समाज परिवर्तनाची आशा बाळगून आहे. आत्मशोधाबरोबर डोळस समूहशोधाची भावना व्यक्त करताना जगभराचा व्यावहारिक अनुभव व सभोवतालचे सामाजिक पर्यावरण यांची ठळक शब्दात नोंद घेणारी ही कविता आहे. माणूस म्हणून माणसाचे सर्वप्रकारचे मानवी मूल्य वाढविण्यासाठी या कवितेने जात, धर्म, मूल्यहिनता, वैचारिक अवमूल्यन, अंधश्रद्धा, भेदभाव, देवभोळेपणा आणि सामाजिक विषमतेला वजा करण्याचे धोरण आखल्याचे या कवितांमधून दिसून येते. व्यापक अर्थाने ही कविता 'जीवनासाठी कला' या मूल्याचा स्वीकार करताना कविता हे समाजपरिवर्तनाचे माध्यम म्हणून ते वापरतात. विद्यार्थी मित्रांनो, या विभागात आलेल्या एकूण आठ कवितांच्यामधून आपणाला त्यांच्या वरील वैशिष्ट्ये व आशयांचा अभ्यास करावयाचा आहे.

## २.३ विषय विवेचन

'बाकी सर्व ठीक आहे' या लोकनाथ यशवंत यांच्या काव्यसंग्रहातील एकूण आठ कविता या घटकामध्ये अध्यापन व अध्ययनासाठी समाविष्ट केलेल्या आहेत. या सर्वच कवितांमधून सामाजिक उपहास, उपरोध व्यापकतेने मांडलेला आहे. कविता वैचारिक आशय देतानाच ती खूपच संवादात्मक होताना आढळते. सर्वसामान्य माणसाच्या जीवनातील व्यथा, वेदना, दारिद्र्य, शोषण व दु:ख यांना वाचा फोडण्याचे काम या कवितांच्यामधून झालेले आहे. लोकजीवनापासून कधीही फटकून न वागणारा कवी आपले काव्यलेखन सूक्ष्म भाषेत मांडताना आढळतो. विधानात्मक मांडणी व वैचारिकता ह्या वैशिष्ट्यांनी ही कविता चिंतनात्मक पातळीवर जीवनाचा अर्थ समजावून सांगताना दिसून येते. वर्णव्यवस्था व इथले जातवास्तव भारतीय माणसाच्या कसे हाडामांसी भिणले आहे? व आज जगभर एवढी मोठी उलाढाल होत असताना माणूस जातीय अहंकार व वर्णश्रेष्ठत्व सोडायला तयार नाही, याचा संतापही कवीने व्यक्त केला आहे. विविध सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, पर्यावरणात्मक, आधुनिक व समाज

वैज्ञानिक आशय घेऊन आलेल्या, 'गौडबंगाल', 'पर्यावरण', 'सोन्याचा दात', 'मांजर', 'स्पर्श', 'युद्ध असे सुरू होते', 'जन्म आईचा', 'शेतमजूर' इ. कविता आपणाला अभ्यासायच्या आहेत. त्या कवितांचा आशय पुढीलप्रमाणे होत.

## २.४ कविता : आशय

### १ ।। गौडबंगाल ।।

स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय आणि समाज प्रबोधन तसेच परिवर्तनाचे पाईक असणारे कवी लोकनाथ यशवंत 'गौडबंगाल' या कवितेतून वास्तवाची जाणीव करून देतात. बुद्ध, डॉ. आंबेडकर, मार्क्स, एंगल्स, माओ, प्लेटो इ. महापुरुषांची फक्त नावे घेऊन त्यांच्या नावांचा उदो-उदो करून, त्या महान पुरुषांची खरी तत्त्वविचारमूल्ये बाजूला ठेवून, जनतेला आजच्या परिवर्तनशील युगात स्थितीशीलतेत अडकवून ठेवून पोकळ तत्त्वज्ञान सांगणारे तथाकथित मार्गदर्शक यांना थेट सवाल करणारी पिढी कवीच्या शब्दात म्हणते,

*''असे किती दिवस तेच ते सांगणार सर.....?*
*अन् जनसामान्यांना अडवून ठेवणार.......??*
*आजच्या निकडीच्या स्थितीत*
*काय करायचे ते सांगा.*
*भांडवलशाहीने आपला विक्राळ जबडा उघडला पुन्हा.....*
*धर्म मेंदूत कथकली करीत आहे थै.... थै....थै''*

भांडवलशाहीने आपला अक्राळ-विक्राळ जबडा उघडला असल्यामुळे सर्वसामान्य माणसाचे जीवन हवालदिल झाले आहे. मेंदू पोखरून बौद्धिक गुलामगिरी लादणारा स्वार्थी व समाजाची धारणा न करणारा विषम धर्म, या सर्वांच्या पलीकडे जाऊन स्वत: सत्यशोधित समाजधारणेचे मूल्य याविषयी काहीतरी सांगा? हा शिक्षकाला विचारलेला प्रश्न विचार करायला लावणारा आहे. स्वत:ला मार्गदर्शक, पालनकार तसेच बुद्ध, मार्क्स, आंबेडकर यांच्या विचारांचे तारणहार समजणारे तुम्ही आयुष्याच्या उतरणीवरही आपले स्वत:चे काहीच सांगत नसाल, नुसता भाषेचा फडशा व शब्दांना टोलविण्याचे काम करत असाल, तर अशाने तमाम समाजाच्या प्रबोधन व परिवर्तनाचे कसं व्हायचं सर......? हा गहिरा प्रश्न जो विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकाला विचारला आहे तो विचार करायला लावणारा आहे. अत्यंत उपरोधकि व उपाहासात्मक आशयाची ही कविता लोकनाथ यशवंत यांची सूक्ष्म काव्यचिंतनाची साक्ष देणारी आहे.

## २ ।। पर्यावरण ।।

या कवितेत लोकनाथ यशवंत यांनी विषम सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक पर्यावरणाचे अमिट वास्तव सांगितले आहे. मित्रांच्या मेंदूतील काही केल्या 'जात' जात नाही. कवी म्हणतो,

> *''मी एकटा प्रिय आहे त्यांना*
> *ते यारीने राहतात मिळून मिसळून*
> *मात्र,*
> *समूहात असलो की,*
> *आपोआप माझे व्यक्तित्त्व होऊन जाते*
> *जातिधर्मात बंदिस्त त्यांच्यासाठी*
> *मग मी - मी राहात नाही*
> *होतो विशिष्ट धर्माचे बाह्य अंग*
> *दोस्ती, यारी शेवटचे आचके देते व्हेन्टिलेटरवर*
> *करावं तर कसं करावं.....?''*

या साऱ्याच पर्यावरणाचे प्रदूषण व्यक्त करताना कवी जातीधर्म विरहीत होऊ पहातो. परंतु त्यास या प्रदूषणाने धर्माचे बाह्य अंग बनवून टाकले आहे. 'गट आणि दोस्ती' परस्परांच्या समोर उभे राहते. तेव्हा गट महत्त्वाचा ठरतो. दोस्ती कमकुवत ठरते. त्यामुळे या सर्व प्रकारच्या प्रदूषणाच्या लाटेमध्ये वाहणारी पिढी संभ्रमित होताना आढळते. विविध पातळ्यांवर फोफावणारा हा इथला संभ्रमितपणा कवीला बेचैन करतो, मग कवीच म्हणतो, *''करावं तर कसं करावं.....?''* हा प्रश्न अंत:करण पिळवटून विचार करायला लावताना आढळतो.

## ३ ।। सोन्याचा दात ।।

भांडवलदार, नोकरदार मध्यम वर्ग व तिसरा रखडत जीवन जगणारा सर्वसामान्य श्रमिक वर्ग यामध्ये तिसऱ्या वर्गातील असंख्य कुपोषित बालके मरणाच्या दारात उभी, अनेक भगिनी वितभर पोटासाठी व कुटुंबाच्या असंख्य प्रश्नांसाठी विवशतेत वेश्या झालेल्या, वाढती बालमजूरांची संख्या, ही ग्लोबल बेकारी वाढते आहे. याचे कुणालाच काही वाटत नाही. उद्ध्वस्त होत असलेले सामान्यांतील सामान्य माणसाचे अस्तित्व महासत्तेच्या सोन्याने विकत घेतले आहे, हे सांगताना होणारा संताप, महासंताप व लहानश्या कमकुवत मेंदूला होणारा ताप-महाताप हे कवी चिकित्सकपणे सांगतो व म्हणतो,

*"तरीही दात तुमचा सोन्याचा,*
*हातात सोन्याच्याच अंगठ्या*
*जोरदार.....!! "* -

असा उपरोधिक टोला कवीने मारला आहे.

या देशात वेश्या व्यवसाय, गरीबी जीवन, बालमजूरी इत्यादी प्रश्न दिवसेंदिवस वाढत आहे. यात महासत्तेचे काय होणार? गर्भश्रीमंतीत जगणाऱ्या माणसाच्या हातातील अंगठ्या व सोन्याचा दात हे विषमतेची दरी दाखवणाऱ्या तुलनेची उदाहरणे पाहून, माणसाने जीवनाचे काय करायचे? मानवतावाद कसा वाढणार? मानवी जीवनमूल्यांचे इथे काय होईल? असे एक ना अनेक प्रश्न कवी उपस्थित करताना आढळतो. इथल्या वास्तवाचे भान आणून देताना कवी बरेच काही सांगताना खूप काही सूचित करताना आपणाला आढळतो. ही विषमतेची दरी खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाने अधिक तीव्र झालेली असून ती इथल्या गरीब जगाला कशी लुबाडत आहे, याचे वास्तव या कवितेतून तीव्र शब्दात व्यक्त होते.

## ४ ।। मांजर ।।

'मांजर' या कवितेत ज्याची-त्याची आवड व निवड बघून, ज्याचं-त्याचं अन्न त्याला लिलया देऊन स्वत: प्रौढ ठरणारे कत्तलखोर समाजात असतात. असे समाजाच्या मजबूरीचा फायदा घेवून मोठेपण मिरवणारे भोंदू कत्तलखोर असिम करूणा, दुसऱ्याच्या दु:खाची जाणीव, प्राणीमात्रावरील दया याचा आव आणून एकदुसऱ्याला हसत-हसत बळी देतात. या कत्तलखोर माणसाच्या कृतीतील दयाळूपणा, परदु:ख जाणीव, डोळ्यातील करूणा ह्या केवळ बेगडी व भास तयार करणाऱ्या आहेत. दयाळू, कनवाळू माणूस हिंस्र असू शकतो यावर विश्वास बसत नाही. पुढे लोकनाथ यशवंत म्हणतात,

*"भुकेने व्याकुळ झाल्यावर*
*जेव्हा मी मॅऽऽव, मॅऽऽव करते*
*तेंव्हा ते बोकडाच्या मांसाचा ताजा तुकडा*
*अतिशय प्रेमाने माझ्याकडे भिरकावतात*
*खाटीक सर,*
*कृतिशील दयावंत आहेत*
*खूपच छान आहेत."* ह्न

भुकेने व्याकूळ झालेला, मांजरासारखा खाली मान घालून, शेपूट घोळवून सांगून तसे ऐकणाऱ्या माणसाला ते बोकडाच्या ताज्या मटणाचा तुकडा फेकून गप्प बसवून विकत घेतात. त्याला लाचार करतात व स्वत:ला असिम करूणाकार, दु:ख जाणीवेने प्राणीमात्रावर दया करणारे दयावान समजतात तसे दाखविण्याचा ते प्रयत्न करून स्वत:ची झोळी भरून स्वार्थ साधून समाजाला फसवतात. खरे तर अशी माणसे मानवतावादी असूच शकत नाहीत. तर ती कमालीची हिंस्र, स्वार्थी, संधीसाधू, लबाड व कावेबाज असतात असे कवीला येथे सांगायचे आहे.

## ५ ।। स्पर्श ।।

'स्पर्श' ही कविता कवी लोकनाथ यशवंत यांच्या संवेदनशील मनाचे प्रतीक असलेली दिसून येते. सगळेच धनवान, दाते व दयावान नसतात. काहीजण आपल्या सरंजामी दहशतीसाठी कुत्र्यासारखे गुंड पोसून ठेवतात, तर काही कुत्र्यांसाठी चौकीदार ठेवतात. त्यांना रंगीबेरंगी कपडे घालतात. पण अशा श्रीमंतांना भूकेने व्याकूळ, प्रेम, दयेवाचून पारखे, अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व माणुसकीवाचून वंचित असलेले अनाथ व गरीब लोक दिसत नाहीत. पण कंगाल असूनही ज्याचे मन, कृती व माणुसकीची भावना मोठी आहे, ते आपल्या करूण स्पर्शाने मानवजातीचे सोने करतात, कवी म्हणतात,

*''अनाथ मुलं येऊन बिलगतात*
*चढतात माझ्या अंगाखांद्यावर*
*स्पर्शतात शरीराला, सोडत नाहीत हात*
*ते बघतात वाट माझी सदैव प्रियकरासारखी*
*मी भेटणे हा आनंदोत्सव त्यांचा*
*त्यांच्या बकाल जीवनात येते बहार*
*शुष्क डोळ्यांत चमक..... डोलतात गुलाब चोहीकडे त्याच्या*
*अर्थहीन आयुष्य होऊन जाते अर्थपूर्ण त्यांचे*
*कंगाल मीही होऊन जातो तृप्त धन्नाशेठ*
*जेंव्हा अनाथालयात जातो तेंव्हा...........''*

ज्यांना हा समाज पारदर्शी व समतेने पाहायचा आहे अशी मानवतावादी माणसे जी कंगाल असूनही खऱ्या अर्थाने माणुसकीची भूक भागवून आनंदाचा तृप्त ढेकर देणारी खरीच धन्नाशेठ असतात. जी अनाथालयातल्या मुलांच्या डोळ्यात आनंद पाहतात. त्यांना प्रेम, दया, माया, जगण्याची उमेद,

माणुसकीचा स्पर्श देतात की, ज्यांच्या स्पर्शाने माणुसकी पुलकित होते. अनाथ मुलांच्या बकाल जीवनात गुलाब डोलतात, मानवतेच्या सुखाचा सुगंध पसरवतात ते करुणाकार खरे धन्नाशेठ असतात. ज्यांच्या माणुसकीची श्रीमंती असते. ही प्रज्ञा, शील व करूणेची अनुभूती कवीला या कवितेतून सूक्ष्मपणे सांगायची आहे.

## ६ ।। युद्ध असे सुरू होते...।।

'युद्ध कुणाला हवे असते? तरीही युद्ध सुरू होते' या पंक्तीने कवितेला सुरूवात होते. युद्धात पगारी सैन्य मारले जाते, स्त्रिया विधवा, मुलं अनाथ, गरीबी-दारिद्र्य वाढत जाते, हे कसे होते कळत नाही, पण युद्ध केले जाते. हे वास्तव कवीने सांगितले आहे. लोकनाथ यशवंत म्हणतात,

*''युद्ध पर्याय नसून पर्याय केला जातो.*
*सगळी युद्धं निरर्थक असली तरी*
*त्याला अर्थ दिला जातो.*
*'युद्ध' या घृणास्पद शब्दाला आस्था भरली जाते*
*आणि भ्रष्टाचाराचे भलेमोठे आगार असलेले*
*युद्ध थोपवले जाते.*
*विराण होतात सीमारेषा*
*होते जमीन जख्मी....''*ह्न

सत्ता साम्राज्य वाढीसाठी वित्तीय व बेकारीच्या समस्या, आर्थिक तूट, महामंदी, निर्यात बंदी अशा अवस्थेत सत्ताधाऱ्यांची बुद्धी बंद होते. मग युद्ध हा पर्याय नसून सुद्धा तो केला जातो. निरर्थक युद्धाला अर्थ लाभतो. युद्ध या घृणास्पद शब्दात आस्था भरली जाते आणि भ्रष्टाचाराचे भलेमोठे आगर होणारे युद्ध लादले जाते. त्यामुळे सीमारेषा विषन्न होऊन जमीन जख्मी होते व हे सगळे हकनाक होते. गरीबी वाढते, असे सांगून 'युद्ध असे सुरू होते' हे वास्तव कवीने अत्यंत उपरोधिक व उपाहासात्मक भाषेत सांगितलेले आढळून येते.

## ७ ।। जन्म आईचा ।।

सुंदर जन्माचा मजबूत पाया म्हणून आईचा जन्म..!..... ही निरालस व अतिशय प्रामाणिक भावना कवीने या कवितेत मांडली आहे. नीती-अनितीचा व समाज-कुटुंब स्वास्थ्याचा विचार करून कवी कोणत्या आईने जन्म घेऊ नये हे सांगताना म्हणतो,

*"जिचा मुलगा सरेआम नरसंहार करीत असेल*
*अशा आईने जन्मच घेऊ नये.*
*जिचं बाळ बंदुकीचा शोध लावत असेल*
*अशा आईने जन्मूच नये.*
*जिचं लेकरू अणुबॉम्ब बनवीत असेल*
*अशा आईने जन्मच घेऊ नये.*
*जिचा पोरगा माणसामाणसात भेद करून*
*द्वेष पसरवीत असेल*
*अशा आईने जन्मूच नये...."*

खुलेआम नरसंहार करणारा, बंदुकीचा शोध लावणारा, अणुबाँब बनविणारा, माणसामाणसात व्देष पसरविणाऱ्या मुलाच्या आईने जन्म घेवू नये असे कवी म्हणतो, त्याचे कारण म्हणजे या सर्व गोष्टी अमानवतावादी, घातकी व देशद्रोही आहेत. त्यामध्ये हिंस्रता व मूल्य नसलेल्या जाणिवा आहेत. याउलट जो मुलगा या मानवी जीवनाला अधिकधिक सुंदर करेल त्या आईने पुन:पुन्हा जन्म घ्यावा हे सांगताना कवी म्हणतो,

*"राईट बंधूंच्या आईने जन्म घ्यावा हजार वेळा*
*मार्कोनीच्या आईने जन्मावे अनेकदा*
*मायकल फॅरेडेच्या आईने जन्म घ्यावा अगणितवेळा*
*वारंवार जन्म घ्यावा एडिसनच्या आईने*
*– आणि हे सुंदर जग आणखी सुंदर करावे*
*येणाऱ्या अर्भकासाठी...."* ह्न

विज्ञान शोधाच्या व नव्या विश्वात्मक जाणिवेने ज्या शास्त्रज्ञांनी विमानाचा, आकाशवाणीचा, विजेचा शोध लावून इथला अंधार दूर करून प्रकाशाचा मार्ग दिला, त्यांनी हे जग सुंदर केले आहे. त्यांच्या मातांना या सुपुत्रांच्या जन्माने व कर्माने धन्यता लाभली. त्या मातांनी हे जग अधिकाधिक सुंदर करणाऱ्या उद्याच्या धर्मनिरपेक्ष, विज्ञानवादी व मानवतावादी अर्भकांसाठी पुन:पुन्हा जन्म घ्यावा, असे कवीला वाटते. ही कविता कमालीची आदर्शवादी व चिंतनशील कविता आहे.

### ।। शेतमजूर ।।

या कवितेत सरळमार्गी, कष्टाळू व ईमानदार जीवन जगणाऱ्या कलंदर शेतमजूराच्या जीवनशैलीचे

व मनोवृत्तीचे चित्रण आलेले आहे. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व माणुसकी इत्यादी मूलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी माफक अपेक्षा ठेवून जगणारा शेतमजूर शेतमजूरी करतो, कष्ट उपसतो, त्याची ही कृती जगा आणि जगू द्या अशी आहे. या सरळमार्गी शेतमजूराच्या मनोवृत्तीचे चित्रण करताना कवी म्हणतो,

*"सकाळी जातो शेतमजूरीवर*
*कष्टाने थकून परततो मावळल्यावर*
*चुलीवरच्या गरम भाकरी खाऊन*
*गोधडीवर ताणून देतो बिनधास्त*
*बघतो जगाची सुंदर स्वप्ने..."* –

चुलीवरची गरम भाकरी खाऊन संध्याकाळी घरी आल्यावर गोधडीवर बिनधास्त सुखांची झोप घेतो व जगाची सुंदर स्वप्ने बघतो, ज्याची मुले शिक्षणात तरबेज आहेत, बायको कष्टाळू आहे. मनुष्य म्हणून एकदाच मिळणाऱ्या जीवनांवर तो खूप प्रेम करतो. जणू जगण्यातून, श्रमातून, घामातून एका आनंदी व बिनधास्त कलंदराची व्याख्याच तो अंमलात आणतो, परंतु तो कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांसारखी आत्महत्या करीत नाही तर असेल त्या परिस्थितीत दोन हात करून जगतो, संघर्ष करतो, लढत राहतो, हे शेतमजूराचे सामर्थ्य या कवितेत व्यक्त केलेले आहे.

## २.५ मध्यवर्ती कल्पना

या विभागात आलेल्या लोकनाथ यशवंत यांच्या निवडक कवितांमधून समकालीन सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक व विज्ञानवादी वास्तवाची ओळख होते. निसर्ग, माणूस व समाजाला अत्यंत उपकारक असणाऱ्या सर्व प्रकारच्या समतेच्या दृष्टीची मागणी करणारी ही कविता खेडे, शहर व महानगरीय जीवनाचा अत्यंत सूक्ष्म वेध घेणारी आहे. मानवी जीवनातील हतबलता, मजबूरी, मानसिक, बौद्धिक व सामाजिक गुलामगिरीचे दर्शन घडविणारी ही कविता उपमा, उत्प्रेक्षा, यमकांचा जास्त सोस न बाळगता प्रतिमांच्या भाषेत बोलते, संवादी होते तसेच उपाहास व उपरोधाच्या बाजूने जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न करताना दिसून येते. मराठी काव्यपरंपरेत अशा प्रकारचा उपरोध व उपहास क्वचितच आढळतो. जीवनमूल्य व कलामूल्य हे मानवी जीवनाच्या सर्वंकष उत्कर्षाला किती कारणीभूत ठरते याचा विचार करूनच कवी कविता लिहितो. या अनुषंगाने या कवितांच्यामधून जीवनानुभव, आत्मशोध व समूहशोध फार महत्त्वाचा वाटतो. या ठिकाणी लोकनाथांची समग्र कविता ही माणसाची कविता वाटते. मानवी शोषणाचा इतिहास, वर्णव्यवस्थेचे भीषण स्वरूप, माणसाला हिन पातळीवर जगायला लावणारी धर्मसूत्रे या साऱ्यांना स्पष्ट नकार देऊन प्रसंगी त्याविरुद्ध विद्रोह पुकारून समतेचे पर्यावरण आणू पाहणारा

कवी खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या भीषण दरीला अधोरेखित करतो. ही कविता सत्यान्वेषी कविता असून ती अनेक वास्तवांचे उत्खनन करणारी कविता आहे. दोन भिन्न सांस्कृतिक जगातील द्वंद्व शब्दबद्ध करताना खुबी इथे दिसते. मानवी जीवनाला व जगण्याला ती कुठेही अडचण निर्माण करत नाही तर हे जीवन कसे अधिक सुंदर होईल याचे दिग्दर्शन करणारी ही कविता आहे. यासंदर्भात महेंद्र भवरे म्हणतात, ''एकंदरीत पर्यायी संस्कृतीचा विचार या कवितेने मांडला आहे. पर्यायी संस्कृतीत कसे जगायला हवे याबद्दलची एक निश्चित भूमिका लोकनाथची कविता मांडते.'' (महेंद्र भवरे- दलित कवितेतील नवेप्रवाह, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र. आ. २००१, पृष्ठ-१२) लोकनाथ यशवंत हा क्रांतीकारी मूल्य जाणिवांचा पाठीराखा कवी असल्यामुळे समाजात नवे बदल व्हावेत ही त्याची भूमिका आहे. त्यासाठी कवी-जाणीवपूर्वक पुरोगामी विचारांचा आग्रह धरतो.

महापुरुषांच्या आदर्शांची खैरात करताना आंधळेपणा व भावनाशीलता टाळून बदलत्या जगाचे भान ठेवताना आढळतो. समाजात साचलेली विविध प्रकारची प्रदूषणे नष्ट करून वातावरणात समतेचा निर्मळपणा आणण्यासाठी कवी जातीधर्म विरहित माणूस होण्याचा प्रयत्न करतो. भांडवलदार, जमिनदार व नोकरदारांच्या तुलनेत सर्वसामान्य रखडत जीवन जगणारा श्रमिक वर्ग कवीला अधिक जवळचा वाटतो. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकरणांच्या लाटेत भारतीय समाजाची होणारी पडझड, शहरीकरणाचा वेग व जीवनाची बदलत जाणारी विविध परिमाणे कवीला बेचैन करतात. मग यामध्ये निसर्ग, माणूस आणि समाज यांच्या धारणातत्त्वांची मूल्यनिष्ठता कवीला अधिक महत्त्वाची वाटल्याने तो निषेधात्मक बाबींचा उपहासात्मक व उपरोधिक शब्दात खरपूस समाचार घेताना आढळतो.

खेडी व शहरामधील जीवनाच्या वास्वतेचा सूक्ष्म वेध घेऊन कवी शहरात गावगाड्याची संवेदना हरवल्याचे सांगतो. खेड्यातले माणसाचे मोकळे जगणे व सरळमार्गी वागणे या शहरात अपराध केल्यासारखे होते. शहरात फक्त माणसाला न दुखावता हित साधायचे एवढाच भाग जाणवत असल्याचे कवी सांगतो. सामान्य माणूस, त्याचे श्रम व घामाचा मुलाहिजा बाळगणारी ही कविता दिनदलितांच्या अंत:करणातील प्रबोधनाचा आवाज व्यक्त करताना दिसून येते. या ठिकाणी आलेल्या प्रत्येक कवितेत कवी सूक्ष्मपणे सर्वस्तरीय घडामोडी व्यक्त करताना आत्मशोध व डोळस समूहशोध घेतो. या कवितांत आलेल्या स्फोटकता या वैशिष्ट्याचा विचार करताना आत्मजाणिव हा घटक महत्त्वाचा आहे. आत्मजाणिवेतून आलेली स्फोटकता अपरिहार्य होतान आढळते. सूचकता हे या कवितांचे काव्यमूल्य आहे.

सभोवतालच्या वास्तवाला सजगपणे व्यक्त करणारी ही काव्यजाणीव विषमता व भेदभाव जपणाऱ्या पारंपारिक व्यवस्थेला आव्हान देऊन विषमतेच्या सर्व वास्तवांना जाहिरपणे नकार देताना

दिसते. अल्पाक्षर रमणियत्व जोपासणारी ही कविता वाचकांच्या मनाचा ठाव घेते. तिचे आशय आणि विचारांचे व्यापकत्व वाचकाला अंतर्मुख करते. तिचा सूचना करण्याचा वेग खूप असल्याने ती खूप काही गोष्टींवर लीलया व शब्दबरहुकूम भाष्य करताना दिसते. जाणिवांची व्यापक किनार लाभलेली ही कविता जात, धर्म, मूल्यहिनता, माणूसकी व मानवाचे अवमूल्यन खूप सूक्ष्म भाषेत मांडताना, मानवतेचे व लोकशाही मूल्यांचे जीवन विकासासाठी आईच्या काळजाने जतन करताना आढळते.

## २.६ भाषा विशेष

लोकनाथ यशवंत यांच्या कवितेची भाषा रोखठोक व कमी शब्दात जास्त आशय व्यक्त करणारी आहे. लढा व आव्हाने यांची समर्थपणे बाजू घेवून शोषकांना जाब विचारण्याची ताकद या कवितेत असलेली दिसते. सार्थ भाषा, अर्थाची व्यापकता आणि सूचकता हे या भाषेचे फार मोठे सामर्थ्य आहे म्हणून महेंद्र भवरे म्हणतात, ''आव्हानाची भाषा ही कविता समर्थपणे पेलते. प्रतिमा आणि प्रतिकांचा वापर करून संस्कृतीची रूपे या कवितेने साकार केली आहेत.'' (महेंद्र भवरे-द.क. न.प्र., शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ.२००१, पृ.११३) हे साक्षेपी मत आहे. लोकनाथ यशवंत यांची कविता अंत:र्मुख आणि बहिर्मुख बाजाची आहे. परंतु समाजाची दिशाभूल करणाऱ्या व सर्वहारा समाजाला सर्वदृष्ट्या शोाषित ठेवणाऱ्या वृत्तीप्रवृत्तींचा ती धिक्कार करते. 'माणूस आणि महानगर' यांचे रक्ताचे नाते दुरापास्त झालेले आहे. 'परंपरा व आधुनिकता' यांच्या पेचात महानगरीय अध:स्तरीय जाणिवांचा हा काव्याविष्कार घटना व घटितांचे एक प्रासंगिक संवेदन न राहता ही कविता खऱ्या अर्थाने सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणाची कविता आहे. तिची शब्दकळा ही तेजस्वी व क्रांतीमूल्यांची जाणीव ठेवणारी आहे. संवादात्मक शैली व सूचकता हे वैशिष्ट्य विचार करायला लावणारे आहे. ही कविता आत्मसन्मुख व शोधकांची जननी असून ती कष्टकरी आणि श्रमिकांची बाजू घेऊन वंचित, उपेक्षित व जागे झालेल्या लोकांची भाषा बोलणारी आहे. त्यामुळे ही कविता जगभरातल्या वंचित घटकांना कवेत घेते. अनुभवाला समृद्ध बनवणारी ही कविता आहे. वाचकमनाची दीर्घकाळ बोलणारी ह्या कवितांची शैली आहे. जात, पोटजात, अन्याय, अत्याचार, गुर्मी आणि देवाधर्माच्या धाकात पिडीत वर्गाला कायमचे दडपण्याचे केलेले सूत्र या विरोधात उभी राहणारी लोकनाथ यशवंत यांची कविता मानवमुक्तीच्या लढ्याला निर्णायक आकार देऊ पाहणारी व सामाजिक बांधिलकीच्या एका ध्येयवादी कृतीची निर्धारपूर्वक कल्पकतेतून साकारलेली ही आंबेडकरवादी काव्यशैली आहे. माणूस, निसर्ग आणि समाज यांच्याबद्दलची सामाजिक बांधिलकी मर्ढेकर, सुर्वे, ढसाळ यांच्या तोडीची आहे. कवीचे आपले अंतस्थ भावविश्व व कविता यांचे अतूट नाते जीवनवादी दृष्टिकोनातून इथे येताना दिसते. सर्वहारा समाजाच्या भावनात्मक वलयांबरोबर ही कविता फिरत राहते. या भावनात्मक वलयाला खोलवर अशा प्रकारची अर्थपूर्णता व आस्वादकता आहे. नेमक्या शब्दात भावना मांडण्याची

कवीची कलात्मकता विचार करायला लावते. अल्पाक्षरत्व हे या कवितांचे वैशिष्ट्य आहे. ही भाषा ग्रांथिक नाही तर ती सरळ-बोली भाषेतून बोलणारी होय. सैलसर व खेळकर अशी आवाहनाची भाषाशैली आहे. सर्वनामे, विशेषता संबोधनात्मक सर्वनामे, संबोधनात्मक संवाद, विद्रोहाचे संवेदन, शब्दांच्या विविधांगी शक्तीक्षमता, उपरोधिक व्यंगात्मक भाषा, प्रश्नार्थक मांडणी अशा शैलीने ही नटलेली कविता आहे.

## २.७ समारोप

लोकनाथ यशवंत यांची कविता वर्तमान युगाचे भान असणारी कविता आहे. ही कविता सामाजिक बांधिलकी जोपासून मनुष्य जीवनाला अधिक संपन्न करताना दिसते. सामाजिक बांधिलकीच्या शोकात्मक कहाण्या तटस्थपणे सांगून देशासमोरील प्रश्नांना शब्दात मांडत जाणारी त्यांची कविता क्रांतीकारी मूल्यव्यूहाचाच एक अविभाज्य घटक आहे. उपरोध आणि उपहासाबरोबर मानवी जीवनातील काही द्वंद्व अभिव्यक्त करण्याची त्यांची शब्दयोजना वाचकाला चकित करणारी आहे. त्यांच्या उपरोध व उपाहासात्मक भाषेला विलक्षण अर्थ आहे. मानवमुक्तीचा आग्रह धरणारे लोकनाथ यशवंत बुद्ध आणि आंबेडकरांच्या समग्र मानवी कल्याणाचा विचार मांडणारे भाष्य करतात. माणूस म्हणून जगताना सभोवतालच्या अस्वस्थ काळात माणसाला जगण्याची स्फूर्ती व आदर्श देणारी ही कविता आहे.

## २.८ स्वयं-अध्ययन प्रश्नोत्तरे

### २.८.१ वस्तुनिष्ठ प्रश्न

- **योग्य पर्याय निवडा.**

१. बुद्ध असे म्हणाले ............ असे म्हटलं ............ .

*(अ) दादासाहेबांनी* *(क) बाबासाहेबांनी*

*(ब) काकासाहेबांनी* *(ड) मार्क्सनी*

२. मी एकटा प्रिय आहे त्यांना ते यारीने ............ मिळून मिसळून.

*(अ) बसतात* *(ब) ऐकतात* *(क) सांगतात* *(ड) राहतात*

३. खाटीक सर, खूपच ........... आहेत.

*(अ) शहरातील* *(ब) करुणाकार* *(क) स्वतंत्र* *(ड) दयाळू*

४. ग्लोबल बेकारी महासत्ता उद्‌ध्वस्त करत असलेले तिसऱ्या ............ लोकजीवन.

*(अ) शहरातील* *(ब) देशातील* *(क) युद्धातील* *(ड) जगातील*

५. काही ............. लोक कुत्र्यासाठी ठेवतात चौकीदार.

*(अ) बोलणारे* *(ब) लिहिणारे* *(क) माजलेले* *(ड) वाचणारे*

६. ........... या घृणास्पद शब्दात आस्था भरली जाते आणि भ्रष्टाचाराचे भलेमोठे आगर असलेले युद्ध थोपवल्या जाते.

*(अ) वाद* *(ब) द्वेष* *(क) युद्ध* *(ड) मत्सर*

७. एकदाच मिळणाऱ्या ............ करतो खूप प्रेम, आणतो अंमलात कलंदराची व्याख्या.

*(अ) आयुष्यावर* *(ब) जीवनावर* *(क) जिंदगीवर* *(ड) निवाऱ्यावर*

८. ............. आईने जन्म द्यावा हजारवेळा, मार्कोनीच्या आईने जन्मावे अनेकदा.

*(अ) मार्क्सच्या* *(ब) राईट बंधूच्या* *(क) शुक्राचार्याच्या* *(ड) बळीराजाच्या*

९. असे किती दिवस तेच ते सांगणार सर....? अन् .............. अडवून ठेवणार.....??

*(अ) जनतेला* *(ब) बहुजनांना* *(क) रयतेला* *(ड) जनसामान्यांना*

१०. ते बघतात वाट माझी सदैव प्रियकरासारखी. मी भेटणे हा ......... त्यांचा.

*(अ) जल्लोष* *(ब) सुखलक्षण* *(क) सतसंगच* *(ड) आनंदोत्सव*

## २.९ सरावासाठी प्रश्न

### २.९.१ दीर्घोत्तरी प्रश्न

प्रश्न १ : लोकनाथ यशवंत यांच्या कवितेत आलेल्या समकालीन सामाजिक वास्तवाची ओळख करून द्या.

प्रश्न २ : लोकनाथ यशवंत यांच्या निवडक कवितांमधून आलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय या लोकशाही मूल्यांचे स्पष्टीकरण द्या.

### २.९.२ लघुत्तरी प्रश्न

प्रश्न १ : लोकनाथ यशवंत यांच्या कवितेतील महानगरीय जीवनातील वास्तव रेखाटा.

प्रश्न २ : लोकनाथ यशवंत यांच्या कवितेत आलेल्या उपमा, उपहास, उपरोध, भाषा व प्रतिभाविश्व इ. वाङ्‌मयीन मूल्यांची ओळख करून द्या.

## २.१० अधिक वाचन

१. बाकी सर्व ठीक आहे (काव्यसंग्रह) - लोकनाथ यशवंत

२. दलित कवितेतील नवे प्रवाह - महेंद्र भवरे

३. दलित कविता व दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र- म. सु. पाटील

४. आंबेडकरी साहित्य - यशवंत मनोहर

५. दलित साहित्य चिकित्सा - सदा कऱ्हाडे

## २.११ उपक्रम

१. भारतीय संविधानाचे सार्वजनिक वाचन करा.

२. बुद्ध, कबीर, फुले, शाहू व आंबेडकर यांच्या जीवन व कार्यावर व्याख्याने आयोजित करा.

३. आपल्या महाविद्यालयात, घरामध्ये, परिसरांमध्ये धर्मनिरपेक्ष, विज्ञानवादी व राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक समता व पुरोगामी विचारतत्त्वांचा प्रचार व प्रसार करणारे उपक्रम राबवा.

❑ ❑ ❑

## घटक – ३
# वृत्तपत्रीय लेखन

अनुक्रमणिका


३.१ उद्दिष्ट्ये

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय विवेचन

३.४ समारोप

३.५ सरावासाठी प्रश्न

३.६ अधिक वाचन

३.७ उपक्रम


## ३.१ उद्दिष्ट्ये

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस,

१. वृत्तपत्रीय लेखनकौशल्ये आत्मसात होतील.

२. नोकरी किंवा अर्थार्जनाच्या एका साधनाची ओळख होईल.

३. नाटक आणि चित्रपट परीक्षणाची कौशल्ये आत्मसात करता येतील.

४. लिखित भाषा कौशल्यामुळे व्यक्तिमत्त्व विकास साधला जाईल.

५. मुद्रित माध्यमातील रोजगाराच्या संधी समजून घेता येतील.

## ३.२ प्रास्ताविक

समाजात राहण्यासाठी माणसाकडे भाषा हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. भाषेशिवाय माणूस, समाज आणि देश अस्तित्वात येऊ शकत नाही. सभोवतालचे अनेक व्यवहार भाषेमुळेच पार पाडले जातात. आपल्या मनातील भावना आणि विचार व्यक्त करण्यासाठी मौखिक आणि लिखित

भाषेचा उपयोग मोठ्या प्रमाणावार केला जातो. एकाच वेळी अनेकांबरोबर संवाद करण्यासाठी प्रसारमाध्यमे अस्तित्वात आली आहेत. शिलालेख, पत्र, ताडपत्र, ताम्रपट, कीर्तन, सार्वजनिक पोथीवाचन, कथाकथन, भारूड सादरीकरण, लोकनाट्य, तमाशा, विविध सण, यात्रा, उरूस आणि खेळ ही पारंपरिक प्रसारमाध्यमे. याशिवाय दवंडी देऊन सरकारी सूचना वा आदेश प्रसारित होत असे. आठवडी बाजार, लग्न समारंभ, अंत्यविधी आणि निवांत वेळी पारावरच्या गप्पा यांमधूनही विचारांची देवाण-घेवाण होते. काळाच्या बदलानुसार प्रसारमाध्यमांची भर पडली. वर्तमानपत्र, आकाशवाणी आणि दूरदर्शन ही आधुनिक प्रसारमाध्यमे आहेत. ही तीन माध्यमे म्हणजे क्रांतिकारी साधने मानावी लागतात. वृत्तपत्र हे दृश्य (वाचता येण्याजोगे), आकाशवाणी हे श्राव्य तर दूरदर्शन हे दृक्-श्राव्य माध्यम आहे.

वरील सर्व प्रसारमाध्यमांमध्ये वृत्तपत्र हे प्रसारमाध्यम आजही टिकून आहे. मोबाईलसारख्या अभूतपूर्व साधनांच्या भाऊगर्दीतही वृत्तपत्र वाचले जात आहे. वृत्तपत्राचा खप वाढला आहे. वृत्तपत्रांची संख्या वाढत आहे. वृत्तपत्रांमध्ये व्यवसाय, नोकरी करण्याची संधी निर्माण झाली आहे. त्यासाठी काही कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. त्यासाठी वृत्तपत्र म्हणजे काय? वृत्तपत्रातील विविध लेखन प्रकार, वृत्तपत्र व्यवसायात नोकरी करण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये याचा सविस्तर अभ्यास झाला पाहिजे. भाषा कौशल्ये आणि लेखनकौशल्ये आत्मसात केली तर वृत्तपत्र क्षेत्रात नोकरी मिळविता येते.

## ❐ वृत्तपत्र म्हणजे काय?

'वृत्तपत्र' या शब्दाला वर्तमानपत्र, बातमीपत्र, वार्तापत्र, समाचार पत्र, अखबार, न्यूजपेपर असे विविध शब्द प्रचलित आहेत. 'वृत्तपत्र' या शब्दात 'वृत्त' हा शब्द 'बातमी' या अर्थाने आला आहे. 'वर्तमानपत्र' या शब्दातही 'वर्तमान' हा शब्द चालू घडामोडी किंवा घटना या अर्थाने आला आहे. त्यामुळे वर्तमान घडामोडी, घटना, बातमी अथवा वृत्त ज्यावर छापून लोकांपर्यंत (वाचकांपर्यंत) पोहचविले जाते त्यास वृत्तपत्र असे म्हटले जाते.

'वृत्तपत्र' या शब्दाला जो अर्थ प्राप्त झाला आहे, तोच अर्थ 'कोरंट' (Coranto) आणि 'गॅझेट' या शब्दांना पूर्वी मिळालेला होता. कोरंट म्हणजे संकलित वर्तमान किंवा वृत्त. म्हणजे वृत्तपत्रात बातमी असते. बातम्यांसाठीच प्रामुख्याने वृत्तपत्राचा जन्म झालेला आहे. प्रभावी प्रसारमाध्यम म्हणून वृत्तपत्राचा उल्लेख करावा लागतो. एक-दोन माणसांना बातमी पुरवायची असती तर वृत्तपत्राची गरज निर्माण झाली नसती. याविषयी प्रभाकर पाध्ये म्हणतात, ''एखादी गोष्ट मोठ्या प्रमाणावर प्रसृत करण्याची निकड भासू लागली, म्हणून वृत्तपत्राची आवश्यकता निर्माण झाली.'' (पत्रकारितेची मूलतत्त्वे, पृ. १५) त्यामुळे वृत्तपत्र ही चैनीची, प्रदर्शनाची किंवा वैभवाची बाब नाही, ती एक गरज आहे. दररोजच्या जगण्यासाठी

आणि सभोवतीच्या विविध व्यवहारासाठी आवश्यक असणाऱ्या माहितीचे संकलित भांडार म्हणजे वृत्तपत्र होय.

वृत्तपत्र सर्वसामान्यांपर्यंत बातमीसह इतर अनेक बाबी पोहोचवित असते. वृत्तपत्र लोकांना माहिती देते, लोकांना शिकविते, लोकांची करमणूकही करते. याशिवाय लोकांमध्ये प्रेरणा निर्माण करते. चळवळीसाठी प्रेरित करते. वृत्तपत्राच्या कार्याविषयी डॉ. ल. रा. नसिराबादकर स्पष्ट करतात, 'लोकांना बातम्या देणे, लोकजागृती करणे, समाजातल्या दांभिकतेचे खंडन आणि लोकमताला योग्य दिशा दाखवून इष्ट असे वळण लावणे' हे वर्तमानपत्राचे महत्त्वाचे कार्य असते.' (व्यावहारिक मराठी, पृ. १८६) त्यामुळेच वृत्तपत्राला लोकमाध्यम म्हटले जाते. यावरून माहीत नसलेल्या किंवा माहिती करून घेण्यासाठी वेळ लागणाऱ्या बाबी लोकांपर्यंत पोहचविण्याचे एक मुद्रित (छापील, Print) माध्यम म्हणजे वृत्तपत्र होय.

## ❑ वृत्तपत्रांचे प्रकार :-

वृत्तपत्र कोणत्या वेळी प्रकाशित होते, त्यावरून सकाळचे वृत्तपत्र या सायंदैनिक अथवा मध्यान्हकाळचे वृत्तपत्र असे प्रकार करता येतात. वृत्तपत्राचा आकार मोठा की छोटा यावरून बृहत वा अर्धाकार वृत्तपत्र तयार होते. गंभीर किंवा लोकानुनय करणारी वृत्तपत्रे ही प्रकृती-प्रवृत्ती दाखवतात. स्थानिक किंवा शहर आवृत्तीचीही वृत्तपत्रे असतात. जिल्हा वा प्रादेशिक वृत्तपत्रही असते. राज्यस्तरीय, राष्ट्रीय स्तरावरचीही वृत्तपत्रे असतात. विशिष्ट विषयासाठी वाहिलेली वृत्तपत्रे असतात. उदा. क्रीडा, आरोग्य, कृषी.

वृत्तपत्र आणि नियतकालिक यात फरक करावा लागतो. विशिष्ट कालावधीत प्रकाशित होणारे नियतकालिक असते. उदा. दैनिक, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, द्वैमासिक, त्रैमासिक, षण्मासिक, वार्षिक, अनियतकालिक. वृत्तपत्र हे नियतकालिकच आहे, मात्र वृत्तपत्रात आजची बातमी उद्याच्या अंकात आहे तशी प्रसिद्ध केली जात नाही. अत्यंत ताज्या, नव्या, चालू बातम्या वृत्तपत्रात दिल्या जातात. नियतकालिकात मात्र भूतकालीन घडामोडींसह वर्तमानकालीन विषयाचे विवरण व विवेचन आलेले असते. नियतकालिकात बातमी दुय्यम स्थानी असते तर वृत्तपत्रात बातम्या केंद्रस्थानी असतात.

विशिष्ट राजकीय पक्ष, संस्था किंवा मंडळे आपल्या विचार-कृतीचा प्रसार करण्यासाठी वृत्तपत्र सुरू करतात त्यास मुखपत्र असे संबोधले जाते. त्यामुळे वृत्तपत्राचा मालक, चालक किंवा संपादक ठरवित असतो की, आपले वृत्तपत्र कोणत्या हेतूसाठी सुरू करायचे आहे, त्याचा स्तर कोणता असावा, आकार कोणता असावा आणि कोणत्या प्रकृतीचा असावा. देश आणि स्थळाची मर्यादा ओलांडून आंतरराष्ट्रीय पातळीवरील घडामोडी देण्यासाठीही काही वृत्तपत्र उदयास आले आहेत. वृत्तपत्राची पहिली आणि शेवटची अट मात्र बातमी देणे ही असते.

## १ बातमी म्हणजे काय?

वृत्तपत्रात बातमी केंद्रस्थानी असते. बातमीबरोबरच वृत्तपत्रीय लेखही असतात. उदा. संपादकीय किंवा अग्रलेख, व्यक्तिविशेष लेख, मुलाखत, साईड आर्टिकल (बाजूचा लेख). याशिवाय वाचकांचा पत्रव्यवहार वृत्तपत्रात दिला जातो. स्तंभलेख अथवा स्फुटलेखही दिला जातो. चित्रपट आणि नाट्यसमीक्षेसाठी जागा असते. शब्दकोडे सोडविणारा वाचकवर्ग असतो. काही वृत्तपत्रे लघु अथवा महाशब्दकोडे देतात. जाहिराती असतात, राशिभविष्य असते आणि त्या त्या दिवसाची दैनंदिनी देऊन कोणता कार्यक्रम कुठे, किती वाजता आहे याचा तपशील संक्षिप्त स्वरूपात दिला जातो. जाहीर निवेदन, सूचना आणि मृत व्यक्तीची नोंदही घेतली जाते. सर्वांत जास्त जागा ही बातम्यांसाठी असते. त्यामुळे बातमी म्हणजे काय? हे समजून घेतले पाहिजे.

'बातमी' या शब्दाला वार्ता, वृत्त, वर्तमान, खबर, घटना, समाचार, वृत्तांत असे किती तरी पर्यायी शब्द वापरले जातात. इंग्रजीत त्यासाठी NEWS न्यूज असा शब्द प्रचलित आहे. New (न्यू) या इंग्रजी शब्दावरून News असा अनेकवचनी शब्द तयार झाला असला तरी New हा शब्द लॅटिन Nowa 'नोवा'चे रूप आहे. नोवा म्हणजे नव किंवा नवीन. NEWS या शब्दातील अक्षरे चार दिशांचे सूचन करतात. N=North (उत्तर), E=East (पूर्व), W=West (पश्चिम) आणि S=South (दक्षिण). योगायोगाने निर्माण झालेल्या न्यूज या शब्दातून बातमी म्हणजे काय याचे उत्तर सापडते. पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर या चारही दिशांतून आलेल्या, कळलेल्या, समजून घेतलेल्या, अनुभवलेल्या, शोधलेल्या घडामोडी वाचकांपर्यंत छापील स्वरूपात पोहोचविण्यासाठी केलेले शब्दांकन म्हणजे बातमी होय.

'न्यूज' या शब्दातील 'न्यू' म्हणजे नवीन. अशी घटना की जी दररोज घडत नाही ती न्यू म्हणजे नवीन आणि तिचे निवेदन म्हणजे बातमी. ''वाचकांना ज्या विषयात स्वारस्य (Interest) असते, अशा नुकत्याच घडलेल्या घटनेची वस्तुनिष्ठ माहिती म्हणजे बातमी.'' (भाषिक सर्जन आणि उपयोजन, पृ.१३९) प्रत्येक घटना ही बातमी होऊ शकत नाही. त्या घटनेत बातमी होण्याची क्षमता असली पाहिजे. त्यामुळे पूर्वी कधी ऐकले नव्हते, पाहिले नव्हते, अनुभवले नव्हते अशा घडामोडींचा अहवाल म्हणजे बातमी. त्या दृष्टीने 'वार्तामूल्य' ही संकल्पना समजून घेतली पाहिजे.

बातमीचा जन्म होण्यासाठी किंवा बातमी निर्माण होण्यासाठी वेगळेपणाची नोंद घेतली पाहिजे. वाचकांच्या दृष्टिकोनाची पारख केली पाहिजे. वाचकाला त्या बातमीची गरज वाटली पाहिजे. त्याशिवाय वार्तामूल्य लक्षात येत नाही. वाचक प्रभावित होतील अशी क्षमता असलेल्या बातमीला वार्तामूल्य येते. उदा. मध्यरात्रीपासून पेट्रोलचे दर वाढणे वा कमी होणे; एक हजार रुपयाची नोट व्यवहारात बंद होणे, प्लॅस्टिक वापरावर बंदी. एस. के. कुलकर्णी म्हणतात, ''वृत्तपत्राचा जो वाचक वर्ग त्याच्या दृष्टीने योग्य अशी जी हकीकत वा मजकूर तो म्हणजे बातमी.'' (बातमीदारी, पृ. २५) त्यामुळे स्पष्टता, ताजेपणा,

अनपेक्षितता, मानवी स्वारस्यता वा लोकरुची, जवळीकता (निकटता), सत्यता, महत्त्व, स्पष्टता, प्रभावक्षमता ही वार्तामूल्ये म्हणून लक्षात घ्यावी लागतात.

बातमी ही वाचकांचे लक्ष वेधून घेत असते. बातमी म्हणजे एक प्रकारची सूचनाच असते. कालपरवापर्यंत एखादी घटना माहीत असेल आणि ती कळली तर ती बातमी होते. घटना म्हणजे बातमी नव्हे तर घटना वर्णन करून सांगणे म्हणजे बातमी. बातमी वाचून कुतूहल संपले पाहिजे, शंकेचे निरसन झाले पाहिजे किंवा प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत. माहीत असलेली घटनाच वाचावयास मिळाली तर तिचे वार्तामूल्य शून्य ठरले असे म्हणता येते. डॉ. सयाजीराव मोकाशी व डॉ. रंजना नेमाडे यांच्या मते, 'रूढ घटनेपेक्षा वेगळी, ताजेपणा असणारी, कुतूहल शमन करणारी घटना म्हणजे बातमी.' (व्यावहारिक मराठी, पृ.६०) त्यामुळे बातमी मूल्ये सार्थ ठरविणारा बातमीदार किंवा पत्रकार फार महत्त्वाचा असतो. बातमी लेखक, बातमीदार किंवा पत्रकाराच्या गुणकौशल्यावरच पत्रकारितेची यशस्विता अवलंबून असते.

## ❑ बातमीदाराचे गुण

'वृत्तपत्र' व्यवसायातील अत्यंत महत्त्वाची संकल्पना म्हणजे पत्रकारिता किंवा बातमीदारी. पत्रकारिता म्हणजे केवळ बातमी लेखन नव्हे. बातमीचे लेखन, बातमीची निवड, बातमीची वृत्तपत्रातील स्थाननिश्चिती, संपादन, छपाई, प्रकाशन आणि प्रसारण वा वितरण या सर्व प्रक्रिया पत्रकारितेमध्ये येतात. पत्रकारितेमधला बातमीदार हा एक घटक असतो. बातमी लेखकाकडे आवश्यक असलेल्या गुणांमुळेच बातमीला बातमी मूल्य प्राप्त होत असते.

बातमीदाराकडे जिज्ञासा (औत्सुक्य वृत्ती) असली पाहिजे. त्यामुळे सभोवतालातील घडामोडी तो जाणून घेतो. त्यासाठी बातमीदार चौकस वृत्तीचा असला पाहिजे. तो नेहमीच जागरूक वा सतर्क असला पाहिजे. एखाद्या घटनेतले वार्तामूल्य शोधण्यासाठी तो तत्पर असला पाहिजे. त्यासाठी त्याला नेहमीच सक्रिय राहावे लागते. आळस हा त्याचा सर्वांत मोठा शत्रू असतो.

पत्रकारितेविषयी प्रचंड निष्ठा असणे हा बातमीदाराचा महत्त्वाचा गुण आहे. त्यामुळे स्वत:च्या कर्तव्याची जाणीव टिकून राहते. बातमीदाराकडे वस्तुनिष्ठता आणि नि:पक्षपातीपणा असला पाहिजे. त्याआधारे बातमी वास्तव स्वरूपात जशीच्या तशी वाचकांपर्यंत पोहचू शकते. तटस्थपणे त्याने घटनेमागचे कार्यकारण शोधले पाहिजे. त्याने नेहमीच सत्याची बाजू घेतली पाहिजे. जाती, धर्म, प्रदेश आणि विचारसरणीच्या पलीकडे जाऊन बातमी मांडली पाहिजे. बातमी लिहिताना त्याच्या डोक्यात समाज आणि राष्ट्रहिताचाच विचार असला पाहिजे.

बातमीदार हा नि:स्वार्थी, निर्लोभी असला पाहिजे. विशिष्ट लोभ वा स्वार्थ बाळगला गेला तर पत्रकारिता हे समाजसेवेचे व्रत आहे यास तडा बसतो. त्यामुळे त्याच्या बातमीतली सत्यता हरवून जाते.

त्याच्याकडे वैज्ञानिक दृष्टी असेल तर बातमी तर्कशुद्ध रूपात वाचकांपुढे येऊ शकते. तो चांगला वाचक असला पाहिजे. भाषेवर प्रभुत्व पाहिजे. त्याच्याकडे विश्लेषण क्षमता असली पाहिजे. त्याच्याकडे लेखन कौशल्य असेल तर बातमी मूर्त स्वरूपात येऊ शकते.

आजच्या काळात बातमीदार हा संगणक साक्षर असण्याची फार गरज आहे. तो धाडसी असला पाहिजे. सत्य उजेडात आणण्यासाठी धैर्य लागते. बातमी दडपण्यासाठी दबाव आणला जाऊ शकतो. त्याला बळी न पडता त्याने कर्तव्य पार पाडले पाहिजे. कोणा एकाची बाजू न घेता घटनेची चहूअंगाने पडताळणी केली पाहिजे. बातमीदाराची शोधक दृष्टी नव्या बातमीला जन्म देत असते. पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रवेश करू इच्छिणाऱ्या व्यक्तीकडे यातील अधिकाधिक गुण असतील तर लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून वृत्तपत्राचे स्थान अढळ राहील, असे झाले तर पत्रकारिता ही समाजाचा शिक्षक बनून वावरेल. कोणत्याही देशातील समाजाची कुवत, क्षमता आणि जगण्याचा स्तर वाढण्यासाठी वृत्तपत्राचे योगदान हे अनन्यसाधारण स्वरूपाचे असते.

## ❒ बातमी : प्रकार आणि मिळण्याचे ठिकाण

बातमी कशी लिहिली जाते, तिची रचना कशी असते हे पाहण्यापूर्वी बातमीचे प्रकार आणि बातम्या मिळण्याचे ठिकाण यांचा शोध घेतला पाहिजे. काही बातमीदार हे स्वत:ची वेगळी नोकरी सांभाळत कार्यरत असतात, ते अंशकालीन वा अर्धवेळ बातमीदार असतात. उदा. शिक्षण घेत असताना एखादा विद्यार्थी बातमीदार म्हणून कार्य करू शकतो. काही बातमीदार पूर्णवेळ बातमीदार म्हणून कार्यरत असतात. काहीजण मुक्त पत्रकार असतात. काहीजण फक्त राजकीय बातमीदार असतात. ग्रामीण जीवनातील बातम्या संकलित करणारा ग्रामीण बातमीदार असतो.

विविध क्षेत्रानुसार बातम्यांचे वर्गीकरण केले जाते. सामाजिक वृत्त, राजकीय बातमी, गुन्हेगारी क्षेत्रातील बातमी, शेती क्षेत्रातील बातमी, विज्ञान क्षेत्रातील बातमी, अर्थव्यवहारातील बातमी, क्रीडा क्षेत्रातील बातमी, वाङ्मयीन क्षेत्रातील बातमी, पर्यावरण क्षेत्रातील बातमी, चित्रपट-नाट्य क्षेत्रातील बातमी, संसदीय क्षेत्रातील बातमी, शोध किंवा अन्वेषण स्वरूपातील बातमी, महिला आणि बाल जगतातील बातमी, अशा विविध प्रकारच्या बातम्या लिहाव्या लागतात.

बातमी मिळविण्यासाठी कार्यालयातील टेबल खुर्ची आणि केवळ संगणकाचा उपयोग होऊ शकत नाही. त्यासाठी काही वृत्त संस्थांचीही मदत घ्यावी लागते. भारतात पीटीआय (प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया), यू एन आय (युनायटेड न्यूज ऑफ इंडिया), हिंदुस्थान समाचार, समाचार भारती ह्या काही प्रमुख वृत्तसंस्था कार्यरत आहेत. त्यांच्याकडून बातमी मिळविता येते. याशिवाय सरकारी कार्यालये, जाहिराती, अहवाल, चर्चासत्र, परिषदा, अधिवेशन, वाचकांचा पत्रव्यवहार, सभा, संमेलने, जयंती, पुण्यतिथी अशा


विविध ठिकाणी आणि कार्यक्रमातून बातमी मिळते. घटना घडलेल्या ठिकाणी भेट देऊन, घटनेत सहभागी असलेल्या व्यक्तीकडून बातम्या मिळविता येतात.

## ❑ बातमी कशी लिहिली जाते?

बातमीदाराला बातमी सापडते कारण तो निरीक्षण करीत असतो वा शोध घेत असतो. त्याला बातमी मिळाली म्हणजे जशीच्या तशी तो वृत्तपत्रात छापत नसतो. बातमीसाठी मिळालेली ती कच्ची सामग्री असते. त्याधारे तो बातमीचे लेखन करीत असतो. मिळालेल्या माहितीची मांडणी बातमीच्या रूपात त्याला करावी लागते. बातमी अशाच प्रकारे लिहावी याचा कोणताही कायदा वा नियम नाही. वाचकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी, बातमी वाचायला प्रवृत्त करण्यासाठी काही पायऱ्या, काही एक पद्धत रूढ झाली आहे ती मात्र आत्मसात केली पाहिजे.

बातमी वाचकांपर्यंत स्पष्ट स्वरूपात पोहचण्यासाठी सहा प्रश्नांची उत्तरे बातमीत दिली पाहिजे. त्यास सहा 'क' कार म्हटले जाते. यामध्ये 'काय', 'कुठे', 'केव्हा', 'कोणी', 'कसे', 'का' या प्रश्नांचा समावेश आहे. यामध्ये आणखी काही प्रश्नांची भर घालता येऊ शकते. उदा. कोणाला? किमान 'सहा' प्रश्नांची उत्तरे दिली तरी बातमीचे लेखन पूर्ण होते.

आजच्या धावपळीत प्रत्येक वाचक हा संपूर्ण बातमी सलगपणे वाचेलच असे नाही. त्यासाठी अत्यंत महत्त्वाचा भाग बातमीच्या आरंभी मांडावा लागतो. तो भाग वाचला तरी संपूर्ण बातमी काय आहे, याचा तर्क वाचकाला करता येतो, त्यानंतरचा भाग वेळ मिळेल तसा वाचला अथवा नाही वाचला तरी चालू शकतो. बातमीच्या अशा मांडणीला उलटा त्रिकोण मांडणी म्हटले जाते.



बातमीदाराने मिळविलेली माहिती अशा स्वरूपात मांडली की बातमीचे डोके मोठे होते आणि पाय टोकदार होतात. बातमीचा चेहरा म्हणजे वरचा भाग की जो वाचक टाळू शकत नाही. काही बातम्यांचे लेखन याउलटही केले जाते. काढून टाकता येणारा भाग आरंभी देऊन वाचकांची उत्सुकता वाढविली जाते. शेवटी महत्त्वाचा भाग देऊन प्रश्न निकालात काढला जातो. बहुधा रंजनप्रधान बातम्या अशा स्वरूपात मांडल्या जातात.

वाचक बातमी वाचतो म्हणजे आरंभी शीर्षक वाचतो. बातमीदाराने लक्षवेधक, बातमीचा सारांश एकवटलेले, पाच शब्दांपेक्षा कमी शब्दातले शीर्षक दिले पाहिजे. यास 'मथळा' असेही म्हणतात.

**नमुना – १**

**देशभरात मुसळधार पावसाचा अंदाज** .....(शीर्षक)

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली** .....(दिनांक रेषा)

देशात बहुतांश भागांत मुसळधार पावसाचा अंदाज हवामानशास्त्र विभागाने व्यक्त केला आहे. जम्मू-काश्मीर, तामिळनाडू, आसाम आणि गुजरातमध्ये शुक्रवारपर्यंत जोरदार पाऊस पडेल असे विभागाने म्हटले आहे. .....(तपशील)

**नमुना – २**

**सासऱ्यावर हल्ला, जावयाला कोठडी** .....(शीर्षक)

**इचलकरंजी (३.६.२०१८) वार्ताहर:** .....(दिनांक रेषा)

सासऱ्यावर खुनी हल्ला केल्याप्रकरणी गावभाग पोलिसांनी अटक केलेल्या संजय किसन मिरजे यास तीन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. .....(तपशील)

संजय मिरजे याचा पत्नीशी वाद झाला होता. त्यानंतर त्याचे सासरे दशरथ चौगुले हे मुलीला गावी नेण्यासाठी आले असता मिरजेने त्यांच्यावर हल्ला केला होता. .....(गौण भाग)

जखमी सासऱ्यास नागरिकांनी तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल केले. अधिक तपास पोलीस उपअधीक्षक श्रीधर रायमाने करीत आहेत. ...(काढून टाकता येईल असा भाग)

**नमुना - ३**

**बसवेश्वरांनी लोकशाहीचा पाया रचला**

**- प्रा. डॉ. राहूल स्वामी** .....(शीर्षक)

**सांगली (१०.७.१८) वार्ताहर:** .....(दिनांक रेषा)

'इंग्रज काळात लोकशाही अस्तित्त्वात आली असे मानून आपण लोकशाही रुजविण्याचे श्रेय इंग्रजांना देतो. पण त्यापूर्वी १२ व्या शतकात बसवेश्वरांनी अनुभव मंटपातून लोकशाहीचा पाया घातला. प्रत्येकाला विचार मांडण्याचे स्वातंत्र्य दिले.' असे प्रतिपादन प्रा.डॉ.राहूल स्वामी यांनी केले. ते सांगली येथे आयोजित लिंगायत धर्मपरिषदेत बोलत होते. .....(तपशील)

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संशोधक रा.सो.वीर होते. स्वागत व प्रास्ताविक प्रकाश पाटील यांनी केले. .....(गौण भाग)

यावेळी संजय हिरेमठ यांनी गीत सादर केले. कार्यक्रमास सरोजिनी मगदूम, अशोक आंबोळे यासह लिंगायत धर्मबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार कृष्णात पाटील यांनी मानले. ...(काढून टाकता येईल असा भाग)

त्यानंतर कुठे आणि कधी या प्रश्नांची उत्तर द्यावे लागतात, ज्याला दिनांक रेषा (डेटलाईन) असे म्हणतात. दिनांक रेषेमध्ये गाव वा ठिकाण, दिनांक, बातमीदार, वार्ताहर किंवा प्रतिनिधी, वृत्तसंस्था याचा उल्लेख करावा लागतो. पुढे तीन नमुन्यात दिलेल्या बातम्यांमधून याचे अधिक स्पष्टीकरण होईल.

बातमीचे शीर्षक, दिनांक रेषा यानंतर अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे बातमीचा तपशील. त्यास आमुख, इन्ट्रो (Intro), मुखडा, मुख्य मुद्दा, प्रारंभिक परिच्छेद किंवा बातमीचे प्रास्ताविक म्हटले जाते. बातमीचे प्रवेशद्वार म्हणजे इन्ट्रो. यामध्ये मुख्य शीर्षकाचे स्पष्टीकरण बातमी लेखकास करावे लागते. किंबहुना या स्पष्टीकरणातील एखादे महत्त्वाचे वाक्य मुख्य शीर्षक म्हणून निवडले जाते.

यानंतर बातमीचा इतर तपशील दिला जातो. घटना-प्रसंग, निमित्त, संदर्भ, कोणाचा सहभाग, काय काय घडले अशा 'इन्ट्रो'ला पूरक असलेला वृत्तांत दिला जातो आणि बातमी पूर्ण केली जाते.

## ❑ बातमी लेखकाने घ्यावयाची काळजी

कोणतीही बातमी वाचकांना कळली पाहिजे. बातमी वाचून वाचक गोंधळात पडता कामा नये.

बातमीतून एकच अर्थ निघाला पाहिजे. म्हणजे ती स्पष्ट, सरळ, नि:संदिग्ध असली पाहिजे. सोपेपणा बातमीत यावा याची काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी जी भाषा वापरावी लागते ती सोपी पाहिजे. संयुक्त वाक्ये टाळून लहान-लहान वाक्यांची योजना केली पाहिजे. पुस्तकी शब्दांचा कमीत कमी वापर करून व्यवहारात प्रचलित असलेले शब्द वापरले पाहिजेत. कमीत कमी शब्दांमधून अधिकाधिक आशय समजला पाहिजे. संक्षिप्तता हे बातमी लेखनाचे महत्त्वाचे तत्त्व आहे.

सरळता, सोपेपणा, संक्षिप्तता यासह बातमीचे निवेदन वा कथन हे रोचक असले पाहिजे. जवळ बसून कुणी तरी बातमी सांगत आहे असे वाचकांना वाटले पाहिजे. आवडीने बातमी वाचली जावी असे निवेदन असले पाहिजे. संपूर्ण बातमी वाचावी अशी गोडी निर्माण झाली पाहिजे.

बातमी लेखकाने काही बाबी टाळल्या पाहिजेत. स्वत:चे मत न मांडता घटनेमागच्या किंवा वास्तवामागच्या कारणांचा शोध मांडला पाहिजे. काल्पनिकता पूर्णपणे टाळली पाहिजे. वास्तव बाबच पुढे आणली पाहिजे. दडवून ठेवण्याचे प्रकार टाळले पाहिजेत. त्यासाठी त्याने सत्य प्रतिपादन केले पाहिजे. आपल्या बातमीमुळे कोणाची बदनामी होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. बातमीत अश्लीलता येऊ नये याचाही विचार केला पाहिजे. चिथावणीखोर, भडक, हिंसक अशा स्वरूपाची वाक्ये टाळली पाहिजेत.

वाचकांची जिज्ञासापूर्ती ही बातमी लेखकाच्या हातात असते. बातमीदार म्हणून प्रत्यक्ष काम करण्यापूर्वी त्याने वृत्तपत्रातील विविध भागांचे वाचन केले पाहिजे. बातमीपेक्षा अग्रलेख वेगळा असतो, त्यापेक्षा वृत्तलेख वेगळा असतो, त्यापेक्षा वाचकांचा पत्रव्यवहार वेगळा असतो, त्यापेक्षा जाहीर निवेदन, सूचना आणि चित्रपट परीक्षण वेगळे असते हे समजून घेतले पाहिजे. एखादी घटना पुन्हापुन्हा वेगवेगळ्या ठिकाणी घडत असते. भूतकाळात एखाद्या घटनेचे वार्तांकन, बातमीची मांडणी कशी केली होती हे समजावे यासाठी त्याचे कात्रण स्वतंत्र फाईलमध्ये संग्रहित केले पाहिजे. प्रकाशित बातम्यांचे कात्रण एकत्र करून ते वाचले तर त्या आधारे पुढील बातमी लिहिता येते.

ऐकीव बातमीऐवजी प्रत्यक्ष घटनास्थळांना भेट दिली पाहिजे. इतर वृत्तपत्रांच्या बातमीदार मित्रास विचारून लिहिलेल्या बातमीत जिवंतपणा नसतो. त्यात आत्मविश्वास नसतो, केवळ कर्तव्यपूर्ती असते. बातमीलेखन हा ध्यास असतो.लोकांच्या भावना उघड करून त्यावर उपाययोजना सुचविण्याची फार मोठी जबाबदारी बातमीदाराकडे असते. बातमीदाराची चुकीची भूमिका देशहिताला बाधा आणू शकते. हे सर्व लक्षात घेऊन बातमी लेखन केले पाहिजे. वृत्तपत्र क्षेत्रात बातमीदार, पत्रकार म्हणून नोकरी करू इच्छिणाऱ्या प्रत्येकास वृत्तपत्र व्यवसायाची तत्त्व, नैतिकता, पायाभूत आचारसंहिता पाळणे आवश्यक आहे.

## २ अग्रलेख

वृत्तपत्रात बातमीबरोबर वृत्तपत्रीय लेखही लिहिले जातात. वृत्तपत्रीय लेखास इंग्रजीत Feature writing असे म्हणतात. A non-news article in a newspaper म्हणजे वृत्तपत्रीय लेख. ज्याला बातमी म्हणता येत नाही असा लेख असे या लेखाचे स्वरूप असते. वृत्तलेख, व्यक्तिविशेष लेख, मुलाखतीतून लेख, ऐतिहासिक लेख, स्फूटलेख, स्तंभलेख या सर्वांमध्ये प्रथम क्रमांकाचा मान अग्रलेखाला दिला जातो. अग्रलेखाला संपादकीय लेख असेही म्हटले जाते. संपूर्ण वृत्तपत्राची जबाबदारी संपादकावर असते. वृत्तपत्राच्या मध्यवर्ती पृष्ठावर अग्रलेखाला जागा दिली जाते. बातम्यांसाठी ज्याप्रमाणे स्वतंत्र वृत्तपृष्ठ असते त्याप्रमाणे अग्रलेखासाठी स्वतंत्र संपादकीय पान असते. बातमीनंतर अग्रलेखाला महत्त्वाचे स्थान दिले जाते. या पानावर प्रामुख्याने अग्रलेख, साइड आर्टिकल (लेख), एखाद्या समस्येवरील लेख, वाचकांची पत्रे छापली जातात. अग्रलेख हा त्या त्या वृत्तपत्राचा चेहरा असतो. त्यामुळे अग्रलेखाचे स्वरूप समजून घ्यावे लागते.

### ❑ अग्रलेख : संकल्पना, स्वरूप आणि महत्त्व

'अग्रलेख' या शब्दात अग्र आणि लेख हे दोन शब्द आहेत. त्यातील अग्र म्हणजे मुख्य, सर्वांत पुढचा, अगोदरचा आणि महत्त्वाच्या स्थानी असलेला. लेख म्हणजे विशिष्ट विचार प्रतिपादन करणारी भाषिक रचना, 'वृत्तपत्रातील अत्यंत महत्त्वाचा लेख म्हणजे अग्रलेख', या विधानात अग्रलेख म्हणजे काय हे समजून येत नाही, मात्र त्याचे स्थान कळते.

स्थानिकपासून ते आंतरराष्ट्रीय पातळीवर घडणाऱ्या विविध घडामोडी आणि घटनांचे विश्लेषण करणे, त्यामागची कारणमीमांसा करणे, प्रभावित होणारे क्षेत्र आणि घटकांवर प्रकाश टाकणे, त्यातून घडणाऱ्या बऱ्या-वाईट बाबींकडे वाचकांचे लक्ष वळवणे, अशा विविध हेतूने अग्रलेख लिहिला जातो.

अग्रलेख म्हणजे काय हे समजून घेण्यासाठी, अग्रलेख कशाला म्हणता येत नाही, याचा विचार करावा लागतो. एखादी बातमी किंवा वृत्त वाचकांपुढे विस्तृत स्वरूपात मांडणे म्हणजे अग्रलेख नव्हे. एखाद्या समस्येवर दिलेली लेख रूपातली प्रतिक्रिया म्हणजे अग्रलेख नव्हे. अग्रलेखासाठी वृत्तपत्रातील विशिष्ट पृष्ठ आणि विशिष्ट जागा जी अढळ स्वरूपात संपादकाने निश्चित केलेली असते, त्यावरूनही तो लेख हा अग्रलेख आहे की नाही हे समजून घेता येते. उदा. आतील दुसरे, चौथे, सहावे किंवा आठवे पृष्ठ आणि त्यातही अगदी डावीकडची बाजू. अशा प्रकारे त्या त्या वृत्तपत्रात अग्रलेखाची जागा ठरलेली असते. विशिष्ट पृष्ठावर वा विशिष्ट जागीच अग्रलेख छापावा याविषयी नियम अथवा दंडक मात्र नसतो. हे झाले अग्रलेखाच्या पृष्ठ आणि स्थानाविषयी.

अग्रलेखात संपादक किंवा अग्रलेख लेखक हा सभोवतालच्या घडामोडीचे विश्लेषण करीत असतो. त्यामागच्या कार्यकारणाचा शोध घेत असतो. घटनेत दडलेल्या सत्याचा शोध घेऊन त्यावर भाष्य करीत असतो. वाचकांना एखादी घटना वा विषय आवडेल की नाही याचा विचार लेखक करीत नाही. ती घटना प्रभाव टाकणारी, जीवनमान बदलवून टाकणारी असेल तर तिची निवड करून अग्रलेख लिहिला जातो. यावरून अग्रलेखाची व्याख्या करता येते. 'सभोवतालच्या घडामोडी, राज्यकर्त्यांचे बदलते धोरण, त्यासाठी राबविल्या जाणाऱ्या योजना आणि लोकांचे विचार-वर्तन याचे सम्यक विश्लेषण करणारा, वाचकांच्या विचार शक्तीला चालना देणारा लेखनप्रकार म्हणजे अग्रलेख होय.'

अग्रलेख हा विचारप्रधान लेखनप्रकार आहे. विशिष्ट विचार हा अग्रलेखाच्या केंद्रस्थानी असतो. त्याची मांडणी तर्कशुद्ध पद्धतीने केलेली असते. साधार विवेचन केलेले असते. भावनिकता टाळून अग्रलेखातील विषय मांडलेला असतो. त्यामुळे गंभीर लेखनप्रकारात अग्रलेखाला स्थान मिळते. वैचारिक निबंधाशी अत्यंत जवळचे नाते सांगणारा लेख म्हणजे अग्रलेख होय.

प्रत्येक वृत्तपत्रातील अग्रलेख हा त्या-त्या वृत्तपत्राची भूमिका दर्शविणारा लेख असतो. अग्रलेख वाचल्यानंतर त्या-त्या वृत्तपत्राची किंवा संपादकाची भविष्यकालीन वाटचाल लक्षात येते. अग्रलेख वाचणे म्हणजे सभोवतालच्या घडामोडीकडे पाहण्याचा दृष्टिकोण विकसित करणे, वैचारिक समृद्ध होण्याचा अनुभव अग्रलेखामुळे येतो.

संपादकीय लेखन ही बातमी लेखनाइतकी सहजसाध्य कृती नसते. एखाद्या घटनेकडे पाहण्याचा प्रत्येक संपादकाचा, लेखकाचा स्वत:चा एक दृष्टिकोण असला तरी त्यातला वैचारिक समतोल ढळता कामा नये. त्यामुळे अग्रलेख हा विचारप्रधान असतो. याविषयी राजन गवस आणि इतर म्हणतात, ''वृत्त आणि विचार असे दोन भाग वृत्तपत्रांमध्ये असतात. त्यापैकी बातमीदार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक (हे) वृत्तविभाग सांभाळत असतात, तर विचारविभागाची जबाबदारी संपादक, सहसंपादक किंवा अग्रलेख लेखक स्तंभलेखक यांच्याकडे असते.'' (भाषिक सर्जन आणि उपयोजन, पृ. १५०) यावरून अग्रलेखाविषयी दोन बाबी स्पष्ट होतात. अग्रलेखात विचार असतो आणि तो संपादक किंवा नेमून दिलेली विशिष्ट व्यक्ती लिहीत असते.

अग्रलेख हा कोण लिहितो, हे महत्त्वाचे नसते. लिहिणारी व्यक्ती मात्र जबाबदारीची जाणीव असलेली, पत्रकारितेची पुरेपूर जाण असलेली, बहुश्रुत असलेली आणि काळाची पुढील पावले ओळखणारी असावी लागते. अग्रलेखाच्या खाली या शीर्षकाजवळ लेखकाचे नाव वा ओळख नसते. इतर कोणत्याही लेखाचा कर्ता वाचकांना कळतो. मात्र अग्रलेख/संपादकीय लेख कोणी लिहिला हे समजत नाही. नाव समजले नाही तरी अग्रलेखातील विचार समजून घेता येतात.

## ❑ अग्रलेख कसा लिहावा?

अग्रलेखासाठी विषयाचे बंधन नसते. मात्र विषयाची मांडणी कशी करावी याचे काही संकेत असतात. शिवाय अग्रलेखाची भाषा कशी असावी याचाही विचार केला जातो. सर्वसामान्य वाचक हा अग्रलेख वाचतोच असे नाही. गंभीर प्रकृतीचे, सारासार विचार करणारे, प्रभाव क्षेत्राची काही प्रमाणात जाण असलेले वाचक अग्रलेख वाचतात. त्यामुळे विषयाचे गांभीर्य ढळू न देता अग्रलेखाचे लेखन होत असते.

वर्तमानकालीन घटनेच्या आधारे बातमी लिहिता येते आणि त्याच घटनेच्या आधारे अग्रलेखही लिहिला जाऊ शकतो, असे असले तरी प्रत्येक बातमी ही अग्रलेखाची सामग्री होऊ शकत नाही. त्यासाठी अशी घटना निवडावी की ज्यातून अग्रलेख लिहिण्यासाठी आधार मिळावा. शिवाय ती घटना मानवाचे जीवन प्रभावित करणारी असावी लागते. ती स्थानिक, राज्य-राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय स्तरावरची असू शकते. त्यामुळे अग्रलेख लिहिण्यापूर्वी अचूक आणि महत्त्वाची घटना निवडणे आवश्यक असते.

निवडलेल्या घटनेत एकापेक्षा अधिक विषय दडलेले असतात. किंबहुना घटनेला विविध पैलू असतात. कोणत्या पैलूच्या आधारे अग्रलेख लिहावयाचा आहे हे निश्चित करावे लागते. उदा. नोटाबंदी, अचानक घडलेल्या अथवा लादलेल्या निर्णयाचे स्वागत करावे की निर्णय धुडकावून लावावा, त्यातील प्रभावशील घटक कोणकोणते असू शकतात याचा शोध घेतला पाहिजे. या घटनेतून विशिष्ट विचार पुढे येतो. भ्रष्टाचाराचे स्वरूप समजून येते, लोकशाही राज्यकारभाराची स्थितीगती समजून येते. नोटाबंदीला सामोरे जाण्यापूर्वीची तरतूद, सोय, सुविधा, पर्याय कोणकोणते आहेत याचाही विचार करावा लागतो. या घटनेवरील विचार प्रतिपादन पन्नास वर्षांनंतर वाचले तरी त्यातील दाहकता, तो काळ, त्यावरील विचार मंथन अमूल्य ठरले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बहिष्कृत भारत' मधून लिहिलेले अग्रलेख आजही चळवळीला दिशा दिग्दर्शन करण्यासाठी उपयुक्त ठरतात. अग्रलेख कसा असतो हे समजून घेण्यासाठी 'दै. पुण्यनगरी' मधील एक संपादकीय लेख उदाहरण म्हणून पुढे दिला आहे.

**संपादकीय**

### सज्जनांचा पुरस्कार, दांभिकांचा धिक्कार, दीनदुबळ्यांचा कैवार, भ्रष्टांवर प्रहार मराठी बोला अभिमानाने!

*मराठी भाषा ही देशात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये तिसऱ्या स्थानावर पोहोचली आहे. तेलगूला मागे टाकत हे स्थान मिळवले आहे. पहिल्या स्थानावर हिंदी असून दुसऱ्या स्थानावर बंगाली भाषा आहे. परंतु मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या वाढल्यामुळे प्रत्येक मराठी माणसाला अभिमान वाटायला हवा. इतकेच नाही तर आता अभिमानानेच मराठी बोलायला हवी.*

२०११ च्या जणगणनेच्या माध्यमातून देशभरातील भाषांचा अभ्यास करण्यात आला. त्याचा अहवाल सरकारकडून नुकताच जाहीर करण्यात आला, त्यात याचा उल्लेख आहे. दुसरीकडे आता हिंदी भाषेनेही आपला प्रवेश केला आहे. मुंबईसारख्या विविध भाषा बोलल्या जाणाऱ्या शहरात मराठी अनेकदा मागे पडल्याचे दिसते. महाराष्ट्राची राजधानी असलेल्या या मुंबईत मराठीच हतबल झाल्याचे अनेकदा दिसते. काही भागात तर चक्क गुजराती भाषेमध्ये फलक दिसतात. दुकाने असो अथवा रेल्वे स्थानक असो, त्याठिकाणी मराठी भाषेचाच बोलबाला असायला हवा. आज मराठी भाषेतूनच सरकारी कार्यालयात कामकाज व्हायला हवे म्हणून अध्यादेश काढावे लागतात, यावरून मराठी भाषेला किती प्राधान्य दिले जाते हे लक्षात येते. मराठी भाषा राजभाषा व्हायला हवी. तिला अभिजात भाषेचा दर्जा अजूनही मिळत नाही. गेल्या पंधरा वर्षात तामिळ, संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्लाळम आणि उडिया या भारतातील पाच राज्यभाषांना केंद्र सरकारने अभिजात भाषा म्हणून घोषित केले आहे. हा दर्जा मराठी भाषेलाच मिळावा म्हणून गेली चार-पाच वर्षे प्रयत्न कले जात आहेत. मात्र त्याला अजूनही यश मिळत नाही. आज मराठी बोलणाऱ्यांची संख्या किती आहे, हे सरकारी अहवालातूनच स्पष्ट झाले आहे. असे असतानाही केवळ राजकीय कारणामुळे जर मराठीचा अभिजात दर्जा थांबवला असेल तर ती शोकांतिकाच म्हणावी लागेल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा का मिळावा? तर ती भाषा प्रगल्भ आहे. मराठी भाषेला खरोखरच दीड-दोन हजार वर्षांचा समृद्ध असा मोठा इतिहास आहे. मराठीच्या आद्यपर्वातच (इसवी सन पूर्व २०० ते इसवी सन २००) हाल सातवाहनाच्या 'गाथा सप्तशती'सारखा तत्कालीन महाराष्ट्रीय या प्राकृत भाषेतला महत्त्वपूर्ण ग्रंथ निर्माण झाला. राजारामशास्त्री भागवताच्या म्हणण्यानुसार, तर आजच्या मराठी भाषेचे मूळ ज्या तत्कालीन महाराष्ट्रीय भाषेत आहे, ती महाराष्ट्री संस्कृतपेक्षाही प्राचीन आहे. कालपरत्वे त्यात अनेक बदल होत गेले आहेत. ते साहजिकच आहे. भाषेवर बाहेरील भाषांचा प्रभाव पडणे साहजिकच असते. मुंबईतील मराठी भाषा असेल किंवा नागपुरातील मराठी भाषा असेल त्यात अनेक फरक दिसतात. परंतु प्रमाण मराठी भाषा बदलत नाही. मराठीला अभिजात दर्जा मिळाल्यास केंद्र सरकारकडून तब्बल ५०० कोटी रुपयांचे अनुदान मिळते. हे मराठीच्या संवर्धनासाठी वापरले जाऊ शकते. त्याची आज नितांत गरज आहे. महाराष्ट्रात ज्या प्रकारे मराठी भाषेवर हिंदी आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव वाढला आहे, हे पाहता मराठीला वाचवण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे. मराठी भाषा अनिवार्य करण्याची गरज आहे. महाराष्ट्रात मराठीच व्यवहाराची भाषा असायला हवी. त्यासाठी सर्वांनी आग्रही असायला हवे. मराठी भाषा ही आपली भाषा आहे आणि ती बोलायला लाज वाटू नये. मराठी भाषेचा इतिहास आणि गोडवा पाहता कुणालाही भुरळ पडू शकते. मराठी भाषा ज्ञानभाषा झाली तर त्याचा उपयोग अधिक चांगला होऊ शकतो. मराठीचे संवर्धन करण्यासाठी मराठी साहित्य संमेलन हे महत्त्वाचे ठरू शकते. मात्र तो उत्सव व्हायला हवा. सर्वसमावेशक असा हा उत्सव असायला हवा. (पुण्यनगरी, दि. २९ जून २०१८)

अग्रलेख लिहिताना संदर्भांचा पुरवठा करावा लागतो. उदा. यापूर्वी नोटाबंदी झाली होती का? तिचे स्वरूप कसे होते? त्याचे परिणाम काय झाले? किंवा मंदिर प्रवेश चळवळी यापूर्वी झाल्या होत्या का? वर्तमान काळात काही मंदिरात स्त्रियांना प्रवेश निषिद्ध असतो. त्यामागची मानसिकता, शास्त्र, विज्ञान, प्रथा, रूढी यांची चिकित्सा करावी लागते. त्यासाठी निर्भिडता आवश्यक असते. अनेक विचारवंतांपैकी महत्त्वाच्या अभ्यासकांच्या मताचा आधारही घेता येतो. तटस्थपणे विषयाची मांडणी करून शेवटी विशिष्ट एका विधानवजा निष्कर्षापर्यंत अग्रलेख नेला पाहिजे.

वाचकांना आकलन होईल अशी भाषा असली पाहिजे. सहकारी आणि वरिष्ठांबरोबर चर्चा करून पुनर्लेखन करता येते. समर्पक शीर्षक देऊन अग्रलेख वाचकांसाठी सादर केला जातो. 'बहिष्कृत भारत' मधील काही अग्रलेखांची शीर्षके उदाहरण म्हणून पाहता येतील. 'महाड येथील धर्मसगर व इंग्रज सरकारची जबाबदारी', 'अस्पृश्यता निवारणाचा पोरखेळ', 'नेहरू कमिटीची योजना व हिंदुस्थानचे भवितव्य', 'खोती ऊर्फ शेतकरी वर्गाची गुलामगिरी' या सर्व शीर्षकातून त्या काळातील घटना, निर्णय, धोरण, योजना आणि त्याचे होणारे परिणाम लक्षात येतात.

एकूणच, अग्रलेख/संपादकीय लेख हे वाचकांची मते बनविण्यासाठी, त्यांच्यात चिकित्सक दृष्टी यावी यासाठी, लोक विचारप्रवण व्हावेत यासाठी, सामाजिक जाण विकसित होण्यासाठी, लोकजागरण आणि लोकशिक्षणासाठी, सुधारणा आणि परिवर्तन यासाठी उपयुक्त ठरतात. समाजपोषक अग्रलेख लिहिणे ही अग्रलेख लिहिणाऱ्या लेखकाची फार मोठी जबाबदारी असते. एम. पी. एस. सी., यू. पी. एस. सी. सारख्या परीक्षांना सामोरे जाणाऱ्यांसाठी अग्रलेख हा माहितीचा एक खजिना असतो.

## ३ वाचकांचा पत्रव्यवहार

वृत्तपत्रीय लेखनामध्ये वाचकांच्या पत्रांना विशेष स्थान दिले जाते. संपादकीय पृष्ठावर वाचकांची पत्रे छापली जातात; यावरून अशा पत्रांना किती महत्त्व दिले जाते हे लक्षात येते. बातमीदाराला बातमी लिहिताना स्वत:चे विचार किंवा मत बाजूला ठेवावे लागते. याउलट वाचकांच्या पत्रव्यवहारात मात्र मुक्तपणे आपली मते मांडण्यास मुभा असते. अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा पुरेपूर उपयोग वाचकांना करता येण्याचे एक माध्यम म्हणून वाचकांच्या पत्राकडे पाहता येते.

वाचकांची पत्रे हा वृत्तपत्राचा फार पूर्वीपासूनचा भाग आहे. वृत्तपत्र क्षेत्रात त्यांना महत्त्वाचे स्थान आहे. वाचक वर्गातही ती औत्सुक्याने वाचली जातात. समाजजीवनात आणि प्रशासनाच्या पातळीवरही त्यांची दखल घेतली जाते. एखाद्या व्यक्तीला पत्र पाठवून विचार-भावना व्यक्त करणे आणि वृत्तपत्राच्या माध्यमातून सर्वांसाठी पत्रलेखन करणे यात फार मोठा फरक आहे. वाचकांचा पत्रव्यवहार व्यापक स्वरूपात कार्य करीत असतो. मुळातच वृत्तपत्रीय लेखन हे Literature in a hurry, त्या त्या

दिवसापुरते मर्यादित, दररोज नव्याने आल्यामुळे मागच भूतकाळात दडपले जाणारे असे असते. वाचकांचा पत्रव्यवहारही असाच असतो. दररोज नवनव्या पत्रांची भर पडत जाते. असे असले तरी हा पत्रव्यवहार पुढे संग्रहरूपात आला तर तो एक ऐतिहासिक दस्तऐवज ठरू शकतो. त्यामुळे वाचकांचा पत्रव्यवहार, त्याची संकल्पना, हेतू, स्वरूप आणि लेखनपद्धती समजून घेणे आवश्यक ठरते.

वृत्तपत्राचा खप आणि वाचकांची संख्या यात मोठे अंतर असते. सार्वजनिक वाचनालयात जाऊन, शेजारी वा मित्राकडे जाऊन वृत्तपत्र वाचणारे वाचक मोजता येत नाहीत. त्यातील काही वाचक हे अत्यंत चोखंदळ असतात. निवडक बातम्या वाचून ते संपादकीय वाचतात. अशावेळी ते वाचकांची पत्रेही वाचतात. प्रत्येक वाचक हा त्याच्या त्याच्या आवडीप्रमाणे वृत्तपत्रातील विविध लेखन वाचत असतो. त्यातील बहुतांशी वाचक 'आपण काय वाचले?' हे लगेच विसरून जातात. वेळ जाण्यासाठीच त्यांचे वाचन चाललेले असते. काही वाचक निवडक बातम्या वाचतात. काहीजण पुरवणीला, त्यातील रंजक बाबींना सर्वप्रथम जवळ करतात. काहींना अग्रलेख वाचावासा वाटतो. काही वाचकांना अग्रलेखाचे, संपादकीय लेखाचे पृष्ठ असते हे माहीतही नसते. काहीजण फक्त शब्दकोड्यासाठी वृत्तपत्र विकत घेतात. जाहिरात वाचणाराही वाचक वर्ग असतो.

## ❑ वाचकांची पत्रे म्हणजे काय?

वृत्तपत्राच्या संपूर्ण वाचकांपैकी काहींनाच प्रतिक्रिया द्यावीसी वाटते. वृत्तपत्र वाचून वा सभोवतालच्या घडामोडी पाहून विचारप्रवण होणारे वाचक मोठ्या संख्येने असले तरी त्याविषयी प्रतिक्रिया व्यक्त करणारे वाचक बोटावर मोजण्याइतके असतात. 'आपली प्रतिक्रिया मते, विचार आणि खाजगी वा सार्वजनिक समस्या पत्राद्वारे संपादकांपर्यंत पाठविण्याच्या कृतीला 'वाचकांचा पत्रव्यवहार' असे म्हणता येते.

वाचकांची पत्रे म्हणजे विचार-भावना व्यक्त करण्याचा एक लेखनप्रकार आहे. वृत्तपत्रात 'सदर' स्वरूपात अशी पत्रे छापली जातात. याविषयी प्रभाकर पाध्ये म्हणतात, ''वाचकांचा पत्रव्यवहार हे सदर म्हणजे वाचकांची व्यक्तिगत किंवा एखाद्या गटाची गाऱ्हाणी मांडण्याची किंवा दु:खे वेशीवर टांगण्याची जागा.....'' (पत्रकारितेची मूलतत्त्वे, पृ.२४) यावरून वाचक हा खाजगी किंवा सार्वजनिक अशा दोन्ही अंगांना पत्रात स्थान देत असतो असे मानता येते. त्यामुळे व्यक्तिगत किंवा सामूहिक जीवनाबाबत पत्र स्वरूपातील प्रांजळ अभिव्यक्ती म्हणजे वाचकांचा पत्रव्यवहार होय.

वाचक पत्र लिहून जाहीरपणे आपले मत व्यक्त करीत असतो. मनातली घुसमट असो वा विचार, सार्वत्रिक स्वरूपात मांडून हलका होत असतो. त्याला आशा वाटत असते की आपले म्हणणे कुणी तरी विचारात घेईल. शेतकरी आभाळाकडे पाहून आशाळभूतपणे आज ना उद्या पाऊस पडेल असा विचार

करीत असतो. वाचकाचीही अशीच अवस्था असते. कोणी दखल घेतली तर ठीक; अन्यथा वाट पाहणे सुरूच असते. वाचक केवळ प्रश्न आणि समस्याच मांडत नसतो; स्वत:चे अनुभव, चिंतन आणि आनंद यालाही पत्राद्वारे वाट मोकळी करून देत असतो. त्यासाठी वृत्तपत्राचे हे सदर हक्काची जागा वाटते. याविषयी डॉ. श्यामसुंदर मिरजकर म्हणतात, ''अनेक प्रश्न, समस्या, विचार, जीवनचिंतन मांडण्याचे वाचकांचे हक्काचे विचारपीठ म्हणून (वाचकांचा पत्रव्यवहार) या सदराकडे पाहता येते.'' (प्रबोधनाची निवडक पत्रे, पृ.१२) कुटुंबातील सदस्य, समाजातील व्यक्ती, प्रशासकीय कर्मचारी अथवा राज्यकर्त्यांपैकी कुणालाच नागरिकांच्या जीवनाविषयी देणे-घेणे नसते; कोणी ऐकतही नाही, अशावेळी वृत्तपत्रातून व्यक्त होण्याशिवाय पर्याय उरत नाही.

एकूणच आपले विचार, सभोवतालची विसंगती, असुविधा, अन्याय, गळचेपी यांसह अनुभवलेले कडू-गोड क्षण, अनुभवातून आलेले शहाणपण, विचार, धारणा इतरांबरोबर वाटून घेण्यासाठी पत्रस्वरूपात वृत्तपत्राकडे पाठविलेले लेखन म्हणजे वाचकांचा पत्रव्यवहार होय. कोणी प्रतिसाद देऊ अथवा ना देऊ व्यक्त होऊन मन मोकळे करणे या मानसिकतेतून वाचक पत्रे पाठवतात.

## ❑ वाचकांच्या पत्रांचे महत्त्व

वाचकांच्या पत्रव्यवहाराचा फायदा नेमका कुणाला होतो, खुद्द पत्रलेखकास की पत्रवाचकांस? याचा विचार झाला पाहिजे. अग्रलेख/संपादकीय लेख वाचणाऱ्यांपेक्षा वाचकांची पत्रे वाचणारा वर्ग मोठा आहे. वृत्तपत्र व्यवसायालाही याचा उपयोग होत असतो. पंचायती, जिल्हा परिषदा, नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या कर्मचारी व अधिकारी वर्गासही वाचकांची पत्रे उपयोगी पडतात. पोलीस यंत्रणा, राज्य व केंद्र सरकार वाचकांच्या पत्रव्यवहारावर बारकाईने नजर ठेवत असते. जनसंपर्क अधिकारी यांची नोंद घेत असतो. म्हणजेच वाचकांच्या पत्रांचे महत्त्व वाढत चालले आहे.

पत्रलेखकास आपली भावना वा विचार व्यक्त केल्यामुळे मन हलके झाल्यासारखे वाटते. आपले म्हणणे कोणी तरी वाचत असणार याचा दिलासा पत्रलेखकास मिळतो. त्याचा आत्मविश्वास वाढतो. व्यक्त होता येणे हे माणूस म्हणून जगण्यासाठी फार आवश्यक असते. 'प्रश्न सोडवा किंवा सोडवू नका, किमान ऐकून तरी घ्या' हे विधान वाचकांच्या पत्रव्यवहारास लागू पडते. कोणी वाचो अथवा ना वाचो किमान ते छापून प्रकाशित तरी करा, अशी पत्रलेखकाची मानसिकता असते. समजा पत्र छापून आलेच तर त्यासारखा मानसिक आधार दुसरा नसतो.

वाचकांच्या पत्रांचा उपयोग इतर वाचकांना, सर्वसामान्य नागरिकांनाही होतो. पत्रात मांडलेले निरीक्षण काही वाचकांसाठी जसेच्या तसे लागू पडते. उदा. पहाटे फिरायला बाहेर पडल्यानंतर भटक्या कुत्र्यांचा होणारा त्रास हा एकट्या-दुकट्याचा नसतो. अशा कुत्र्यांचा बंदोबस्त व्हावा ही फिरणाऱ्या

सर्वांची इच्छा असते. आपल्या मनातील भावना कुणी तरी व्यक्त करत आहे, ही समाधानाची बाब असते. रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांचा त्रास चार भिंतीच्या कार्यालयातील आणि चारचाकीतून फिरणाऱ्या अधिकाऱ्यांना कधीच होत नसतो. दुचाकीस्वारांची प्रातिनिधिक ओरड वाचकांच्या पत्रातून व्यक्त होत असते.

वाचकांचे पत्र झोपलेल्या किंवा झोपेचे सोंग घेतलेल्या अधिकाऱ्यास जागे करू शकते. जोपर्यंत कुणी तक्रार करीत नाही तोपर्यंत सर्व काही ठीक आहे अशी मानसिकता बनलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांचे कर्तव्य दाखवून देण्याचे कार्य वाचकांची पत्रे करतात. वरिष्ठांची अवकृपा होऊ नये या भीतीपोटी तरी तो बरेच दिवस लक्षात येत नाही. ती लक्षात आणून देण्याचे कार्य वाचकांची पत्रे करतात.

वाचकांची पत्रे सर्वसामान्य नागरिकांच्या वर्तनावरही नियंत्रण ठेवण्याचे काम करतात. पर्यटन क्षेत्राजवळ टाकलेल्या पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, प्लॅस्टिकच्या पिशव्या, खाद्याची पाकिटे ही पर्यटकांनीच टाकलेली असतात. आपण पर्यावरण धोक्यात आणत आहोत याची जाणीव नसलेल्या नागरिकांच्या वर्तनावर अंकुश ठेवण्यासाठी अशी पत्रे उपयुक्त पडतात. पुढे नमुना म्हणून छापलेले वाचकाचे पत्र हे २९ जून २०१८ च्या 'पुण्यनगरी' मध्ये आलेले आहे. या पत्रातील श्री. मयूर ढोलम या पत्रलेखकाचे विचार आपल्या कर्तव्याचे भान आणून देणयसाठी ते उपयुक्त ठरते. प्रश्न अगदी लहान वाटू शकतो पण त्याची तीव्रता भयंकर असते. असे पत्र भविष्यात होऊ शकणाऱ्या अनिष्ट घटनेला पायबंद घालू शकते. त्यामुळे वाचकांची पत्रे म्हणजे नागरिकाच्या विचार-वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचे एक साधन आहे.

### रस्त्यावर कचरा टाकू नका

कोकणात पर्यटन वाढते आहे. मालवणला तारकर्ली, देवबाग, चिबला, कोळंब, मालवण किल्ला या समुद्र किनाऱ्यावर स्कूबा तसेच इतर राईडची बोटींगची मजा घ्यायला येणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सोबतीला मालवणी जेवण आणि निसर्ग सौंदर्य आहेच; पण याच कोकणात सुट्टीला मज्जा करायला गाड्यांनी येणारे मात्र येता जातांना चालत्या गाडीतून बिनधास्त पाण्याच्या प्लास्टिक बाटल्या, पिशव्या, वेफर्सची पाकिटे तर काही गाड्यातून दारूच्या बाटल्याही फेकतात आणि पुढे निघून जातात. त्यामुळे कणकवली-आचरा-मालवण या रस्त्यावर दोन्ही बाजूला कचऱ्यांचा खच पडलेला दिसतो आणि त्यामुळे कळत नकळत या पर्यटकाकडून पर्यावरणाचे निसर्गाचे नुकसान होते आहे. कोकणचे सौंदर्य टिकवण्यासाठी ठिकठिकाणी 'कचरा टाकू नये'चे फलक लावावेत. तसेच कचरा टाकणाऱ्यांवर कारवाईही करावी.

**मयूर ढोलम**, कोळंब, मालवण

वाचकांची पत्रे शासन-प्रशासनालाही मार्गदर्शक ठरतात. आपल्या ध्येयधोरणात बदल घडविण्यासाठीही ती उपयोगी पडतात. नोटाबंदीनंतर उसळलेल्या जनसमुदायाची हाक लहानमोठ्या पत्रातून शासनाला ऐकू गेली असेल हे नाकारता येत नाही. नव्या नोटा तातडीने चलनात आणण्यासाठी दिवसरात्र प्रयत्न झाले असतील किंवा प्लॅस्टिकबंदीमुळे वाढू शकणारा भ्रष्टाचार शासनाला कळल्यामुळे त्यात केलेली शिथिलता हे वाचकांच्या पत्रव्यवहाराचे द्योतक नव्हे काय! वृत्तपत्राच्या संपादकांना मिळालेल्या वाचकांच्या कित्येक पत्रांना कचऱ्याची टोपली मिळत असली तरी त्यातील निवडक पत्रांमुळे ध्येय-धोरणे बदलली जाऊ शकतात, याकडे दुर्लक्ष करता येत नाही.

वाचकांचा पत्रव्यवहार हा वृत्तपत्र व्यवसायासाठीसुद्धा उपकारक ठरतो. वाचकवर्ग वाढतो. वृत्तपत्रात वारंवार होणाऱ्या चुका निदर्शनास आल्या तर त्यांमध्ये दुरुस्त्या करता येतात. त्या त्या विभागांना सूचना देऊन त्यात बदल करण्यासाठी ताकीद दिली जाते. कदाचित एखादे पत्र प्रकाशित झाले नाही परंतु ते संपादकास मिळाले तर त्याचीही दखल घेतली जाते. त्यानुसार कार्यवाही होऊ शकते. एखादी मालिका, चित्रपट, नाटक, पुस्तक यावरील प्रतिक्रिया म्हणजे त्या-त्या घटकांसाठी मार्गदर्शक सूचना ठरू शकते. त्याचे श्रेय वाचकांना मिळो अथवा ना मिळो अशा पत्रांचे महत्त्व कमी होत नाही. त्यामुळे वृत्तपत्राच्या संपादकांना वाचकांची पत्रे छापावी लागतात. जवळपास सर्वच वृत्तपत्रे संपादकीय पृष्ठावर त्यासाठी जागा देऊन त्याला सदराचे रूप देतात. त्या सदरात एका दिवशी किमान एक ते पाच पत्रे प्रकाशित केली जातात. वाचकांची पत्रे या सदरास दिलेली नावे उदाहरणादाखल लक्षात घेता येतात. उदा. 'पडसाद' (तरुण भारत), 'वाचक-संवाद' (लोकमत), 'मत-मतांतरे' (सकाळ), 'बहुतांची अंतरे' (महाराष्ट्र टाइम्स), 'सप्रेम नमस्कार' (महासत्ता), 'ई-संवाद' (पुण्यनगरी), 'वाचकांचा कॉलम' (केसरी), 'वाचकांचा पत्रव्यवहार' (पुढारी) कालांतराने या शीर्षकात संपादक बदल करू शकतो.

एकूणच 'वाचकांचा पत्रव्यवहार' हा समाजमन बनविण्यासाठी उपयोगी पडतो. समाजपरिवर्तनाच्या चळवळीचे ते साधन आहे. भविष्यकाळासाठी तो संदर्भ साठा असतो. विचारप्रवण आणि कृतिप्रवण होण्यासाठी चालना मिळते. जनतेच्या दरबारात न्यायासाठी केलेली तक्रार असते. अशा पत्रांना वाङ्मयप्रकार म्हणून स्वतंत्र स्थान मिळाले नसले तरी त्याचे महत्त्व कमी होत नाही. इतर वाचकांना लिहिते करण्यासाठीही त्याचा उपयोग होतो.

## ❑ वाचकांच्या पत्राचे लेखन

वाचकांनी पत्रलेखन कसे करावे याचे कोणतेही नियम नाहीत. कार्यालयीन पत्रे कसे असावीत याविषयी मार्गदर्शक सूचना आढळतात. कौटुंबिक पत्रव्यवहाराचेही काही संकेत आहेत. उदा. लहानांना आशीर्वाद, मोठ्यांना दंडवत, नमस्कार वगैरे. वृत्तपत्रातील वाचकांच्या पत्राचे लेखन कसे असावे

याबद्दल मात्र एकच एक मत आढळत नाही. असे असले तरी संपादकाच्या दृष्टिकोणातून, यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या वाचकांच्या पत्रांतून काही किमान अपेक्षा नोंदविता येतात. त्याधारे वाचकांच्या पत्राची लेखनपद्धती स्पष्ट करता येते. शिवाय जी पत्रे छापली जातात ती जशीच्या तशी न छापता त्यात संपादक बदलही करतात. तो बदल इतर वाचकांना दिसत नसला तरी पत्र लेखकाला तो सहज जाणवत असतो.

संक्षिप्तता हा चांगल्या पत्राचा एक गुण मानला जातो. वृत्तपत्रातील वाचकांच्या पत्रांसाठी जी जागा, आकार, जेवढा स्पेस निश्चित केला जातो; त्यावरून वाचकाने अगदी थोडक्यात आपले विचार मांडणे आवश्यक असते. साधारणत: ७५ ते १२५ शब्दमर्यादेत लिहिलेले पत्र छापले जाते. अधिक शब्दांत मांडलेल्या पत्रात संपादक काटछाट करू शकतो. त्यासाठी कमीत कमी शब्दांत आपला अनुभव पत्रात मांडणे आवश्यक असते. ज्या कोणास वृत्तपत्राकडे पत्र पाठवायचे आहे त्यांनी संक्षिप्त स्वरूपात पत्र लिहिले पाहिजे.

विषय निवडीला वाचकाने महत्त्व दिले पाहिजे. निरर्थक, फुटकळ विषयांसाठी वाचकांनी पत्रलेखनासाठी शक्ती खर्च करू नये. प्रत्येकाला वाटत असते. आपला विचार अथवा विषय हा फार महत्त्वाचा आहे. सारासार विचार करून पत्रासाठी विषय निवडावा लागतो. मांडलेला विषय हा प्रातिनिधिक स्वरूपाचा असेल तर उत्तमच. प्रस्तुत विषयाचा सार्वकालिक परिणाम जाणवणार आहे का? याची शहानिशा करावी लागते. महत्त्वपूर्ण विषयाला नेहमीच प्रसिद्धी मिळत असते. अत्यंत खाजगी विषय टाळले पाहिजेत. उदा. शेजारी भांडतात. अश्लील व इतरांची बदनामी होईल असे विषय टाळावेत.

स्पष्टता हा पत्रलेखनाचा विशेष आहे. आपण वाचक म्हणून पत्र का लिहीत आहोत याचे सुस्पष्ट उत्तर आपल्याकडे असले पाहिजे. पत्रलेखनाचा हेतू स्पष्ट पाहिजे. त्याबरोबरच पत्रलेखनातही स्पष्टता पाहिजे. काय म्हणायचे आहे, ते पुढच्यांना कळले पाहिजे. संदिग्धता असली की वाचकांचा व संपादकांचाही गोंधळ उडतो. त्यातून वेगळा अर्थ निघता कामा नये. त्यामुळे हेतूची स्पष्टता आणि विषय मांडणीची स्पष्टता पत्रलेखकाने राखली पाहिजे.

पत्रलेखनाची भाषा सोपी असली पाहिजे. ती आकलनक्षम असली पाहिजे. लहान-लहान वाक्ये, सोपे आणि व्यवहारातील शब्द यांचाही विचार झाला पाहिजे. भाषेवर किती प्रभुत्व आहे याचे प्रदर्शन पत्रलेखनात उपयोगी ठरत नाही. त्या भाषेतून मांडलेला विचार सहजतेने पोहचतो की नाही यासाठी प्रयत्न केले पाहिजे. त्यासाठी शास्त्रीय भाषा महत्त्वाची ठरत नाही. आलंकारिक भाषाही उपयोगाची नसते. व्यवहारभाषेचा उपयोग करावा लागतो.

मुद्देसूद मांडणी केल्यामुळे पत्रलेखन वाचनीय होते. वरच्या आणि खालच्या मुद्द्यांची संगती

लावली पाहिजे. मुद्द्यांसाठी काही निरीक्षणे, उदाहरणे यांचा आधार द्यावा लागतो. कमीत कमी परिच्छेदात म्हणणे स्पष्ट केले पाहिजे. दोन मुद्दे एकमेकांत घुसडले तर पत्राचा ताळमेळ बिघडतो.

एकूणच पत्रलेखन हे संपादकांना उद्देशून लिहिले असले तरी त्याचे वाचन हे इतर वाचक करीत असतात. वाचकांशी संवाद करणारा पत्रव्यवहार अपेक्षित असतो. पत्रातून अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अतिरेक होऊ नये याची काळजी घेतली पाहिजे. काल्पनिकता टाळूनच पत्र लिहिले पाहिजे. भावनिकतेचा आधार तारतम्यानेच घेतला पाहिजे. पत्रलेखन हे समाजकार्याचे फार मोठे साधन आहे याचे भान पत्रलेखकाने बाळगले पाहिजे.

## ४ परीक्षण : नाटक आणि चित्रपट

नाटक आणि चित्रपट ह्या दोन कला आहेत. दोन्ही कलांना दृक्-श्राव्य माध्यमांचे स्वरूप मिळाले आहे. दोन्ही कला सादर केल्या जातात. दोन्हींना प्रेक्षक मिळालेले असतात. नाट्यगृहात नाटक पाहिले जाते आणि चित्रपटगृहात चित्रपट पाहिला जातो. नाटक किंवा चित्रपट चांगला असेल तर प्रेक्षक गर्दी करतात. गर्दी होणे हा एक प्रकारचा प्रतिसाद असतो वा ती एक प्रतिक्रिया असते. एखाद्या नाटकाला अथवा चित्रपटाला प्रेक्षक न मिळणे हे त्या त्या कलेचे अपयश म्हणता येते. त्यामध्ये काही उणिवा राहिलेल्या असतात. वृत्तपत्रातील काही जागा नाटक अथवा चित्रपटावरील परीक्षणासाठी दिलेली असते. दर आठवड्याला वा अधून-मधून वृत्तपत्रात कोणी तरी या कलाप्रकारांवर परीक्षण लिहीत असतो. चित्रपट-नाटक पाहिला असला व नसला तरी असे परीक्षण वाचक वाचतात. किंबहुना परीक्षण वाचून नाटक वा चित्रपट पाहण्यासाठी काही वाचक उद्युक्त होऊ शकतात. ह्या दोन्ही कलाप्रकारांचे वृत्तपत्रीय परीक्षण कसे करायचे, याचा विचार करण्यापूर्वी कला म्हणजे काय? कलेचा हेतू काय? नाटक आणि चित्रपट कलेचे स्वरूप काय असते? या प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतात.

### ❑ कला : व्याख्या, संकल्पना, प्रकार व हेतू

मानव अथवा निसर्ग यांच्याकडून घडणाऱ्या प्रत्येक घडामोडींमागे कार्यकारण असते. गोष्टी विनाकारण घडत नाहीत वा घडविल्या जात नाहीत. त्यामागे विशिष्ट हेतू हा असतोच. कलेच्या बाबतीतही हेच वास्तव असते. मानवाकडून निर्माण झालेल्या किंवा निर्माण होत असलेल्या विविध कलांचा जन्म हाही निर्हेतुक नसतो. त्यामुळे कोणत्याही कलेच्या पोटात त्या कलेचे प्रयोजन दडलेले असते. कला ही एक प्रकारची निर्मिती असते, ती केवळ निर्मिती नसते तर नवनिर्मिती असते. जिला सर्जनशीलता हे मूल्य प्राप्त झालेले असते. कला ही मानवांकडून होणारी विशिष्ट अशी कृती असते. प्रत्येक कृती म्हणजे कला नव्हे. अशीच कृती की ज्यासाठी काही कौशल्ये लागतात किंवा क्षमता

लागते. ''मानवी सृजनशीलतेचा एक आविष्कार म्हणजे कला असे म्हणता येईल.'' (वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश, पृ. १४७) या व्याख्येच्या आधारे कलेचे स्वरूप लक्षात घेता येते.

विशिष्ट ध्येयपूर्तीसाठी मानवाने केलेली कलात्मक कृती म्हणजे कला, इंग्रजीत त्यासाठी आर्ट हा शब्द योजिला आहे. विशिष्ट कल्पना मूर्त वा अमूर्त स्वरूपात साकार होण्यासाठी मानवांकडून होणारी कृती म्हणजे कला होय. त्यासाठी कलात्मकता हवी असते. सभोवतालमधून काही तरी नवीन करण्यासाठी ती एक धडपड असते. त्यामुळे नावीन्य हा कलात्मकतेचा विशेष असतो. आहे त्यापेक्षा वा आहे त्यातून नवीन निर्माण करणे यासाठी केलेली कृती कलेला जन्म देत असते. मानवाच्या कलात्मक कृतीमुळे किंवा क्रियेमुळे कलाकृती निर्माण होत असते.

सौंदर्य हा कलाकृतीचा अंगभूत वा प्राणभूत घटक असतो त्यामुळे मानवाची एखादी कृती ही कला ठरते. कलेचे मुख्य दोन प्रकार पडतात, एक मुख्य कला आणि दुसरी गौण कला. मुख्य कलांमध्ये ललित कलांचा आणि गौण कलांमध्ये उपयोजित (उपयुक्त) कलांचा समावेश केला जातो. ललित कलांची निर्मिती ही सौंदर्यासाठी आणि सौंदर्याच्या आस्वादासाठी असते. उपयोजित किंवा उपयुक्त कलांचा व्यवहारासाठी उपयोग केला जातो. या आधारे कलेचे प्रयोजनही लक्षात येते.

भाकर व्यवस्थित भाजलेली असावी की ती दिसायला गोल, छान, सुंदर आणि न चिरलेली असावी? या प्रश्नाच्या उत्तरात कलाकृतीचे प्रयोजन सापडते. माणसाला माणूस म्हणून जगाचे असेल तर भाकर तयार करायच्या कृतीमध्ये दोन्ही बाबी हव्या असतात. घर हे राहण्यासाटी दणकट असावे तसे ते दिसायलाही चांगले (सुंदर) असले पाहिजे. मात्र काही कलांचा उपयोग फक्त सौंदर्यनिर्मिती आणि सौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठीच होत असतो. उदा. संगीत, चित्र, नृत्य, वाङ्मय.

एखादी कला सौंदर्यासाठी निर्माण झाली असली तरी तिचा अन्य कारणांसाठी उपयोग करून घेतला जाऊ शकतो. उदा. नृत्यकला, नृत्य करणारा आणि त्याचवेळी नृत्य पाहणारा यांना नृत्यातून एकाच वेळी वेगवेगळ्या बाबी साध्य करता येतात. नृत्यांगना नृत्यकला सादरीकरणातून शरीर व्यायाम आणि कला सौंदर्य (आत्मसुख) प्राप्त करू शकते. पाहणाऱ्यांना सौंदर्यानुभूती प्राप्त होऊ शकते. Art is beautifull and useful असे म्हटले जाते, तेव्हा त्यात दुहेरी हेतू दडलेला लक्षात येतो.

यापुढे जाऊन विविध कलांचे वर्गीकरण करता येते. संगीत ही कलात्मक कला आहे. चित्र, शिल्प, वास्तू, छायाचित्र यासारख्या कला अवकाशात्मक कला आहेत. साहित्याला शब्दकला म्हणता येते. नाटक, नृत्य, संगीत ह्या तीन कला प्रयोगनिष्ठ कला आहेत. केवळ दृश्य स्वरूप लाभलेल्या कलांमध्ये चित्र, शिल्प आणि वास्तू यांचा समावेश करता येतो. संगीत ही श्राव्यकला आहे. नाटक आणि चित्रपट ह्या दोन कला मात्र संमिश्र कला आहे. नाटक आणि चित्रपटाचे आरंभीचे रूप हे शाब्दकलेचे

असते. त्यानंतर तिला सादरीकरणाचे (Performing Art) रूप प्राप्त होते. शिवाय एकाच वेळी त्यांना दृश्य आणि श्राव्य रूप मिळते. शिवाय नाटक आणि चित्रपटात अनेक कला सादर होत असतात म्हणून ह्या दोन कलांना संमिश्र कलेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. अशा कलांचे परीक्षण करायचे किंवा मीमांसा करायची, ती कोणत्या निकषाधारे करायची, याचाही अभ्यास करावा लागतो.

## ❑ कलापरीक्षण किंवा कलामीमांसा

'मीमांसा' हा शब्द चिकित्सा किंवा विश्लेषण या अर्थाने वापरला जातो तर 'परीक्षण' हा शब्द तपासणी या अर्थाने वापरला जातो. परीक्षण या मीमांसेच्या काही कसोट्या असतात, त्यांचा अवलंब करून पारख केली आणि विशिष्ट निष्कर्ष मांडला की परीक्षण वा मीमांसा पूर्ण होते. कलेच्या परीक्षणासाठी सुद्धा त्या त्या कलेचे काही अंगभूत विशेष असतात त्याचा शोध घेतला जातो. कलापरीक्षण वा कलामीमांसा यात कलेचा शोध घेतला जातो म्हणजे कलेला प्राधान्य दिले जाते. कला हे मध्यवर्ती सूत्र असते. एखादी वस्तू सुंदर आहे असे म्हणताना सौंदर्याचे काही निकष असतात, ते शोधले जातात. कोणत्याही कलेत काही कलामूल्ये असतात, कलातत्त्वे असतात, त्याची पारख केली जाते. कलाकृतीचा आस्वाद घेणे आणि जाणवलेला आस्वाद व्यक्त करणे यातून कलापरीक्षण अथवा कलामीमांसा घडते.

चित्रपट किंवा नाटक ही कला आहे असे निश्चित केल्यानंतर तिचे परीक्षण करण्यासाठी या कलांमधील कलामूल्ये शोधली पाहिजेत. हे शोधण्यासाठी नाटक आणि चित्रपट या कलांचे अंगभूत विशेष कोणते आहेत यांचा अभ्यास होणे अपेक्षित असते. ह्या दोन्ही कलांचे परीक्षण कसे करायचे, हे पाहण्यापूर्वी नाटक आणि चित्रपट ह्या कलाप्रकारांचे विशेष अभ्यासावे लागतात.

## ❑ नाटक ही शाब्द आणि प्रयोगरूप कला

कथा, कविता, कादंबरी अशा प्रकारांप्रमाणे नाटक हा एक साहित्यप्रकार आहे. शिवाय रंगमंचावर तो सादर होत असल्यामुळे तो कलाप्रकारही आहे. यापूर्वी म्हटल्याप्रमाणे नाटक ही संमिश्र कला आहे. नाटकाचा आस्वाद दोन प्रकाराने घेता येतो. नाटकाची संहिता किंवा नाटकाचे पुस्तक वाचून आणि रंगमंचावर सादर झालेले नाटक पाहून नाटक अनुभवता येते. दोन्ही आस्वादामध्ये फरक असतो. वाचनीय स्वरूपात नाटक अनुभवणे आणि इतर प्रेक्षकांसह दृश्य-श्राव्य स्वरूपात नाटक अनुभवणे यात कमालीचा फरक असतो.

नाट्यग्रंथाचे वाचन करताना शब्दांचा माध्यमातून संवाद आणि संवादांच्या माध्यमातून कथानक समजून येते. त्यास नाटकाची मूळ संहिता म्हणतात. मूळ संहितेचा विचार करताना नाटक हा

साहित्यप्रकार आहे याचे भान येथे. नाटक हा कलाप्रकार आहे हे समजून घेण्यासाठी नाटकाच्या नाट्यसंहितेचा विचार करावा लागतो. नाटकात संवाद, प्रसंग आणि व्यक्तिरेखा असतात. अरविंद वामन कुलकर्णी म्हणतात, ''संवाद हे मूलद्रव्य आणि प्रसंग हे माध्यम याद्वारा होणारा एक नाट्यमय किंवा संघर्षमय कथात्मक अनुभव म्हणजे नाटक होय.'' (मराठी नाट्य-लेखन तंत्राची वाटचाल, पृ.२) रंगभूमीवर दृश्य रूपात, संवादांच्या आधारे आणि प्रसंगांच्या माध्यमातून पात्रांकरवी सादर होण्यासाठी रचलेली साहित्यकृती म्हणजे नाटक.

नाटक रंगभूमीवर सादर होत नाही तोपर्यंत ते मूळ संहितेच्या, कथानकाच्या किंवा विशिष्ट आशयाच्या रूपात वाचकांसमोर येते. मूळ संहितेतून सादरीकरणासाठी नाट्यसंहिता तयार केली जाते तेव्हा नाटक प्रयोगासाठी सिद्ध होते. प्रयोगांती नाटकाला पूर्ण रूप प्राप्त होते. कादंबरीतील कथानक गतिमान होण्यासाठी निवेदन असते परंतु नाटकातील कथानकाची वाटचाल करण्यासाठी संवाद आणि प्रसंग असतात. नाट्यसंहितेत अंक, प्रवेश, दृश्य, अभिनय-नेपथ्य यांविषयी सूचना असतात, पात्रांचे वर्णनही दिलेले असते, संगीत आणि प्रकाश योजनेच्या सूचनाही दिल्या जातात. सादरीकरणासाठी मूळ संहितेत काही वेळा बदल करावे लागतात.

नाटकात नाट्य असावे लागते. दोन वा अधिक पात्रांच्या संवाद-अभिनयातून निर्माण झालेला संघर्ष म्हणजे नाट्य. संवादामुळे काहीच घडत नसेल तर नाट्य निर्माण होत नाही. संघर्ष म्हणजे भांडण नव्हे. 'संघर्ष' या शब्दातून स्थिती, वास्तव, प्रत्यय किंवा पेच असा अर्थ ध्वनित होतो. नाटकासाठी संघर्ष वा नाट्य फार आवश्यक असते. त्यासाठी पात्रे, त्यांचा अभिनय, भाव (शृंगार, करुण, वीर, अद्‌भूत, हास्य) यातून काही तरी प्रत्ययास येत असते. हा प्रत्यय नाट्यानुभूती देत असतो. त्यामुळे नाटककारास नाटक लिहिताना काही व्यवधाने पाळावी लागतात.

नाटकासाठी लिहिलेले संवाद, प्रसंग, दृश्ये, पात्रे हे प्रत्यक्ष रंगमंचावर जिवंत स्वरूपात सादर करता येतात की नाही, याचा विचार नाटककार करीत असतो. नाटकासाठी आवश्यक असणारा एक घटक जरी कमकुवत असेल ते नाटक रंगमंचावर सादर करता येत नाही. त्यामुळे कथानकात जेवढे नावीन्य असते तेवढेच सामर्थ्य संवाद, पात्र योजना, प्रसंग आणि दृश्यांमध्ये असले पाहिजे. आरंभीची संगीत नाटके, फार पूर्वीपासून प्रचलित असणारा तमाशा (लोकनाट्य), पुढे आलेली गद्यात्म नाटके, त्यातही नाट्यतंत्रात झालेले बदल, आधुनिक तंत्रज्ञानात, रंगमंचात झालेले बदल लक्षात घेऊन नाटक परीक्षण केले पाहिजे.

## ❑ नाटक परीक्षणाची लेखनपद्धती

ग्रंथपरीक्षण आणि एखाद्या कलाप्रकाराचे परीक्षण यात फरक केला पाहिजे. कथासंग्रह, कादंबरी

वा काव्यसंग्रह अशा पुस्तकांचे परीक्षण जसे करता येते तसे नाटकाच्या पुस्तकाचेही परीक्षण करता येते. नाटक परीक्षण असा शब्द वापरला जातो त्यावेळी रंगमंचावर प्रयोग रूपाने सादर झालेल्या नाटकाचे परीक्षण अपेक्षित असते. त्यामुळे येथे रंगमंचावर सादर झालेल्या नाटकाचे परीक्षण करताना काय केले पाहिजे याचा विचार केला आहे.

**१. नाटकाची निवड :** नाटक परीक्षण करण्यासाठी एखाद्या नाटकाची निवड केली पाहिजे. त्यातही ज्या नाटकामुळे आपण प्रभावित झालो आहोत असे नाटक निवडले पाहिजे. एखाद्या नाटकाचा प्रभाव अत्यंत नगण्य स्वरूपातला आहे असे नाटकही परीक्षणासाठी निवडता येते. त्याचा प्रभाव कमी का आहे याची कारणे मात्र स्पष्ट केली पाहिजेत. परीक्षणाचे काम सोपवले असेल तर निवडीला वाव नसतो. नाट्यपरीक्षणाच्या तत्त्वांचा, निकषांचा किंवा कलामूल्यांचा आधार घेऊन तटस्थपणे परीक्षण करावे लागते.

**२. नाटकाचा प्रयोग :** नाटकाच्या परीक्षणापूर्वी ते नाटक रंगभूमीवर पाहणे आवश्यक असते. नाटकाचे फक्त पुस्तक वाचून उपयोग होत नाही. अनेक रसिक प्रेक्षकांसह नाटक पाहिले व ऐकले पाहिजे. कारण नाटक ही कला दृक्-श्राव्य स्वरूपातील आहे. नाटकाचा पडदा उघडणे वा पहिली घंटा होणे इथपासून ते नाटकाचा पडदा पडेपर्यंत नाटक कसे सादर झाले आहे याचा आस्वाद घेतला पाहिजे. नाटक सादर होताना संवादफेक, संवादातील चढउतार, त्यावेळी पात्रांची भावस्थिती यातले बारकावे लक्षात घेतले पाहिजेत. नाटकातील पात्रांचा आंगिक अभिनय, वाचिक अभिनय, पोशाख-नेपथ्य (आहार्य अभिनय) आणि सात्त्विक अभिनय (भावस्थिती खेद, रोमांच, अश्रू वगैरे) कसा होता? त्यातून कथानक पुढे सरकत होते काय? हे तपासले पाहिजे. एखाद्या पात्राला त्याच्या वाट्याला आलेले कार्य तो प्रत्यक्ष रूपात पार पाडतो की नाही, हे पाहताना पार्श्वभूमीला असलेले नेपथ्य, संगीत आणि प्रकाशयोजना कथानक साध्यासाठी अनुरूप आहे की नाही याकडेही लक्ष द्यावे लागते.

**३. नाटक आणि प्रेक्षक :** नाटक ही एकट्याने पाहण्याची कला नाही. आजच्या तंत्रज्ञान युगात कित्येक नाटकांच्या सी.डी. उपलब्ध आहेत. दूरदर्शनवरील एखाद्या चॅनेलवर एखादे नाटक बघता येते. अशा नाटकाचा आस्वाद एकट्याने घेता येतो परंतु नाट्यगृहातील रंगमंचावर सादर झालेले नाटक हे अधिक जिवंत असते. त्यातील प्रेक्षकांचा प्रतिसाद हा नाटकाचे परीक्षण करण्यासाठी उपयोगी पडतो. काही प्रसंगांत पात्राच्या विशिष्ट संवादाला प्रेक्षकांच्या टाळ्या पडतात, प्रेक्षक खळखळून हसतात किंवा धीरगंभीर होतात, त्यांच्या पापण्यांच्या कडा ओलावतात, याची नोंद एकट्याने नाटक बघताना घेता येत नाही. रंगकर्मी किंवा नाट्यकलावंत पुढच्या प्रेक्षकांना केवळ संवाद ऐकवत नसतो किंवा काही कृती दाखवत नसतो; नाटकाच्या संविधानकात खेचून घेऊन वाटचाल करायला भाग पाडत असतो. प्रेक्षक

नाटकातील पात्रांच्या भावस्थितीशी एकरूप होतात याची अनुभूती घेणे नाटक परीक्षणासाठी फार आवश्यक असते.

**४. नाटक आणि कलामूल्ये यातील तारतम्य :** नाटक हा कलाप्रकार आहे. त्यातून नाटकाची कलामूल्ये शोधली पाहिजे. नाटकातील रसपरिपोष याचाही विचार झाला पाहिजे. नाटकाचा क्लायमॅक्स (उत्कर्षबिंदू) आणि शेवट याचा तपास घेतला पाहिजे. हे सर्व मान्य करूनसुद्धा नाटक ही कला जीवनाशी निगडीत असते. ती सामाजिक वास्तू असते, समाजजीवनाला ती काही तरी देत असते याचा विचार नाटक परीक्षणात झाला पाहिजे. त्यामुळे नाटकातील सौंदर्य, रंजनमूल्ये न नाकारता नाटकाचे मानवी जीवनासाठीचे योगदान कशा प्रकारचे आहे हे परीक्षणात आले पाहिजे. म्हणजेच नाटकाची उपयोजित मूल्ये शोधली पाहिजेत.

**५. नाटकपरीक्षणाची भाषा :** वृत्तपत्रीय लेखनाचा एक भाग म्हणून नाटक परीक्षणाकडे पाहिले जाते. अशावेळी नाटक परीक्षण वाचून वाचक हा नाट्यगृहाकडे वळला जाऊ शकतो. त्यादृष्टीने नाट्यपरीक्षणाची भाषा असली पाहिजे. नाट्यतंत्रातील शब्दांना पर्याय शब्द दिले पाहिजेत. आकलनक्षम भाषा वापरली पाहिजे. नाटकातील प्रसंग, संवाद यांची उदाहरणे देऊन मुद्दा स्पष्ट केला पाहिजे. संयुक्त वाक्ये टाळली पाहिजेत. व्यवहारातील शब्द निवडले पाहिजेत. उदा. 'प्रसंग अंगावर येतो' अशा वाक्यांमुळे सर्वसामान्य वाचक गोंधळात पडू शकतो.

**६. नाटकपरीक्षणाचा समारोप :** नाटक परीक्षणाचा समारोप म्हणजे नाटकातील कथानकाचा सारांश नव्हे. नाटकाचा प्रयोग हा संविधानकातील विधान प्रेक्षकांपर्यंत पोहोचवतोय की नाही, त्या नाटकाचे नाट्यप्रवाहातील स्थान कोणते, नाटकात प्रयोगशीलता कितपत आहे, प्रयोगातील उणिवा काही आहेत का स्थलकाळाचे भान नाटककार पाळतो की नाही, प्रेक्षक नाट्यप्रयोगाशी किती एकरूप झाले होते. प्रेक्षकांचा नाटक पाहतानाचा प्रतिसाद कसा होता, बाहेर पडताना प्रेक्षकांच्या पदरात काही पडते का? अशा प्रश्नांची थोडक्यात उत्तरे दिली पाहिजेत. शेवटी नाटकाला श्रेणी देता येते. उदा. ★★★ यामध्ये थ्रीस्टार म्हणजे पाचपैकी तीन ताऱ्यांची श्रेणी नाटकाला मिळाली आहे असे सुचविता येते. समर्पक शीर्षक असणे हे कोणत्याही लेखनप्रकाराचे सर्वसाधारण वैशिष्ट्य असते, त्याचाही विचार झाला पाहिजे.

## ❑ चित्रपट : चलचित्रांची दृक्-श्राव्य कला

नाटकाप्रमाणेच चित्रपट हा दृक्-श्राव्य कलाप्रकार आहे. फरक एवढाच असतो की नाटकातील जिवंतपणा चित्रपटात नसतो. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने चित्रीकरण (शूटिंग) करून त्याला हलत्या-फिरत्या-चालत्या रूपात पडद्यावर दाखवले जाते. प्रेक्षकांची प्रतिक्रिया नाटकातील पात्रांना

प्रयोगादरम्यान लगेच मिळत असते. चित्रपटगृहातील प्रेक्षकांची प्रतिक्रिया सिनेकलावंतांना लगेच कळत नाही. नाटकातील कलावंत प्रयोगागणिक आपल्या अभिनयात बदल करू शकतो. चित्रपटातील कलावंतांनी एकदा अभिनय केला की त्यात सुधारणा करता येत नाही.

'चित्रपट' या शब्दासाठी इंग्रजीमधील 'Film' हा शब्द वापरला जातो. 'चित्रपट' या शब्दात चित्र आणि पट हे दोन शब्द आहेत. गतिमान चित्रांचा पडदा म्हणजे चित्रपट असे साधारणपणे म्हणता येते. चलत्‌चित्रांची मालिका पडद्यावर मांडून सिनेमागृहात दाखविली जाणारी कला म्हणजे चित्रपट. चित्रपटात चलत्‌चित्रे असतात, ध्वनी असतो, प्रकाश असतो, त्यातून एखादी कथा दाखविली जाते. त्यामुळे ध्वनी आणि चलत्‌चित्रांच्या माध्यमातून पडद्यावर मांडलेली कथा म्हणजे चित्रपट होय.

कोणत्याही भाषेत चित्रपट तयार करण्यासाठी आवश्यक असणारे घटक एकसारखेच असतात. चित्रपट आकारास येण्यासाठी पहिली आवश्यक बाब असते ती म्हणजे पटकथा. पटकथा ही चित्रपटाचे शाब्दरूप असते. पटकथा लेखक चित्रपटाचे शूटिंग करण्यासाठी आवश्यक असणारे कथानक दृश्य-संवाद-प्रसंग-ध्वनी-अँगल-जवळचे/दूरचे चित्र, धावते-स्थिर चित्रीकरण अशा सूचना मांडत असतो.

पटकथेला अनुलक्षून कास्टिंग म्हणजे पात्रानुसार कलावंतांची निवड केली जाते. चित्रपटाचा दिग्दर्शक पटकथेनुसार कलावंतांकडून संवाद व अभिनय करवून घेतो. ज्या पार्श्वभूमीवर कथा घडते त्या ठिकाणाची निवड केली जाते. वातावरण, त्याचा काळ, वेळ यानुसार तयारी केली जाते. चलच्चित्रीकरणाचा कॅमेरा घेऊन चित्रीकरण पूर्ण होते. त्यानंतर संकलन, संपादनी (एडिटिंग) केली जाते, चित्रमालिका तयार केली जाते; संगीताची जोड दिली जाते. डबिंग ही प्रक्रिया ही पूर्ण केली जाते. पात्राच्या मुखातील संवादासाठी आवाज दिला जातो. चित्रपट सेन्सॉर बोर्डाकडे पाठवून त्यानुसार दुरुस्त्या केल्या जातात. प्रमाणपत्र मिळते आणि चित्रपट प्रेक्षकांसाठी तयार होतो. चित्रपट परीक्षणापूर्वी चित्रपटाची निर्मिती कशी होते. हे लक्षात घेतले पाहिजे. त्यानंतर चित्रपट परीक्षणाचे लेखन कसे करायचे? याचा विचार केला पाहिजे.

## ❑ चित्रपट परीक्षणाची लेखनपद्धती

चित्रपट ही कला आहे. प्रेक्षकांचे मनोरंजन व्हावे या मूळ हेतूने चित्रपटाची निर्मिती केली जाते. रंजनाबरोबरीने समाजप्रबोधन होते की नाही याचाही विचार चित्रपट बनविताना केला जातो. एखादा चित्रपट चित्रपटगृहात लागलेला असतो. त्याकडे प्रेक्षकांचे लक्ष जातेच असे नाही. मोजक्या प्रेक्षकांसह चित्रपट चालत असतो. अशा वेळी वृत्तपत्रात त्याविषयी लिहून आले आणि त्याची वाखाणणी योग्य पद्धतीने केलेली वाचायला मिळाली तर चित्र बदलू शकते. चित्रपट परीक्षणामध्ये

लेखकाने मांडलेल्या विविध पैलूंचा प्रत्यय घेण्यासाठी प्रेक्षक चित्रपटगृहाकडे जाऊ शकतात. त्यामुळे चित्रपट परीक्षण हा वृत्तपत्रीय लेखनाचा महत्त्वाचा भाग आहे असे म्हणता येते. चित्रपटातील विविध बाबींच्या गुणावगुणांची चर्चा करण्याचे महत्त्वाचे कार्य या परीक्षणातून होऊ शकते. चित्रपटाचे मोठेपण ठरविण्याचे श्रेय हे परीक्षणाकडे जात नसून ते प्रेक्षकांकडे जात असते. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर म्हणतात त्याप्रमाणे, साहित्याचे शेवटचे न्यायासन जनता असते, तसे चित्रपट चांगला की वाईट याचा न्यायनिवाडा शेवटी प्रेक्षकांच्या हातात असतो. बॉक्स ऑफिसवर झालेली गर्दी आणि चित्रपटाने केलेली कमाई (आर्थिक) याला महत्त्व देण्यात येते. चित्रपट परीक्षणामध्ये हितसंबंध जोपासले जाऊ शकतात. म्हणजेच व्यक्तिसापेक्ष वृत्तीने परीक्षण लिहिले जाऊ शकते. नाट्यकलावंत किंवा चित्रपट कलावंत प्रेक्षकांना 'माय बाप हो!' असे संबोधतात, हे विनाकारण नव्हे. असे असले तरी चित्रपट परीक्षण करताना कोणती दक्षता घ्यावी किंवा कोणती तयारी करावी याचा विचार झाला पाहिजे.

**१. चित्रपटाचे कथानक (स्टोरी) :** चित्रपट परीक्षणाचा आरंभ हा चित्रपटाच्या कथानकाने होतो, त्याला स्टोरी असे म्हणतात. त्यापूर्वी चित्रपटाचे नाव, चित्रपटाचा दिग्दर्शक, चित्रपटातील मुख्य कलावंत आणि चित्रपटाचा निर्माता यांचा उल्लेख करावा लागतो. त्यामुळे कोणत्या चित्रपटाचे परीक्षण आपण वाचत आहोत हे वाचकांना आरंभी कळते. चित्रपटाचा अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे कथानक (स्टोरी). चित्रपटातील प्रत्यक्ष पात्राचे नाव देऊन चित्रपटाचा आशय आरंभ ते शेवट असा मांडला पाहिजे. तपशिलात न मांडता संक्षिप्त स्वरूपात कथानक सांगितले पाहिजे.

**२. चित्रपट कलावंतांचा अभिनय :** चित्रपटातील कलावंतांचा अभिनय हा किती नैसर्गिक, सहज होतो हे प्रेक्षकांना कळत असते. कथानकाला आवश्यक असलेल्या अभिनयाला कलावंताने योग्य न्याय दिलेला आहे की नाही हे तपासले पाहिजे. प्रेक्षक हा निव्वळ स्टोरीसाठी सिनेमागृहात जात असतो. आवडत्या अभिनेता वा अभिनेत्रीचे अभिनय कौशल्य तो पाहणार असतो. एखाद्या सुमार दर्जाच्या कथेवरील चित्रपट अभिनयाच्या सामर्थ्यावर मोठा होऊ शकतो.

**३. चित्रपट आणि दिग्दर्शन :** चित्रपटाचे यश हे दिग्दर्शकाच्या कौशल्यावर बऱ्याच अंशी अवलंबून असते. साधारण पटकथेला कसे फुलवित न्यायचे, कोणत्या अँगलचा वापर करायचा, लाँग शॉट, क्लोज शॉट, मिड शॉट अशा बाबींचा उपयोग कसा करायचा, एखादा प्रसंग कसा संपवायचा किंवा तो स्थिर करून कशा प्रकारे सूचित करायचे याचा दिग्दर्शक विचार करीत असतो. कलावंताची मुलाखत सुरू असताना एखाद्या प्रश्नाचे उत्तर देताना तो म्हणतो, 'माझ्याकडून दिग्दर्शकाने असे काम करवून घेतले, याचे श्रेय त्यांना जाते.' यावरून दिग्दर्शकाचे दिग्दर्शन कसे होते याची दखल परीक्षणात घेता येते.

**४. चित्रपट आणि तंत्रज्ञान :** डिजिटल युगात किंवा संगणकाच्या क्रांतीमुळे चित्रपटातील तांत्रिक बाजू भक्कम होत चालली आहे. जुन्या सिनेमातल्या नैसर्गिक दृश्याला आज तंत्रज्ञानाची जोड दिली जात आहे. वास्तवाचे अवास्तव करतानाही ते वास्तव वाटावे असे तंत्रज्ञान विकसित झाले आहे. शेवटी प्रेक्षक हा चित्रपटाकडे एक कला म्हणून पाहात असतो. 'बाहुबली' चित्रपटातले अमानवी दृश्य, भव्यता कितीही खोटी असली तरी प्रेक्षक त्यात अडकून पडतो. 'ज्युरॅसिक पार्क' पाहताना संगणकाचा वापर किती बेमालूमपणे केला आहे याकडेही लक्ष दिले पाहिजे. प्रेक्षकांना थोडेही वाटत नाही, की आपण खोटा डायनासोर पाहात आहोत. तंत्रज्ञानाचा उपयोग किती समर्थपणे केला आहे याचा विचार परीक्षणात होणे अपेक्षित असते.

**५. चित्रपट आणि इतर बाबी :** चित्रपटात संगीत, गीत, नृत्य, वेशभूषा अशा किती तरी बाबी असतात. चित्रपटाच्या कथानकाची उंची, लांबी, रुंदी उघड करून दाखविण्यासाठी त्यांचा उपयोग होत असतो. मूक चित्रपट आणि ध्वनिमाध्यमातला चित्रपट हा दोन्हींची परिणामकारकता प्रचंड वेगळी असते. अगदी शांत ठिकाणी पायांचा आवाजसुद्धा चित्रपटात विशिष्ट भाव निर्माण करू शकतो. घोड्यांच्या टापांचा आवाज, इमारत कोसळणे, सोसाट्याचा वारा अशा किती तरी आवाजांमुळे चित्रपट गतिमान होतो. काही वेळा 'चित्रपट रेंगाळला' असे वाक्य लिहावे लागते. तो का रेंगाळला, त्यामुळे काय परिणाम झाला याचा बारकाईने विचार केला पाहिजे. त्यामुळे संगीत, गीत, नृत्य, वेशभूषा आणि इतर बाबींचे योगदान चित्रपट परीक्षणावेळी लक्षात घेतले पाहिजे.

**६. चित्रपटाचा परिणाम :** चित्रपट हा प्रेक्षकांना काय देतो, चित्रपटाचा प्रेक्षकांवर कोणता परिणाम होतो किंवा चित्रपटाविषयी प्रेक्षक कसा रिॲक्ट होतो याला चित्रपटाचा परिणाम असे म्हटले जाते. चित्रपटाच्या कथानकाचा, अभिनयाचा वा संगीताचा परिणाम प्रेक्षकांवर होत असतो. तो मोजण्यासाठी विशिष्ट एक मोजमाप नसले तरी प्रेक्षकांच्या प्रतिसादाच्या आधारे त्याची नोंद घेता येते. प्रेक्षकांची वाढती गर्दी लक्षात घेता येते. त्यामुळे चित्रपट आला की लगेच परीक्षण लिहिले, यात काहीशी घाई होते. चित्रपटाचा परिणाम मोजण्यासाठी काही कालावधी जावा लागतो.

**७. प्रत्यक्ष लेखन :** चित्रपट परीक्षणाची विशिष्ट अशी भाषा असते. त्यातल्या तांत्रिक संकल्पना वेगळ्या असतात. कॅमेऱ्याची भाषाही वेगळी असते. चित्रीकरणातले विविध शॉट घेतानाची साधने वेगवेगळी असतात. प्रेक्षकांना याचे काहीही देणे-घेणे नसते. परीक्षण लेखनात हे शब्द हळूहळू रूढ होत असतात. त्याचे अधिक स्पष्टीकरण काही वेळा देण्याची गरज भासते. वाचकांना दुर्बोध शब्द किंवा अवघड भाषा नको असते. शिवाय परीक्षणाला योग्य शीर्षकही द्यावे लागते. चित्रपटातील एखादे दृश्य छापावे लागते. शेवटी समारोपात चित्रपटाचे योगदान मांडता येते. स्टार पद्धतीने श्रेणी देता येते.

## ३.४ समारोप

वृत्तपत्रीय लेखनात विविध बाबी येत असल्या तरी येथे बातमी लेखन, अग्रलेख (संपादकीय), वाचकांचा पत्रव्यवहार आणि नाटक/चित्रपट परीक्षण या चार घटकांचाच विचार केला आहे. आजची पिढी वृत्तपत्रापासून दूर नसली तरी लेखनपद्धतीपासून दूर आहे. नोकरीचे किंवा अर्थार्जनाचे एक साधन म्हणून वृत्तपत्रीय लेखनाकडे पाहता येते. या चारही घटकांच्या लेखनाची कौशल्ये आत्मसात करता येतात. वृत्तपत्रात त्या त्या लेखनाखाली लेखकाचे नाव छापले जाते; वाचकांमध्ये प्रसिद्धी मिळते, त्यातून मिळणारा आनंद आणि वाढणारा आत्मविश्वास जीवन जगण्यासाठी उपयोगी पडतो.

वृत्तपत्रीय लेखनकौशल्ये आत्मसात करण्यासाठी त्या त्या लेखनप्रकाराचे विशेष समजून घेतले तर त्याचा फायदा लेखनावेळी होतो. वृत्तपत्रीय लेखनातील वरील चारही घटक विज्ञान क्षेत्रातील संकल्पना आणि परिभाषेने फारशा युक्त नसतात. व्यवहारातील भाषाच वृत्तपत्रात असते. क्लिष्ट, किचकट आणि असाध्य म्हणून वृत्तपत्रीय लेखनाकडे न पाहता आपल्या सभोवतालचा एक अविभाज्य भाग म्हणून पाहिले पाहिजे.

## ३.५ सरावासाठी प्रश्न

१. तुमच्या महाविद्यालयातील मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाची वर्तमानपत्रासाठी बातमी तयार करा.

२. बातमी म्हणजे काय ते सांगून बातमीदाराकडे कोणते गुण असले पाहिजेत याची चर्चा करा.

३. अग्रलेख संकल्पना, स्वरूप आणि महत्त्व स्पष्ट करा.

४. नाटक ही प्रयोजनरूप कला आहे सिद्ध करा.

## ३.६ अधिक वाचन

१. **प्रभाकर पाध्ये,** *''पत्रकारितेची मूलतत्त्वे''*, मेहता प्रकाशन, कोल्हापूर.

२. **ल. रा. नसिराबादकर,** *''व्यावहारिक मराठी''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३. **राजन गवस, अरुण शिंदे, गोमटेश्वर पाटील** (संपा.), *''भाषिक सर्जन आणि उपयोजन''*, दर्या प्रकाशन, पुणे.

४. **सुहासकुमार बोबडे,** *''मराठी भाषा : उपयोजन आणि सर्जन''*, शांती पब्लिकेशन, पुणे.

❑ ❑ ❑

घटक – ४

# उपयोजित व स्पर्धा परीक्षेसाठी लेखन

# अ) पत्रलेखन

अनुक्रमणिका

४.१ उद्दिष्ट्ये

४.२ प्रस्तावना

४.३ विषय विवेचन

- ४.३.१ पत्रलेखन : स्वरूप
- ४.३.२ पत्रलेखनाचे प्रकार
- ४.३.३ व्यावसायिक वा कार्यालयीन पत्रलेखनासाठी आवश्यक घटक

४.४ प्रात्यक्षिकासह पत्रलेखन

४.५ पत्रलेखनाचे बदलते स्वरूप : ई–पत्रव्यवहार

४.६ समारोप

४.७ सरावासाठी प्रश्न

४.८ अधिक वाचन

४.९ उपक्रम

## ४.१ उद्दिष्ट्ये

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस,

१. पत्रलेखनाचे स्वरूप लक्षात येईल.

२. कौटुंबिक पत्रव्यवहार व कार्यालयीन पत्रव्यवहाराचे स्वरूप लक्षात येईल.

## ४.२ प्रस्तावना

पत्रलेखन ही एक कला आहे. ते एक महत्त्वाचे लेखनकौशल्य आहे. प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना

कोणत्या कारणासाठी पत्रव्यवहार करीत असतो. पत्रलेखन म्हणजे दोन व्यक्ती किंवा दोन संस्थांना जोडणारा सुकर मार्ग आहे. पत्रव्यवहारामुळे परस्परांमध्ये विचार, भावना आणि संदेशांची देवाण-घेवाण होते. पत्रलेखनामध्ये पत्रलेखकाच्या विचारांचे, भाव-भावनांचे, अंतरंगाचे व व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब पडलेले असते. ते अक्षररूप असल्याने कायमचे टिकते. महनीय व्यक्तिंच्या पत्रव्यवहारातून समकालीन सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. पत्रव्यवहार हा जीवनाशी आणि समाजवास्तवाशी संवाद साधणारा भक्कम पुरावाच असतो.

पत्रलेखन करण्याची प्राचीन परंपरा आपल्याकडे आहे. आज माध्यम क्षेत्रातील क्रांतीमुळे दूरध्वनी, भ्रमणध्वनी, आंतरजाल अशी संवादाची आधुनिक साधने उपलब्ध झाली असली तरीही पत्रलेखनाचे महत्त्व कमी झालेले नाही. पत्रव्यवहाराचे मूळ मनुष्याच्या सामाजिकतेत आहे. समाजाचा घटक या नात्याने आपणांस अन्य व्यक्तींशी प्रेमभावनेने, कर्तव्यभावनेने रहावे लागते. पत्रलेखन हे केवळ परिचित व सहसंबंधित असलेल्या व्यक्तीशीच नव्हे तर ज्याच्याशी तिचा तात्पुरता, जुजबी व व्यावहारिक संबंध आलेला आहे, अशा व्यक्तींशी देखील पत्रलेखनातून संवाद साधला जातो. पत्रव्यवहार हे कार्यालयीन व व्यावहारिक संपर्काचे महत्त्वाचे साधन असते. त्यामुळे आजही पत्रलेखन महत्त्वपूर्ण व विश्वसनीय ठरते.

## ४.३ विषय विवेचन

### ४.३.१ पत्रलेखन : स्वरूप

पत्रलेखन म्हणजे स्थलावकाश व कालावकाश यांचे तारतम्य ठेवून केलेला लेखनरूपी संवाद होय. लिहिणारा आणि वाचणारा यांच्यामध्ये खुल्या मनाने झालेला संवाद म्हणजे पत्रलेखन होय. पत्रलेखन ही जशी एक कला आहे तसेच हे एक शास्त्रदेखील आहे. पत्रात पत्ता कोठे असावा, तारीख कोठे असावी, शेवट कसा करावा याचे काही संकेत ठरलेले असतात. यशस्वी पत्रलेखनासाठी या गोष्टी अपेक्षित असतात. याचे स्वरूप खालीलप्रमाणे :-

**१. नाव व पत्ता :-**

पत्राच्या वरच्या बाजूस उजव्या कोपऱ्यात पत्रलेखकाचे नाव, पत्ता व दिनांक लिहिण्याचा संकेत आहे. पत्र पाठवणाऱ्या व्यक्तीचे नांव लिहिणे अपेक्षित आहे. पत्राच्या वरच्या बाजूस उजव्या कोपऱ्यात पत्रलेखकाचे नांव, पत्ता व दिनांक लिहावा. व्यक्ती किंवा संस्था, पदनाम, वसाहतीचे नाव, शहराचे नाव आणि पिनकोड अशा क्रमाने पत्ता लिहिला जातो. आजच्या काळात त्वरित संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल, फॅक्स क्रमांक देतात.

उदाहरणार्थ,

| |
|---|
| डॉ. सुहास पाटील<br>फ्लॅट नं. १०१, राखी अपार्टमेंट,<br>साखरसंकुलजवळ, वाकडेवाडी,<br>शिवाजीनगर, पुणे-८.<br>दि. १० एप्रिल २०१९ |

### २. दिनांक :-

पत्र लिहिताना पत्रलेखकाच्या पत्याखाली दिनांक लिहिणे आवश्यक असते. कार्यालयीन पत्रव्यवहारात दिनांकाला महत्त्व असते.

### ३. पत्र स्वीकारणाऱ्याचे नाव व पत्ता :-

आपण ज्यांना उद्देशून पत्र लिहिलेले असते किंवा ज्यांना आपण पत्र पाठवितो त्या व्यक्तीचे नाव, पदनाम, संस्थेचा अथवा कार्यालयाचा पूर्ण पत्ता लिहावा. संबंधित कार्यालयातील अधिकाऱ्याचे पदनाम, कार्यालयाचे नाव, रस्त्याचे नाव, शहराचे नाव व पिनकोड क्रमांक अशा क्रमाने पत्ता लिहावा. उदाहरणार्थ,

प्रति,

मा. जयकुमार चंदनशिवे
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
कन्या महाविद्यालय,
मिरज - ४१६ ४१०.

### ४. विषय :-

कार्यालयीन पत्रव्यवहारात विषयाला प्राधान्य असते. शासकीय किंवा व्यावसायिक कार्यालयात विविध विभाग कार्यरत असल्याने कोणत्या विभागांतर्गत कोणत्या विषयाच्या अनुषंगाने हे पत्र आहे हे विषय वाचून चटकन लक्षात येते. म्हणून विषय लिहिण्याची पद्धत उपयुक्त ठरते.

### ५. संदर्भ :-

व्यावसायिक कारणासाठी जेव्हा पत्रव्यवहार सुरू असतो, तेव्हा तत्पूर्वी पाठवलेल्या पत्राचा संदर्भ

देणे आवश्यक असते. उदा.

संदर्भ : आपले दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ चे पत्र.

*किंवा*

संदर्भ : कममि/आस्था/१००४, दि. २९ फेब्रुवारी २०१९.

## ६. अभिवादन :-

अभिवादन याला 'मायना' असेही म्हणतात. पत्राच्या सुरुवातीला ज्याला पत्र लिहायचे आहे त्याचे नाव लिहिल्यानंतर त्याखाली मायना लिहावा. कौटुंबिक पत्रात आई-वडिलांना 'तीर्थरूप', गुरुजनांना 'गुरुवर्य', मित्रांना 'प्रिय मित्र' किंवा इतरांना 'श्री.रा.रा.' असे लिहिण्याची पद्धत रूढ आहे. व्यावसायिक पत्रात सर्वसामान्यपणे महोदय/महोदया असे लिहिण्याची पद्धत आहे.

## ७. मजकूर :-

पत्रलेखनात मजकूर हा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. पत्रातील माहितीचे आकलन सुलभ व्हावे यासाठी मजकूराचे तीन भागात विभाजन केले जाते.

**i) प्रारंभीचा मजकूर :** हा प्रारंभीचा मजकूर म्हणजे पत्राची प्रस्तावनाच असते. ही प्रस्तावना कमीत कमी शब्दांत व मुख्य मजकूराशी संबंधित असावी.

**ii) मुख्य मजकूर :** मुख्य मजकूरात एखाद्या मुद्याचे किंवा अल्प माहितीचे स्पष्टीकरण करायचे असते. एकापेक्षा अधिक मुद्दे असतील तर प्रत्येक मुद्यासाठी स्वतंत्र परिच्छेद करावा. मजकूराची भाषा सभ्य असावी. पत्रलेखकाने वाचकाला नेहमी आदरार्थी बोलावे.

**iii) शेवटचा मजकूर :** मुख्य मजकूर प्रभावी ठरण्याच्या दृष्टीने पत्राचा योग्य शेवट करावा. पत्राच्या समारोपातील परिच्छेदात मोजकी वाक्ये असावीत. तथापि ती वाचकांवर प्रभाव पाडणारी व पत्राबाबत अनुकूल कार्यवाही करण्यास प्रेरक ठरावीत.

## ८. समारोप :-

समारोप लहान दोन-तीन वाक्यांमध्ये असावा. किंबहुना पत्राबाबत सकारात्मक कार्यवाही होईल अशी वाक्ये असावीत. उदा.

☞ कृपया पोहोच द्यावी ही विनंती.

☞ योग्य ती कार्यवाही होईल ही नम्र अपेक्षा.

☞ तसदीबद्दल माफी असावी.

☞ आपल्या तक्रारीचे पूर्णपणे निराकरण करण्यात येईल याची खात्री असावी.

☞ असाच लोभ असू द्यावा ही विज्ञापना.

## ९. नम्रतापूर्ण शेवट :-

पत्राचा शेवट नम्रतापूर्ण असावा. उदा. आपला विश्वासू, आपला आज्ञाधारक.

## १०. स्वाक्षरी :-

आदरपूर्वक आणि नम्रतापूर्वक शब्दाने शेवट केल्यानंतर त्याच्याखाली पत्रलेखकाने स्वाक्षरी करणे अतिशय महत्त्वाचे आहे. पत्र व्यावसायिक असेल तर स्वाक्षरीखाली आपले नाव, पदनाम व संस्थेचा निर्देश द्यायला हवा.

## ११. कागदपत्रे :-

व्यावसायिक किंवा कार्यालयीन पत्रव्यवहारात मुख्य पत्रासोबत काही कागदपत्रांच्या छायांकित प्रती पाठवाव्या लागतात, त्यांना 'प्रतिपत्रे' किंवा 'पत्रासोबत जोडलेली कागदपत्रे' असे म्हणतात. उदा.

**सोबत :-**

१) अनुभवाचे प्रमाणपत्र

२) रहिवाशी दाखला

## १२. अग्रेषण :-

काहीवेळा पत्र वेगवेगळ्या व्यक्तींना कार्यवाहीसाठी पाठवावे लागते. अशावेळी पत्राच्या डाव्या तळबाजूस प्रतिलिपी, 'माहितीस्तव', 'प्रत माहितीसाठी' व 'आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित' अशा शब्दाने निर्देशित केले जातात. उदा.

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१) मा. मुख्याधिकारी,
कराड नगरपरिषद, कराड.

## ४.३.२ पत्रलेखनाचे प्रकार

भावना व्यक्त करणारे आणि सुसंवाद साधणारे शब्दरूप साधन म्हणजे 'पत्र' होय. अनेकदा आपणांस आपल्यापासून दूर असणाऱ्या व्यक्तींशी संवाद साधायचा असतो तो संवाद आपण लेखनाच्या माध्यमातून करतो यालाच आपण पत्रलेखन म्हणतो. या पत्रव्यवहाराचे सामान्यपणे दोन प्रकार पडतात.

१) कौटुंबिक किंवा घरगुती पत्रलेखन.

२) कार्यालयीन किंवा व्यावसायिक पत्रलेखन.

### १. कौटुंबिक किंवा घरगुती पत्रलेखन :-

कौटुंबिक पत्रव्यवहार हा पूर्णपणे व्यक्तिसापेक्ष वा खाजगी असतो. कुटुंबापासून, घरापासून दूर असलेली व्यक्ती पत्रलेखनाच्या माध्यमातून आपल्या आईवडिलांशी, नातेवाईकांशी संवाद साधत असते. हा सर्व पत्रव्यवहार खाजगी, अनौपचारिक स्वरूपाचा असतो. अशा पत्रात कुटुंबातील व्यक्तीबद्दलचा जिव्हाळा, प्रेम व्यक्त होते तसेच काही वेळा रागालाही वाट मिळते. ही पत्रे पूर्णपणे व्यक्तिसापेक्ष व आत्मनिष्ठ असतात. हे पत्र ठरावीक पद्धतीनेच लिहावे असे कोणतेच संकेत नाहीत.

### २. कार्यालयीन किंवा व्यावसायिक पत्रलेखन :-

आपल्या व्यवसायाच्या किंवा कामाच्या निमित्ताने आपण अनेकवेळा इतरांशी संपर्क साधत असतो. व्यक्ती किंवा एखाद्या विशिष्ट संस्थेमार्फत हा पत्रव्यवहार होत असतो. हे पत्र पूर्णपणे वस्तुनिष्ठ, नि:संदिग्ध व औपचारिक स्वरूपाचे असते. सामाजिक, राजकीय, शासकीय, निमशासकीय कार्यालये, औद्योगिक संस्था, व्यापारी संस्था इत्यादी पत्रव्यवहारांचा यात समावेश असतो.

या पत्रलेखनात आपण ज्यांना पत्र लिहीत असतो त्यांच्याशी आपला परिचय नसतो. शिवाय पत्राद्वारे होणारी ओळख ही जुजबी, कामापुरती मर्यादित असते. या पत्रलेखनात काटेकोरपणा व व्यवहारलक्ष्यी तोल पूर्णत: सांभाळला जातो. येथे समाजमान्य व शासनमान्य काही संकेत पाळावे लागतात.

## ४.३.३ व्यावसायिक वा कार्यालयीन पत्रलेखनासाठी आवश्यक घटक

कौटुंबिक पत्रव्यवहार आणि कार्यालयीन पत्रव्यवहार असे पत्रांचे सर्वसामान्यपणे दोन प्रकार पडतात. पत्रव्यवहार अनेकजण अनेक पद्धतींनी करत असले तरी यशस्वी पत्रलेखनाचे विशिष्ट संकेत ठरलेले असतात. पत्र लिहिण्याचे एक विशिष्ट तंत्रही असते. व्यावसायिक पत्रलेखनासाठी काही आवश्यक घटक असतात. प्रत्येक कार्यालयाला काही व्यक्ती पत्र लिहीत असतात. तसेच प्रत्येक कार्यालयाला या पत्रांना उत्तरे लिहावी लागतात आणि अनेकविध कारणांनी व्यक्तींना वा संस्थांना पत्रे

लिहावी लागतात. हा पत्रव्यवहार संस्थेच्या दृष्टीने फार महत्त्वाचा असतो. बँका, विविध उद्योग, सहकारी संस्था, नगरपालिका, ग्रामपंचायती, विविध विकास सोसायटी, सामाजिक व सांस्कृतिक मंडळे यांचे एक जाळेच आज विणले गेले आहे. या सर्वांना पत्रव्यवहार करणे अपरिहार्य आहे. ही पत्रे म्हणजेच तुमचा उद्योग वा व्यवसाय कसा आहे हे दाखविण्याचा आरसाच असतो. आलेल्या प्रत्येक पत्राला वेळेवर व योग्य उत्तर देणे अगत्याचे असते. तसेच संस्थेला काही माहिती हवी असते. त्यासाठी लिहिलेले पत्र योग्य भाषेत असायला हवे. तरच संस्थेची सकारात्मक प्रतिमा पत्र वाचणाऱ्या व्यक्तिच्या मनात उमटते. यशस्वी पत्रलेखनासाठी काही विशिष्ट घटक नजरेसमोर ठेवून लेखन केले पाहिजे.

**१. स्पष्टता :** पत्रातील भाषा स्पष्ट, नि:संदिग्ध आणि अर्थवाही असावी. व्यावसायिक किंवा कार्यालयीन पत्रलेखनात स्पष्टता फार महत्त्वाची असते. सुस्पष्टतेमुळे सदर पत्रावर त्वरित कार्यवाही होण्यास मदत होत असते. जर संबंधित व्यक्तीला पत्रलेखकाचा मजकूर नीट कळला नाही तर पत्रलेखनाचा हेतू असफल होईल. पत्राच्या प्रारंभीच विषय जर अचूकपणे नोंदवला तर संबंधित व्यक्तीला पत्राचे आकलन होण्यास मदत होते.

**२. संक्षिप्तता :** पत्रामध्ये भावनेला आवाहन करणारा मजकूर लिहू नये. पल्लेदार वाक्ये शक्यतो टाळावी. पत्र हे वाचकाच्या सोयीसाठी असून त्यातून योग्य तो संदेश, संवाद व्हावा अशी अपेक्षा असते. त्यामुळे अतिरिक्त व अनावश्यक शब्द टाळावेत.

**३. पत्राची भाषा :** कार्यालयीन पत्र लिहिताना कौटुंबिक भाषा किंवा सांकेतिक शब्दप्रयोग वापरू नयेत. अलंकारिक भाषा टाळावी. पत्रातून योग्य तो संदेश जावा अशी अपेक्षा असल्याने बोजड, दुर्बोध शब्द वापरू नयेत. कमीत-कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय पोहचावा ही अपेक्षा असते.

**४. नम्रता :** पत्रलेखनात पत्र लिहिणाऱ्या व्यक्तीचा नम्र भाव प्रकटला पाहिजे. पत्रातून लिहिणाऱ्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व, स्वभाव, आचार-विचार पद्धती सूचीत होत असतात. पत्रात औपचारिक सौहार्दपूर्ण भाषा व रूढ शिष्टाचाराचे पालन झाले पाहिजे. तसेच ज्या व्यक्तीला आपण पत्र लिहिणार आहोत तिचा आदर करण्याची, मान राखण्याची जबाबदारी पत्रलेखकावर असते.

**५. आकर्षकता :** कार्यालयाला आलेल्या अनेक पत्रांमधून आपल्याच पत्राचा प्रभाव पडायला हवा. यासाठी पत्राची मांडणी व रचना सुयोग्य असावी. पत्राला समास सोडायला हवा. दोन ओळीत पुरेसे अंतर हवे. योग्य तेथे परिच्छेद हवा. अक्षर सुंदर व सुवाच्च असायला हवे. लेखनाचे नियम पाळायला हवेत. यामुळे पत्र आकर्षक होते व ते प्रभावी ठरते.

अशा रितीने कार्यालयीन पत्रव्यवहाराचे काही संकेत ठरलेले आहेत. ते संकेत पाळून पत्रलेखन केले तर ते निश्चितच प्रभावी ठरेल.

## ४.४ प्रात्यक्षिकासह पत्रेलखन

### १. अभिनंदन पत्र :–

भारतीय क्रिकेटपटू स्मृती मानधना हिला आयसीसीच्या २०१८ या वर्षीचा 'सर्वोत्तम महिला क्रिकेटपटू' हा पुरस्कार प्राप्त झाला, याबद्दल तिचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

बोर्ड ऑफ कंट्रोल फॉर क्रिकेट इन इंडिया,
६५, नेताजी सुभाषचंद्र बोस रोड,
चर्चगेट, मुंबई, महाराष्ट्र – ४०० ०२६.
दिनांक : २० जुलै, २०१९.

प्रति,
मा. स्मृती मानधना,
मुंबई, महाराष्ट्र.

महोदया,

नुकताच आपणांस क्रीडा क्षेत्रातील (क्रीकेट) मौलिक योगदानाबद्दल आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेतर्फे (आयसीसी) 'सर्वोत्तम क्रिकेटपटू' हा पुरस्कार प्राप्त झाला. तसेच सर्वोत्तम एकदिवसीय खेळाडू, महिला क्रिकेटपटूसाठी दिला जाणारा 'रॅचेल हेहो–फ्लिंट' पुरस्कारही जाहीर करण्यात आला. 'अर्जुन' पुरस्कारानेही आपणांस सन्मानित करण्यात आले.

सर्वप्रथम संघटनेच्यावतीने आपले मन:पूर्वक अभिनंदन!

आजपर्यंत अनेक पुरस्कार मिळवून आपण महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले आहे. आजपर्यंत जे यश तुम्ही मिळवले ते सर्वांसाठीच प्रेरक आहे. वरील पुरस्काराने आपला उचित सन्मान झाला आहेच. शिवाय सदर पुरस्कारासही उंची प्राप्त झाली आहे.

**पुढील वर्षी होणाऱ्या सामन्यासाठी** आपणांस शुभेच्छा!

आपणांस असेच यश प्राप्त होवो ही शुभेच्छा !

पुन:श्च एकदा अभिनंदन!

कळावे,

आपला विश्वासू,
(बी.सी.सी.आय.)

## २. आभार पत्र :-

एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत उज्ज्वल यश मिळविल्याबद्दल सारंग पाटील याच्या काकांच्या अभिनंदनाच्या पत्रास उत्तर देऊन आभार मांडले.

श्री. सारंग सदाशिव पाटील,
लक्ष्मीनगर, शिवाजी रोड,
जयसिंगपूर-४१६ ४११.
दि. १४ जुलै, २०१९

तीर्थस्वरूप काका,

साष्टांग नमस्कार.

तुमचे अभिनंदनाचे पत्र आजच मिळाले. आपण केलेल्या कौतुकाबद्दल व व्यक्त केलेल्या सदिच्छेबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. मला एस. एस. सी. परीक्षेत जे यश मिळाले. यात माझ्या गुरूजनांनी केलेल्या मार्गदर्शनाचा व माझ्या आई-बाबांनी दिलेल्या प्रोत्साहनाचा वाटा मोठा आहे.

माझ्याबद्दल सर्वांच्याच आशा उंचावल्या आहेत. त्यांची पूर्तता करण्याच्यादृष्टीने मी निश्चितच प्रयत्न करीन.

माझ्या पुढील वाटचालीत आपले आशीर्वाद सतत पाठीशी राहोत, ही अपेक्षा व्यक्त करतो.

पुन्हा एकदा धन्यवाद!

कळावे,

आपला नम्र,
सही/-
(श्री.सारंग सदाशिव पाटील)

## ३. नोकरीसाठी अर्ज :-

श्री. जाधव सचिन बजरंग,
मु. पो. ता.आटपाडी,
जि. सांगली ४१५ ३०१
दिनांक : २० जून, २०१९

प्रति,

मा. प्राचार्य,
शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय,
मिरज, ता. मिरज, जि. सांगली ४१६ ४१०.

विषय : भूगोल विषयाच्या सहाय्यक प्राध्यापक पदासाठी अर्ज.

संदर्भ : दैनिक सकाळ, दि. २५/०५/२०१८.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये विनंतीपूर्वक अर्ज करतो की, मी आपल्या महाविद्यालयात भूगोल विषयाच्या सहाय्यक प्राध्यापक पदासाठी काम करण्यास इच्छुक आहे. माझी शैक्षणिक पात्रता एम.ए., एम.एड्., सेट, नेट (भूगोल) ही असून सध्या मी 'माण नदीखोऱ्यातील डाळींब उत्पादन : एक भौगोलिक-आर्थिक अभ्यास' या विषयावर पीएच.डी.करत आहे. मला एकूण पाच वर्षे अध्यापनाचा अनुभव आहे. तरी आपल्या महाविद्यालयात मला काम करण्याची संधी मिळावी, ही नम्र विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(श्री.जाधव सचिन बजरंग)

सोबत :-

१) परिचय पत्र.

२) गुणपत्रिका/प्रमाणपत्र छायांकीत प्रती.

## ४. चौकशी पत्र :-

नव्याने सुरू केलेल्या व्यवसायासाठी वस्तूंची खरेदी करण्यासाठी प्राथमिक चौकशी करणारे पत्र.

श्रीराम एंटरप्रायजेस,
लक्ष्मी रोड, सांगली.
दिनांक : १५ नोव्हेंबर २०१८

प्रति,

मा. जनरल मॅनेजर,
अर्थ स्ट्रीट एजन्सीस,
सांगली - ४१६ ४१०

विषय : वस्तूंच्या किमतीविषयी चौकशी करणेबाबत.

महोदय,

श्रीराम एंटरप्रायजेस लक्ष्मी रोडवर लवकरच नवी अद्ययावत शोरूम सुरू करणार आहे. टी.व्ही., रेफ्रिजरेटर, इलेक्ट्रॉनिक्स इ. विक्री करण्याचा आमचा व्यवसाय आहे.

नव्या शोरूमसाठी आम्हाला विविध प्रकारचे स्टील फर्निचर हवे आहे. तरी आपण खाली दर्शवल्याप्रमाणे आम्हांस मालासंबंधी माहितीपत्रके, दरपत्रके, देण्या-घेण्यासंबंधीच्या अटी इत्यादी माहिती पाठवून उपकृत करावे.

आपल्या दालनातील वस्तू पाहून, पसंत पडल्यास रीतसर ऑर्डर नोंदवू. आम्हांला आवश्यक असणाऱ्या वस्तूंची नावे खालीलप्रमाणे :-

| **अ.क्र.** | **वस्तूचे नाव** | **नग** |
|---|---|---|
| १. | स्टील कपाटे | ०४ |
| २. | एक्झिक्युटिव्ह चेअर | ०२ |
| ३. | अन्य खुर्च्या | १२ |
| ४. | मोठे टेबल | ०६ |
| ५. | फाईल कॅबिनेट | ०६ |

आपल्या पत्रोत्तराची वाट पाहत आहोत.

कळावे,

आपला विश्वासू,
(श्रीराम एंटरप्रायजेस)

५. **तक्रारपत्र :-**

तुमच्या वसाहतीतील रस्त्यावर कचऱ्याचे ढीग साचले आहेत. त्यासंबंधी योग्य ती कार्यवाही करण्यास महानगरपालिका अधिकारी, सांगली यांना सुमारे शंभर शब्दात तक्रारपत्र लिहा.

श्री. उमेश दिनकरराव देशमुख
फ्लॅट नं. ५, अंजना अपार्टमेंट,
विश्रामबाग, सांगली ४१६ ४१०

प्रति,

मा. मुख्याधिकारी,
महानगरपालिका सां./मि./कु.
सांगली - ४१६ ४१०

विषय : रस्त्यावरील कचऱ्याचे ढीग उचलण्याबाबत.

महोदय,

मी विश्रामबागमधील एक कर्तव्यदक्ष नागरिक या नात्याने माझ्या परिसरातील कचऱ्याच्या समस्येकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. आमच्या शिवाजीनगर परिसरातील रस्त्यांवर गेल्या काही दिवसांपासून कचऱ्याचे ढीग साचलेले आहेत व रस्त्यावर फिरणारी गुरे-ढोरे व मोकाट कुत्र्यांनी हाच कचरा रस्त्यावर पसरविला आहे त्यामुळे अगोदरच अरूंद असलेला हा रस्ता आता वापरण्यायोग्य राहिलेला नाही. कचऱ्यामुळे डासांचे प्रमाण वाढून मलेरियासारख्या रोगांचाही प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. नगरपालिकेचे कर्मचारी वेळेवर कचरा उचलत होते, परंतु गेले काही दिवस येथील कचरा उचलला गेलेला नाही.

तरी आपण वेळेवर लक्ष दिले तर ही गैरसोय तातडीने दूर होईल, असा विश्वास वाटतो.

कळावे,

आपला विश्वासू,
(उमेश दि. देशमुख)

## ६. नेमणूक पत्र :–

**स्टारव्हिजन कंपनी लिमिटेड**

एस. ए. शर्मा,
कर्मचारी भरती विभागप्रमुख,
स्वारगेट, पुणे-४११ ०४१
दि. ०५ ऑगस्ट २०१९

प्रति,

अनुराधा बुरुड,
शिवाजीनगर, मिरज.

विषय : कॉम्प्युटर ऑपरेटर पदावर नियुक्ती.

महोदया,

दि. २ मे, २०१८ रोजीच्या आपल्या अर्जाच्या व त्यानंतर दि. ३० जुलै, २०१८ रोजीच्या वैयक्तिक मुलाखतीच्या संदर्भात आपणांस कळविण्यात येते की, दि. १० ऑगस्ट, २०१८ पासून आपली आमच्या कार्यालयात कॉम्प्युटर ऑपरेटरपदी नियुक्ती करण्यात येत आहे. या नियुक्तीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :

१. आपली दरमहा रु. ८,०००-५००-१२०००-८००-२८००० या वेतनश्रेणीत नियुक्ती करण्यात येत आहे. सुरुवातीचे आपले मूळ वेतन रु. ८,०००/- राहील.
२. मूळ वेतनाशिवाय आपणांस कंपनीच्या नियमानुसार भत्ते लागू होतील.
३. कंपनीच्या वैद्यकीय अधिकाऱ्याने आपली वैद्यकीय तपासणी करून आपण वैद्यकीयदृष्ट्या योग्य आहात असे प्रमाणपत्र दिल्यानंतरच आपली नियुक्ती नियमित करण्यात येईल.
४. कंपनीच्या सेवेत असताना संगणक विभागातील कर्मचाऱ्यांना लागू असलेले सर्व प्रकारचे सेवानियम आपणांस लागू होऊन ते बंधनकारक राहतील.
५. सुरूवातीला आपला उमेदवारीचा काळ एक वर्षाचा राहील. उमेदवारीचा काळ संपल्यानंतर आपणांस भविष्य निर्वाह निधी व सेवानिवृत्तीच्या अटी लागू होतील. जर उमेदवारीच्या काळातील आपले काम असमाधानकारक वाटले तर हा काळ संपताच आपणांस सेवेतून कमी करण्यात येईल.
६. नियुक्तीच्या वरील अटी आपणांस मान्य असल्यास या पत्रासोबत पाठवलेल्या कागदावर आपण स्वीकृतिदर्शक स्वाक्षरी करून तो कंपनीकडे ताबडतोब पाठवावा. आपण दि. ३१ ऑगस्ट, २०१८ पर्यंत कामावर रुजू न झाल्यास ते नियुक्तीचे पत्र रद्द समजण्यात येईल.

कळावे,

आपला विश्वासू,
(एस. ए. शर्मा)

## ७. पुस्तकांची मागणी करणारे पत्र :-

कन्या महाविद्यालय, मिरज,
ता. मिरज, जि. सांगली ४१६ ४१०
दिनांक-२५ नोव्हेंबर २०१८

प्रति,

मा. व्यवस्थापक,
शब्दालय प्रकाशन,
दळवी नगर, चिंचवड,
पुणे, ४११ ०३३.

विषय : महाविद्यालयीन ग्रंथालयासाठी पुस्तकांच्या मागणीबाबत.

महोदय,

आपण पाठवलेली आपल्या प्रकाशनांची संपूर्ण यादी मिळाली, धन्यवाद. आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयासाठी कृपया पुढील पुस्तके पाठवावीत.

तसेच सदर पुस्तकांच्या किंमतीवर ग्रंथालयास मिळणारी योग्य ती सवलत द्यावी ही विनंती.

| अ.क्र. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे/प्रकाशकाचे नाव | प्रती |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

वरील पुस्तके वेळेवर पाठवून सहकार्य करावे.

कळावे,

विभागप्रमुख ग्रंथपाल प्राचार्य

## ४.५ पत्रलेखनाचे बदलते स्वरूप : ई पत्रव्यवहार

### ❑ ई–टपाल (e-mail)

ई–मेल हे Electronic mail या इंग्रजी संज्ञेचे लघुरुप होय. ई–मेल हे इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या साहाय्याने संदेश पाठवण्याचे तंत्रज्ञान आहे. सध्याच्या बहुतांश यंत्रणा इंटरनेटचा वापर करतात. इंटरनेटलाच 'महाजाल' असे संबोधले जाते. महाजाल हे संगणकांच्या जगभर पसरलेल्या कित्येक लाख अशा नेटवर्कस्‌चे मिळून बनलेले एक प्रचंड नेटवर्क आहे. महाजाल हे इलेक्ट्रॉनिक संपर्काच्या काही जागतिक प्रमाण अशा प्रोटोकॉल्स (इलेक्ट्रॉनिक अभियांत्रिकीतील माहिती देवाण–घेवाणीच्या प्रमाण संवादपद्धती) वर चालते. इंटरनेट हे केवळ एकच एकसंघ असे नेटवर्क नसून ते अनेक लहान नेटवकर्स्‌नी बनलेले आहे.

इंटरनेटच्या माध्यमातून अनेक विविध प्रकारच्या माहितीची देवाण–घेवाण जोडलेल्या संगणकांना करता येते. यातील काही सर्वसामान्य वापराची उदाहरणे म्हणजे, इलेक्ट्रॉनिक पत्रे (ई–मेल), वर्ल्डवाईड वेब पेजेस, चॅटिंग इत्यादी होत.

इलेक्ट्रॉनिक पत्रे ज्याला आपण रोजच्या वापरात ई–मेल या नावाने ओळखतो, ती एक प्रकारची डिजिटल संदेशांची देवाण–घेवाण आहे. ई–मेलने एका लेखकाने संगणकावर टंकलिखित करून पाठवलेला मजकूर अगदी थोड्याच वेळात दुसऱ्या एका किंवा अनेक वाचकांपर्यंत पोहचतो. आजचे आधुनिक ई–मेल हे स्टोअर (साठवणे) आणि फॉरवर्ड (पुढे पाठवणे) या धर्तीवर बनवले गेलेले आहेत. ई–मेल सर्व्हर संदेश प्राप्त करतात, संदेश पाठवतात आणि संदेश साठवूनसुद्धा ठेवू शकतात. त्यासाठी अलिकडे संदेश पाठवणारे, वाचणारे आणि त्यांचे संगणक हे ऑनलाईन असल्याचीसुद्धा गरज नाही. ते थोड्या काळासाठी एकमेकांबरोबर जोडले गेले तरी संदेश पाठवता येतो. हा थोडा अवधी एक संदेश पाठवण्यास लागणाऱ्या वेळेपर्यंत सिमीत असतो.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मानवाला जलद पत्रव्यवहार करण्यासाठी महाजालाद्‌वारा ई–संदेश पाठवणे खूपच सोपे झाले आहे. महाजालाचा सर्वाधिक वापर (ई–टापालाचा) आज देवाणघेवाणीसाठी होताना दिसतो, म्हणून ई–टपाल सेवा पुरवणाऱ्या संस्थांची वाढ होत आहे. एका क्षणार्धात आपणास कोठेही संदेश पाठविता येतो. तथापि, त्याकरिता संदेश पाठवणाऱ्याकडे, ज्या व्यक्तीला पाठवायचा आहे, त्या व्यक्तीकडे ई–टपालासाठी पत्ता (e-mail ID) असावा लागतो. हा पत्ता तयार करण्याची एक विशिष्ट पद्धत आहे, ती अशी :–

ई-टपाल सेवा पुरवणाऱ्या संस्थांच्या पोर्टल (website) वर जाणे. उदा. जी-मेल (g-mail), हॉट मेल (hotmail), याहू (yahoo), रिडिफमेल (rediffmail) ह्या ई-टपाल पुरविणाऱ्या संस्था/सेवा आहेत. महाजालावर या सेवांचा अर्ज भरला की प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र व एकमेव असा पत्ता त्या-त्या संकेतस्थळाकडून दिला जातो. उदा श्रीराम मोहिते यांना जी-मेल या सेवेद्‌वारे टपालासाठी पत्ता तयार करावयाचा असेल तर तो असा असेल.

shrirammohite@gmail.com येथे पत्त्यातील घटक समजून घेतला असता प्रत्येक पत्रात ॲपरसॅण्ड @ हे चिन्ह असावे लागते. @ याने पत्ता दोन भागात विभागला जातो. चिन्हाच्या डाव्या बाजूला एक विशिष्टता आहे. संदेश पाठविणारी व्यक्ती कोण हे लक्षात येईल. असे नाव साधारणपणे निवडले जाते ते जगभरात फक्त एकाच व्यक्तीला दिले जाते. समजा श्रीराम मोहिते नावाच्या आणखी एक व्यक्तीला जी-मेल या सेवेवरच ई-पत्ता तयार करावयाचा असेल तर त्याला मोहिते हे नाव मिळणार नाही. तर त्याला दुसरे shrirammohite20 किंवा mohiteshriram यासारखे वेगळे नाव निवडावे लागेल. @ चिन्हाच्या उजव्या बाजूला ई-टपाल सेवा पुरवणाऱ्या पोर्टलच्या ई-टपाल संगणकाचा पत्ता डोमेन नाव असते. (gmail.com)

हॉटमेल ही ई-मेल प्रणाली सामान्य जनतेला फुकट वापरता येणारी पहिली यशस्वी ई-मेल प्रणाली आहे. ई-मेल संदेशाचे प्रामुख्याने दोन भाग पडतात. पहिला भाग असतो हेडर म्हणजेच ठळकपणे लिहिलेले संदेशाचे नाव, पाठवणाऱ्याचा ई-मेलचा पत्ता, आणि संदेश ज्याला पाठवला आहे त्याचाही ई-मेलचा पत्ता हे सगळे असते. दुसरा भाग म्हणजे मेसेज बॉडी ह्यामध्ये संदेश लिखित असतो.

प्राथमिक स्वरूपात असताना फक्त लिहिलेले संदर्भ पाठवता येणारा ई-मेल आधुनिक काळात जास्त विकसित होऊन मल्टिमीडिया ॲटॅचमेन्टस म्हणजेच छोट्या आकाराचा मल्टिमीडिया फायली पाठवण्याबाबत सक्षम बनला ह्या पद्धतीला मल्टिपर्पज इंटरनेट मेल एक्सटेन्शन्स (MIME) असे म्हणतात.

ई-मेल सेवेचा इतिहास आपणांस 'अर्पानेट'पर्यंत मागे घेऊन जातो. १९८० च्या दशकात 'अर्पानेट'चे इंटरनेटमध्ये झालेल्या रूपांतरामुळे ई-मेल सेवेचा जन्म झाला. १९७० मध्ये पाठविले गेलेले ई-मेल आणि आजचे फक्त शब्दबद्ध मजकूर असलेले ई-मेल यामध्ये कमालीचे साम्य आहे.

## ❑ प्रत्यक्ष ई-टपाल पाठविणे :-

प्रथम ई-टपाल सेवेचे त्यांचे सॉफ्टवेअर वापरून मजकूर तयार करावा लागतो. मजकूर तयार झाला

की ज्याला संदेश पाठवायचा त्याचा ई-मेल नमूद करावा लागेल. संदेश व ई-मेल तपासून ई-टपाल पाठविण्याची सूचना द्यावी लागेल. त्यानंतर क्षणार्धात जगभरात कुठेही हा संदेश जाऊ शकेल आणि नेमक्या पत्त्यावर पोहोचेल. महाजालाच्या माध्यमातून संदेश प्रवास करताना संदेश स्वीकारणाऱ्याचा विशिष्ट कोड असतो, त्यामुळे संदेश स्वीकारणाऱ्याच्या कोड नंबरशिवाय कुणालाही कळत नाही. ज्या पत्त्यावर संदेश पाठविलेला असतो, त्याच्याच खात्यावर जाऊन तो साठवला जातो. ज्यावेळी संदेश स्वीकारणारी दुसरी व्यक्ती संगणकावरून तिचे ई-टपालचे खाते तपासेल, त्यावेळी तिला तो संदेश मिळतो. काहीवेळा ई-टपाल सेवेचे त्याचे सॉफ्टवेअर वापरून मजकूर तयार करण्याऐवजी स्वतंत्ररित्या मजकूर तयार केला जातो. उदा. मराठीतील संदेश त्या सॉफ्टवेअरऐवजी वेगवेगळ्या ठिकाणी देवनागरीत तयार केलेला असेल तर तो पीडीएफ (Portable Document Format) करून मग पाठवला जातो. ती धारिका ई-टपालाला जोडून पाठवता येतो. या धारिका सर्व संगणक व मुद्रकावर (प्रिंटर) वर चालतात. त्यात कोणताही बदल करता येत नाही.

महत्त्वाचे असे की, ई-टपाल सॉफ्टवेअरमध्ये अनेक सुविधा असतात. त्यामुळे ई-संदेश तयार करणे, ई-संदेश पाठविणे, आलेले ई-संदेश पाहता येणे, या ई-संदेशांना उत्तरे देणे किंवा ते तसेच दुसऱ्याला पुढे पाठविणे या गोष्टी सहज करता येतात. ई-टपालाद्वारे मोठ्या प्रमाणात देवघेव करता येते. व्यक्तीचे ई-पत्ते साठवणे, स्वत:च्या संगणकावरती धारिका किंवा छायाचित्र ई-संदेशावरून जोडून पाठवणे, एकच संदेश एकाचवेळी अनेकांना पाठविणे. एकच संदेश एक मुख्य व्यक्तीबरोबरच त्याच्या नकळत आणखीही कुणाला पाठवायचा असेल तर तशीही सोय ई-टपालामध्ये आहे.

ई-टपाल व्यवस्थेतील काही संकेत अथवा शिष्टाचार याला नेटिकेट्स म्हणतात. त्यातील काही विषय संक्षिप्त असावे म्हणजे विषयाच्या महत्त्वावरून संदेश लगेच वाचायचा की नंतर वाचण्यासाठी मेल राखून ठेवायची हे ई-टपाल न पाहताच ठरविता येते.

१) ई-टपालातील मजकूर कधीही मोठ्या अक्षरामध्ये (Capital Letters) तयार करू नये, कारण मोठी अक्षरे हे रागवण्याचे किंवा ओरडण्याचे प्रतीक समजले जाते.

२) ई-टपाल मुद्द्यांना धरून छोटे व भाषेच्या चुका न ठेवता तयार करावे, कारण त्यावर संदेश पाठवणाऱ्याची प्रतिमा ठरते.

३) योग्य त्या कारणास्तव ई-टपाल पाठवावे. वारंवार असे संदेश आले तर संबंध बिघडण्याचा धोका असतो.

● **ई-टपालाचा नमुना खालीलप्रमाणे :-**

१२ जून, २०१९

प्रति,

मुख्य कार्यकारी प्रबंधक,

महाराष्ट्र बँक.

विषय : नवीन बचत खाते उघडण्याविषयी.

माननीय महोदय/महोदया,

मी, विशाल पाटील राहणार अक्षरवेल कॉलनी, विश्रामबाग, सांगली-४१६ ४१० आपल्या बँकेत बचत खाते उघडू इच्छितो.

खाते उघडण्याच्या प्रक्रियेकरिता आवश्यक ओळखपत्र आणि इतर प्रमाणपत्रे सोबत जोडत आहे.

तरी माझ्या मेलचा सहानुभूतीपूर्वक विचार करून नवीन बचत खाते मिळावे ही नम्र विनंती.

आपला विश्वासू/आपला कृपाभिलाषी/आपला आज्ञाधारक

विशाल पाटील
vishalpatil@gmail.com
दूरध्वनी-०२३३-५०१३९.

## ४.६ समारोप

मराठी भाषेचे उपयोजन व सर्जन ही प्रक्रिया घडण्यासाठी विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व साहित्यनिर्मितीच्या व भाषा उपयोजनाच्या पातळीवर कसे घडते या उद्देशाने पत्रव्यवहाराची माहिती सदर घटकातून घेतली. सदरची माहिती विद्यार्थ्याने समजून घेऊन कौटुंबिक पत्रव्यवहार व कार्यालयीन पत्रव्यवहाराचे स्वरूप कसे आहे याचाही आढावा येथे घेण्यात आला आहे. व्यावहारिक जीवनात भाषेचे उपयोजन कसे करावे हे आपल्या लक्षात आले. यादृष्टीने याच घटकातील 'आकलन' या पुढील भागात आकलनप्रक्रियेचे स्वरूप समजावून देऊन उतारा व कवितेचे आकलन कसे होईल हे प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समजावून देण्यात आलेले आहे.

## ४.७ सरावासाठी प्रश्न

१. पत्रलेखन म्हणजे काय ते सांगून पत्रलेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.

२. तुमच्या वसाहतीतील रस्त्यावरील कचऱ्याचे ढीग उचलण्याबाबत महानगरपालिकेला तक्रारपत्र लिहा.

३. भारतीय क्रिकेटपटू स्मृती मानधना हिला आयसीसीच्या २०१८ या वर्षीचा 'सर्वोत्तम महिला क्रिकेटपटू' हा पुरस्कार प्राप्त झाला याबद्दल तिचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

४. ई-टपाल (e-mail) संकल्पनेची चर्चा करा.

## ४.८ अधिक वाचन


१. **प्रभाकर पाध्ये,** *'पत्रकारितेची मूलतत्त्वे'*, मेहता प्रकाशन, कोल्हापूर.

२. **ल. रा. नसिराबादकर,** *'व्यावहारिक मराठी'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३. **राजन गवस, अरुण शिंदे, गोमटेश्वर पाटील** (संपा.), *'भाषिक सर्जन आणि उपयोजन'*, दर्या प्रकाशन, पुणे.

४. **श्रुती वडगबाळगर**, *'मुलाखत, पत्रलेखन व रोजनिशी'*, सुविधा प्रकाशन, कोल्हापूर.

५. **कल्याण काळे (संपा.),** *'व्यावहारिक मराठी'*, द. दि. पुंडे.

६. **संजय लांडगे,** *'उपयोजित मराठी'*, दिलीपराज प्रकाशन, पुणे.


## ४.९ उपक्रम

१. 'लोकसत्ता' दैनिकामध्ये आलेल्या जाहिरातीनुसार 'प्राध्यापक' पदासाठी अर्ज तयार करा.

२. वेगवेगळ्या विषयांवरील पत्रांचे संकलन करा.

३. निमंत्रणपत्रिका आणि शुभेच्छा पत्रांचा संग्रह करा.

४. तुमच्याजवळ असलेल्या कार्यालयात जाऊन कार्यालयीन पत्रव्यवहार समजावून घ्या.

५. आपल्याजवळ उपलब्ध असलेल्या नेट कॅफेत जाऊन ई-पत्रव्यवहार कसा करतात हे समजावून घ्या.

❑ ❑ ❑

घटक–४

# ब) आकलन

अनुक्रमणिका

४.१ उद्दिष्ट्ये

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

४.४ समारोप

४.५ उताऱ्याखालील नमुना प्रश्नोत्तरे

४.६ कवितेखालील नमुना प्रश्नोत्तरे

४.७ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.८ सरावासाठी उतारा

४.९ सरावासाठी कविता

४.१० सरावासाठी स्वाध्याय

४.११ उपक्रम

४.१२ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## ४.१ उद्दिष्ट्ये

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस,

१. आकलनप्रक्रियेचे स्वरूप समजून येईल.

२. आकलन या भाषिक कौशल्यावर प्रभुत्व संपादन करता येईल.

३. उतारा व कवितेचे आकलन होईल व त्यावरील प्रश्न सोडविता येतील.

## ४.२ प्रास्ताविक

भाषा हे मानवाचे एक व्यवच्छेदक लक्षण व मानवी प्रगतीचे गमक आहे. भाषेमुळे विचार, भावभावना, कल्पना, ज्ञान यांचे आदानप्रदान, जतन, संवर्धन झाले. भाषेच्या माध्यमातून ज्ञाननिर्मिती, ज्ञानसंवर्धन व ज्ञानाचे हस्तांतरण केले जाते. एखाद्या भाषेवर प्रभुत्व संपादन करण्यासाठी भाषिक कौशल्ये अवगत असणे आवश्यक असते. श्रवण, भाषण, वाचन, लेखन, आकलन ही भाषिक कौशल्ये आहेत. श्रवण व वाचन या क्षमता आकलनाशी संबंधित आहेत तर भाषण व लेखन या क्षमता अभिव्यक्तीशी संबंधित आहेत. आकलन हे एक अत्यंत महत्त्वाचे भाषिक कौशल्य असून त्याचा संबंध समजण्याशी आहे. संघ लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच इतर स्पर्धा परीक्षांमध्ये उतारा/कवितेवर आधारित प्रश्न विचारलेले असतात. त्या आधारे विद्यार्थ्याचे आकलनकौशल्य तपासले जाते. दैनंदिन जीवनात तसेच अध्ययनप्रकियेमध्ये आकलनकौशल्य अत्यंत महत्त्वाचे ठरते. गद्य वा पद्याचे समग्र आकलन झाले, तरच आपणांस संबंधित विषय पूर्णांशाने कळू शकेल. म्हणून आपण प्रस्तुत घटकामध्ये आकलनप्रक्रियेचे स्वरूप समजून घेणार आहोत.

## ४.३ विषय विवेचन

आकलन म्हणजे समजण्याची शक्ती अगर क्षमता. यालाच इंग्रजीमध्ये Comprehension असे म्हणतात. मानसशास्त्रीयदृष्ट्या या शब्दाचा अर्थ याहूनही व्यापक आहे. एखादी गोष्ट समजावून घेत असताना, आपणांस काय समजते आहे याची बरोबर जाणीव ज्या क्रियेत होते ती आकलन शक्ती. याशिवाय समजलेल्या गोष्टींचा अगर कल्पनेचा व्यक्तीला दुसरीकडे उपयोग करता येणे अपेक्षित आहे.

ब्लूम या भाषाशास्त्रज्ञाच्या मते आकलन तीन प्रकारचे असते.

१) समजलेल्या मूळ विचारांचे दुसऱ्या शब्दात रूपांतर अगर भाषांतर.

२) मूळ विचारांचा अर्थ दुसऱ्या शब्दात किंवा वाक्यात सांगणे.

३) मूळ विचारांचा गर्भितार्थ किंवा त्यांचे फलित अगर, उपसिद्धांत सांगून त्यात भर टाकणे.

वाङ्मयातील शब्दांचे मूल्य समजणे, भाषांतर करणे, काव्यार्थ सजवणे, शब्दांवरील कोटी समजणे इ. गोष्टी आकलनामध्ये येतात. आकलन ही बुद्धिमापनाची एक महत्त्वपूर्ण कसोटी आहे. एखाद्या उताऱ्याचे, संकल्पनेचे, विचाराचे आकलन व उपयोजन यावर व्यक्तीचा बुद्ध्यांक ठरतो.

आकलन हे एक महत्त्वाचे भाषिक कौशल्य आहे. वाचन प्रक्रियेमध्ये आकलनास अधिक महत्त्व

असते. वाचलेल्या किंवा ऐकलेल्या कोणत्याही गोष्टीचा मथितार्थ समजणे म्हणजे आकलन. आकलनाच्या पाच पातळ्या आहेत.

## १) बोधन :

मजकुरातील मध्यवर्ती कल्पना/लेखकाला जे सांगावयाचे आहे ते उचित संवेदनेसहित व अर्थासहित कळणे म्हणजे बोधन. यासाठी प्रथम पुस्तकाचे अंतरंग बहिरंग चाळावे. मुखपृष्ठ, शीर्षक, अनुक्रमणिका, मांडणी, भाषा, परिशिष्ट, सूची, समारोप इत्यादी पाहून आपल्या दृष्टीने कोणता मजकूर उपयुकत आहे ते ठरवावे. विषय, घटक, उपघटक लक्षात येण्यासाठी महत्त्वाच्या शब्दांना अधोरेखित करावे. त्यानंतर वाचत असताना गाभाभूत घटकांचे, आशयसूत्रांचे सारग्रहण करावे. यामधून मजकुरातील मुख्यार्थाचा बोध होतो.

## २) तर्क :

शब्दांमध्ये वाच्यार्थापलिकडील सूचितार्थ, व्यंगार्थ दडलेला असतो. त्याचप्रमाणे दोन वाक्यांमधील गर्भितार्थ समजणे आवश्यक असते. यासाठी तर्कशक्तीच्या आधारे अनुमान करावे लागते. वाक्यातील, आशयातील संदर्भावरून, मागच्या पुढच्या माहितीवरून गर्भितार्थांची उकल करता येते. अभिधा, लक्षणा, व्यंजना या शब्दशक्तींचे ज्ञान असल्यास सूचितार्थांचे आकलन होण्यास साहाय्य होते.

## ३) मूल्यमापन :

वाचलेल्या मजकुराचे गुणविशेष व मर्यादा यांचे चिकित्सक विश्लेषण करणे म्हणजे मूल्यमापन. उचित – अनुचिताच्या निकषांचे ज्ञान व त्यांच्या प्रकाशात संबंधित गोष्टींची समीक्षा करण्याची दृष्टी हा आकलनाचा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. एखाद्या चित्रपटाचे, नाटकाचे, वक्त्याच्या व्याख्यानाचे मूल्यमापन आपण आकलनक्षमतेनुसार करीत असतो.

## ४) रसग्रहण :

लेखकाच्या भूमिकेत शिरून त्याच्या भावनांची, संवेदनांची अनुभूती घेणे याला रसग्रहण म्हणता येते. रसग्रहणात्मक आकलनामुळे लेखकाची भूमिका, त्याच्या लेखनाचे प्रयोजन, मध्यवर्ती कल्पना, कथावस्तू, पात्रे, मांडणी, लेखनशक्ती, भाषासौंदर्य, रससौंदर्य समजते.

## ५) उपयोजन :

समजलेल्या गोष्टींचे, कल्पनांचे, विचारांचे, सिद्धांतांचे इतरत्र यशस्वी उपयोजन करता येणे हे

आकलनाचे खरे फलित असते. मूळ विचारांमध्ये नवी भर घालून तो विकसित करणे, जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये त्याचा वापर करून नवनिर्मिती करणे, व्यावहारिक प्रश्नांची, समस्यांची सोडवणूक करणे, नवी कौशल्ये प्राप्त करणे ही आकलनाची शेवटची पायरी म्हणता येते.

कोणत्याही गोष्टीचे मर्म समजण्यासाठी व त्याचे प्रसंगानुरूप उपयोजन करण्यासाठी आकलनकौशल्य अवगत असावे लागते. एकाग्रता, स्मरणशक्ती, ग्रहणशक्ती, तर्ककौशल्य, सूक्ष्मनिरीक्षण, चिकित्सक विश्लेषण, शोधकता, व्यासंग यांनी आकलनक्षमता वाढते.

भाषाशिक्षणाचा मुख्य उद्देशच 'आकलन' असतो. मूल जसजसे वाढत जाते, तसतसे त्याची आकलशक्ती वाढत जाते. विद्यार्थ्यांचे आकलनकौशल्य, सारग्रहणकौशल्य तपासण्यासाठी विविध पद्धतींचा अवलंब केला जातो. गद्य वा पद्य वेच्यांवर आधारित प्रश्न विचारून आकलनकौशल्य आजमावले जाते. स्पर्धा परीक्षांमध्ये आकलनकौशल्यावर भर असतो. उतारे किंवा कविता देऊन त्यावर प्रश्न विचारलेले असतात.

उतारा/कविता यांवरील प्रश्नांची उत्तरे लिहिताना खालील सूचना लक्षात ठेवाव्यात.

१. प्रथम दिलेला उतारा किंवा कविता लक्षपूर्वक वाचा.

२. उतारा किंवा कवितेचा आशय समजून घ्या.

३. उतारा किंवा कवितेवरील प्रश्न काळजीपूर्वक वाचा.

४. आपल्याला उतारा आणि कवितेपैकी कोणाची निवड करायची आहे, वाचा आणि निर्णय घ्या.

५. त्यानंतर प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी सहेतुक वाचन करा.

६. प्रश्नाच्या क्रमानेच उताऱ्यात उत्तरे मिळतील असे नाही.

७. उतारा वाचत असतानाच दिलेल्या प्रश्नांची उत्तरे ज्या ओळीत आहेत असे वाटते, त्या ओळी अधोरेखित करा.

८. अधोरेखित केलेल्या ओळी एक-दोनदा वाचून दिलेल्या प्रश्नांच्या उत्तराचे मुद्दे मनात तयार करा.

९. मूळ आशय न बदलता उत्तर स्वतःच्या भाषेत लिहा. उताऱ्यातील वाक्ये जशीच्या तशी उतरवू नयेत.

१०. उत्तरांमध्ये सुस्पष्टता, अचूकता, अर्थपूर्ण वाक्यरचना, मुद्देसूदपणा, प्रमाणलेखन, अक्षर यांना महत्त्व असते.

## ४.४ समारोप

श्रवण, भाषण, वाचन, लेखन व आकलन ही भाषिक कौशल्ये आहेत. भाषाशिक्षणाचा मुख्य उद्देश आकलन असतो. आकलन हे आपणांस शिक्षणाबरोबर जीवनात यशस्वी होण्यासाठी उपयुक्त ठरणारे भाषिक कौशल्य आहे. वाचलेल्या किंवा ऐकलेल्या कोणत्याही गोष्टीचा मथितार्थ, मध्यवर्ती आशय, गाभा, गर्भितार्थ अचूक समजणे म्हणजे आकलन. आकलन ही एक मानसिक प्रक्रिया आहे. ब्लूम या भाषाशास्त्रज्ञाने आकलनप्रक्रियेचे विश्लेषण केले आहे. बोधन, तर्क, मूल्यमापन, रसग्रहण, उपयोजन या आकलनाच्या पाच पातळ्या आहेत. भाषा शिक्षणाचा मूलभूत उद्देशच आकलन असतो. वयोमानानुसार आकलन सामर्थ्य वाढण्याची अपेक्षा असते. आकलनाचा संदर्भ बुद्ध्यांकाशीही जोडला जाऊ शकतो. स्पर्धा परीक्षांमध्ये उमेदवाराची आकलनक्षमता आजमावण्यासाठी उतारा/कवितेवर आधारित प्रश्न विचारलेले असतात. अभ्यास, सराव, प्रयत्न, एकाग्रता, शिस्त इत्यादींच्या द्वारे आपण आकलनकौशल्य वृद्धिंगत करू शकतो.

## ४.५ उताऱ्याखालील नमुना प्रश्नोत्तरे

सत्य विचार नेहमी तटस्थ, निरपेक्ष असतो. असा जो सत्यनिष्ठ विचार आहे, या विचाराची आज आपल्या देशाला मोठी गरज आहे. याचे कारण असे आहे की, विचार करण्याचे जबाबदारीचे काम आता जगातील जवळजवळ सगळ्या माणसांनी सोडून दिले आहे. व्हॉल्टेअरचे एक मोठे सुंदर वाक्य आहे. त्याने असे म्हटले आहे की, माणसाला देवाने बुद्धी दिली आणि माणसाने या त्याच्या चुकीबद्दल सूड उगविण्याचे ठरविले. तू आम्हाला बुद्धी दिलीस ठीक आहे; आम्ही निदान एवढे तरी करू की, ती वापरणार नाही, तिचा उपयोग करणार नाही. आज आपल्याला असे दिसून येते की, माणसाचे वैशिष्ट्य बुद्धी आहे, तरी जे बुद्धिमान लोक आहेत, त्यांचा बुद्धीवर कमीत कमी विश्वास आहे. माणसाचा सगळ्यांत कमी जर विश्वास कशावर असेल तर बुद्धीवर आहे. शिपायांचा तलवारीवर विश्वास आहे, सत्ताधाऱ्यांचा सत्तेवर, तख्तावर, सिंहासनावर विश्वास आहे. पण ज्याच्याजवळ बुद्धी आहे, त्याचा बुद्धीवर मुळीच विश्वास नाही. तो एखाद्या वेळी बुद्धीचा उपयोग तलवारीची स्तोत्रे गायला करतो. अनेकदा धनाचा महिमा सांगायला बुद्धीचा उपयोग करतो आणि सत्ताधाऱ्याचे वैतालिक तर अनेक साहित्यिक आहेत, अनेक बुद्धिमंत आहेत. बुद्धिमंतांचा बुद्धीच्या शक्तीवर विश्वास नाही. माणसाची मुख्य शक्ती हीच आहे. विचार हीच माणसाची शक्ती आहे. या निष्ठेची आज आवश्यकता आहे. ही निष्ठा म्हणजेच लोकनिष्ठा. बुद्धीचा उपयोग जो करू शकतो, ज्याचा बुद्धीच्या शक्तीवर विश्वास आहे तोच लोकनिष्ठ. हे लोकतंत्राचे, लोकशाहीचे अधिष्ठान आहे.

आज आपण असे बघतो की, ज्यांच्याजवळ संपत्ती आहे, धन आहे तो लोकशाहीला विकत

घेण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्याच्याजवळ सत्ता आहे, तो लोकशाही आपल्मा स्वार्थाकरिता राबवून घेण्याचा प्रयत्न करीत आहे आणि ज्यांच्याजवळ दंडुका आहे, तो लोकशाही आपल्या वळणावर कशी येईल या दृष्टीने माणसाला वळविण्याचा प्रयत्न करीत आहे. या तीन शक्तीची प्रतिष्ठा जोपर्यंत आहे, तोपर्यंत औपचारिक लोकशाहीच्या ऐवजी जिला आपण वास्तविक लोकशाही म्हणतो, तिची स्थापना होऊ शकणार नाही.

### स्वयं-अध्ययन प्रश्न-१

१. आपल्या देशाला कोणत्या विचाराची गरज आहे व का?

२. माणूस बुद्धीचा उपयोग कसा करतो?

३. लोकतंत्राचे अधिष्ठान कोणते?

४. खरी लोकशाहीची स्थापना का होणार नाही?

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे**

१. आपल्या देशाला सत्यनिष्ठ विचाराची गरज आहे. कारण सत्य विचार हे नेहमी तटस्थ व निरपेक्ष असतात.

२. माणूस आपल्या बुद्धीचा उपयोग व्यवहारात किंवा विचार करण्यास करीत नाही तर तो बुद्धीचा उपयोग तलवारीची स्तोत्रे गायला, धनाचा महिमा सांगायला करतो.

३. लोकशाहीचे अधिष्ठान म्हणजेच बुद्धीचा वापर करणारा माणूस. बुद्धीमुळेच माणूस विचार करू शकतो आणि तीच त्याची शक्ती आहे. म्हणूनच बुद्धीचा वापर करणारा व्यक्तीच लोकनिष्ठ आहे आणि ही निष्ठाच लोकशाहीचे अधिष्ठान आहे.

४. आज श्रीमंत लोक संपत्तीच्या जोरावर लोकशाही विकत घेण्याचा प्रयत्न करतात तर सत्ताधारी स्वार्थाकरिता तिचा वापर करू पाहतात आणि शक्तिशाली लोकशक्तीचा वापर करू लोकशाहीला दुर्बल बनवू इच्छितात. त्यामुळे जोपर्यंत या शक्ती प्रभावी आहेत, तोपर्यंत खरी लोकशाही स्थापन होणार नाही.

## ४.६ कवितेखालील नमुना प्रश्नोत्तरे

*नको मंदिरे, नको मशिदी, नको चर्च वा गुरुद्वारा,*
*मनामनांतून वाहत राहो मानवतेचा शीतल वारा।।धृ.।।*

*धर्मांहुनही श्रेष्ठ आम्हाला कर्मावरची अपार भक्ती*
*कष्टावरती निष्ठा आमुची ऐक्य भावना ही तर शक्ती,*
*अज्ञानाच्या अंधाराला मुळीच नाही जनात थारा।।१।।*

*विज्ञानाच्या वाटेवरती चालत राहू सदैव सारे*
*हाती येतील प्रकाश वर्षे, गूढ चांदण्या, दूरस्थ तारे,*
*संवादाचा पूल उभारू गाडून टाकू मौन मनोरा।।२।।*

*माणूस ही तर जात आमुची, माणुसकी हा धर्म आमचा*
*दुसऱ्यांसाठी त्याग, समर्पण जोडू धागा परंपरेचा,*
*सजीव सृष्टी विशाल इथली एकच कर्ता उभारणारा।।३।।*

## स्वयं-अध्ययन प्रश्न-२

१. वरील कवितेमधून कोणता संदेश दिला आहे?

२. धर्मांपेक्षा काय महान असल्याचे कवीने म्हटले आहे?

३. कोणत्या वाटेवरून चालण्याचा विचार कवीने व्यक्त केला आहे?

४. कवीची जात-धर्मविषयक भूमिका काय आहे?

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

१. मानवतेचा विचार मनामनांमधून वाहत राहो, मंदिर, मशीद, चर्च, गुरुद्वारा आदी धर्मस्थळांपेक्षा व धर्मांपेक्षा माणूस महत्त्वाचा आहे. कर्म, विज्ञाननिष्ठा, संवाद, माणुसकी हा आमचा नवमार्ग असेल असा संदेश वरील कवितेमधून दिला आहे.

२. कर्मावरची अपार भक्ती, कष्टावरती निष्ठा व ऐक्यभावना ही धर्मापेक्षा महान असल्याचे कवीने म्हटले आहे.

३. विज्ञानाच्या वाटेवरून चालण्याचा विचार कवीने व्यक्त केला आहे. त्यामुळे खगोलशास्त्राचे ज्ञान हाती येईल असे कवीला वाटते.

४. पारंपरिक जात-धर्मकल्पनेला कवीने नकार दिला आहे. माणूस हीच जात आणि माणुसकी हाच धर्म असल्याचे कवीने स्पष्टपणे म्हटले आहे. त्याग आणि समर्पणाचा धागा परंपरेशी जोडून नवा समाज उभारण्याचा विचार कवीने मांडला आहे.

## ४.७ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

१. आपल्या देशाला सत्यनिष्ठ विचाराची गरज आहे. कारण सत्य विचार हे नेहमी तटस्थ व निरपेक्ष असतात.

२. माणूस आपल्या बुद्धीचा उपयोग व्यवहारात किंवा विचार करण्यास करीत नाही तर तो बुद्धीचा उपयोग तलवारीची स्तोत्रे गायला, धनाचा महिमा सांगायला आणि सत्ताधाऱ्यांचे गोष्ट गाण्यासाठी करतो.

३. लोकशाहीचे अधिष्ठान म्हणजेच बुद्धीचा वापर करणारा माणूस. बुद्धीमुळेच माणूस विचार करू शकतो आणि तीच त्याची शक्ती आहे. म्हणूनच बुद्धीचा वापर करणारा व्यक्तीच लोकनिष्ठ आहे आणि ही निष्ठत्तच लोकशाहीचे अधिष्ठान आहे.

४. आज श्रीमंत लोक संपत्तीच्या जोरावर लोकशाही विकत घेण्याचा प्रयत्न करतात तर सत्ताधारी स्वार्थाकरिता तिचा वापर करू पाहतात आणि शक्तिशाली लोकशक्तीचा वापर करू लोकशाहीला दुर्बल बनवू इच्छितात. त्यामुळे जोपर्यंत या शक्ती प्रभावी आहेत, तोपर्यंत खरी लोकशाही स्थापन होणार नाही.

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

१. मानवतेचा विचार मनामनांमधून वाहात राहो, मंदिर, मशीद, चर्च, गुरुद्वारा आदी धर्मस्थळांपेक्षा व धर्मापेक्षा माणूस महत्त्वाचा आहे. कर्म, विज्ञाननिष्ठा, संवाद, माणुसकी हा आमचा नवमार्ग असेल असा संदेश वरील कवितेमधून दिला आहे.

२. कर्मावरची अपार भक्ती, कष्टावरती निष्ठा व ऐक्यभावना ही धर्मापेक्षा महान असल्याचे कवीने म्हटले आहे.

३. विज्ञानाच्या वाटेवरून चालण्याचा विचार कवीने व्यक्त केला आहे. त्यामुळे खगोलशास्त्राचे ज्ञान हाती येईल असे कवीला वाटते.

४. पारंपरिक जात-धर्मकल्पनेला कवीने नकार दिला आहे. माणूस हीच जात आणि माणुसकी हाच धर्म असल्याचे कवीने स्पष्टपणे म्हटले आहे. त्याग आणि समर्पणाचा धागा परंपरेशी जोडून नवा समाज उभारण्याचा विचार कवीने मांडला आहे.

## ४.८ सरावासाठी उतारा

संघ लोकसेवा आयोगामार्फत भारतीय प्रशासकीय सेवेसाठी २०१६ साली घेण्यात आलेल्या मुख्य परीक्षेतील मराठी (आवश्यक) विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील उतारा नमुन्यादाखल पुढे दिला आहे.

'स्त्रियांनी अर्धे आकाश व्यापले आहे' असे म्हटले जाते किंवा त्याहीपेक्षा जास्त आपण वादाखातर म्हणू शकतो. असे असले तरी काळाच्या प्रत्येक टप्प्यात, प्रत्येक देशात, संस्कृती नि परंपरेत धर्म, जात, वर्ग, वर्ण आणि मान्यतांमधून आणि आमच्या वैविध्यपूर्ण भूतकाळात व वर्तमानात जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या तुलनेत स्त्री ही मागेच राहिली आहे. अन्न, शिक्षण, आरोग्य, काम करण्याची मुभा, विकास प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी, नेतृत्व, स्वप्न पाहणे नि त्यांच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करणे यांसारख्या गोष्टींत त्यांना प्राधान्य दिले जात नाही. निश्चितच, शतकापासून स्त्रिया जगातील सर्वांत जास्त अल्पसंख्याक ठरल्या आहेत.

पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रीला स्वयंपूर्ण व्यक्ती म्हणून मान्यता मिळाली नाही. त्यांच्याकडे कधीही स्वयंपूर्ण, स्वायत्त किंवा प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून पाहिले जात नाही. शिवाय सामाजिक व्यवहार, कायदेकानून किंवा सामाजिक संस्थांमधून समानतेची वागणूक दिली जात नाही. त्यांच्याकडे फक्त पुरुषाचे साधन म्हणजे प्रजोत्पादन, संगोपन, कामतृप्ती आणि कुटुंबाचे संगोपन करणारी व्यक्ती म्हणून पाहिले जाते. सांस्कृतिक पातळीवरही त्यांना मुलगी, पत्नी, आई या नात्यानेच मान्यता दिली जाते. नाही तर त्यांच्याकडे पतित म्हणून पाहिले जाते. एकटी राहणारी स्त्री तर या पुरुषसापेक्ष वर्तुळाच्या बाहेरच आहे. लग्नाचे वय झालेले असूनही ज्यांनी लग्न केले नाही किंवा ज्या विधवा आहेत, घटस्फोटित आहेत अगर स्वतंत्र राहात आहेत, अशा स्त्रियांचे पुरुषाधीन नसणे हे समाज स्वीकार करीत नाही. एवढेच नाही तर एखाद्या स्त्रीचा नवरा अपघातात किंवा आजाराने दगावला असेल तरी तिच्या स्वतंत्र जगण्याला समाज स्वीकार करीत नाही. कोणत्याही परिस्थितीत पुरुषाधीन नसलेल्या स्त्रीबद्दल पुरुषांच्या मनात राग असतोच.

विकसनशील राष्ट्रांमध्ये ६० ते ८० टक्के स्वयंपाक स्त्रियाच करतात आणि जगातील अर्ध्या अन्न-धान्यांवर त्यांचा अधिकार आहे. परंपरेने घराघरांतील स्वयंपाकाची जबाबदारीही त्यांच्यावरच आहे. असे असले तरी भारतात स्त्रिया कमी आणि शेवटी जेवतात आणि पुरेसे अन्न नसल्यास उपाशीही राहतात. काही वेळा घरात समानतेची वागणूक मिळत नल्यामुळे पुरेसे अन्न असूनही तिला हवे तितके खायला मिळत नाही. जगाला स्वतंत्रपणे सामोरे जाणाऱ्या एकट्या स्त्रीला तर सामाजिक पातळीवर पोट भरण्यासाठी किंवा जगण्यासाठी अनेक अडथळे पार करावे लागतात.

मुलांच्या/पुरुषांच्या तुलनेत मुलींची/स्त्रियांची संख्या कमी असलेल्या जगातील मोजक्याच देशांत भारताची गणना होते. लोकसंख्येत त्यांचे प्रमाण मागील एक शतकात कमी झाले आहे.

इ. स. २००१ च्या लोकसंख्येप्रमाणे १००० पुरुषांच्या सरासरीत स्त्रियांची संख्या फक्त ९३३ इतकी होती. मुलींना आरोग्य, आहार आणि जगण्याची मुलांसारखीच संधी देण्यात आली, तर लोकसंख्येत त्यांचे प्रमाण पुरुषांइतकेच होईल. उलट २००१ साली मुलांच्या/पुरुषांच्या तुलनेत मुलींची/स्त्रियांची संख्या ३ कोटी ५० लाखाने कमी होती. इ. स. २०११ च्या लोकसंख्येत सरासरीत किंचित वाढ झाली. ९३३ च्या ऐवजी मुलींचे प्रमाण ९४० इतके झाले. काळजीचे मुख्य कारण १ ते ६ वर्षे या वयोगटात मुलींचे हे प्रमाण घसरते आहे. इ. स. २००१ साली हे प्रमाण ९२७ होते. ते २०११ साली ९१४ इतके खाली आहे आहे. या आकडेवारीतून हेच सिद्ध होते की, सामाजिक-सांस्कृतिक आणि वाढत्या तंत्रज्ञानाच्या पातळीवर भेदाभेद केल्यामुळे मोठ्या प्रमाणात मुलींना/स्त्रियांना जगण्यापासून परावृत्त केले गेले. कदाचित हे प्रमाण भारतात नियमितपणे मुलींच्या/स्त्रियांच्या होणाऱ्या मृत्यूपेक्षा जास्त आहे.

अ) मुलींच्या/स्त्रियांच्या बाबतीत लोकसंख्येची आकडेवारी आपल्याला काय सुचविते?

इ) अन्न आणि स्त्रिया यांच्या संबंधातील असमतोलामध्ये कोणता उपरोध आहे?

उ) 'स्त्रिया अर्ध्याहून अधिक आकाश व्यापून राहिल्या आहेत' हे विवाद्य आहे, असे लेखकास का वाटते?

ऊ) पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रियांकडे कोणत्या भूमिकेतून पाहिले जाते?

ए) एकट्या स्त्रीचे अस्तित्व लेखकाला कोणत्या कारणास्तव असुरक्षित वाटते?

## ४.९ सरावासाठी कविता

### आजी

*आजी तुझ्या ओच्यात तोंड खुपसून ओक्साबोक्सी रडणारं माझं बालपण*
*तुझ्याबरोबर सृष्टिआड झालं, गेलं माझ्या आयुष्याचं केंद्र, माझं मर्म*
*तुझ्या पदराखाली झाकून ठेवलेलं, आता हे उरल्या आयुष्याचं रिंगण*
*मी किती दिवस वाहू? तुझी दीर्घायुषी आनुवंशिकता सांभाळत*
*वार्धक्याच्या क्रूर मातीची ही विसर्जनपूर्व खाट*
*माझ्या पाठीवर किती दिवस घेऊन फिरू?*
*आजी, तू मेलीस तेव्हा कोणी रडलं नाही कोणाचा गळा भरून आला नाही*
*दिसली तुझी तुटकी खाट परकर चोळ्या जस्ताची ताटली*
*जिच्यातील पोळी मांजराची पिलं ओढून खायची बिनधास्त*

*आणि गोखल्यात अनेक वर्षांच्या वैधव्याला साजेशी दाततुटकी लाकडी फणी*
*जिच्यातले न निघणारे शुभ्र धवल केस माझ्या केसांना घट्ट बिलगले.*
*आजी, एक्क्याण्णव वर्षांची तुझी गोवरी गेली राख होऊन आमच्या भडा कुटुंबाच्या भातचुलीत*
*तुझा तळतळाट लागो माझ्या अपेशी कपाळाला जे वेळोवेळी जीवघेण्याचा क्षुद्र मोहिमांपूर्वी*
*तुझ्या कष्टकरी पायांवर ठेवून ठेवून जी मी झिजवली मागत यश*
*जे तुला कधीच दिसलं नाही आणि हयाती राहो – एवढाच तुझा वर*
*जो मला मिळाला पण ज्याचं मोल हयातभर कळलं नाही.*

**– भालचंद्र नेमाडे**

## ४.१० सरावासाठी स्वाध्याय

१. आजी आणि नातू यांचे भावबंध कवितेमध्ये कसे प्रकटले आहेत?

२. आजीचे वार्धक्यातील जगणे कसे होते?

३. आजीने कवीस कोणता आशीर्वाद दिला आहे?

४. या कवितेतून कवीने कोणते सांस्कृतिक संचित व्यक्त केले आहे?

५. प्रस्तुत कवितेमध्ये कवी कोणाशी संवाद साधतो आहे?

## ४.११ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. **गवस राजन, शिंदे अरुण, पाटील गोमटेश्वर :** *''भाषिक सर्जन आणि उपयोजन''*, दर्या प्रकाशन, पुणे.

२. **लिगाडे आकाश :** *''अनिवार्य मराठी''*, माणदेश प्रकाशन, पुणे.

## ४.१२ उपक्रम

- निवडक गद्य उतारे व पद्य वेचे यांचा संग्रह करा व त्यांचा मथितार्थ स्वतःच्या शब्दांत लिहा.

❑ ❑ ❑